# उरुळी कांचन येथील निसर्गोपचार केंद्र आणि निसर्गोपचार

**मो. क. गांधी**

अनुवाद, संकलन आणि संपादन

**ब्रिजमोहन हेडा**

# उरुळी काचन येथील निसर्गोपचार केंद्र

## २६ जून १९४४ १८७. १. दिनशा के मेहता यांना पत्र

२६ जून १९४४

भाई दिनशा,

मी तुमच्याशी केवळ थोडक्यात बोलू शकलो. परंतु सर्व वेळ मी निसर्गोपचार केंद्राबद्दल विचार करत होतो. परिणाम असा आहे -

ही संस्था तुमची निर्मिती असल्यामुळे तिच्यात काही थोडीशी सुधारणा करून ती जशीच्या तशी राहिली पाहिजे. तिच्या कामाचे क्षेत्र वाढवू नका.

तुमच्या देखरेखीखाली एखाद्या खेड्याजवळ एखाद हजार एकर जागा विकत घ्या. तिथे रुग्णांकरिता आणि निरोगी लोकांनी निरोगी राहण्याकरिता पुरेशी जागा असली पाहिजे. गरीब आणि श्रीमंतानी एकाच प्रकारे राहायला पाहिजे, आणि त्यांच्याकरिता इथेच अन्न तयार झाले पाहिजे. जवळपास सर्व गोष्टी इथे पिकवल्या पाहिजे. माती, पाणी, प्रकाश, वारा आणि इथर याच्याद्वारे उपचार केला पाहिजे. अशा प्रकारे सर्व गोष्टींचे व्यवस्थापन केले पाहिजे की गरिबांना जे पाहिजे ते इथे मिळाले पाहिजे. तुम्हाला जसजसे कार्यकर्ते मिळत जातील तसतशा अशा नवीन संस्था निर्माण होत गेल्या पाहिजे. व्यवस्थापन असे असले पाहिजे की संस्थेला तिचा खर्च भागवता आला पाहिजे.

जनतेच्या हातात जोपर्यंत सत्ता येत नाही तोपर्यंत शासनाची मदत घेऊ नका.

यासंबंधात निसर्गोपचारकांची सभा बोलावा आणि त्यांच्याशी या प्रश्नाची चर्चा करा. त्यांच्यातून कार्यकर्ते घ्या.

ही आणि जी नवीन संस्था तयार होईल तिच्याकरिता मिळून एक न्यास असावा. विश्वस्तांमध्ये किमान तुम्ही, घनश्यामदास आणि मी असायला पाहिजे. तुम्हाला योग्य वाटेल

तितके शुल्क तुम्ही घेऊ शकाल. परंतु केवळ तुमच्या वैयक्तिक खर्चाकरिता ठरलेली रक्कम तुम्ही घ्याल. बाकी रक्कम तुम्ही संस्थेच्या खात्यात जमा कराल.

निसर्गोपचारात कोणकोणते विषय येतात ते ठरवा आणि त्यांची व्याख्या करा आणि त्यावर पुस्तके लिहा सामान्यज्ञानाची पुस्तके लिहिण्यात यावी.

यात भविष्यात वाट पाहण्यासारखी काहीही गोष्ट नाही. जोपर्यंत मी बाहेर आणि जिवंत आहे ही संस्था माझ्या देखरेखीखाली असेल. परंतु हीची योजना अशा प्रकारे आखली पाहिजे की माझ्या अनुपस्थितीतही ही सुरू राहिली पाहिजे.

याबद्दल घनश्यामदासशी मी आधीच चर्चा सुरू केली आहे. मी म्हणेन तसे करण्याचे त्यांनी कबूल केले आहे.

यावर विचार करा आणि कोणते बदल आवश्यक आहेत ते मला सांगा. ते तुम्ही पूर्ण मनमोकळेपणाने सुचवू शकता. यात जर तुमचे मन आणि हृदय असेल तरच हे साध्य करता येईल. यासंबंधात मी केवळ तुमचाच विचार करू शकतो. यासंबंधात माझी नजर तुमच्यावर आहे आणि तुम्हाला जर हे पटत नसेल तर मी हे विसरायला पाहिजे. या संस्थेकरिता जी मदत आवश्यक असेल ती मिळू शकेल असा माझा विश्वास आहे.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

------------------

खंड ८४

## ३ जुलै १९४४. १९८. दिनशा के. मेहता यांना पत्र

३ जुलै १९४४

भाई दिनशा,

मी घरे पाहिली. ती घाणेरडी आहेत. तुम्ही त्याकडे लक्ष दिले पाहिजे. रुग्णालयात माणूस घाणेरड्या खुर्च्या कशा सहन करू शकतो? रुग्णांनासुद्धा त्यांचा उपयोग कसा करावा हे शिकवले पाहिजे. तुमच्या सहाय्यकांनासुद्धा ही गोष्ट कळली पाहिजे. मजुरांची घरे मुळीच चांगली नाहीत. ती साधी असली पाहिजे, परंतु आपल्यासारख्या लोकांनाही राहता येईल अशी ती असली पाहिजे. संडासात किती वास येत होता ते तुम्ही पाहिले. यात सुधारणा करण्याकरिता फार खर्च येणार नाही. तुम्ही खाली आल्याबरोबर हे काम हातात घ्या. स्वयंपाकघातसुद्धा सुधारणेला वाव आहे. तुम्ही जोपर्यंत लक्ष घालणार नाही तोपर्यंत यात सुधारणा होणार नाही.

तुमच्या व्यवस्थापनाबद्दल मला अतिशय आदर वाटला. संपूर्ण संस्थेत शांतता आहे. कोणीही जोरात बोलत नाही. तुमचा आवाजसुद्धा मृदू आहे, आणि तुम्ही क्वचितच बोलता. सामान्यपणे बोलत असताना आपण ओरडतो.

नवीन योजनेबद्दल मी लवकरच लिहू शकेन अशी आशा आहे.

गुलबाईच्या (दिनशा के. मेहता यांची पत्नी) सेवेची अनेकदा आठवण येते.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

-----------------

# ११ ऑगस्ट १९४४. ३८४. देवदास गांधींना पत्र

सेवाग्राम,

ऑगस्ट ११, १९४४

चि. देवदास,

दिनशाजींबद्दल (दिनशा के. मेहता) लिहायचे मी विसरतच जातो. त्यांच्याकरिता लिहिलेल्या पत्राची प्रत कदाचित तुला मिळाली नसेल म्हणून त्या पत्राची प्रत मी सोबत जोडत आहे. या दिशेने आपण विश्वस्त संस्था स्थापन करायचा दस्तावेज तयार केला पाहिजे. (प्रस्ताविक निसर्गोपचार केंद्राचे; पाहा "महावीर प्रसाद पोद्दार यांना पत्र", १७ ऑगस्ट १९४४.) घनश्यामदास (घनश्याम दास बिर्ला), महावीर प्रसाद पोद्दार, तू आणि मी विश्वस्त असू. यासंबंधी घनश्याम दास तुझ्याशी बोलणार होता. तो जर बोलला नसेल तर सर्व काही ठरण्यापूर्वी त्याचा सल्ला घे. मला मसुदा पाठव. तो हिंदीत लिहिला जाऊ शकेल असा माझा विश्वास आहे. त्याची नोंदणी करावी लागेल.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

-----------------

# १७ ऑगस्ट १९४४. ४०६. महावीर प्रसाद पोद्दार यांना पत्र

१७ ऑगस्ट १९४४

महावीर प्रसाद,

माझ्या निसर्गोपचाराच्या योजनेबद्दल घनश्यामदासने तुम्हाला सांगितले की नाही मला माहीत नाही. माझ्या कल्पनेवर अंमल करता आला असता तर ईश्वराने मला जी प्रतिभा दिली आहे तिचा सर्वोत्तम क्षमतेने मी उपयोग करू शकलो असतो. दिनशाच्या आरोग्यभवनमध्ये (पुण्यात) असताना मला हा विचार सुचला होता. याच्या विकसनाचा पूर्ण इतिहास मी तुम्हाला सांगत बसणार नाही. इथे तर मी तुम्हाला केवळ थोडक्यात आजचे त्यांचे स्वरूप सांगणार आहे. कोणत्याही एखाद्या खेड्याजवळ एक हजार एकराची जागा निवडा. ही जमीन आरोग्यवर्धक भागात असेल तर अधिक चांगले. खेडे शहरापासून वा रेल्वेपासून फार दूर जरी असले तरी त्यामुळे फरक पडणार नाही. अशा दोन जागांची वा किमान एका जागेची निवड करा. जमीन जरी घेतलेली नसेल तरी तिचा नकाशा आजच तयार करून घ्या. योजना तयार करताना पुढील मुद्दे लक्षात ठेवा. योजनेत रस्त्याची आखणी करण्यात यावी. एक रस्ता रुंद असावा परंतु सध्याच मोटर जाऊ शकेल असा असण्याची आवश्यकता नाही. त्यावरून सध्या बैलगाड्या वा घोडागाड्याच चालतील. जागेवर ताज्या पाण्याची व्यवस्था असली पाहिजे. शारीरिक व्यायाम करता येईल असा तिथे एक चांगला पोहण्याचा तलाव आणि एक वा दोन व्यायामशाळांची व्यवस्था करता आली पाहिजे. तिथे फळझाडे, झाडे, भाजीपाला आणि अन्नधान्ये यांची लागवड करता आली पाहिजे. या जमिनीवर रुग्णांवर निसर्गोपचार पद्धतीने उपचार करता येणयाची सोय असली पाहिजे. निसर्गोपचारात मातीचा लेप लावण्याच्या विविध पद्धती, कटिस्नान, घर्षणस्नान, बाष्पस्नान तसेच जलोपचार, सूर्यस्नानासारखा प्रकाशोपचार, सूर्यनमस्कार (व्यायामाचा प्रकार, शब्दशः अर्थ सूर्याची पूजा) चंद्रप्रकाशाचा उपचार, चांदण्या पाहणे, कापड, पाणी आणि काचेची बाटली यांच्या

माध्यमातून इंद्रधनुष्याचे सर्व रंग पाहणे इत्यादींचा तसेच प्राणायाम वगैरे वायूच्या उपयारांचा यात समावेश असेल. सुरुवातीच्या काळात वीज वगैरे आधुनिक साहित्य इथे टाळण्यात येतील. अशा यांत्रिक साधनांचा किमान उपयोग करण्याच्या दृष्टीने तसेच ग्रामीण लोक सहजपणे उपयोग करू शकतील अशी साधने विकसित करू शकतील तसेच ग्रामीणांना त्यांच्या उपयोगितेचा शोध घेता यावा म्हणून असे केले जाईल. या संस्थेत केवळ आजाऱ्यांवरच उपचार केला जाणार नाही तर चांगल्या प्रकृतीच्या लोकांनाही निसर्गोपचाराचा कसा उपयोग होतो हे कळावे म्हणून त्यांच्यावरही इथे उपचार केला जाईल. अशक्त माणसात जोम आणि शक्ती आणण्याकरिता आपण प्रयत्न केला पाहिजे. याच दृष्टीने मुलांना या संस्थेत दाखल करून घेतले जाईल. निसर्गनियमाप्रमाणे त्यांची प्रकृती सुदृढ करण्याचा प्रयत्न केला जाईल. प्रकृतीबद्दल आपण विशेष काळजी घेतली पाहिजे. प्रकृती राखणे आणि तिच्यात सुधारणा करणे यावर विशेष भर दिला जाईल. अशा प्रकारे या संस्थेचा भर सर्व बाबतीत आत्मनिर्भर होण्यावर असेल आणि तिचा संदेश सर्वांकरिता असेल. ते गाव आदर्श गाव होईल. त्यात बुनियादी शिक्षणाची आणि खादीसारख्या ग्रामोद्योगाची सुविधा असेल. सुरुवातीला त्याकरिता निश्चितच भरपूर पैसा लागेल, परंतु याहून पैशाचा चांगला उपयोग मला माहीत नाही. याकरिता एक न्यास तयार केला पाहिजे. दिनशा मेहता, घनश्यामदास आणि मी विश्वस्त असावे असा विचार मी करतो आहे. घनश्यामदासने देवदास आणि तुमची भर घातली आहे. अशा अजून दोन नावांची भर घातली आहे. मी अर्थातच तुमच्या नावाचा विचार केला होता, परंतु हे तुम्हाला कितपत जुळेल याची मला कल्पना नव्हती. मी जर तुमचे नाव मान्य केले तर तुम्हाला तुमच्या इतर सर्व कामांमधून मोकळे व्हावे लागेल आणि या कामाला वाहून घ्यावे लागेल. घनश्यामदासचा निसर्गोपचारावर विश्वास आहे आणि या कामाकरिता एक तर तो देणग्या मिळवू शकतो वा स्वतःच देणगी देऊ शकतो. घनश्यामदासचा प्रतिनिधी होऊन देवदास हे काम करू शकेल. ही संपूर्ण कल्पना माझी असल्यामुळे मी मार्गदर्शक होईन. असे म्हणता येईल की गत ५० वर्षांपासून मी

निसर्गोपचाराचा भक्त आहे. दिनशा मेहताला आपल्या कल्पनेप्रमाणे पूर्णपणे काम करता यावे या अपेक्षेने उपक्रमाची कल्पना करण्यात आली आहे. आणि तुम्ही जर उर्वरित जीवन या प्रकल्पाला वाहून घेऊ शकत असाल तर तुम्ही या प्रकल्पात आलेले मला फार आवडेल. तुम्हाला जर ही संकल्पना आवडत असेल तर तुम्ही मला लवकरात लवकर भेटा.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

---------------------

खंड ८५

## ९ ऑक्टोबर १९४४. २५. दिनशा के. मेहता यांना पत्र

ऑक्टोबर ९, १९४४

चि. दिनशा,

तुला लिहिण्यात किती तरी दिवस निघून घेले. इतकी आठवण ठेव की -

१) तू माझ्यावर विसंबून राहू नये. मी तुरुंगात जाऊ शकतो वा मरू शकतो; वा इथून निघणे मला शक्य होणार नाही. माझ्याशिवाय हा प्रयोग करण्याची तुझ्यात जर हिंमत नसेल तर तो सुरू न करणे चांगले.

२) तुझ्यात जर हिंमत आणि आत्मविश्वास असेल तर तुला आवश्यक जमीन सापडू शकेल.

३) जमीन मिळाल्यानंतर तिचा नकाशा तयार कर आणि तिथे कोणकोणती व्यवस्था असेल ते सांग. तिच्या मधोमध वा एका कोपऱ्यात उपचार आणि प्रयोगाकरिता दालन असावे. त्यांच्या आजूबाजूला रुग्ण आणि आपल्या देखरेखीखाली सोपवलेल्या मुलांच्या राहण्याकरिता सुंदर झोपड्या असाव्या. आरोग्यगृहात फळे, फुले, धान्य आणि भाजीपाला यांचे पीक घेण्यात यावे. त्यात गुरांकरिता छपरी असावी आणि वाहनांची जाणेयेणे करता येईल असे रस्ते असावे. तिथे व्यायामशाळा, आंघोळ आणि इतर कामांकरिता टाके असावे. हे सर्व एका दिवसात निर्माण करता येत नाही. परंतु संपूर्ण प्रकल्प ५ वर्षात पूर्ण झाला पाहिजे. सुरुवातीपासून रुग्णांना दाखल करून घेतले पाहिजे. विजेचा वापर करावा लागणार नाही असा उपचार त्यांच्यावर करण्यात यावा उदाहरणार्थ गरम आणि थंड पाणी, वाफ, माती, आणि सूर्यप्रकाश यांचा त्यांच्यावर उपचार करण्यात यावा.

या सर्वांवर विचार कर. इतक्यातच आंध्रमधील एक निसर्गोपचारक माझ्याकडे आले होते. त्यांच्याजवळ ३० एकर जमीन आहे. आणि ते अदमासे ९० रुग्णांवर उपचार करतात. हे आरोग्यगृह पाहण्याकरिता तुला पाठवण्याची निश्चितच माझी इच्छा आहे. तू अशा संस्थांचा अभ्यास केला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------

# १९ ऑक्टोबर १९४४. ८७. दिनशा के. मेहता यांना पत्र

ऑक्टोबर १९, १९४४

चि. दिनशा

. . .

सोबत मी आंध्र प्रदेशातील निसर्गोपचार तज्ज्ञांची नावे आणि पत्ते पाठवत आहे. तुझ्याकरिता इतर नावांची आणि पत्त्यांची यादीही मी तयार करवून घेईन.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---------------

# २३ ऑक्टोबर १९४४. १०८. दिनशा के. मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

ऑक्टोबर २३, १९४४

चि. दिनशा.

मला तुझे विस्तृत पत्र मिळाले. न्यासपत्राचे काम सुरू असेल अशी आशा आहे. देवदास थोडा हळू आहे, परंतु मी त्याला त्याबद्दल विसर पडू देणार नाही.

तू उल्लेखिलेल्या अडचणींची मी काळजी करत नाही कारण आपली दोघांचीही काळजी घेण्याकरिता ईश्वर आहे. आपण स्वतःकरिता काहीही करत नाही, करतो काय? जमीन आणि प्रवासाच्या सुविधांबद्दल मी रामेश्वरदासला लिहीत आहे.

तुला माझे मागील पत्र मिळाले असेल अशी आशा आहे (पाहा “दिनशा मेहता यांना पत्र”, ऑक्टोबर ९, १९४४.).

आर्देशीर (दिनशा मेहता यांचा मुलगा.) दिवसेंदिवस काही प्रगती करत असेल याची खात्री आहे.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - तुझ्या औषधोपचाराकरिता तुला काही औषधांची भर घालायची आहे कायt? आवश्यक असेल तर ती आपण मिळवू शकू. तुझे गुजराती चांगले आहे.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# २३ ऑक्टोबर १९४४. ११२. रामेश्वरदास बिर्ला यांना पत्र

सेवाग्राम,

ऑक्टोबर २३, १९४४

भाई रामेश्वरदास,

गोदरेज फर्मची जमीन उपलब्ध आहे काय? जीवनलालची काय मदत होते? दिनशाचा शोध सुरू आहे. या दिवसात प्रवासाकरिता वाहन मिळणे कठीण झाले आहे. त्याबद्दल तुम्ही काही करू शकता काय? सेवाग्राम येथील बिर्ला हाऊसचा सूतिकागृह म्हणून उपयोग व्हावा असा प्रस्ताव आहे. त्यात काही अडचण आहे काय?

आशीर्वाद,

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

सेवाग्राम,

नोव्हेंबर १४, १९४४

चि. दिनशा,

तुझे पत्र. जमिनीबद्दल आपण फार घाई करू नये. गोष्टींना वेळ होत आहे परंतु त्यातही ईश्वराचा हात आहे. माझ्या उपवासाबद्दल तुला काय म्हणायचे आहे ते मी समजू शकतो. त्याबद्दल अजून काहीही निश्चित नाही. आणि तो चाळीस दिवसांचा की कमी काळाचा राहील हेही ठरलेले नाही. मी प्रार्थना करतो आहे. मी उपोषण करीन तेव्हा तुझ्याबरोबर असलेले मला आवडेल, परंतु या उपोषणाबद्दल काहीही ठरवणे माझ्या हाती नाही. अखेरीस मला माझी सोय पाहण्याची तरी संधी आहे काय? हा उपवास मी काय माझ्या प्रकृतीस्वास्थ्याकरिता करतो आहे? हे ईश्वराचे काम आहे. त्याला मला जिथे न्यायचे असेल तिथे तो मला नेईल. कृपाकरून माझ्याकरिता कोणतीही तयारी करू नको. तू तुझ्या कामात पूर्णपणे व्यस्त राहा, हीच तुझी सर्वात जास्त मदत असेल. तुमच्यापैकी कोणीही काळजी करू नये. आर्देशीर प्रगती करत राहो. त्याला अजून पुढे जायचे आहे. त्याला अहिंसा शिकवा.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------

# ९ जानेवारी १९४५. ४४१. घनश्यामदास बिर्ला यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी ९, १९४५

चि. घनश्याम,

. . . .

दिनशाबद्दलचे दस्तावेज तयार होणे आवश्यक आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. सी. डब्ल्यू. ८०६३. घनश्याम दास बिर्ला

-------------

# ५ जानेवारी १९४५. ४२९. देवदास गांधी यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी ५, १९४५

चि. देवदास,

. . . .

डॉ. दिनशांचा न्यास अजून अस्तित्वात आलेला नाही. तो लगेच आकार घेईल तर चांगले होईल. त्याने भरपूर वेळ घेतला आहे.

. . .

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------

# २१ जानेवारी १९४५. ५१२. दिनशा के. मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी २१, १९४५

चि. दिनशा,

मला तुझे पत्र मिळाले. मी चांगला आहे. माझी शक्ती वाचवण्याकरता मी दिवसा मौन ठेवतो.

दुधाच्या उपचारपद्धतीवर अजून माझा विश्वास बसलेला नाही. परंतु मला जर तुझ्याबरोबर राहण्याची संधी मिळाली तर तुझ्या निरीक्षणाखाली मी तो उपचार निश्चितच घेईन. सध्या तर येथून निघण्याची इच्छाच होत नाही. मी येथील कामही करतो आहे. ईश्वर जेव्हा मला तिथे आणील तेव्हा मी येईन.

आपल्यात काही मतभेद आहेत. परंतु मला त्याची काळजी वाटत नाही. मी तुझ्याकडून काम घेऊ शकतो इतके माझ्याकरिता पुरे आहे.

देवदासला तू लिहिलेले पत्र तीक्ष्ण आहे, परंतु तू ते लिहिले हे योग्य केले. तू काय केले इतकेच तू लिहू शकला असता. खरे म्हणजे तू लिहिण्याआधीच मी त्याला लिहिले होते (पाहा "देवदास गांधी यांना पत्र", जानेवारी १, १९४५.).

न्यास तयार होईल. परंतु तो तयार होवो वा न होवो आपल्याला जर पुरेशी जमीन मिळाली तर आपण काम सुरू करण्याचा विचार करू शकतो. आणि तसाही तू काही रिकामा बसलेला नाही.

आर्देशीर चांगली प्रगती करत असेल. जिना साहेबांबद्दल तुला काय म्हणायचे आहे ते मला कळते.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता,

६, टोडीवाला रोड,

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------

# २४ जानेवारी १९४५. ५२६. घनश्यामदास बिर्ला यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी २४, १९४५

चि. घनश्यामदास,

. . . .

दिनशाकडून सविस्तर कळण्याची वाट कशासाठी पाहायची? तुझ्या म्हणण्याचा आशय तर तोच होता. केवळ काही हजार रुपयांची तर ही गोष्ट आहे. त्यात जितकी वाढ करायची असेल तितकी होऊन जाईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. सी. डब्ल्यू. ८०६४. सौजन्य - घनश्यामदास बिर्ला. शिवाय प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

--------------

# ३ फेब्रुवारी १९४५. ५८४. दिनशा के. मेहता

सेवाग्राम,

फेब्रुवारी ३, १९४५

चि. दिनशा,

मला तुझे पत्र, धनादेश, फोटो इत्यादी मिळाले. माझ्या यानंतरच्या पत्राबरोबर मी फोटो परत करीन. कोणीही मला अडवत नाही. माझाच दुग्धोपचारावर विश्वास बसत नाही. बाकी गोष्टींबाबत मी तुझ्याशी सहमत आहे.

आपल्यामध्ये जे मतभेद आहेत ते काळानुसार आपोआपच निवळतील.

घनश्यामने दिलेली देणगी काहीही झाले तरी निनावी राहिली पाहिजे. तिची आपण एखाद्या नावानेसुद्धा ओळख देणार नाही. त्या आकड्यापर्यंत पोहोचेपर्यंत तो देणे सुरू ठेवणार आहे. ही रक्कम आपल्याकडे एकदम येणार नाही. हिशोबात अर्थातच लहान लहान रकमा दिसतील. मला भिवंडीवाला वा फक्रियार जंग अशा नावांचा समावेश करणे आवडेल. याबद्दल मी तुला लिहीन. आता या क्षणी अजून काही लिहिण्याचा मी विचार करू शकत नाही. मला वाटते की मी थोडे जास्तच काम करून राहिलो आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# ३ फेब्रुवारी १९४५. ५८४. दिनशा के. मेहता

सेवाग्राम,

फेब्रुवारी ३, १९४५

चि. दिनशा,

मला तुझे पत्र, धनादेश, फोटो इत्यादी मिळाले. माझ्या यानंतरच्या पत्राबरोबर मी फोटो परत करीन. कोणीही मला अडवत नाही. माझाच दुग्धोपचारावर विश्वास बसत नाही. बाकी गोष्टींबाबत मी तुझ्याशी सहमत आहे.

आपल्यामध्ये जे मतभेद आहेत ते काळानुसार आपोआपच निवळतील.

घनश्यामने दिलेली देणगी काहीही झाले तरी निनावी राहिली पाहिजे. तिची आपण एखाद्या नावानेसुद्धा ओळख देणार नाही. त्या आकड्यापर्यंत पोहोचेपर्यंत तो देणे सुरू ठेवणार आहे. ही रक्कम आपल्याकडे एकदम येणार नाही. हिशोबात अर्थातच लहान लहान रकमा दिसतील. मला भिवंडीवाला वा फक्रियार जंग अशा नावांचा समावेश करणे आवडेल. याबद्दल मी तुला लिहीन. आता या क्षणी अजून काही लिहिण्याचा मी विचार करू शकत नाही. मला वाटते की मी थोडे जास्तच काम करून राहिलो आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# ५ फेब्रुवारी १९४५. ६००. घनश्यामदास बिर्ला यांना पत्र

सेवाग्राम,

फेब्रुवारी ५, १९४५

चि. घनश्यामदास,

दिनशाने दे[वदासला मसुदा पाठवला आहे. त्याची इच्छा आहे की भिवंडीवालांना ज्यांनी त्याला मदत केली आहे आणि ज्यांची निसर्गोपचारावर श्रद्धा आहे त्यांचा आणि शिवाय फक्रियार जंगचा, जे निझामचे अर्थमंत्री होते आणि ज्यांचा अशा उपचारांवर विश्वास आहे त्यांचा, विश्वस्तात समावेश करावा. मला वाटते की त्यात काही हानी नाही. बाकी मुद्द्यांबद्दल मी दिनशाला लिहीत आहे. तुम्हाला जर हे पत्र देवदासला दाखवायचे असेल तर मी एका पत्राने काम भागवीन.

. . . .

आशीर्वाद,

बापू

बिर्लाजी,

न.दि.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# २० फेब्रुवारी १९४५. ६८२. दिनशा के. मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

फेब्रुवारी २०, १९४५

चि. दिनशा,

तुझे असमाधान अर्थातच माझ्या लक्षात आले. परंतु मला वाटत होते त्याहूनही तू जास्त दुःखी आहेस असे सुशीलाबेनने माझ्या लक्षात आणून दिले. याकरिता काहीही कारण नाही. काहीही बिघडलेले नाही. या विषयाची चर्चा झालेली आहे आणि ती चांगल्याकरिताच आहे. आपल्याला जमीन पाहावी लागेल. जे काही घडले त्यामुळे काहीसा उशीर होईल इतकेच. आपण मुंबईत भेटत आहो. तिथे जर आपली बोलणी फिस्कटणार असतील तर तसे होऊ दे. आपण कुणालाही बळजबरीने ठेवू शकत नाही. आणि बळजबरीने कोणतेही काम करवून घेण्यात कोणती शोभा असेल? हे फार कठीण काम आहे. प्रामुख्याने हे माझे काम असले तरी मी मुळीच घाबरलेलो नाही. तू जे निर्माण केले आहे ते अर्थातच सुरू राहील. मला त्यात विशेष रस नाही. परंतु आंध्रमध्ये जे करण्यात येत आहे त्यात मला निश्चितच रस आहे कारण ते गावातील कामासारखे आहे. त्यातही दोष असल्याचे आता मला कळते. परंतु तो शोध जर बरोबर असेल तर ती फार मोठी गोष्ट आहे. तू इतक्या घाईने निष्कर्ष काढला हे मला आवडले नाही. असेच करत राहशील तर तू कोणतेही मोठे काम करू शकणार नाही. खेड्यांची सेवा तर तू करूच शकणार नाही.

लक्षात ठेव की आजपासून सेवाग्रामची जमीन तुझ्या ताब्यात असल्यासारखी आहे. ती फेकून देण्याकरिता नाही. तो प्रयोग सरळसरळ माझ्या देखरेखीखाली होणार आहे. तू ते काम समजून घे आणि ते नावारूपाला आण. असे झाले तरच तू प्रगती केली असे म्हणता येईल. ते काहीही असले तरी तुला याकरिता साधेपणाचा अवलंब करावा लागेल. मला वाटते की

बंगलोरचा उपक्रम चांगला नाही. आपण पुण्यातील उपक्रमही बंद करायला नको. पुण्याचा उपक्रम बंद केल्याशिवाय बंगलोरचा उपक्रम उभारता येऊ शकत नाही.

गुलबाईने मला लिहिले पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता,

तोडीवाला रोड,

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------

# १४ नोव्हेंबर  १९४४. २४९. दिनशा के. मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

नोव्हेंबर १४, १९४४

चि. दिनशा,

तुझे पत्र. जमिनीबद्दल आपण फार घाई करू नये. गोष्टींना वेळ होत आहे परंतु त्यातही ईश्वराचा हात आहे.

. . . .

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------

# ३ फेब्रुवारी १९४५. ५८४. दिनशा के. मेहता

सेवाग्राम,

फेब्रुवारी ३, १९४५

चि. दिनशा,

मला तुझे पत्र, धनादेश, फोटो इत्यादी मिळाले. माझ्या यानंतरच्या पत्राबरोबर मी फोटो परत करीन. कोणीही मला अडवत नाही. माझाच दुग्धोपचारावर विश्वास बसत नाही. बाकी गोष्टींबाबत मी तुझ्याशी सहमत आहे.

आपल्यामध्ये जे मतभेद आहेत ते काळानुसार आपोआपच निवळतील.

घनश्यामने दिलेली देणगी काहीही झाले तरी निनावी राहिली पाहिजे. तिची आपण एखाद्या नावानेसुद्धा ओळख देणार नाही. त्या आकड्यापर्यंत पोहोचेपर्यंत तो देणे सुरू ठेवणार आहे. ही रक्कम आपल्याकडे एकदम येणार नाही. हिशेबात अर्थातच लहान लहान रकमा दिसतील. मला भिवंडीवाला वा फक्रियार जंग अशा नावांचा समावेश करणे आवडेल. याबद्दल मी तुला लिहीन. आता या क्षणी अजून काही लिहिण्याचा मी विचार करू शकत नाही. मला वाटते की मी थोडे जास्तच काम करून राहिलो आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# ५ फेब्रुवारी १९४५. ६००. घनश्यामदास बिर्ला यांना पत्र

सेवाग्राम,

फेब्रुवारी ५, १९४५

चि. घनश्यामदास,

दिनशाने दे[वदासला मसुदा पाठवला आहे. त्याची इच्छा आहे की भिवंडीवालांना ज्यांनी त्याला मदत केली आहे आणि ज्यांची निसर्गोपचारावर श्रद्धा आहे त्यांचा आणि शिवाय फक्रियार जंगचा, जे निझामचे अर्थमंत्री होते आणि ज्यांचा अशा उपचारांवर विश्वास आहे त्यांचा, विश्वस्तात समावेश करावा. मला वाटते की त्यात काही हानी नाही. बाकी मुद्द्यांबद्दल मी दिनशाला लिहीत आहे. तुम्हाला जर हे पत्र देवदासला दाखवायचे असेल तर मी एका पत्राने काम भागवीन.

. . . .

आशीर्वाद,

बापू

बिर्लाजी,

न.दि.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# २० फेब्रुवारी १९४५. ६८२. दिनशा के. मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

फेब्रुवारी २०, १९४५

चि. दिनशा,

तुझे असमाधात अर्थातच माझ्या लक्षात आले. परंतु मला वाटत होते त्याहूनही तू जास्त दुःखी आहेस असे सुशीलाबेनने माझ्या लक्षात आणून दिले. याकरिता काहीही कारण नाही. काहीही बिघडलेले नाही. या विषयाची चर्चा झालेली आहे आणि ती चांगल्याकरिताच आहे. आपल्याला जमीन पाहावी लागेल. जे काही घडले त्यामुळे काहीसा उशीर होईल इतकेच. आपण मुंबईत भेटत आहो. तिथे जर आपली बोलणी फिस्कटणारच असतील तर तसे होऊ दे. आपण कुणालाही बळजबरीने ठेवू शकत नाही. आणि बळजबरीने कोणतेही काम करवून घेण्यात कोणती शोभा असेल? हे फार कठीण काम आहे. प्रामुख्याने हे माझे काम असले तरी मी मुळीच घाबरलेलो नाही. तू जे निर्माण केले आहे ते अर्थातच सुरू राहील. मला त्यात विशेष रस नाही. परंतु आंध्रमध्ये जे करण्यात येत आहे त्यात मला निश्चितच रस आहे कारण ते गावातील कामासारखे आहे. त्यातही दोष असल्याचे आता मला कळते. परंतु तो शोध जर बरोबर असेल तर ती फार मोठी गोष्ट आहे. तू इतक्या घाईने निष्कर्ष काढला हे मला आवडले नाही. असेच करत राहशील तर तू कोणतेही मोठे काम करू शकणार नाही. खेड्यांची सेवा तर तू करूच शकणार नाही. लक्षात ठेव की आजपासून सेवाग्रामची जमीन तुझ्या ताब्यात असल्यासारखी आहे. ती फेकून दण्याकरिता नाही. तो प्रयोग सरळसरळ माझ्या देखरेखीखाली होणार आहे. तू ते काम समजून घे आणि ते नावारूपाला आण. असे झाले तरच तू प्रगती केली असे म्हणता येईल. ते काहीही असले तरी तुला याकरिता साधेपणाचा अवलंब करावा लागेल. मला वाटते की बंगलोरचा उपक्रम चांगला नाही. आपण पुण्यातील उपक्रमही बंद करायला नको. पुण्याचा उपक्रम बंद केल्याशिवाय बंगलोरचा उपक्रम उभारता येऊ शकत नाही.

गुलबाईने मला लिहिले पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता

तोडीवाला रोड,

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------

# ६ मे १९४५. ५५१. घनश्यामदास बिर्ला यांना पत्र

महाबळेश्वर,

मे ६, १९४५

चि. घनश्यामदास,

मी असे ऐकले आहे की तू १२ तारखेला जाण्याचा निर्णय घेतला आहे (घनश्यामदास बिर्ला यांनी इंग्लंड आणि अमेरिकेत जाण्याची योजना आखली होती; शिवाय पाहा "घनश्यामदास बिर्ला यांना तार", मे ८, १९४५.).

भाई दिनशा इथे आहेत. त्यांना सर्व अटी मान्य आहेत; परंतु त्यांची अट आहे की दस्तावेजावर सह्या झाल्यानंतर विश्वस्त गाव निसर्गोपचाराकरिता किमान पाच वर्षांकरिता उपलब्ध राहिले पाहिजे. त्यानंतर प्रयत्नात अपयश आले तर न्यासाच्या चल वा अचल संपत्तीचा उपयोग शैक्षणिक कार्याकरिता करता येईल.

मला वाटते की आपण याच्याशी सहमत झालो पाहिजे.

तुझी प्रकृती चांगली असेल.

१२ तारीख योग्य आहे ना?

आशीर्वाद,

बापू

ता. क. - तारेने उत्तर दे.

मूळ हिंदीवरून. सी. डब्ल्यू. ८०७०. सौजन्य घनश्यामदास बिर्ला

---------------------

# १४ मे १९४५. ६४९. डॉ. दिनशा के. मेहता यांना पत्र

मे १४, १९४५

चि. दिनशा,

घनश्यामदासला कलकत्ता येथे तू जे पत्र पाठवले त्याचे हे उत्तर आहे - “दिनशा न्यासाबद्दलचे तुमचे पत्र मिळाले. मला वाटते की त्यांची मागणी अगदी योग्य आहे, परंतु ही बाब मी तुमच्यावर सोडतो. (हा परिच्छेद इंग्रजीत आहे; शिवाय पाहा “घनश्यामदास बिर्ला यांना पत्र”, मे ६, १९४५ आणि “घनश्यामदास बिर्ला यांना पत्र”, मे १०, १९४५.)

यामुळे तुम्ही सुचवलेल्या उद्दिष्टांसंबंधीचे आवश्यक बदल केल्यानंतर माझा विचार पक्वासांना (मंगलदास पक्वासा, मुंबई येथील सॉलीसिटर, अध्यक्ष मुंबई विधिमंडळ १९३७-४७, १९४७ साली मध्यप्रांत आणि वऱ्हाडचे राज्यपाल नियुक्त) न्यासपत्र तयार करण्याकरिता सांगण्याचा आहे. तुमचे रुग्ण असलेले मावळणकर यानी मला तुमच्या प्रशासकीय क्षमतेबद्दल लिहिले आहे. त्यांची तक्रार न्याय्य आहे..(पाहा पुढील विषय)

तुम्हा तिघांनाही आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारलाल

-----------------

# १४ मे १९४५. ६५०. डॉ. दिनशा के. मेहता यांना पत्र

मे १४, १९४५

चि. दिनशा,

हे पत्र काळजीपूर्वक वाच. तुला बहुतांश वेळ पुण्यात राहावे लागेल. माझ्याकरिता जर तू पुण्याबाहेर राहशील तर ते मला मुळीच आवडणार नाही. घाण, निष्काळजीपणा, दुर्लक्ष, मालीश इत्यादींची काळजी घे. रुग्णांना तू कठोर वाटू नये. प्रत्येक प्रकारच्या आरोपाला उत्तर असते. आपले काम सार घेणे आणि बाकीचे टाकून देणे आहे कारण तो कचरा असतो. कागदपत्र परत पाठव.

आशीर्वाद,

बापू

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारलाल

----------------

# १४ मे १९४५. ६५१. बालकृष्ण मावळणकर यांना पत्र

महाबळेश्वर,

मे १४, १९४५

चि. बालकृष्ण,

तू लिहिले हे चांगले केले. मी सर्व काही वाचले. मी डॉ. दिनशांना कागदपत्रे पाठवली आहेत. तोच एकमेव मार्ग आहे. काही बदल आवश्यक असतील तर अशाच प्रकारे मी करायला लावू शकतो. तुझ्या पत्रात कोणताच उद्धटपणा नाही. तुझी इच्छा असेल तर तू अजून लिहू शकतो. मी तुला परिणाम कळवीन.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. १२५३

--------------

# १ जून १९४५. ५९. मंगलदास पक्वासा यांना पत्र

पाचगणी,

जून १, १९४५

भाई मंगलदास,

आशा आहे की तुमची प्रकृती एकदम चांगली असेल. सोबत मी निसर्गोपचार केंद्राच्या विश्वस्त संस्थेच्या घटनेसंबंधीची कागदपत्रे पाठवत आहे. त्यात आवश्यक बदल करण्यात आले आहेत. परंतु मी ते वेगळे टंकलिखित करून घेऊन पाठवले आहेत. त्यांचा संस्थेच्या घटनेत अंतर्भाव करा आणि उपस्थित विश्वस्तांची त्यावर सही घ्या. घनश्यामदास जेव्हा इथे येईल तेव्हा तो त्यावर सही करील. घनश्यामदासचे माझ्याशी जेव्हा बोलणे झाले तेव्हा उद्दिष्टांबद्दलची चर्चा झाली नव्हती. यामुळे मी त्याची परवानगी घेतली. तुम्हाला जर ते पाहायचे असेल तर मी ते तुम्हाला पाठवीन. या न्यासाच्या दस्तावेजाचे हिंदीत भाषांतर केले जावे अशी माझी इच्छा आहे आणि त्याची नोंदणी हिंदी दस्तावेजाधारे झाली तर ते अधिक चांगले होईल. तुम्ही जर तिथे त्याचा अनुवाद करून घेऊ शकत नसाल तर त्याची अंतिम प्रत तयार करून ते माझ्याकडे परत पाठवा, मी करवून घेईन. मी त्याकरिता जितका वेळ घेतला तितका जर तुम्ही घेतला नाही तर मला आवडेल.

आशीर्वाद,

बापू

श्री मंगलदास पक्वासा ,

डुंगरसिंह रोड, मलबार हिल, मुंबई

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------------

# १ जून १९४५. १७१. डॉ. दिनशा के. मेहता यांना पत्र

पाचगणी,

जून ११, १९४५

चि. दिनशा,

वनमाला, मनू आणि आभा यांना  पाठवता येईल काय? यांच्यापैकी कोण यायला तयार होईल हे अजून स्पष्ट नाही.

तुझ्यावर १,००० रुपयांचे ओझे कशामुळे आले? तेथील परिस्थिती अजूनही नाजूक आहे काय?

तुला मनःशांती आहे की नाही? जिवंत प्राण्यांवर प्रयोग करणे आणि ग्रंथी, यकृत इत्यादी भाग खाणे यांना तू निसर्गोपचाराचा भाग समजतो. हे तर माझ्या मते फार झाले. याचा विचार करावा लागेल. तू याचे उत्तर दिले नाही तरी काही हरकत नाही. तू केवळ यावर विचार केला पाहिजे. मी चांगला आहे. मंगलदास पक्वासा सर्व काही करत आहेत. कदाचित ते इथे येतील. काल मी जाऊन जमीन पाहिली. पंडितनी शिफारस केलेली जमीन मी पाहू शकलो नाही, आणि माझा पाहण्याचा विचारही नाही. गुलबेन मला दररोज आंघोळ घालत असते.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता आरोग्य भवन,

स्टोशनजवळ, पुणे शहर

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# १२ जून १९४५. १८५. दिनशा के. मेहता यांना पत्र

पाचगणी,

जून १२, १९४५

चि. दिनशा,

खरे सांगायचे तर तुला हे कागदपत्र पाठवण्याची आवश्यकता नाही. (हा संदर्भ निसर्गोपचार केंद्राच्या विश्वस्त संस्थेच्या घटनेचा आहे, पाहा पुढील विषय.) परंतु वेळ असल्यामुळे आणि तुला आणि मला याबद्दल नंतर विचार करावा लागू नये म्हणून मी हे पाठवत आहे.

यातील तिसरे कलम, ज्यावर मी खूण केली आहे तो जसाच्या तसा ठेवला पाहिजे कारण विश्वस्त मंडळाच्या व्यवस्थापनाविषयीची तरतूद नीट असली पाहिजे असे मी लिहिले आहे.

बाकी सर्व सुचवल्याप्रमाणे आहे. तुझ्या पत्राबरोबर पक्वासांचे पत्र आणि न्यासाची घटना परत पाठव. मी असेही लिहिले आहे की न्यासाच्या घटनेच्या हिंदुस्तानीतील भाषांतराला वेळ लागणार असेल तर त्याकडे दुर्लक्ष करण्यात यावे.

. . . .

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता,

आरोग्य भवन, स्टेशनजवळ, पुणे शहर

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# १२ जून १९४५. १८६. मंगलदास पक्वासा यांना पत्र

जून १२, १९४५

भाई मंगलदास पक्वासा,

तुम्ही लगेच मसुदा पाठवला आणि डॉ. दिनशा के. मेहता यांनी त्यावर नजर टाकावी म्हणून मी तो त्यांच्याकडे पाठवला आहे. व्यवस्थापकमंडळाबद्दल सांगायचे तर मी तुम्हाला आधीच पाठवलेल्या मूळ मसुद्यातील तरतूद कायम ठेवणे चांगले होईल असे मला वाटते. ते जोपर्यंत जिवंत आहेत आणि काम करण्याकरिता सक्षम आहेत तोपर्यंत ते व्यवस्थापकमंडळात असले पाहिजे हा यामागील उद्देश आहे. याच उद्देशाने आपण इतका त्रास घेत आहो.

तिसरा परिच्छेद तुम्ही दुरुस्त केल्याप्रमाणेच राहिला पाहिजे.

हिंदुस्तानीत भाषांतर करण्याकरिता तो अलाहाबादला पाठवणे त्रासदायक होईल. कल्पना करा की आपल्याला त्याचे गुजरातीत भाषांतर करायचे असले तर? (पाहा मागील विषय)

सध्या तरी मी तुम्हाला इथे येण्याचा त्रास देणार नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. ४६९१. सौजन्य - मंगलदास पक्वासा

--------------------

# २५ जून १९४५. २८७. मंगलदास पक्वासा यांना पत्र

सिमला,

जून २५, १९४५

भाई मंगलदास पक्वासा,

सोबत मी दिनशाचे न्यासपत्र पाठवत आहे. ते तपासल्यानंतर त्याचे केवळ इंग्रजीत भाषांतर करा. त्याच्या हिंदी भाषांतराचे ओझे मी तुमच्यावर टाकणार नाही. तुम्हाला त्यातील मजकूर पटत असेल तर तो दस्तावेज मातृभाषेत वा राष्ट्रभाषेत तयार करा. (शिवाय पाहा “मंगलदास पक्वासा यांना पत्र”, जून १२, १९४५ आणि याआधीचा विषय.) मी तुम्हाला भरपूर त्रास देत आहे. माझा निरुपाय आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती मायक्रोफिल्मवरून. सी. डब्ल्यू. ४६९२. सौजन्य - मंगलदास पक्वासा

-------------------

# ३ ऑक्टोबर १९४५. २३९. दिनशा के. मेहता यांना पत्र

ऑक्टोबर ३, १९४५

चि. दिनशा,

१. चिकित्सालयात जी धूळ आहे ती सर्व स्वच्छ करण्यात यावी. पाणी कुठूनही गळायला नको. निसर्गोपचारात स्वच्छतेला पहिले स्थान दिले पाहिजे. यामुळे खर्च वाढणार असेल तर वाढू दे.

२. मी चिकित्सायाबद्दल गंभीर विचार केला आहे आणि दररोज करत असतो. तू ते चालवले पाहिजे याबद्दल माझी खात्री पटली आहे. आपल्याजवळ न्यास आहे ही चांगली गोष्ट आहे परंतु ही लहान गोष्ट आहे. विद्यापीठ जर निर्माण व्हायचे असेल तर त्याची सुरुवात चिकित्सालयापासूनच होईल. हे जर इतर कोणाला सोपवले तर विद्यापीठ होऊ शकणार नाही. हे सोडणे म्हणजे आपला व्यवसाय सोडणे. विद्यापीठ निर्माण करण्याकरिता तू सर्व निसर्गोपचारकांना भेटायला पाहिजे, त्यांच्याशी मैत्री केली पाहिजे व त्यांचे सहकार्य मिळवले पाहिजे. जोपर्यंत तू ही गोष्ट करत नाही तोपर्यंत सर्व व्यर्थ आहे. जगात सर्व गोष्टी अशाच निर्माण झाल्या आहेत. पैशाने विद्यापीठ निर्माण होत नसतात.

३. गावांकरिता काम करणे ही अगदी वेगळी गोष्ट आहे. सध्या तू केवळ गावांमध्ये काम करू शकत नाही हे मला दिसते. या दोन्ही गोष्टी तू एकटा सांभाळू शकत नाही. काही काळ गावातील काम लांबले तर मला त्याचे काही वाटणार नाही. त्याकरिता न्यास बनवणे चांगले होईल. मला वाटते की हे काम ठोस पायावर आणि विचारपूर्वक उभारले पाहिजे. एकदा सुरुवात केल्यानंतर यातून माघार घेणे वांछनीय होणार नाही. या तीन मुद्द्यांवर विचार करण्याकरिता उद्या रात्री आपण साडेआठ वाजता बसू. विचारविनिमय जर पूर्ण झाला नाही तर आपल्याला परत बसावे लागेल.

. . . .

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल प्रतीवरून. सौजन्य - प्यारेलाल

# २६ ऑक्टोबर १९४५. ४५६. घनश्यामदास बिर्ला यांना पत्र

ऑक्टोबर २६, १९४५

चि. घनश्यामदास,

मला जहांगीर पटेलचे (निसर्गोपचार केंद्राचे एक विश्वस्त) पत्र मला मिळाले. ते लिहितात की केवळ शाळेची इमारत सोयीची होईल. तिथे अजून काही सोयी कराव्या लागतील. तिथे विजेची आणि पाण्याचीही व्यवस्था करावी लागेल. शाळेची इमारत पूर्णपणे तयार होईल तेव्हाच आपण तिथे जावे म्हणून दिनशा सुचवतात. असे केले तर याकरिता नऊ महिने लागतील. मला वाटते की आरोग्यमंदिरात आपण ताबडतोब जावे आणि तिथे काम सुरू करावे, आणि शाळेची इमारत तयार झाली की मग आपण तिथे जावे. हे शक्य आहे की नाही हे तुम्ही लोकांनी ठरवायचे आहे. आरोग्यमंदिरातसुद्धा पाण्याचे अधिक पाईप लागतील. कदाचित विजेबद्दलही काही करावे लागेल. जलचिकित्सेकरिता भरपूर पाणी लागत असते. शाळेची इमारत घेण्यात मला काही अडचणी दिसतात. तिथे जर शाळा ठेवायची असेल तर एकाच इमारतीत दोन संस्था ठेवणे कठीण होईल. माझ्या कल्पनेने जर आकार घेतला तर सध्याची इमारतही पुरणार नाही. निसर्गोपचार चिकित्सालयात गरिबांनासुद्धा प्रवेश दिला पाहिजे आणि त्यांच्याकरितासुद्धा निसर्गोपचार चिकित्सालय चालवण्यात मला रस वाटला पाहीजे अशी माझी कल्पना आहे. मी योजिल्याप्रमाणे शाळेच्या इमारतीतूनच गावातील लोकांचीही सेवा करता येईल असे मला वाटते. हा सर्व विचार करा आणि काय करणे सर्वात चांगले राहील ते मला कळवा.

मी तुला सरदारचाही दृष्टिकोन सांगतो. त्यांचे म्हणणे आहे की या कामात मी इतक्या जास्त प्रमाणात रस घ्यायला नको. दिनशांना जर आर्थिक मदतीची आवश्यकता असेल तर ती त्यांना मिळवून द्यावी आणि तिथेच थांबावे. या वेळी याहून मी अधिक पुढे गेलो तर अखेरीस एखाद वेळी दिनशा तुटण्याची वेळ येऊ शकते अथवा माझी निराशा होऊ शकते आणि. त्यामुळे दिनशा आज माझ्यावर जे आत्यंतिक प्रेम करतात ते नाहीसे होऊ शकते. मला अशी कोणतीही

भीती वाटत नाही. माझ्या मते दिनशा तुटू शकतो परंतु माझ्याबद्दलचे त्याचे प्रेम कधीही वितळून जाऊ शकत नाही. मला माहीत आहे की जेव्हा पैशाचा प्रश्नही निर्माण झालेला नव्हता आणि मी त्याला ओळखतही नव्हतो तेव्हाही तो माझ्यावर इतकेच प्रेम करत होता. परंतु सरदारना मानवस्वभावाचे ज्ञान आहे आणि त्यांना माझ्याबद्दल किती तरी काळजी वाटते; यामुळे त्यांचा दृष्टिकोन तुझ्यासमोर ठेवणे आणि तू वस्तुनिष्ठ दृष्टीने निर्णय घेणे मला आवश्यक वाटले. मी नाशिकचा पर्याय दिलेला असल्यामुळे इतर कोणत्याही पर्यायाचा विचार करू नये असे कृपाकरून समजू नको. निसर्गोपचाराचे काम फार महत्त्वाचे आहे. ते जर योग्य पद्धतीने हाताळले तर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. आज त्याचा आवाका आपल्या लक्षात येऊ शकत नाही. या साच्यात दिनशा किती प्रमाणात बसू शकेल याचाही विचार केला पाहिजे. निर्णय घेण्यापूर्वी मला भेटून चर्चा करणे आवश्यक वाटत असेल आणि येण्याइतका वेळ असेल तर येऊन जा. परंतु या बाबतीत पत्रव्यवहारानेच काम भागू शकते असे वाटत असेल तर तू येण्याची आवश्यकता नाही. या कामात मला जरी इतका रस वाटत असला तरी या बाबतीतही मी अनासक्त भावनेने वागतो असे समज. मला जर १२५ वर्ष जगायचे असेल तर माझ्यातील वस्तुनिष्ठेचा भाव म्हणजे अनासक्त भाव दिवसेंदिवस इतका परिपूर्ण होत गेला पाहिजे जितका मानव प्राण्याकरिता शक्य आहे. असे घडू शकते की नाही अथवा कधी तरी असे घडेल की नाही हे मला माहीत नाही. हे कळून घेण्याची तरी इच्छा मी का ठेवावी? माझ्या दृष्टीसमोर हा आदर्श मला ठेवू दे आणि माझे जे कर्तव्य असेल ते मला करू दे. या आदर्शापर्यंत पोहोचणे कठीण आहे हे मला माहीत आहे. परंतु कठीण काम हाती घेण्यातच माझे जीवन गेलेले आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. सी. डब्ल्यू. ८०७३. सौजन्य घनश्यामदास बिर्ला

--------------------

# ४ नोव्हेंबर १९४५. ५४६. घनश्यामदास बिर्ला यांना पत्र

पुणे,

नोव्हेंबर ४, १९४५

चि. घनश्यामदास,

दिनशाची तुझ्या भावांशी चर्चा झाली. परिणामी आता त्याची नाशिकला जाण्याची इच्छा नाही. (शिवाय पाहा "वृत्तपत्रांना वक्तव्य", नोव्हेंबर २१, १९४५.) यामुळे नाशिकचा विचार रद्द झाला आहे असे समजून तुम्ही पुढे जाऊ शकता. इमारतीबद्दल सांगायचे तर आपण त्याच दिशेने जात राहू. दिनशाला अजूनही नाशिकला जाण्याची इच्छा आहे असे आढळले तर मी त्याच्याशी बोलेन. एखादी इमारत वा जमीन उपलब्ध आहे काय हे तेव्हा आपण पाहू.

आम्ही सर्व मुंबईला १९ तारखेला पोहोचू आणि वर्ध्याकरिता २० तारखेला निघू.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. सी. डब्ल्यू. ८०७४. सौजन्य - घनश्यामदास बिर्ला

----------------------

# ६ नोव्हेंबर १९४५. ५५७. दिनशा के. मेहता यांना पत्र

पुणे,

नोव्हेंबर ६, १९४५

चि. दिनशा,

काल मी तुला लिहू शकलो नाही परंतु मी सर्व गोष्टींवर विचार करत राहिलो. न्यासांतर्गत तुझ्या इच्छेप्रमाणे तुला सर्व काही करता येईल परंतु आपण तो सध्याच सिंहगडला सुरू करू शकत नाही असे मी म्हणेन. परंतु तिथे काही तरी सुरू करण्याबद्दल मी म्हणालो असेन तर ती गोष्ट वेगळी. मुंबईचे केंद्र बंद करावे लागेल. तुला माझा सल्ला आहे की उत्पन्नाचे अतिरिक्त साधन म्हणून ते तू वेगळे राहू दे. ते न्यासाखाली असणे मला परवडू शकत नाही. तुझ्या वैयक्तिक खर्चाचे आकडे मला अजून मिळालेले नाहीत. तुझ्या राहण्याची आणि खाण्याची व्यवस्था करून वर दरमहा ५०० रुपये दिले तर निसर्गोपचारातून वेगळा पैसा मिळवण्याची इच्छा तू ठेवू नये. परंतु याबद्दल तू तुझ्याच सदसद्विवेकबुद्धीला विचारायला पाहिजे. ही जर कडू गोळी असेल तर तू मुंबईलाच राहायला पाहिजे आणि तुझा व्यवसाय सुरू ठेवायला पाहिजे. तू जर ते न्यासात ठेवले तर ते कदाचित लवकरच बंद केले जाईल. तू येथील खर्चाची मुळी काळजी करायला नको. ते मी पाहीन. मी अशी कल्पना करतो की डिसेंबरच्या शेवटापर्यंत इथे एकही श्रीमंत रुग्ण राहणार नाही. मी ज्या लोकांना पाठवीन केवळ त्यांच्याचकरिता ही सोय असेल.

ज्या माणसाला व्यवस्थापनाकरिता मी इथे पाठवीन तो इथेच राहील. स्वयंपाकघरात मांस शिजवले जाईल, परंतु ते केवळ माजीकरिता आणि तुझ्या कुटुंबातील सदस्यांना जे लोक भेटायला येतील त्यांच्याकरिता, रुग्णांकरिता नाही. माझा धर्म मला सांगतो की निसर्गोपचारात मटन, यकृत यासारख्या गोष्टींना कोणतेही स्थान नाही. या गोष्टींनी कोणालाही लाभ झाला नाही वा होऊ शकत नाही असे मला सुचवायचे नाही. मला इतकेच म्हणायचे आहे की माझ्या दृष्टिकोनातील निसर्गोपचारात यांचा समावेश करता येऊ शकत नाही. सध्या मी ज्या भागात

राहतो तो सगळा भाग तुझ्याकरिता आणि गुलबाईकरिता राखून ठेवला जाईल आणि माझ्याकरितासुद्धा तो रिकामा करण्याकरिता कधीही सांगितले जाणार नाही. मी जेव्हा केव्हा येईन तेव्हा मी वरच्या माळ्यावर राहू शकेन. सध्या सरलाबेन ज्या खोलीत राहतात त्या खोलीतसुद्धा राहणे मला कठीण जाणार नाही. पाऊस आला तर मी न्हाणीघरात राहू शकतो. परंतु गुलबाईकरिता बांधलेला भाग मी व्यापणे कोणत्याही परिस्थितीत मुळीच न्याय्य होणार नाही.

न्यासाकरिता 'साहित्याची' यादी तयार करण्यात यावी. भीमनाग येईपर्यंत बहुधा ती करता येणार नाही. तसे तर माझ्याबरोबर इथे किती तरी लोक आहेत. त्यांच्या मदतीने मीसुद्धा ही यादी सहजपणे तयार करू शकतो. परंतु काम करून घेण्याची तुझी पद्धत अगदी वेगळी आहे. मला ती पसंत नाही. तसे पाहिले तर अशा अनेक काही गोष्टी आहेत की ज्या मला आवडत नाहीत, परंतु मी त्यांच्याशी जुळवून घेतो. तू जर जबाबदारी घेतली तर येथील बऱ्याच गोष्टींचा निपटारा होऊ शकतो. काम करायची तयारी असणारे रुग्ण मिळत नाहीत हे मला चूक वाटते. वनमाला किती तरी काम करू शकते. सर्व रुग्ण काही अंथरुणाला खिळलेले नसतात. यापुढे केवळ गरीब लोकांना प्रवेश देण्यात यावा. जर कोणी श्रीमंत रुग्ण असेल तर तो मी आणलेला असेल आणि तोही काही विशिष्ट उद्देशाने. मी त्याच्याकडून पैसेही घेऊ शकेन आणि माझी इच्छा असेपर्यंत तो थांबेल. गुलबाईलासुद्धा तू चांगल्या प्रकारे प्रशिक्षित केले नाही ही गोष्ट मला बोचते.

इथे कोणालाही प्रशक्षण मिळाल्यासारखे दिसत नाही. तुला जे तीन वर्षांचे प्रशिक्षण आवश्यक वाटते तेसुद्ध इथे कोणालाही देण्यात आलेले दिसत नाही. हे बरोबर नाही परंतु याबाबतीत तू जे सहजपणे करू शकशील त्यावर मी समाधान मानेन. असे केल्याने सर्व काही बदलेल आणि म्हणून मी इतक्या मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप करणे बरोबर नाही असे जर तुला वाटत असेल तर तू मला काढून टाकू शकतो. मला जर गोष्टीत गुंतवण्यात आले तर गोष्टी जशा आहेत तशाच मी राहू देईन. मला चोहोकडून पत्रे येत आहेत. ते याकरिता मदत करायला तयार आहेत वा यात सहभागी होण्याकरितासुद्धा तयार आहेत. मी कबूल करतो की त्यांतील काही

फार चांगले आहेत. परंतु जोपर्यंत मला तू निसर्गोपचाराचा भक्त वाटतो आणि तुझ्याबरोबर काम करण्याकरिता कोण योग्य आहे हे तू ठरवशील तोपर्यंत दुसऱ्या कोणत्याही निसर्गोपचारकाला घेणे मला मान्य नाही. मी जर ही कार्यशाळा चालवली तर तिचा बाहेरच्या हजारो लोकांना लाभ होईल. याकरिता मला मोठ्या संख्येत कार्यकर्ते लागतील. असे जेव्हा होईल तेव्हाच आपण विद्यापीठासारख्या गोष्टीचा विचार करू शकू.

यावर थोडा विचार कर. मी या पत्राची प्रत ठेवलेली नाही. वाचल्यानंतर ही मला परत कर. मी त्याची प्रत तयार करवून घेईन आणि नंतर तुला ती परत करीन. सकाळी मी अंथरुणात असताना माझ्या मनात जसजसे विचार येत गेले तसतसे मी ते लिहीत गेलो.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

------------------

# ६ नोव्हेंबर १९४५. ५६०. एम. एस. केळकर यांना पत्र

नोव्हेंबर ६, १९४५

भाई केळकर,

तुमचे पत्र मिळाले. निसर्गोपचार केंद्र उघडण्याबद्दल काहीही सांगता येत नाही, अजून त्याचा मी विचारसुद्धा केला नाही. मला अनेक वर्षांपासून असे केंद्र उघडण्याची इच्छा आहे पण ती इच्छाच राहिलेली आहे. तुमचे विचार असे आहेत की तुम्ही कोणत्याही संस्थेत काम करू शकत नाही. माझ्यासारखा माणूस तुमच्याकडून काम घेऊ शकेल ही वेगळी गोष्ट आहे. तुमच्याकरिता वेगळी संस्था असली पाहिजे. परंतु असे कधीही होणार नाही हे मला माहीत आहे. यामुळे जसे सुरू आहे तसे सुरू राहू द्या आणि जी कोणती सेवा आपण करू शकतो ती करत राहू या. मला दुसरा कोणताही मार्ग दिसत नाही.

आशीर्वाद,

मो. क. गांधी

एम. एस. केळकर द्वारा सहस्रबुद्धे, विणाई सिक्षक,

मोहता मिल,

अकोला

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# १४ नोव्हेंबर १९४५. ६३१. दिनशा के. मेहता यांना पत्र

पुणे,

नोव्हेंबर १४, १९४५

चि. दिनशा,

माझा विचारविनिमय तर सुरूच असतो. ही संस्था तर तू डिसेंबर ३१ला बंद केली पाहिजे. जानेवारी १ पासून ही संस्था गरिबांची झाली पाहिजे आणि श्रीमंतांची राहायला नको. आजपर्यंत तू (तुझ्या रुग्णालयात) श्रीमंताना जागा दिल्यानंतरच गरिबांना घेण्याचा आग्रह ठेवला गेला आहे. परंतु जे खरोखर गरीब आहेत ते तुझ्यापर्यंत क्वचितच पोहोचू शकतील आणि कोणी जरी पोहोचू शकला तरी श्रीमंत लोक ज्या दराने पैसे देतात त्याच दराने त्यांना पैसे द्यावे लागतील, यामुळे तर ते पूर्णपणे भरडलेच जातील. १ जानेवारीपासून गरिबांना जागा मिळाल्यानंतरच श्रीमंतांचा क्रम लागेल आणि तेही ते गरिबांप्रमाणे राहू शकणार असतील तर. आज संस्थेत जी साफसफाई आहे त्यापेक्षा जास्त चांगली साफसफाई असली पाहिजे. साफसफाई ठेवण्याकरिता पैशाची आवश्यकता नसते, परंतु त्याकरिता सावधगिरी, प्रेम, सत्य आणि ज्ञान यांची आवश्यकता असते. यामुळे साफसफाईच्या कामाला आजपासूनच सुरुवात केली तर चांगले होईल, परंतु कोणीही कोणाचेही ऐकायला तयार नसल्यामुळे आणि प्रत्येकजण मालक असल्यामुळे हे काम कठीण होईल असे वाटते. कोणी जर कामात रस घेत असेल तर तो तसे केवळ तुला खुष करण्याकरिता करत असतो. यामुळे आजपासूनच मी वर उल्लेख केलेल्या लोकांमधूनच कोणी कामाला सुरुवात केली तरच कामात प्रगती होऊ शकेल. ही गोष्ट जर तुला भावत नसेल तर आपण दोघांनाही नंतर पश्चात्ताप करावा लागेल कारण स्वच्छता हा ईश्वराचा भाग आहे असा माझा विश्वास आहे. "ईश्वरानंतर दुसरे स्थान स्वच्छतेला आहे" या म्हणीत बदल करून मी म्हणेन की "स्वच्छताच ईश्वर आहे". परंतु अंतर्बाह्य स्वच्छता असेल तरच आपल्याला तो ईश्वरी गुण म्हणता येईल.

१ जानेवारीपासून नामपटल लागले पाहिजे. ते मराठी, देवनागरी, उर्दू आणि इंग्रजीत लिहिलेले असले पाहिजे. माझ्या मनात मी याचे निश्चित रूप तर तयार केले नाही, परंतु ते काहीसे असे असेल - "इथे गरिबांवर निसर्गोपचार केला जाईल". हेल्थोटेरियम हे नाव काढून टाकण्यात यावे. कोणत्याही नावाची आवश्यकता नाही. ते गरीब संस्थेकरिता योग्य दिसत नाही. खरे म्हणजे ते कोणाकरिताही योग्य नाही. इंग्रजी संस्कृतीत ही गोष्ट "व्हल्गर - फालतू" समजली जाईल.

आपण कोणतीही विदेशी गोष्ट, ती पेटेंट घेतलेली असो वा नसो, वापरू नये. गरीब लोकांना इंग्लंडमध्ये तयार झालेली इसबगोलची बाटली, रॉबिन्सन बार्ली, क्वेकर ओट, सॅनटोजेन, हॉर्लिक्स, माल्ट घातलेले दूध वा मर्कचे ग्लुकोज परवडू शकत नाही. आपण इथल्या लोकांना या गोष्टी घेण्याकरिता शिकवू शकत नाही, इथे सरदार, एखादा संस्थानिक वा मी असा कोण आहे याला महत्त्व नाही. आपण इथे सॅनटोजेन तयार केले पाहिजे. हॉर्लिक्स आणि माल्ट घातलेले दूध यासारख्या गोष्टी आपण इथे बनवल्या पाहिजे, आणि ग्लुकोजसारखेही काही तरी इथे उपलब्ध असले पाहिजे.

आजपर्यंत ज्या प्रकारे स्वयंपाकघर चालत होते त्याप्रकारे चालू नये. आज तुझ्याजवळ राजालाही खाऊ घालता येईल अशी साधने आहेत. परंतु उद्या ही सर्व साधने तुला सोडून द्यावी लागतील. इथे ज्या मोकळेपणाने फळे इत्यादींचा उपयोग होतो त्याने मी दुखावतो. हे बदलले पाहिजे. आपण गूळ आणि निंबाने काम भागवू शकत नाही काय?

तू लिहिण्याची सवय विकसित केली पाहिजे. तुझी गुजराती सदोष असली तर असू दे, ती चांगल्या भाषेत अभिव्यक्त करता येऊ शकते. इथून लहानलहान पुस्तिका तयार करण्यात आल्या पाहिजे. तुला या गोष्टींकडे किती तरी लक्ष द्यावे लागेल. दरमहा ४-५ हजार रुपये कमावून तू हे सर्व कसे करशील हे मला कळत नाही. परंतु लक्षात ठेव की तू जर हे सर्व करणार नाही तर विद्यापीठ तुझ्या स्वप्नातच राहील. माझ्यात काम करण्याची आणि योजना आखण्याची असीम क्षमता आहे, परंतु विद्यापीठ तयार करण्याकरिता लागणारा जादूई ताईत माझ्याजवळ नाही. आणि याकरिता आवश्यक असलेले ज्ञानही मला नाही. यामुळे मी असहाय आहे. मी जर

असहाय नसतो तर मी माझे स्वतःचेच निसर्गोपचार केंद्र काढले असते आणि तिथून सर्व कामकाज चालवले असते. परंतु ईश्वराने मला ते दिले नाही. या बाबतीत मी उत्साही होतो, आणि अजूनही अतिशय उत्साही असल्यामुळे मी तुला बिलगतो आहे, परंतु तू आहेस बादशाह. तू तुझे ज्ञान वाढू देऊन राहिलेला नाही. हा तुझ्या मार्गात फार मोठा अडथळा आहे. तू यावर मात करशील तेव्हाच तुझे स्वप्न वास्तवात येईल. हे शक्य नाही म्हणून तुझे अंतःकरण तुला सांगत असेल तर तू आताही मला सोडू शकतो. मला वाईट वाटणार नाही. मी हे सर्व काम कसे करीन याची सरदारना काळजी वाटते. त्यांची काळजी निरर्थक आहे कारण कोणीही माझ्यावर बळजबरी करून राहिलेला नाही. हे काम करण्याकरिता ईश्वरच माझ्यावर दडपण आणत आहे. त्याला जर हे काम थांबवायचे असेल तर तो तसे करील. परंतु तुझी माझ्यावर श्रद्धा आहे असे दिसत असल्यामुळे मी माझ्या असहायतेबद्दल तुला सावध केले पाहिजे. आणि तुझ्यात आढळणाऱ्या मर्यादा आणि दोष यांच्याबद्दल मी तुला सावध केले पाहिजे. अधिक जेव्हा मला सुचेल.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# १८ नोव्हेंबर १९४५. ६५८. घनश्याम दास बिर्ला यांना पत्र

पुणे,

नोव्हेंबर १८, १९४५

चि. घनश्यामदास,

नाशिकला जमीन मिळावी म्हणून तू शक्य ते सर्व प्रयत्न केले याबद्दल मला किंचिंतही संशय नाही. दिनशा तऱ्हेवाईक परंतु फार चांगला, मोठ्या मनाचा आणि साधासरळ माणूस आहे. निसर्गोपचाराबद्दल बोलायचे तर तो एकच असा माणूस आहे की ज्याच्यावर माझे डोळे खिळलेले आहेत. मी त्याच्या गुणांना प्रोत्साहन देत राहणार आहे आणि जर मी असे करू शकलो तर त्यामुळे रुग्णांना बरीच मदत होईल. यामुळे मी जेव्हा पाहिले की तो स्वतःच नाशिकला जाण्याकरिता उत्सुक नाही तेव्हा मी तो विषय सोडून दिला. त्याचबरोबर संस्थेचे नवीन सत्र इथूनच सुरू करावे आणि ती गरिबांकरिता चालवावी असा निर्णय मी घेतला. आतापर्यंत केवळ श्रीमंत आले आणि गरीब मागे राहिले. परंतु आता ज्या श्रीमंतांना इथे यायचे असेल त्यांना गरिबांनंतर यावे लागेल. श्रीमंतांना गरिबांइतक्याच सेवासुविधा मिळतील. त्याचबरोबर स्वच्छतेचे नियम शक्य तितक्या काटेकोरपणे पाळण्याचाही प्रयत्न केला जाईल. यात काही शंका नाही की हे काम कठीण आहे. माझ्या ढळत्या वयात मी अशा कामात रस घ्यायला नको. माझ्यात जी गोष्ट आतापर्यंत सुप्तावस्थेत होती ती आता जाणीवपूर्वक कोणताही प्रयत्न न करता जागी झाली आहे. मी त्या गोष्टीला आता कसा अडवू शकतो? ईश्वराची इच्छा असेल तेच होईल. ज्या संस्थेचे तुम्ही विश्वस्त आहा ती संस्था सध्यापुरती बंद करण्यात आली आहे. ती जर इथल्या कामकाजातून अस्तित्वात येणार असेल तर येईल. जे काही होईल ते सर्व दृष्टींनी योग्य असेल. मला जर नाशिकला जावे लागले तर मी तुला लिहीन वा इथल्या संस्था चालवण्याकरिता काही पैसे लागले तर मी तुला लिहीन. सध्या मी केवळ पाहतो आहे. माझ्याजवळ काही पैसा पडलेला

आहे. त्याने मी काम भागवीन. व्यवस्थापन दिनशाच्या हातात राहणार नाही ही न्यासाची अट असल्यामुळे जबाबदारी माझी आहे असे तू म्हणू शकतो.

तू माझ्याकडे पाठवलेले शिवनाथ सिंगचे पत्र मी वाचले आहे. त्याने माझ्या मनावर चांगला ठसा उमटला नाही. त्यांनी भरपूर लांबलचक लिहिले आहे. (यात निसर्गोपचाराची चर्चा करण्यात आली होती. घनश्यामदासनी त्यांना लिहिले होते की तुमचे पत्र गांधीजींना पसंत आले तर ते तुम्हाला बोलावतील.) मी त्यांना थोडक्यात लिहिणार आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. सी. डब्ल्यू. ८०७५. सौजन्य - घनश्यामदास बिर्ला

------------------------

# ६७०. वृत्तपत्रांना वक्तव्य

नोव्हेंबर २१, १९४५

मी पुण्याला जाऊन राहण्याचा आणि पुणे वा नाशिक येथे एका मोठ्या भूखंडावर निसर्गोपचार केंद्र उघडण्याविषयी ज्या बातम्या प्रकाशित झाल्या आहेत त्यांचे खंडन करण्याचा मी जाणूनबुजून प्रयत्न केला नाही. ज्याप्रमाणे वर्तमानपत्रात अनधिकृतपणे प्रकाशित होणाऱ्या अनेक बातम्या चुकीच्या असतात त्याचप्रमाणे हीही बातमी चुकीची आहे. यामुळे माझ्यापेक्षाही जनतेला नेहमीच मला फार मोठी किंमत चुकवावी लागलेली आहे. मणभर अफवांमध्ये कणभर सत्य असते. डॉ. दिनशा मेहतांना मी जेव्हापासून ओळखत होतो त्याच्या आधीपासून ते मला ओळखत होते, आणि मी त्यांना ओळखू लागल्यापासून ते मला आवडतात. मी जितक्या निसर्गोपचारकांना ओळखतो त्यांच्या आधीपासून मी स्वतः एक निसर्गोपचारक आहे. मी ओळखत असलेल्या निसर्गोपचारकातून डॉ. दिनशा मेहतांनी मला सर्वाधिक प्रभावित केले आहे, आणि तेही माझ्याप्रमाणेच स्वप्न पाहणारे आहेत. त्यांना निसर्गोपचाराचे विद्यापीठ हवे आहे; आणि मलासुद्धा. त्यांचा पुण्याला आणि सिंहगडला जो कारभार होता तो त्यांनी एका न्यासाला सुपूर्द केला आहे  न्यासाच्या अनुसूचीत दिलेली असल्याप्रमाणे या कारभाराची अंदाजे किंमत ५०,००० रुपये आहे. (१९४५साली, जवळपास ८० वर्षांपूर्वी) मी स्वतः या न्यासाचा न्यासी झालो आहे. या न्यासाचे इतर दोन न्यासी डॉ. मेहता आणि निसर्गोपचारात रस असलेले श्री जहांगीर पटेल आहेत. आतापर्यंत डॉ. मेहतांची संस्था श्रीमंत माणसांकरिता होती आणि मग जर काही गरीब लोकांना सहजपणे घेता आले तर ते घेत होते. सर्व रुग्ण घरी राहणारे असत.

येत्या १ जानेवारीपासून ही संस्था गरिबांच्या सेवेकरिता समर्पित केली जाईल. श्रीमंतांना तेव्हाच घेतले जाईल जेव्हा ते गरिबांबरोबर राहू शकतील, आणि गरिबांना या संस्थेत ज्या सोयीसवलती मिळतात त्याहून अधिक सोयीसवलतींची अपेक्षा ते करणार नाहीत. अशा प्रकारच्या संस्थेत स्वच्छतेचा जो स्तर असतो त्याहून कमी प्रतीचा स्तर इथे राहणार नाही

याबद्दल शाश्वती दिली जात आहे, परंतु विलासाला त्यात स्थान नसेल. रुग्णालयात भरती होणाऱ्या आणि बाहेर राहणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या रुग्णावर इथे उपचार केला जाईल.

बिर्ला कुटुंबियांना माझ्यात चार वर्षांपासून रस होता. संस्थेकरिता आवश्यक असेल तितकी जमीन आणि इमारती देण्याकरिता ते तयार होते. परंतु डॉ. दिनशा मेहतांना नाशिकची कल्पना मनापासून पसंत नव्हती, नाही तर पुण्यात सुरू असलेल्या न्यासात डॉ. दिनशा मेहतांच्या व्यवसायांचा समावेश करण्याकरिता मी तायर होतो. मी हे ओझे सहन करू शकत नव्हतो. यामुळे काहीही झाले तरी नाशिकचा प्रकल्प सध्या तरी सोडाला लागला आहे. (शिवाय पाहा "घनश्यामदास बिर्ला यांना पत्र", नोव्हेंबर ४, १९४५ आणि "घनश्यामदास बिर्ला यांना पत्र", नोव्हेंबर १८, १९४५) अजूनही तांत्रिक भागाचा जोवर संबंध आहे डॉ. मेहता एकमेव निदेशक राहतील. ही संस्था जर वाढणार असेल तर तिला गरिबांचे आशीर्वाद पाहिजे, श्रीमंतांची आर्थिक मदत पाहिजे, खऱ्या निसर्गोपचारकांचे सहकार्य पाहिजे आणि वैद्यकीय क्षेत्रातील लोकांची सहानुभूती पाहिजे. गरिबांच्या गरजांच्या दृष्टीने सध्याची तिची जागा फार लहान आहे. याशिवाय ही संस्था सध्याच्या जागेवर राहील की नाही हे पट्टेदारावर अवलंबून आहे.

द हितवाद, नोव्हेंबर २२, १९४५

---------------------

# २७ नोव्हेंबर १९४५.६९४. जहांगीर पटेल यांना पत्र

नोव्हेंबर २७, १९४५

भाई जहांगीर,

तुम्ही तिथे पोहोचला हे चांगले झाले. हिशेब ठेवण्याकरिता इथून कोणाला तरी पाठवावे असा मी विचार करतो आहे आणि भरपूर विचार करतो आहे. आंम्हांला तुमच्याकडून भरपूर मदत हवी आहे. आई चांगली असेल अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

जहांगीर पटेल,

पटेल ब्रदर्स, १० चर्चगेट, फोर्ट, मुंबई

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# २८ नोव्हेंबर १९४५. ७०५. दिनशा के. मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

नोव्हेंबर २८, १९४५

चि. दिनशा,

मला तुझे आणि जहांगीरजींचेही पत्र मिळाले. मला तुम्हांला काही सूचना करण्याची इच्छा आहे परंतु तसे मी वेळ मिळेल तेव्हाच करीन. सध्या मी इतकेच सांगेन. जे लोक स्वच्छतेच्या कामात रस घेत आहेत त्यांना पूर्ण प्रोत्साहन द्या. स्वतःचे काम करत असतानासुद्धा याकडे तू पूर्ण लक्ष दिले पाहिजे. खुर्च्या, टेबल इत्यादी सर्व साहित्य विकून टाकायचा निर्णय तू आधीच घेतला असशील. तू ते मुंबईला नेऊन विकले तर त्याची किंमत तुला मिळू शकेल वा मला सांगितले तर त्याकरिता मी शक्य ती व्यवस्था करीन. आपण ते अगदीच कवडी किंमतीने विकणार नाही.

भाई मुन्नालाल तिथे सहा वा सात दिवसात येणार आहे. तो साफसफाईच्या कामात भाग घेईल. मला वाटते की तो हिशोब ठेवू शकेल आणि तुझ्याकरिता बाजारहाटही करू शकेल. त्याला या तीन गोष्टी चांगल्या येतात आणि यापूर्वीही त्याने या गोष्टी केलेल्या आहेत. मला माहीत आहे की श्रीयुत मनगे हिशोब ठेवण्याचे आणि बाजारहाटाचे काम करत असतात. त्यांना या कामापासून पूर्णपणे मुक्त ठेवण्याचा माझा विचार आहे. त्यांनी इतर काही कामाकरिता स्वतःला तयार ठेवले पाहिजे असे मला वाटते. त्यांनी निसर्गोपचारक व्हावे. काही अभ्यासही केला पाहिजे. माझ्या अनुपस्थितीत मुन्नालालने येऊ नये वा तुझी इतर काही योजना असेल तर तू आश्रमाला तार करू शकतो. आपल्याला जी गोष्ट १ जानेवारीला सुरू करायची आहे (निसर्गोपचार केंद्र) तिची सुरुवात आपण शक्य तितक्या लवकरात लवकर केली पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

# ५ डिसेंबर १९४५. ७३९. शांतिलाल देसाई यांना पत्र

डिसेंबर ५, १९४५

चि. शांतिलाल,

तुझे पत्र मिळाले. तुझी एक टिपणी माझ्या फाईलमध्ये ठेवलेली आहे. वेळ मिळेल तेव्हा वाचून मग ती परत करता यावी म्हणून ती ठेवलेली आहे. दुसरी एक टिपणी मी आधीच वाचली आहे परंतु ती कुठे आहे हे मला आठवत नाही. ती हरवली नाही. परंतु ती तुला लवकरात लवकर पोहोचली पाहिजे याच्याशी मी सहमत आहे. या बाबतीत थोडा शिथिलपणा झाला याबद्दल मला खेद होतो आणि हे कसे झाले हे मला माहीत नाही.

तू मला मणिभाईबद्दल माहिती दिली हे चांगले केले. माझी त्यांच्याशी चर्चा झाली. आता त्यांच्यावर माझी नजर आहे. मला त्यांना दिनशाच्या चिकित्सालयात गुंतवण्याची इच्छा आहे. तिथे त्याला जो अनुभव मिळेल त्याचा गावांमध्ये लाभ होईल असा माझा विश्वास आहे. याशिवाय त्याला माझ्याबरोबर काही वेळ घालवायचा असल्यामुळे तो माझ्या देखरेखीखाली वेळोवेळी राहत जाईल आणि यामुळे त्याला मी अधिक चांगला ओळखूही शकेन.

आशा आहे की तुझे तिकडे सर्व काही चांगले सुरू असेल.

श्री शांतिलाल देसाई,

अनाविल विद्यार्थी आश्रम,

नानापुरा, सुरत

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# ६ डिसेंबर १९४५. ७४९. मुन्नालाल गं. शाह यांना पत्र

सोदेपूर,

डिसेंबर ६, १९४५

चि. मुन्नालाल,

तुझी दोन पत्रे मिळाली. मी एखाद्या गोष्टीबद्दल सल्ला दिलेला असेल आणि माझ्या सल्ल्यापेक्षा कोणी वेगळा सल्ला देत असेल तर माझ्या सल्ल्याप्रमाणे चाल. तू पुण्याला गेलेला असशील असे गृहीत धरून मी हे पत्र पुण्याला पाठवतो आहे.

तुला कोणी काहीही जरी म्हणाले तर त्यामुळे तू घाबरण्याचे काय कारण? तुझ्या कामात गुंतून राहा आणि अतिशय आवश्यक असल्याशिवाय बोलू नको. तू तिथे केवळ तीन काम कर आणि ते तुझ्या सर्वोत्तम क्षमतेप्रमाणे पार पाड - हिशेब लिहिणे, बाजारहाट करणे आणि स्वच्छता ठेवणे. शेवटचे काम करताना तू मत देऊ शकतो, परंतु पहिली दोन कामे करताना तुला शब्दही उच्चारण्याची आवश्यकता नाही. तू जर धैर्य आणि श्रद्धा ठेवली तर तुझ्या कामाचे कौतुक होणे अपरिहार्य आहे. परंतु कोणी कौतुक जरी केले नाही तरी त्याचे काय?

. . . .

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ८६१५. शिवाय सी. डब्ल्यू. ७१९७सौजन्य - मुन्नालाल गं. शाह

-----------

# १४ डिसेंबर १९४५.५७. मुन्नालाल गं. शाह यांना पत्र

सोदेपूर,

डिसेंबर १४, १९४५

चि. मुन्नालाल,

मला तुझे लांब पत्र मिळाले. मला थोडासा धक्काच बसला. तेथील स्वयंपाकघरात मांसाहार आणि गोमांसही शिजवण्यात येते याची मला कल्पनाच नव्हती. ही समस्या केवळ धीरानेच सोडवली जाऊ शकते. तू घाबरून पळून जाऊ नको. तू केवळ मासांहार वा गोमांसाहार केले नाही तर तितके पुरेसे आहे. परंतु असे करण्यापासून तू दुसऱ्यांना अडवू शकत नाही. याबद्दल स्वतःच विचार करून ते हे थांबवतील तर चांगले होईल. यामुळे धीर धरून तू मी सांगितलेले काम करत राहा असा माझा तुला सल्ला आहे.

मला तुला फार दिवस ठेवायचे नाही. परंतु तू हिशोब लिहिण्याकरिता सुरुवात करशील व ते व्यवस्थित करशील व साफसफाईचे काम आटोक्यात आणशील तर माझे समाधान होईल. इतर बदल मी आल्यानंतरच करता येऊ शकतील. आता जहांगीरजी तिथे आलेले असतील.

. . . .

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ८१०. शिवाय सी. डब्ल्यू. ७१९३. सौजन्य मुन्नालाल गं. शाह

---------------------

# १६ डिसेंबर १९४५. ७३. मुन्नालाल गं. शाह यांना पत्र

सोदेपूर,

डिसेंबर १६, १९४५

चि. मुन्नालाल,

तू १२ तारखेला लिहिलेले दुसरे पत्र इथे १५ तारखेला आले. मी काल तुला पाठवलेली पुढील तार मिळालीच असेल. (पाहा "मुन्नालाल गं. शाह यांना पत्र", डिसेंबर १५, १९४५)

तू केलेले वर्णन अगदी चांगले आहे. ज्याप्रमाणे गोमांसाची समस्या सोडवण्यात आली त्याचप्रमाणे तुझ्यावर सोपवलेल्या इतर कामांच्या समस्याही धैर्याने आणि प्रेमाने सोडवल्या जातील याची मला खात्री आहे. (पाहा "मुन्नालाल गं. शाह यांना पत्र", डिसेंबर १४, १९४५) मी तुझ्याकडे काही अतिशय महत्त्वाचे काम सोपवले होते, परंतु चिकित्सा कार्याशिवाय इतर सर्व कामांची जबाबदारी मी घेतलेली असल्यामुळे तू जर ती सर्व कामे केली तर मला ते निश्चितच आवडेल. यामुळे कोणाशीही कटकटी न होता जे कोणते काम तुला करता येईल ते तू तुझ्याकडे घे.

हे चिकित्सालय जरी १ जानेवारीपासून केवळ गरिबांकरिता आणि गरिबांतर्फे चालणार असले तरी त्या दिवशी मी इथे नसेन. त्या दिवसापासून वैद्यकीय विभाग सोडला तर इतर सर्व विभागांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी माझी आहे असे समजले जाईल. माझ्यातर्फे तू ही जबाबदारी घेशील असा माझा विश्वास आहे. परंतु तू तितकीच जबाबदारी घेतली पाहिजे जितकी तू सहजपणे पेलू शकशील. तू कोणते काम करू शकणार नाही हे तू मला आधीच सांग.

१ जानेवारीनंतर तिथे श्रीमंत रुग्ण नसतील. जरी कोणी असतीलही तरी त्यांना श्रीमंत गणले जाणार नाही.

डॉ. दिनशा म्हणाले की फर्निचरबद्दल मी स्वतः पाहीन. ते म्हणाले की त्यांना येथील फर्निचर मुंबई येथील चिकित्सालयाकरिता हवे आहे. सध्या फार कमी गरीब आंतररुग्ण असतील. कदाचित एकही असणार नाही. मोठ्या संख्येतील अशा रुग्णांना भरती करता येईल

अशी व्यवस्था आपण जरी ठेवू तरी नजिकच्या भविष्यकाळात असे रुग्ण मोठ्या संख्येत भरती होतील अशी अपेक्षा नाही.

फर्निचरच्या संबंधात आपण आपला विवेक वापरला पाहिजे. गुलबाईंची (दिनशा मेहता यांची पत्नी) काय इच्छा आहे हे आधी जाणून घे. अशा गोष्टींबद्दल आदेश देऊ नको की जो त्यांना पसंत नसेल.

सध्या तिथे जे रुग्ण याहेत त्यांच्यातील कोणी जात असेल तर जाऊ दे. १ जानेवारीपासून खरे सांगायचे तर तिथे बालकृष्ण (बालकृष्ण भावे) वनू (वनमाला पारीख) आणि झोहरा हेच असतील. त्यांच्याकडे लक्ष देणे तुला कठीण होऊ नये. आता तुझ्या लक्षात येईल की या संस्थेची जबाबदारी घेणे सोपी गोष्ट नाही. हे काम असे आहे की कोणत्याही माणसाची त्यात कसोटी होईल.

. . . .

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ८६१४. शिवाय सी. डब्ल्यू. ७१९४. सौजन्य - मुन्नालाल गं. शाह

---------------------

# १८ डिसेंबर १९४५. १४. दिनशा के. मेहता यांना पत्र

सोदेपूर,

डिसेंबर १८, १९४५

चि. दिनशा,

मी जरी इथे असलो तरी मी तेथील गोष्टींचा विचार करत असतो. मुन्नालालला चांगल्या प्रकारे प्रशिक्षण दे. तो मेहनती आणि प्रामाणिक आहे आणि त्याला बरीचशी माहितीसुद्धा आहे.

फर्निचरबद्दल तू काय केले? नववर्षापासून आपण एकही नवीन रुग्ण घेणार नाही. तू शांत असशील अशी आशा आहे. मेट मॅनेजची तार मी सोबत जोडत आहे. त्यांना शक्य असेल तेव्हा येऊ दे. जे राहू इच्छितात त्यांना काळजीपूर्वक विचार करून ठेव. जे जातात त्यांना जाऊ दे. वर दिलेल्या पत्त्यावर मला लिही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारलाल

---------------

डिसेंबर २३, १९४५

चि. मुन्नालाल,

मला तुझे १६ तारखेचे पत्र आणि १९ तारखेचे पोस्टकार्ड (मुन्नालाल गं. शाह यांचे हे पत्र उपलब्ध नाही.) मिळाले. आंतररुग्ण म्हणून जे भरती होतील त्यांच्याकडून कोणतेही शुल्क घेऊ नये, परंतु ते जे काही देत असतील त्याचा आपण स्वीकार करावा. वेगळ्या शब्दांत सेवाग्राममध्ये जे होत होते तेच आपण इथे करू. सध्या खाण्याचाच आपला खर्च इतका जास्त आहे की सामान्य उत्पन्न असलेला माणूस तो करू शकणार नाही. प्रकृती चांगली होईल व प्रकृती चांगली राहील असा कोणता आहार रुग्णांना द्यावा याचा आपण विचार केला पाहिजे.

२. गरिबांमध्ये गरिबांप्रमाणे राहू शकतील असे श्रीमंत रुग्ण आपण घेऊ शकतो. त्यांच्याकरिता जर विशेष सुविधा पुरवणे आवश्यक असेल तर या आरोग्यभवनात मला त्यांच्याकरिता कोणतेही स्थान दिसत नाही. श्रीमंत रुग्ण श्रीमंत आहेत म्हणून त्यांना स्वतंत्र खोली देण्याकरितासुद्धा मी परवानगी देणार नाही. आताच नवीन खोल्या वगैरे बांधण्याची कल्पना मला पटत नाही. किती गरीब रुग्ण प्रवेश घेतात वा किती लोकांना आपण प्रवेश देतो हे आपल्याला अनुभवाने ठरवावे लागेल. आपल्याला जेव्हा जागा कमी पडेल तेव्हा आपण पाहू. यामुळे माझी सूचना आहे की अत्यावश्यक खर्चाशिवाय सध्याच इतर कोणताही खर्च करू नये.

३. खुर्च्या वगैरे अर्थातच काढून टाकाव्या लागतील. यातील काही फर्निचर तर स्वतः डॉक्टरलाच घ्यायचे आहे. अजूनही त्यांना असे करायचे आहे की नाही हे मला माहीत नाही. ते जर घेणार नसतील तर ते फर्निचर काढून टाकण्याकरिता काही तरी करावे लागेल. मी असे करू शकेन इतकीच आशा मी करू शकतो. सध्या जितके बिछाने आहेत तितक्यानेच आपल्याला काम भागवावे लागेल. लवकरच आपल्यावर फार मोठ्या संख्येत रुग्णांना भरती करण्याची वेळ येईल असे मला वाटत नाही.

४. वर जे सांगितले आहे त्यात याचे उत्तर आले आहे.

५. पाणी गरम करण्याचे यंत्र जर खराब झाले असेल तर त्या ठिकाणी नवीन बॉईलर विकत घेण्यात यावा. याबद्दल डॉक्टरशी माझी काही चर्चा झाली आहे, परंतु आम्ही काय निर्णय घेतला होता ते मी विसरलो आहे. याकरिता जवळपासच्या गिरणीमालकांची वा बिर्लाजीं ंच्या मदतीची आवश्यकता असेल तर तसे करण्याकरिता मी तयार आहे. याबाबतीत डॉक्टर म्हणतील तसे कर.

६. अगदी १ जानेवारीपासूनच आपल्याला रुग्ण मिळायला सुरुवात होईल असे काही नाही. आधीच तिथे जे रुग्ण आहेत केवळ त्याच लोकांची व्यवस्था आपल्याला करावी लागेल. आणि ते जमिनीवर बसू शकतील आणि चिनीमातीच्या भांड्यात खाऊ शकतील.

७. आवश्यक तितकी खादी विकत घेण्याची मी व्यवस्था केली आहे. यामुळे तू जर मला गरजा सांगू शकशील तर मी त्या पुरवू शकेन. तू स्वतःच तीन डझन चादरींचे सात रोल सुचवले आहेत. इतक्या चादरी पुरे होतील काय?

८. काम करणारांमधील ज्या लोकांची स्वतःच्या स्वयंपाक करण्याची व्यवस्था आहे त्यांची ती व्यवस्था सुरू राहावी काय याचा विचार कर. मला वाटते की ज्यांना मांसाहाराची सवय आहे त्यांना मांसाहार देणे आपले कर्तव्य आहे. एकाच स्वयंपाकघरात दोन प्रकारचे अन्न शिजवले तर त्यात अशुद्धतेचा वा बाटण्याचा काही प्रश्न येतो असे मी मानत नाही आणि इतर कोणीही मानायला नको. बाटण्याचा विचार आपल्या धर्माचा आवश्यक भाग नाही. जे शाकाहारी आहेत त्यांनी आपल्या धर्माचे पालन करावे. मला मान्य आहे की ज्या भांड्यात आपण मांस शिजवतो त्याच भांड्यात आपण शाकाहारी अन्न शिजवू नये. परंतु याबाबतीत डॉक्टर वा गुलबाई जे म्हणतील ते आपण मान्य केले पाहिजे. अप्रत्यक्ष पद्धतीने आपण लोकांना शाकाहारी करू इच्छितो असा संशयसुद्धा कुणाला यायला नको. परंतु आपल्याकरिता शाकाहार चांगला आहे असे समजून त्याचा स्वतःहोऊन स्वीकार करणाऱ्या व्यक्तीचे आपण स्वागत करतो. ज्या रुग्णांना प्रकृतीच्या कारणाकरिता अंडी वा मांसाहार देणे आवश्यक आहे असे डॉक्टरला वाटते त्यांना ते देणे आपले कर्तव्य आहे.

९. वैद्यकीय मदतीसंबंधीचा निर्णय घेण्याचा अधिकार डॉक्टरला असेल.

१०. याच्या उत्तराची आवश्यकता नाही.

११. बाळकोबा हा गरिबांच्या दर्जाचे प्रतिधित्वच करतो असे आता मी समजतो.

१२. अखेरीस आपल्याला कोणत्या तरी मोठ्या ठिकाणी हलावे लागेल या डॉक्टरच्या मताशी मी सहमत आहे. ईश्वर आपला मार्ग मोकळा करील अशी माझी पूर्ण श्रद्धा आहे.

१३. सध्याच सेवाग्रामहून कोणाला बोलावण्याची गरज वाटत नाही. मी तुला मणिभाईंबद्दल आधीच लिहिले आहे. आपण जेव्हा केव्हा त्यांना बोलावू तेव्हा ते येतील.

१४. खर्च मी करीन. तेथील बँकेच्या खात्यात शिल्लक नाही काय? मला वाटते की हा प्रश्न मी या आधीच्या पत्रातही विचारला होता. बहुधा ते पत्र डॉक्टरला लिहिलेले असावे.

१५. तू व्यक्त केलेला दृष्टिकोन नेहमीच माझाही राहिलेला आहे. मला वाटते की मी तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. असे असले तरी तुला जर काही कळत नसेल तर मला लिही. पत्र सोदेपूरच्या पत्त्यावर लिही. आज तुझे पोस्टकार्ड मिळाले. त्यात तू विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर वर लिहिलेल्यामध्ये आले आहे. मी हे पत्र परत वाचून पाहिले नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ८६२२. शिवाय सी. डब्ल्यू. ७१९५. सौजन्य - मुन्नालाल गं. शाह

\---------------

# २८ डिसेंबर १९४५. १६९. दिनशा के. मेहता यांना पत्र

महीषदाल,

डिसेंबर २८, १९४५

चि. दिनशा,

आज २८ तारीख आहे. मिदनापूरमधील एका गावातून मी याचा मजकूर सांगत आहे. मुन्नालालच्या पत्राचे मी पूर्ण उत्तर दिले आहे. ते त्याने तुम्हा सर्वांतर्फे लिहिले असल्याचे कळवले होते. हे तुला केव्हा पोहोचेल हे मला माहीत नाही.

१ जानेवारीपासून सर्व काही बदलेल अशी मी आशा करतो. माझे हृदय तिथे आहे. मी तिथे कधी पोहोचेन हे ईश्वराच्या हाती आहे. जेव्हा त्याची इच्छा असेल तेव्हा मला तो तिथे आणील.

तिथे हिंदुस्तानी, उर्दू आणि मराठीत एक फलक लावणे आवश्यक होते. ते केले काय? की मी येईपर्यंत तू ते स्थगित ठेवले?

तुझ्याकडे अजूनही पैसेवाले मोठे लोक आहेत की ते सोडून गेले? ते जर थांबलेले असतील तर गरिबांप्रमाणेच त्यांची राहण्याची तयारी आहे काय?

रुग्णालयाच्या फर्निचरबद्दल काय केले? तुझ्या मुंबईच्या रुग्णालयाकरिता तुला हवे असलेले साहित्य मिळाले काय? की या बाबतीतही मला लक्ष घालावे लागेल? मला माहीत आहे की तेथील मासिक खर्चाची मला व्यवस्था करावी लागेल. या संबंधात किती तरी प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत; मला उत्तर मिळाल्यानंतर योग्य रक्कम पाठवीन.

फार मोठ्या संख्येत आंतररुग्ण येतील अशी माझी अपेक्षा नाही. आधीच ज्या लोकांनी तुझ्याकडे अर्ज केला आहे ते श्रीमंत रुग्ण असतील असे मी गृहीत धरतो. आता त्यांना दाखल करून घेण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. नवीन नियमाप्रमाणे काम सुरू झाल्यानंतर आणि

त्यांनी गरिबांप्रमाणे राहायचे कबूल केल्यानंतर आपण त्यांना दाखल करून घेतले तर गोष्ट वेगळी आहे.

तूसुद्धा ही नवीन व्यवस्था समजून घेऊन श्रद्धापूर्वक तिचा अंगिकार केला पाहिजे असे मला प्रकर्षाने वाटते.

. . . .

मला सोदेपूरच्या पत्त्यावर लिही.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता, पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------------

# १ जानेवारी १९४६. २१२. दिनशा के. मेहता यांना पत्र

कोंताई,

जानेवारी १, १९४६

चि. दिनशा,

तुझे डिसेंबर २८, १९४५चे पत्र मिळाले. मी डिसेंबर २८ला हवाई डाकेने पाठवलेले पत्र तुला मिळाले असेल अशी आशा आहे. तुझे पत्र तातडीच्या उत्तराची अपेक्षा करते आणि यामुळे हेही पत्र मी आताच हवाई डाकेने पाठवणार आहे.

तुझ्या पुण्याच्या चिकित्सालयात तू काही वेगळे रुग्ण दाखल करून घेत असशील तर तुला हे शोभत नाही. एकाच माणसाने धर्मार्थ रुग्णालय आणि नफा मिळवणारे रुग्णालय चालवावे हे योग्य दिसत नाही. तुझी इच्छा असेल तर तू मुंबईचे चिकित्सालय ठेवू शकतो; ते ठेवण्याला मी संमती दिली आहे. जानेवारीपासून पुण्याच्या खर्चाची जबाबदारी माझी आहे आणि त्याकरिता मी व्यवस्था केली आहे. या महिन्याच्या अखेरीस पुण्याच्या रुग्णालयाचा खर्च ३,५०० रुपयांपेक्षा जास्त यायला नको, परंतु तो जास्त येत असेल तर येऊ दे. ते त्या पैशाइतकी सेवा करील आणि त्यामुळे तो खर्च मला बोचणार नाही. आता मुख्य प्रश्न हा आहे की तू नफा मिळवण्याच्या तत्त्वावरील वेगळे चिकित्सालय पुण्यात उघडले पाहिजे काय. याबाबतीत मी माझे मत दिलेले आहे.

तू गुलबाईबद्दल जे लिहितोस ते काहीसे आश्चर्यजनक आहे. ती गर्भार आहे, यामुळे तिने आपल्या लहरींवर धीराने नियंत्रण ठेवले पाहिजे. रुग्णालयासंबंधी मध्यस्थी करण्याकरिता मी तिला निश्चितच लिहिणार नाही.

डॉ. दिनशा मेहता

निसर्गोपचार केंद्र ६ तोडीवाला मार्ग, पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# ३ जानेवारी १९४६. २३३. मुन्नालाल गं. शाह यांना पत्र

सोदेपूरला घेऊन जाणाऱ्या जहाजातून,

जानेवारी ३, १९४६

चि. मुन्नालाल,

तुझे डिसेंबर ३०, १९४५चे पत्र मला जानेवारी ३, १९४६ला कोंताई इथे मिळाले. मी ते जहाजात वाचले आणि जहाजातूनच त्याचे उत्तर देत आहे. तू खादीबद्दल जे म्हणतोस ते मी समजू शकतो. तिथे किती खादी उपलब्ध आहे हे कळले तर मी विचार करून ताबडतोब निर्णय घेऊ शकतो. तुला जितकी खादी हवी असेल तितकी पुरवण्याकरिता मी तयार आहे. (शिवाय पाहा "मुन्नालाल गं. शाह यांना पत्र". डिसेंबर २३, १९४५)

माझ्या उत्तराने डॉक्टरचे (दिनशा मेहता) समाधान झाले नाही हे मी समजू शकतो. परंतु मी असहाय आहे.

मी शक्य तितक्या लवकर परतण्याचा प्रयत्न करीन. मी बँकेच्या खात्याची व्यवस्था करीन. कलकत्त्याला पोहोचल्याबरोबर पैसेसुद्धा लवकरात लवकर वळते करायचा मी प्रयत्न करीन.

गरिबांत मिसळण्याकरिता तयार असलेल्या सर्व रुग्णांना आपण अर्थातच प्रवेश दिला पाहिजे. कोणी श्रीमंत आहे एवढ्याकरिता त्याला स्वतंत्र खोली देता येणार नाही. ज्या लोकांना प्रवेश दिला जाईल ते शुल्क देतील काय? आपले लोक सोडून इतर जे लोक इतरांमध्ये मिसळू शकतील व नियम पाळतील त्याच्या प्रवेशावर मी आक्षेप घेणार नाही.

सिंहगढ येथील सामान ट्रस्टचे आहे व त्यामुळे माझ्या मते आपण त्यांचा आपल्या कामाकरिता उपयोग करू शकतो आणि तेथील कोणतेही सामान हलवू शकतो.

डॉक्टरचे जर वेगळे मत असेल तर त्यांचे म्हणणे काय आहे हे जाणून घेण्याची माझी इच्छा असेल. नजिकच्या भविष्यकाळात पुण्याबाहेर अजून कोणतेही केंद्र सुरू करण्याचा आपला विचार नाही.

. . . .

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ८६११. शिवाय सी. डब्ल्यू. ७२००. सौजन्य - मुन्नालाल गं. शाह

------------------

# ५ जानेवारी १९४६. २४८. मुन्नालाल गं. शाह यांना पत्र

सोदेपूर,

जानेवारी ५, १९४६

चि. मुन्नालाल,

काल मी दिनशाजींना १०,००० रुपये पाठवले. त्यातून तू या महिन्यापासून मी येईपर्यंतचा संपूर्ण खर्च करू शकशील.

कांचनला जोरदार सर्दीपडसे झाले आहे आणि तिला तापही आहे. परंतु त्याबद्दल काळजी करण्याचे कारण नाही. तिच्यावर सुशीलाबेन उपचार करत आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. जी. एन. ८६१२. शिवाय सी. डब्ल्यू. ७२०१. सौजन्य - मुन्नालाल गं. शाह

---------------

# ५ जानेवारी १९४६. २५०. दिनशा के. मेहता यांना पत्र

सोदेपूर,

जानेवारी ५, १९४६

चि. दिनशा,

काल मी तुझ्याकडे १०,००० रुपये पाठवले. या पैशाने तू न्यासाच्या नावाने तुला आवडेल त्या बँकेत खाते उघडू शकतो. मी हे पैसे न्यासी आणि निदेशक म्हणून पाठवलेले असल्यामुळे तू स्वतःच्या नावाने धनादेश काढू शकतो. मी हे पैसे घाईघाईत पाठवतो आहे कारण तुझ्याजवळ पैसे शिल्लक नाही असे मला कळते. यामुळे मला दुःख झाले. माझे असे मत झाले होते की तुमच्याजवळ बराच पैसा शिल्लक पडलेला असेल. आणि अशा मोठ्या खात्यात तर इतका पैसा असायलाही पाहिजे ना? मला जर माहीत असते की तुझ्याजवळ पैसा राहतच नाही तर मी पुण्याहून निघण्यापूर्वीच पैशाची व्यवस्था केली असती. परंतु ते असो.

मला गुलबाईचे पत्र आले आहे. त्याने मला धक्काच बसला. ती दुःखी आहे. तिला दुःख देऊ नको. असे दिसते की आर्देशीरला लस टोचण्याबद्दल ती साशंक आहे उलट तू त्याबद्दल आग्रही आहेस. माझा लस टोचून घेण्यावर विश्वास नाही. मी त्याप्रमाणे गुलबाईला लिहीत आहे. मी जर तुझ्या ठिकाणी असतो तर मी गुलबाईच्या इच्छेचा आदर केला असता. अखेरीस आईचा मुलावर जास्त अधिकार असतो. एकदा बीज पेरले की पुरुषाचे काम संपते. ती आईच असते की जी मुलाला पोटात वाढवते आणि नंतरही ते मूल वाढत असताना त्याला स्तन्य देते. परंतु गुलबाईला याचे दुःख नाही; तिला दुःख तुझ्या वागणुकीचे आहे. याबद्दल आपली थोडी चर्चा झाली आहे. तिच्याशी या विषयावर शांतपणे बोल आणि सर्व काही स्पष्ट करून सांग.

तू चिडचिडा झाला आहे असे दिसते. तू न्यासातून पगार घ्यावा अशी माझी अजूनही सूचना आहे. मला माहीत आहे की न्यासपत्रात याची तरतूद नाही, परंतु हा आवश्यक बदल करण्याकरिता तीन न्यासी सहमत होऊ शकतात. तुझी इच्छा असेल तर तर तू दुसरा कोणता

व्यवसाय करू शकतो. माणसाचे पहिले कर्तव्य स्वतःशी प्रामाणिक असणे आणि सत्याचरण करणे आहे. जो माणूस असे करत नाही तो कोणत्याही कामाचा राहत नाही. तो दांभिक वा फसवणूक करणारा होतो. माझ्या सल्ल्याप्रमाणे चालायचे तू ठरवले होते. याचा अर्थ समजून घे. जो असे ठरवतो तो एक तर दुसऱ्याचे म्हणणे समजून घेतो वा समजले नाही तर ते श्रद्धापूर्वक ऐकून घेतो व त्याप्रमाणे करतो. आणि अशी श्रद्धा समजून घेण्यापेक्षाही अधिक उपयोगाची गोष्ट असते. असे झाले तर माणूस अस्वस्थ होतो. तुझी अशी अवस्था कधीही न होवो. तुझ्यातील जोम गमावला जावा अशी माझी इच्छा नाही. माझ्या संपर्कामुळे तू उंच आणि अजून उंच गेला तरच माझे समाधान होईल.

अधिक विचार केल्यानंतर मला वाटते की मी तुला गुलबाईचे पत्र पाठवले पाहिजे. असे केल्याने तिला कोणते दुःख आहे ते तुला कळू शकेल. तिच्याशी शांतपणाने आणि धीराने वाग.

मी तिथे फेब्रुवारी २१च्या किंवा २३च्या सायंकाळी पोहोचेन कारण २२ तारखेला बाची पुण्यतिथी आहे. आणि मी त्या दिवशी एका ठिकाणी असेन. आगगाडीत संपूर्ण गीता वाचणे शक्य नसल्यामुळे हे शक्य नाही.

. . . .

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

-------------------------

# ५ जानेवारी १९४६. २५१. गुलबाई दि. मेहता यांना पत्र

सोदेपूर,

जानेवारी ५, १९४६

चि. गुलबाई,

तुझे पत्र मिळाले. मी तुला तिसरे पत्र लिहिण्याचा विचार करत असतानाच काल तुझे पत्र आले. माझा निश्चितच लसीवर विश्वास नाही. माझे विचार बदललेले नाहीत ते दृढ आहेत. यामुळे माझे चालले असते तर चि. आर्देशीरला मी लस टोचायला लावली नसती. मी देवीच्या रोगाचा धोका पत्करला असता. परंतु दिनशाचा लसीवर विश्वास आहे हे मला माहीत आहे. निसर्गोपचाराबद्दलच्या त्याच्या आणि माझ्या विचारांत बरेच अंतर आहे. हे माहीत असूनही मी त्याला चिकटून आहे कारण तो सत्यवादी माणूस आहे असा माझा विश्वास आहे. माणूस जर सत्यवादी असेल तर एक तर तो मला सांभाळून घेतो वा मी त्याला सांभाळून घेतो. माझ्यात हट्टीपणाचा लवलेशही नाही. दृढपणा माझ्यात निश्चितच आहे आणि तो असायलाही पाहिजे. ज्या माणसात हा गुण नाही तो कधीही सत्याला धरून राहू शकत नाही. त्याच्यासमोर असलेल्या धोक्याची तो फिकीर करत नसतो कारण सत्याग्रहीची श्रद्धा केवळ ईश्वरावर असते. यामुळे आपसात चर्चा करून लस टोचण्यासंबंधी तुला जे काही करायचे असेल ते कर.

मी तुझे पत्र दिनशाला पाठवले कारण ते पत्र सुंदर आणि तुला शोभणारे होते. त्यातून तुझी वेदना अभिव्यक्त झाली आहे. हे दिनशाला पण कळले पाहिजे. त्याला ते पत्र पाठवण्यात मी चूक केली नसेल अशी आशा आहे.

तुझे बाळांतपण केव्हा होऊ घातले आहे?

सूतिकागृहाबद्दल काळजी करू नको. खर्चाबद्दलची काळजी करणे माझे काम आहे. कालच मी खर्चाकरिता पैसे पाठवले. माझ्या मते आपण गरिबांकरिते जे खाते चालवतो ते आता सुरू ठेवण्याची आवश्यकता नाही. बालकृष्ण ज्या घरात राहत होता त्या घरात माजींनी आपला

मुक्काम हलवण्याची आवश्यकता नाही. त्या जिथे राहतात तिथे राहू शकतात वा त्यांना जिथे आवडेल तिथे त्या मी येईपर्यंत राहू शकतात. मी ज्या खोल्यांमध्ये राहत होतो त्या खोल्यांमध्ये माजींनी राहावे अशी माझी सूचना आहे. मी परतेन तेव्हा तुम्ही मला तिथे वा तुम्हाला आवडेल अशा ठिकाणी ठेवू शकता. माझ्याबरोबर असलेले लोक राहुट्यात राहणार असल्यामुळे त्यांच्या व्यवस्थेने तुमची कोणतीही गैरसोय होणार नाही. अशा प्रकारे तुम्ही मला जी खोली द्याल ती, तिला जोडलेले न्हाणीघर आणि बाजूची खोली इतके माझ्याकरिता पुरेसे असेल. दिनशाचे जेव्हा नवीन उत्पन्न सुरू होईल तेव्हा पाहू. त्याने नवीन कोणत्याही खर्चात न पडणे वांछनीय आहे. त्याने या वा त्या कारणाकरिता पराभव पत्करला तर मला ते मुळीच आवडणार नाही. तू आणि आर्देशीर चांगले असाल अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

------------------

# ८ जानेवारी १९४६. २७९. वल्लभभाई पटेल यांना पत्र

सोदेपूर,

जानेवारी ८, १९४६

भाई वल्लभभाई,

काल मी तुम्हाला पुढीलप्रमाणे तार पाठवली :

“ईश्वराची इच्छा असली तर बार्डोलीला ३ मार्चला पोहोचेन.”

मला १ तारखेला येण्याची फार इच्छा होती परंतु ते शक्य नाही असे दिसते कारण फेब्रुवारीत केवळ २८ दिवसच आहेत आणि बार्डोलीला जाण्यापूर्वी पुण्यात मी काही दिवस तरी लक्ष घातले पाहिजे. यामुळे मी दोन दिवस जास्त मोजले आहेत. यामुळे मी माझा कार्यक्रम अशा प्रकारे तयार करत आहे की जणू काय फेब्रुवारीत ३० दिवस आहे. एकदा सुरुवात केल्यानंतर मी ती गोष्ट शेवटपर्यंत न्यायला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत मी पैशाचा दुरुपयोग सहन करू शकत नाही. आणि मी जर लक्ष घातले नाही तर दिनशा एकटा हे साहस पार पाडू शकणार नाही. यामुळे वर्ध्याचे काम लवकर संपवून मी पुण्याला लहानशी भेट देईन व मग बार्डोलीला येईन व मग परत पुण्याला जाईन. सध्या माझ्या मनात हे असे आहे.

. . . .

-----------

# ११ जानेवारी १९४६. २९९. मुन्नालाल गं. शाह यांना पत्र

गोहाटी,

जानेवारी ११, १९४६

चि. मुन्नालाल,

तुझी तार मिळाली. तुझा न येण्याचा निर्णय अगदी बरोबर आहे. मी तुला जी तार पाठवली होती ती पाठवणे माझा धर्म होता. तुझ्या वडिलांच्या मृत्यूच्या वेळी तुझा धर्म काय आहे हे मी तुला समजावून सांगितले होते. तू त्यावर कायम राहिला होता. तुझे कल्याण होवो. कांचनच्या प्रगतीबद्दल मला दररोज बातमी मिळत असते. मी अगदी सकाळीसकाळी लिहीत आहे. कांचनी प्रकृती सुधारत आहे असे सांगणारी सुशीलाची तार मला काल मिळाली. ती याचे श्रेय पेनिसिलीनला देते. माझा विश्वास आहे की सुशीलाने तिची फार चांगली सुश्रूषा केली. कांचनकरिता ती मागे थांबली होती. आता काय होते ते आपण पाहू. कदाचित या गंभीर आजाराने कांचनचा अगदी कायापालट होऊन जाईल. ती सरळसाधी परंतु पुष्कळशी मूल असलेली स्त्री आहे. तिचे वय जरी वाढत असले तरी तिच्या समंजसपणात वाढ होऊन राहिलेली नाही. तू त्याचे कारण असू शकतो काय? आपल्या आजूबाजूच्या लोकांना असे वाटते आणि याकरिता तुझ्याबरोबर लोक मलाही जबाबदार धरतात. मला हा आरोप मान्य नाही. पण ती वेगळी गोष्ट आहे. तू यावर कदातित विचार करशील असे वाटल्याने मी याचा उल्लेख केला.

एव्हाना मणिभाई तिथे आलेले असतील. नाही तरी त्यांना तिथे बोलावण्याचा आपण विचार केला होता, आणि कांचनच्या प्रकृतीमुळे त्यांना तिथे पाठवणे माझा धर्म आहे असे मला वाटले व “मोकळे असाल तर ताबडतोब निघा” म्हणून मी त्यांना सांगितले. मला त्यांचा फार कमी अनुभव आहे. परंतु काही काळ सेवाग्राममध्ये राहिलेले शांतिलाल आणि महादेवची बहीण निर्मलाचे पती ईश्वरलाल यांनी मणिभाई अद्भुत कार्यक्षमतेचे व्यक्ती आहेत म्हणून मला सांगितले

होते. नरहरीला त्यांचा अनुभव आहे आणि त्याला त्यांच्या पात्रतेची कल्पना आहे. यामुळे मणिभाईंची तुला फार मदत होईल. कोणत्याही दृष्टीने ते कार्यक्षम आहेत.

मी हिशोब इंग्रजीत ठेवण्याचा आग्रह धरतो आहे ते केवळ जहांगीरजींकरिता (जहांगीरजी पटेल). ते जर त्याकरिता उत्सुक नसतील तर तू ते हिंदी वा मराठीत ठेवू शकतो. महिने आणि वर्ष ग्रेगरी कॅलेंडरप्रमाणे ठेवता येतील तर पाहा म्हणजे जहांगीरजी ते तपासून पाहू शकतील?

तू हे पत्र दिनशाला दाखवू शकतो. तू त्यांना माझे कोणतेही पत्र दाखवू शकतो.

सोबत जोडलेले पत्र मणिभाईंना दे. डॉक्टरकरिता लिहिलेले पत्र त्यांना दे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ८६१८. शिवाय सी. डब्ल्यू. ७२०४. सौजन्य - मुन्नालाल गं. शाह

----------------

# ११ जानेवारी १९४६. ३०१. मणिभाई यांना पत्र

सरानिया आश्रम,

जानेवारी ११, १९४६

चि. मणिभाई,

नरहरीभाईंनी माझ्या तारेचे उत्तर दिले आणि मी जी अपेक्षा करत होतो तेच झाले. मुन्नालालला सर्व प्रकारची मदत कर. प्रकृतीची हानी न होता जितकी मदत करता येईल तितकी कर. तू जे काही करशील त्यातून निर्धार, गोडवा, स्वच्छता आणि कौशल्य यांचे दर्शन होईल अशी माझी अपेक्षा आहे. चि. शांतिलालने माझे असेच मत करून दिले होते आणि माझा जो अनुभव आहे व तुला मी जे काही ओळखू शकलो त्यातून तू मला असाच अनुभव आणून दिला आहे. तुला माझ्याबरोबर घेऊन जाण्याचा माझा विचार होता परंतु परिस्थितीने काही वेगळेच ठरवले होते; आणि मला वाटते की हे सर्व चांगल्याकरिताच होते. मला लिही. मुन्नालाल तुला माझा कार्यक्रम सांगेल.

तू सेवाग्राम सोडल्यामुळे नरहरीची गैरसोय होणार नाही, अशी आशा आहे.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

------------

# ११ जानेवारी १९४६. ३०२. दिनशा के. मेहता यांना पत्र

सरानिया आश्रम,

जानेवारी ११, १९४६

चि. दिनशा,

चि. मुन्नालालची पत्नी कांचनबेन अतिशय आजारी आहे, यामुळे त्याला यायचे असेल तर त्याला मोकळे करण्यात यावे अशी तार मी केली होती. मला असे वाटले की कोणी तरी त्याच्या ठिकाणी यायला पाहिजे आणि म्हणून मणिभाईंना पाठवण्याकरिता मी सेवाग्रामला तार केली. त्यांना मी अतिशय कार्यक्षम समजतो. ते ताबडतोब पुण्याकरिता निघाले. मणिभाई फार चांगले कार्यकर्ते आहेत असे सांगण्यात आल्यामुळे मला फार आनंद झाला. माझा यावर विश्वास आहे. मला त्यांचा वैयक्तिक अनुभव क्वचितच असेल. तुला काही असेल.

मी पाठवलेले १०,००० तुला पोहोचले असतील अशी आशा आहे. यामुळे नवीन खात्यात पैसे नाहीत म्हणून तुला त्रास होणार नाही.

तिथे आधीच जे रुग्ण आहेत त्यांनी नवीन पद्धतीशी जुळवून घेतले पाहिजे. त्यांनी गरिबांमध्ये मिसळायला पाहिजे. प्रत्येकाने मिनिटामिनिटाने वेळेचे पालन केले पाहिजे. आणि असे असले तरी ते जर पैसे देणार असतील तरच तू त्यांना सामावून घ्यावे नाही तर त्यांना जाऊ दे. वास्तवात यालाच खरी मैत्री म्हणता येईल. रुग्णांच्या इच्छेप्रमाणे आपण त्यांना स्वतंत्र खोल्या देऊ शकत नाही. खरे म्हणजे स्वतंत्र खोली हवी असणाऱ्या रुग्णांना प्रवेशच द्यायला नको. रुग्णांना जितका एकांत देता येईल तितका देण्यात यावा हे मी तुला आधीच लिहिले आहे. तुला ते आठवत असेल अशी आशा आहे. माझ्याकडून आतापर्यंत जर अशी सूचना मिळाली नसेल तर आता याची नोंद करून ठेव.

मुन्नालालचे म्हणणे आहे की इंग्रजी पद्धतीने हिशोब ठेवणे हे अधिक खर्चाचे आहे. मला वाटते हे खरे आहे. आपण हिंदुस्तानी पद्धतीने हिशोब ठेवले तर काय बिघडणार आहे? हिंदुस्तानी

पद्धतीने हिशोब अगदी बरोबर ठेवता येऊ शकतात. हिंदुस्तानी पेढ्या हिंदुस्तानी पद्धतीने हिशेब ठेवतात आणि इंग्रजांच्या बँकांशी करोडो रुपयांचा व्यापार करतात. आणि ज्याअर्थी आपला लहानसा कारभार हिंदुस्तानी असल्यामुळे व तो हिंदुस्तानला शोभणारा असावा म्हणून त्यात आपण सुरुवातीपासूनच शक्य तितके स्वदेशी वातावरण ठेवले पाहिजे. हे पत्र जहांगीरजींना दाखव. त्यांच्या आग्रहामुळे आपण इंग्रजीत हिशोब ठेवण्याकरिता संमती दिली होती. परंतु इंग्रजी पद्धतीने हिशोब ठेवल्यामुळे जर दरमहा ४०-५० रुपयाने खर्च वाढणार असेल तर जहांगीरजी निश्चितच हा पैसा वाचवण्याच्या बाजूने असतील असा माझा विश्वास आहे. मी जो पैसा देईन तो तर गरिबांचाच पैसा आहे असे समजायला पाहिजे. मी तो श्रीमंतांकडून घेत असेन, परंतु एकदा तो पैसा माझ्या हातात आला की तो गरिबांचा होतो, व तो पूर्णपणे गरिबांकरिता खर्च झाला पाहिजे. माझे सर्व व्यवहार याच जुन्या पद्धतीने होत असतात परंतु आता मी म्हातारा झालेलो असल्यामुळे मी आता पूर्णपणे काम करू शकत नाही याचे मला दुःख होते, आणि मला या परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागते कारण मी दुसरे काही करू शकत नाही. परंतु मी माझ्या लहरींचे ओझे दुसऱ्यावर का टाकावे?

आशा आहे की तुला माझी आधीची पत्रे मिळाली असतील.

सध्या टाळण्यासारखे सर्व खर्च टाळा. मी तिथे २० अथवा २१ मार्चला पोहोचण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करीन. मला यश मिळते की नाही हे ईश्वराच्या हातात आहे.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

------------------

# १४ जानेवारी १९४६. ३३६. मुन्नालाल गं. शाह यांना पत्र

आगगाडीतून,

जानेवारी १४, १९४६

चि. मुन्नालाल,

तुझे पत्र मिळाले. डॉ. दिनशाची उदासीनता मला आवडली नाही. जहांगीरजी तुला मदत करत आहेत ही चांगली गोष्ट आहे. तुला जे करता येणे शक्य आहे ते तू शांतपणे आणि धीराने करत राहा. ज्यांना जायचे असेल त्यांना जाऊ दे. मणिभाई तुला शक्य ती सगळी मदत करत असतील अशी आशा आहे. नवीन रुग्ण घेऊ नको. इतकेच नाही तर जे जुने रुग्ण पैसे देतात त्यांनीही नवीन नियम पाळले पाहिजे. त्यांच्या पैशाने आपल्याला काम चालवायचे नाही. आपल्याला ते गरिबांच्या आशीर्वादाने करायचे आहे. नवीन रुग्णांवर डॉक्टर असा उपचार सांगू शकतात की जो ते घरीच घेऊ शकतील. कोणी जर आंघोळ वगैरेकरिता येत असेल तर त्याला ती करता येईल. परंतु कोणालाही चिकित्सालयात थांबू देऊ नये. मी परतल्यानंतर सर्व काही व्यवस्थित करता येईल असे मला वाटते. असे नसेल तर तू हे जहांगीरजींना दाखवू शकतो. डॉक्टर अर्थातच हे वाचेल.

तिथे परतल्यानंतर मी खादीची व्यवस्था करीन. मी आवश्यक तितकी खादी मिळवीन. कांचन चांगली असेल असा माझा विश्वास आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ८६२३. शिवाय सी. डब्ल्यू. ७२०५ सौजन्य -मुन्नालाल गं. शाह

-------------------

# १६ जानेवारी १९४६. ३५७. जहांगीर पटेल यांना पत्र

सोदेपूर,

जानेवारी १६, १९४६

भाई जहांगीर,

तुमचे शुद्ध गुजरातीतील श्रुतलेखन करून लिहून घेतलेले पत्र मिळाले. मला आनंद झाला. असे असले तरी आपल्याला दिनशाजीकरिता काम करायचे असेल आणि इंग्रजीत लिहिल्याने त्याकरिता फायदा होत असेल तर मी निश्चितच इग्रजीत लिहीन.

मी पुण्याला २१ फेब्रुवारीपूर्वी पोहोचण्याचा प्रयत्न करीन.

मी पैसे पाठवलेले आहेत हे तुम्हाला माहीतच असेल असे मला वाटते. मला इतकीच काळजी आहे की, काळजी तर वाटत असतेच, चिकित्सालयाचा लाभ जनसामान्याला झाला पाहिजे. आतापर्यंत हे चिकित्सालय केवळ श्रीमंताकरिता होते. परंतु आपण भेटू तेव्हा याबद्दल अजून चर्चा करू. सध्या तुम्ही जे काही करत आहा आणि करून घेत आहा तितके पुरे आहे.

श्रीयुत जहांगीर पटेल,

पटेल हाऊस, १० चर्चगेट स्ट्रीट,

फोर्ट, मुंबई

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

-------------------

# १९ जानेवारी १९४६. ३७१. मुन्नालाल गं. शाह यांना पत्र

सोदेपूर,

जानेवारी १९, १९४६

चि. मुन्नालाल,

आजकाल मी कामात फार व्यग्र आहे. यामुळे मला तुझ्या एक वा दोन पत्रांचे उत्तर देणे शक्य झालेले नाही. त्यात विशेष काही नव्हते. परिस्थितीत काही सुधारणा झाल्यामुळे मला आनंद होतो. असे असले तरी मला तुझी अडचण कळते. आपल्याला ती धीरानेच दूर करता येईल. इथून मी जास्त काही करू शकत नाही. तू नवीन काही खर्च केला नाही इतके पुरे आहे. मी परतल्यानंतर खादीबद्दल नंतर पाहीन.

तू कांचनला पाठवलेली लांब तार मी पाहिली. मी तर म्हणेन की तू ती पाठवायला नको होती. बालकृष्णने ती पाठवण्याकरिता तुला कसे प्रोत्साहन दिले ते मला कळत नाही. ती तार वेवलाकडून (बेकार माणूस) आली होती असे म्हणता येईल. तुला जर वेवला या शब्दाचा अर्थ माहीत असेल तर मी काय म्हणतो ते तुला कळले असेल. वेवला या शब्दाचा समानार्थी इंग्रजी शब्द मला माहीत नाही. प्रत्येक भाषेत असे काही शब्द असतात की ज्यांचा अनुवाद करता येत नाही. वेवला हा असाच शब्द आहे. मी तुझी भर्त्सना करून राहिलेलो नाही, हा विनोद समज. तुझी इच्छा असली तर येण्याची संधी मी तुला दिली होती. आता कांचन चांगली आहे. आणि ती जर तिचा हट्टीपणा सोडेल तर या आजाराने तिचा बराच लाभ होईल. आज मी मद्रासकरिता निघतो आहे. कांचनला सोबत न्यायचे की नाही याबद्दल मी निश्चित नाही. डॉ. बिधनने तिची क्षकिरण चिकित्सा केली आहे. निदान जर चांगले आले असेल तर मी तिला सोबत नेऊ शकतो असे सुशीलाबेनचे म्हणणे आहे. तिला अजून चालण्याची परवानगी नाही.

मी मणिभाईला तिथे पाठवले कारण अशी काही परिस्थिती निर्माण झाली तर तुला तिथे ताबडतोब जाता यावे. यामुळे तू जरी आला नाही तरी तुझ्याकडून मणिभाईला प्रशिक्षण मिळावे असे माझे मत होते. परंतु जे झाले ते झाले.

एक गोष्ट मात्र निश्चित आहे, एखाद्या सम्राटाची काळजी घ्यावी तशी कांचनची काळजी घेतली गेली. आणि एखाद्या सम्राटाला मिळू शकावा असा डॉक्टर तिला मिळाला.

मला जहांगीरजींचे पत्र आले आहे. ते म्हणतात की ते सर्वोत्तम करतील. कांचन माझ्याबरोबर येत आहे.

परत वाचून पाहिले नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ८६१६. शिवाय सी. डब्ल्यू. ७२०२. सौजन्य - मुन्नालाल गं. शाह

--------------

# ५ फेब्रुवारी १९४६. ४६७. निसर्गोपचार चिकित्सालय

(हे "नोंदी" या शीर्षकाखाली "हिंदुस्तानीतून भाषांतर करून" हरिजन सेवक आणि हरिजनमध्ये एकाच वेळी प्रकाशित झाले होते.)

वाचकांना माहीतच आहे की जहांगीर पटेल आणि डॉ. दिनशा मेहता यांच्याबरोबर दिनशा मेहता यांच्या पुण्यातील चिकित्सालयात मी सहन्यासी झालो आहे (पाहा "वृत्तपत्रांना वक्तव्य", नोव्हेंबर २१, १९४५). या न्यासाच्या अटीप्रमाणे हे चिकित्सालय या वर्षाच्या १ जानेवारीपासून श्रीमंतांऐवजी गरिबांचे चिकित्सालय होईल. ही कल्पना माझी होती परंतु माझ्या दौऱ्यांमुळे या अटीची पूर्णपणे परिपूर्ती होऊ शकली नाही. या महिन्याच्या शेवटी मी पुण्याला जाईन अशी अपेक्षा आहे. असे असल्यामुळे या संबंधात न्यासाचे काही काम मी करू शकेन असा विश्वास मी बाळगतो. श्रीमंत रुग्णांना जर यायचे असेल तर त्यांनी त्यांच्या क्षमतेप्रमाणे पूर्ण शुल्क द्यावे आणि तरीही गरीब रुग्ण राहतात त्याप्रमाणेच राहावे अशी माझी कळकळीची इच्छा होती. माझा विश्वास आहे की असे केल्याने यापुढे त्यांचा जास्त लाभ होईल. ज्या लोकांना ही अट पाळण्याची इच्छा नसेल त्यांनी या चिकित्सालयात येण्याची आवश्यकता नाही. हा नियम आवश्यक आहे. रुग्णावरील उपचाराशिवाय गरीब रुग्णांना निरोगी जीवन कसे जगावे हेही तिथे शिकवले जाणार आहे. आज सर्वसामान्यपणे असा समज आहे की निसर्गोपचार आयुर्वेद वा ॲलोपॅथीपेक्षाही महाग आहे. हे जर खरे असल्याचे सिद्ध झाले तर मी अपयशी झालो हे मला मान्य करावे लागेल. परंतु माझा विश्वास आहे की याउलटच सत्य आहे आणि माझ्या अनुभवातूनही याच विश्वासाची अभिव्यक्ती होते. निसर्गोपचारकाने केवळ शरीराकडेच पाहायचे नसते तर रुग्णांच्या आत्म्यावरही उपचार करायचा असतो हे निसर्गोपचारकाचे कर्तव्य आहे. आत्म्यावर सर्वोत्तम उपाय अर्थातच रामनाम आहे. रामनामचा अर्थ आणि त्याचा कसा उपयोग करावा यात शिरण्याचा माझा विचार नाही. मी इतकेच म्हणेन की गरिबांना जास्त औषधांची गरज नसते. कोणतीही काळजी न घेता ते तसेच मरत असतात. त्यांच्या अज्ञानामुळे निसर्गोपचारकाची शिकवण काय आहे हे न दिसण्याइतके ते आंधळे झालेले असतात. पुण्यातील प्रयोगाला जर यश आले तर निसर्गोपचार विद्यापीठ

काढण्याचे डॉ. मेहता यांचे स्वप्न पूर्ण होईल. या महान कार्यात हिंदुस्थानातील सर्व खऱ्या निसर्गोपचारक डॉक्टरांच्या मदतीची देशाकरिता गरज आहे. त्यातून पैसा मिळवण्याचा प्रश्नच नाही. गरज आहे ती अशा लोकांची की जे गरिबांबद्दलच्या सेवाभावनेने भरलेले आहेत आणि असे पुरेसे डॉक्टर मिळाले तरच हे काम प्रगती करू शकते. डॉक्टरांच्या नावासमोरील केवळ पदवीने काम भागू शकत नाही. ज्यांना अनुभव आणि ज्ञान आहे आणि जे सेवा करण्याकरिता उत्सुक आहेत त्यांनी आपल्या शैक्षणिक अर्हतेसह लिहावे. ज्यांची अर्हता आवश्यक पात्रतेइतकी नसेल त्यांना कोणतेही उत्तर दिले जाणार नाही. हरिजन परत सुरू करण्यात आलेले असल्यामुळे कामाचे ओझे वाढले आहे हेही सर्वांनी लक्षात घ्यावे. यामुळे पत्रांना वैयक्तिक उत्तर देता येण्याची शक्यता फार कमी आहे.

वर्ध्याच्या मार्गावर, फेब्रुवारी ५, १९४६ आणि हरिजन, फेब्रुवारी १०, १९४६

-------------------

# १४ फेब्रुवारी १९४६. ५२२. डॉ. दिनशा के. मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

फेब्रुवारी १४, १९४६

चि. दिनशा,

मी तिथे १९ तारखेला पोहोचेन. कोणत्या ट्रेनने येतो आहे ते पत्राने कळवीन. आम्ही ११ वा १२ लोक असू. आपल्याला तिथे जे काम करायचे आहे त्याकरिता या वेळी मी तुझा पाहुणा म्हणून येतो आहे. या वेळी मी आणि माझ्याबरोबर असलेले लोक आमच्या अन्नाचा खर्च गरिबांकरिता जो निधी आहे त्यातून करू. यामुळे याकरिता तू कोणताही खर्च करण्याची आवश्यकता नाही. (आमच्याकरिता) तू जो काही खर्च करशील तो मी तुला तेव्हाच्या तेव्हा देईन. तोसुद्धा माझ्या खात्यातून देणार नाही तर या वर्षाकरिता गरिबांकरिता राखून ठेवलेल्या रुग्णालयाच्या निधीतून देईन. दुसरा जो निधी माझ्याजवळ आहे तो या वर्षातील कोणत्याही विशेष कामाकरिता राखून ठेवलेला नाही. हा पैसा माझ्या श्रीमंत मित्रांचा आहे. तुझ्याजवळ जो काही पैसा शिल्लक असेल तो तू कमावलेला आहे आणि तुझ्या वैयक्तिक खर्चाकरिता तो आहे. आणि त्यातील एक पैसासुद्धा घेण्याचा मला अधिकार नाही, कारण आता न्यासी झाल्यानंतर त्या पैशातून काहीही घेण्याचा मला अधिकार नाही.

राहता राहिली गोष्ट माझ्या राहण्याची तर तू ठेवशील तिथे म्हणजे तू ठरवलेल्या खोलीत वा रुग्णालयातील कोणत्याही भागात वा राहुटीत राहण्याची माझी तयारी आहे. या ऋतूत मी राहुटीत राहिलो तर त्यामुळे माझी काही गैरसोय होणार नाही. आणि फरशी असलेल्या खोलीतही मला वर्षभर राहावे लागले तर तेही मला गैरसोयीचे होणार नाही. अशी जागा तू कार्यकारिणीच्या सभेकरिता तर तयार केलीच होती.

माझ्याकरिता तू कोणताही खर्च करण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकारे मन पक्के करून मी चालणार नाही तर विश्वस्त होण्याकरिता मी पात्र राहणार नाही, आणि न्यासातर्फे मी गरिबांची सेवाही करू शकणार नाही.

आशा आहे की तू, गुलबाई (दिनशा के. मेहता यांची पत्नी) आणि आर्देशीर (दिनशा के. मेहता यांचा मुलगा) चांगले असाल आणि माजी (दिनशा के. मेहता यांची आई) शांततेचा आणि समाधानाचा आस्वाद घेत असतील. तिथून मी १ मार्चला परत निघेन आणि १९ वा २० मार्चला परत पुण्याला येईन अशी आशा आहे. बाकी आपण भेटू तेव्हा.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता,

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

---------------

# १५ फेब्रुवारी १९४६. ५२७. पुरुषोत्तम पटेल यांना पत्र

सेवाग्राम,

फेब्रुवारी १५, १९४६

भाई श्री,

तुमच्या पत्राचे उत्तर द्यायचे तर मी म्हणेन की तुम्ही तुमच्या आदर्शापर्यंत निसर्गोपचाराच्या ज्ञानानेच पोहोचू शकाल. माझे मत आहे की सध्या निसर्गोपचार अतिशय अपुर्णावस्थेत आहे.

वंदेमातरम,

मो. क. गांधी

पुरुषोत्तम पटेल,

६९, बडोदा कॉलेज वसतिगृह,

बडोदा

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

-------------------------

# २० फेब्रुवारी १९४६. ५५१. डॉ. दिनशा के मेहता यांना चिठ्ठी

फेब्रुवारी २०, १९४६

माझी कल्पना अशी आहे : मी जोपर्यंत एखादा रुग्ण पाठवत नाही वा गरिबांकरिता असलेल्या या वर्षाच्या निधीतून मी एखाद्या रुग्णाच्या खर्चाची व्यवस्था करत नाही तोपर्यंत एकाही रुग्णाला भरती करून घेऊ नये. अशा प्रकारे आपण निराधार लोकांना नाही परंतु गरिबांना सामावून घेऊ शकू.

२. कोणत्याही गरीब स्त्री वा पुरुष रुग्णाला तपासले पाहिजे. आवश्यक असेल तर त्याला आंघोळ घातली पाहिजे आणि बस्ती देणे आवश्यक असेल तर बस्ती दिली पाहिजे. त्याने कोणता आहार घेतला पाहिजे हे त्याला लेखी लिहून दिले पाहिजे. रुग्णाने खाण्यापिण्याचे साहित्य स्वतः मिळवले पाहिजे. त्याने जर ते मागितले तर आपण ते दिले पाहिजे, परंतु त्याने त्याचे पैसे दिले पाहिजे. अशा लोकांना मोठ्या टबात झोपवण्याची आवश्यकता नाही तर कटिस्नान दिले पाहिजे आणि त्यांना फवाऱ्याच्या खाली आंघोळ घातली पाहिजे. शरीराचे सर्व अवयव स्वच्छ करण्याची तिथे सोय असली पाहिजे. रुग्णाला नग्न करून सूर्यस्नान करायला लावले पाहिजे. तो लंगोटावर राहू शकतो. स्त्रियांकरिता वेगळी व्यवस्था असली पाहिजे, परंतु व्यक्तिगत रुग्णांकरिता वेगळी व्यवस्था नसावी.

३. रुग्णाला जितके अधिक स्वच्छ पाणी पिता येईल तितके पिऊ दिले पाहिजे. ज्या लोकांना संत्री वगैरे परवडत नाहीत त्यांना मध, लिंबू आणि पाणी यांचे मिश्रण द्यावे.

४. ज्या लोकांकरिता इतका उपचार पुरेसा असेल केवळ त्यांचीच आपण काळजी घेतली पाहिजे. यात अपचन, ताप, गोवर, बद्धकोष्ठता, डोकेदुखी, गजकर्ण, उठाव, कांजण्या, देवी, खरूज, हगवण आणि ग्रामीण लोकांमध्ये असलेले असेच इतर आजार यांचा समावेश होतो. हे काम करण्याकरिता आपल्याला रुग्णांच्या प्रमाणात कामगार घ्यावे लागतील व त्यांना प्रशिक्षण द्यावे लागेल. जे लोक किमान दोन वर्ष काम करण्याकरिता तयार असतील केवळ त्यांनाच

आपण कामावर घेतले पाहिजे. सामान्यपणे या लोकांनी घरीच राहायला पाहिजे. त्यांच्यातील काही लोक काही तास मोफत सेवा देऊ शकतात, तर काहींना नियमित पगार द्यावा लागेल. परंतु या सर्व गोष्टी हळूहळू स्थिरावत जातील. जसजशा आपल्या गरजा वाढत जातील तसतसा मार्ग निघत जाईल आणि त्यातून पुढे काय करायचे हे आपल्याला कळेल.

५. आपण कधीही विदेशी औषधांचा उपयोग करू नये आणि जैव औषधांचाही उपयोग आपण करणार नाही. काष्ठौषधी वा अशी काही साधी औषधे जी गावात मिळतात त्यांचा काही प्रमाणात आपण उपयोग केला पाहिजे. आवश्यक वाटले तर एरंडीचे तेल वापरले पाहिजे.

६. या कामाकरिता आपल्याला मोठ्या संख्येत स्वयंसेवक लागतील. परंतु त्यांच्यापैकी कोणालाही मोठा पगार दिला जाणार नाही.

७. हे काम जर व्यापक प्रमाणात झाले तर इथे शिक्षणाची व्यवस्था करता येईल, म्हणजे विद्यापीठ.

८. माझा दृढविश्वास आहे की हा प्रकल्प कार्यरत झाला तर आपल्याला आवश्यक तितकी जागा आणि पैसा मिळेल.

९. तुला जर हे काम कळत नसेल परंतु यावर तुझी श्रद्धा असेल तर हे काम मार्गावर लागेपर्यंत तू मुंबई येथील काम सुरू ठेवू शकतो. इतर ठिकाणेही तपास. सध्याच जमीन वा इमारत यांच्याकरिता गुंतवणूक करण्याची माझी इच्छा नाही. सध्या उपलब्ध असलेल्या संसाधनांवर काम भागवण्याची माझी इच्छा आहे. तुझ्यात जर श्रद्धा असेल तर तुला अधूनमधून इथे यावेच लागेल.

१०. पैसे देणाऱ्या लोकांना आपण जे वचन देतो त्याचे पालन केलेच पाहिजे. हे कसे करावे हे तुला पाहावे लागेल. तुला जो काही पैसा मिळेल तो तुझा असेल. हे लोक कदाचित या जागेवर राहणार नाही परंतु मला वाटते की हे पुण्यात कुठे तरी राहू शकतात.

जर काही प्रश्नांचे उत्तर द्यायचे राहून गेले असेल तर मला विचार. मी लेखी उत्तर देईन. हे जहांगीरजींना दाखव. यानंतर आपण तिघेही यावर चर्चा करू शकतो. तू पराभव स्वीकारण्याची आवश्यकता नाही आणि निराश होण्याचा तर प्रश्नच निर्माण होत नाही. आपण जे काम हाती घेतले आहे ते पूर्ण करणे आपणा तिघांचे काम आहे.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

--------------------------

# २० फेब्रुवारी १९४६. ५५३. प्यारेलाल यांना पत्र

फेब्रुवारी २०, १९४६

चि. प्यारेलाल,

मी जरी तिथे मणिभाईकडून काम घेतले असले तरी त्यांनी इथे काही काम करावे म्हणून मी त्यांना इथे आणले आहे. मला वाटत होते की हे तुला माहीत असेल. परंतु मुन्नालालला मी त्यांच्या ठिकाणी पाठवेन. तो सुद्धा काम करू शकतो. कोणी तरी त्याची मागणी केली होती मी त्याकडे दुर्लक्ष केले. घाबरून जाण्याचे काही कारण नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

------------------

# २२ फेब्रुवारी १९४६. ५६६. अखिल भारतीय निसर्गोपचार चिकित्सालयाच्या विश्वस्तांच्या सभेचे कार्यवृत्त

अखिल भारतीय निसर्गोपचार चिकित्सालयाच्या विश्वस्तांची पहिली सभा फेब्रुवारी २१, १९४६ला सात्री १०.३०ला ....(मूळ स्रोतात ही जागा रिकामी आहे.) च्या घरी झाली, जिथे गांधीजी थांबले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी गांधीजी होते. दुसरे दोन विश्वस्त श्री जहांगीर पटेल आणि श्री दिनशा मेहता हेही सभेला उपस्थित होते.

१. बैठकीत हिशेबासंबंधी पुढील विषयांची सविस्तर चर्चा झाली :

१. सात आठवड्यांच्या काळात दर आठवड्याला झालेल्या खर्चाचा हिशेब.

२. सविस्तर उत्पन्नाचा हिशेब

३. आंतर आणि बाह्य रुग्णांकरिता दररोज येणारा खर्च

४. चिकित्सालयात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या राहण्याकरिता व खाण्याकरिता येणारा खर्च

५. बांधकाम आणि दुरुस्तीकरिता येणारा खर्च, तसेच बागेवर येणारा खर्च आणि बागेतून मिळणाऱ्या उत्पादनापासून होणारे उत्पन्न यांचा हिशेब.

६. दिनशाजींचा वैयक्तिक हिशेब नीट व्हावा म्हणून डिसेंबर १९४५मधील वा त्या पूर्वीचे जे बिल  जानेवारी महिन्यात मिळाले त्याचा हिशेब.

७. रुग्णांकडून वा इतर कोणाकडून काही घेणे शिल्लक असले तर त्याचा हिशेब.

२. १ जानेवारी १९४६ पासून तर आज २१ फेब्रुवारी १९४६पर्यंत या संस्थेचे कामकाज कसे चालले यासंबंधी सविस्तर चर्चा झाली. गांधीजींची इच्छा त्यांच्या दृष्टिकोनानुसार संस्था चालावी अशी आहे.

३. भविष्यात ही संस्था कशी चालावी या संबंधी विश्वस्तांमध्ये सविस्तर चर्चा झाली. गांधीजींनी केवळ व्यवस्थापनासंबंधीच आपला दृष्टिकोन मांडला नाही तर गरीब लोकांचा लाभ होण्याकरिता कशा प्रकारे उपचार करावा याबद्दलही आपले मत मांडले. डॉ. मेहता म्हणाले की उपचाराची ही पद्धत केवळ प्रायोगिक अवस्थेत आहे आणि तिला फार मर्यादित वाव आहे. परंतु तिच्या मर्यादित स्वरूपात का होईना ती जर हिंदुस्थानच्या लोकांकरिता उपलब्ध होऊ शकत असेल आणि निसर्गोपचार विद्यापीठ अस्तित्वात येऊ शकत असेल तर मी गांधीजींच्या दृष्टिकोनानुसार उपचार करण्याकरिता तयार आहे. या काळात एक तर या उपचार पद्धतीच्या यशाने गांधीजींचा दृष्टिकोन सिद्ध होईल वा गांधीजी आपला दृष्टिकोन सोडून देतील. गांधीजींच्या म्हणण्यानुसार निसर्गोपचार विद्यापीठाची स्थापना हे त्यांचे अखेरचे जीवनकार्य असेल.

यानंतर ही सभा फेब्रुवारी २२च्या दुपारी २.३०पर्यंत स्थगित झाली.

मो. क. गांधी

फेब्रुवारी २२, १९४६

महात्मा खंड ७च्या पृष्ठ ९६-७मधील फोटोप्रतीवरून

-------------------

# २४ फेब्रुवारी १९४६. ५८०. निसर्गोपचार

(मुळात हे हिंदीत लिहिले होते. हे नोंदी या शीर्षकाखाली हरिजन सेवक आणि हरिजनमध्ये एकाय वेळी प्रकाशित झाले होते.)

निसर्गोपचार म्हणजे असा उपचार की ज्यामुळे माणसाचा फायदा होतो. इथे माणूस या शब्दाचा अर्थ केवळ एक मानव प्राणी इतकाच नसून मन आणि आत्मा असलेला शरीरधारी माणूस असा आहे. अशा माणसाकरिता रामनाम हाच खरा निसर्गोपचार आहे. हा रामबाण उपाय आहे. रामबाण हा शब्द यामुळेच निघाला आहे. निसर्गसुद्धा म्हणतो की माणसाकरिता हाच योग्य उपाय आहे. व्याधी कोणतीही जरी असली तरी अंतःकरणापासून रामनाम घेणे हाच त्यावरील खात्रीपूर्वक इलाज आहे. ईश्वराची किती तरी नावे आहेत. प्रत्येक माणूस आपल्याला जास्तीत जास्त भावेल ते नाव निवडू शकतो. ईश्वर, अल्ला, खुदा, गॉड या सर्वांचा अर्थ एकच आहे. परंतु रामनामाचा जप पोपटपंछीप्रमाणे नसावा, त्याचा श्रद्धेतून जन्म झालेला असला पाहिजे आणि श्रद्धेबरोबर प्रयत्नही असला पाहिजे. हे कसे?

तर माणसाची घडण ज्या गोष्टींनी झाली आहे, म्हणजे पृथ्वी, पाणी, आकाश, सूर्य आणि वारा यातूनच त्याने आपल्या व्याधीवरील उपाययोजनेचा शोध घेतला पाहिजेï अर्थातच त्याबरोबर रामनामही अपरिहार्यपणे असले पाहिजे. इतके करूनही शरीराचा नाश होत असेल तर होऊ द्यावा, त्याची फिकीर करू नये. उलटपक्षी त्याचे आपण स्वागत केले पाहिजे. शरीर अमर करता येईल असा शोध अजून तरी विज्ञानाने लावलेला नाही. अमरत्व हा आत्म्याचा गुण आहे. तो निश्चितच चिरंतन आहे परंतु त्याच्या अभिव्यक्तीकरिता शरीर शुद्ध करण्याचा सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. आपण जर वरील युक्तिवाद मान्य केला तर निसर्गोपचारात साधनांची जी मर्यादा सांगितली आहे ती अजूनच सीमीत केली जाईल. आणि मग माणसाची मोठमोठ्या रुग्णालयांच्या संसाधनांपासून आणि प्रख्यात डॉक्टर इत्यादींपासून सुटका होईल. जगातील बहुसंख्य लोकांना हे परवडू शकत नाही. जी गोष्टी अनेकांना मिळू शकत नाही त्याची काही थोड्याशा लोकांनी का इच्छा करावी?

पुणे,

फेब्रुवारी २४, १९४६. हरिजन, मार्च ३. १९४६

-------------------

# २४ फेब्रुवारी १९४६. ५८४. डॉ. दिनशा के. मेहता यांना पत्र

पुणे,

फेब्रुवारी २४, १९४६

चि. दिनशा,

माझ्या मनात तुझा विचार सुरू असतो. जहांगीरजींशी माझी चर्चा झाली. तुझ्यात जोपर्यंत सॅनेटरी सेन्स (मुळात हे दोन शब्द इंग्रजीत आहेत) जागा होत नाही तोपर्यंत गरिबांवर कधीही योग्य उपचार होऊ शकणार नाही. नोकरांकरिता असलेली चाळ लज्जाजनक आहे. घाणीचे राज्य आहे. मला वाटते की तू त्यांना तिथून हलवले पाहिजे. हे तुझे काम आहे आणि दुसरा कोणीही हे करू शकत नाही. तू जर परिसरातील रिकामी जागा ताब्यात दिली तर दुसरा कोणी करूही शकेल. तू स्वतःच जी तारीख ठरवशील त्या तारखेला तू ताबा दिला पाहिजे. (इतर काही लोकांना जरी नाही तरी) तू मुन्नालालला ताबडतोब मोकळे केले पाहिजे. मी अजून काय सांगू?

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता,

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

-------------------

# २८ फेब्रुवारी १९४६. २२. किशोरीलाल घ. मश्रूवाला यांना पत्र

पुणे,

फेब्रुवारी २८, १९४६

चि. किशोरीलाल,

आज काही पत्रांकडे मी पाहत असताना तुझ्या पत्राकडे माझी नजर गेली. तू गोमतीबद्दल (किशोरीलाल घ. मश्रूवाला यांची पत्नी.) जे लिहितो ते समजण्यासारखे आहे. ऍलोपॅथीचे डॉक्टर ज्या रुग्णांचे निदान करू शकत नाहीत त्यांचे काही निसर्गोपचारक निदान करू शकतात, परंतु ही गोष्ट गोमतीला लागू होत नाही, आणि डॉ. दिनशा या बाबतीत काही करू शकतील असे मला वाटत नाही. ते बरेच हुशार आणि उदार आहेत, परंतु ते एकाच पद्धतीने काम करत आहेत आणि त्यातून त्यांना लवकर बाहेर पडणे शक्य होईल असे मला वाटत नाही. माझ्यावरील असीम श्रद्धेमुळे त्यांना पसंत नसलेले कामही ते करत आहेत आणि सर्व काही निभवून घेत आहेत. अशा परिस्थितीत मी हे केंद्र चालवायला घेतले आहे. आपण विचारू तिथे ते आपल्याला मार्गदर्शन करतील. यामुळे धिरुभाई जरी आले तरी त्यांना दिनशाच्या ज्ञानाचा, हुशारीचा आणि अनुभवाचा लाभ होणार नाही. सध्या ते माझ्या मर्यादित ज्ञानाचाच उपयोग करू शकतात. दिनशा स्वतःच व्यायामाची प्रतिमूर्ती आहेत परंतु ते ते व्यायाम कोणाला शिकवत नाहीत. ते निसर्गोपचार आणि त्याचे विद्यापीठ काढण्याच्या इच्छेने भारावलेले आहेत, आणि माझ्याबरोबर काम केल्याने असे विद्यापीठ स्थापन होऊ शकेल असे त्यांना वाटते. हा विभाग जर पूर्णपणे गोरगरिबांकरिता असेल तर त्या आधारावर विद्यापीठ स्थापन करण्याची काही आशा करता आली असती. अशा परिस्थितीत धिरुभाईंचे काही समाधान करता येऊ शकेल असे मला वाटत नाही. मला असे वाटते की इथे कोणत्या तरी प्रकारच्या आश्रमीय जीवनाची सुरुवात होईल. मला अजून काही येतच नाही की मला इतर कशात रस नाही की काय हे मला माहीत नाही ! अशा प्रकारे मी इच्छेने आणि अनिच्छेने पुढे जात आहे. ज्याला नोकरवर्ग म्हणतात त्यांना मी परत पाठवत आहे; यात

मला कितपत यश येते हे पाहायचे आहे. यामुळे धिरुभाई आणि इतर येतील तर निसर्गोपचाराच्या माझ्या स्वतःच्या ज्ञानावर त्यांना समाधान मानावे लागेल, आज तरी हे असेच आहे. मध्यंतरीच्या काळात दिनशात मोकळेपणा आला आणि आपले ज्ञान इतरांना देण्याची क्षमता त्याच्यात आली तर आपण काही प्रगती करू शकू.

. . . .

आशीर्वाद,

बापू

किशोरीलाल घ. मश्रूवाला

सेवाग्राम

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

------------------

# ४ मार्च १९४६. ४६. दिनशा के. मेहता यांना पत्र

[मार्च ४, १९४६]

(हे पत्र या तारखेच्या पत्रांमध्ये ठेवलेले आहे. शिवाय पाहा "जेव्हा जाग येते तेव्हा सकाळ, मार्च ६, १९४६")

चि. दिनशा,

आज सकाळी मी अस्वस्थ झालो होतो. मला असे वाटले की मी चुकलो आहे वा घोडचूक केली आहे. गरिबांकरिता इतकी महाग आणि फर्निचरने भरलेली जागा (हा संदर्भ पुण्याच्या निसर्गोपचाराच्या जागेचा आहे.) आपल्याला परवडू शकते काय? असे करून लोकांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासाचा मी दुरुपयोग करत नाही काय? मला गरिबांची सेवा माझ्या पद्धतीने करायची आहे. याकरिता तू व्यवस्था केलेल्या कोणत्याही संसाधनांची गरज नाही. माझी जागा अशा काही खेड्यात आहे की जिथे मी काही झोपड्यांनी सेवा करू शकतो. माझ्या डोक्यात असे विचार येत असतात आणि मी कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. याचे उत्तर देण्याची धडपड करू नको. उद्या माझ्याशी बोल. यावर विचार कर. काही गोंधळ असेल तर विश्वस्तमंडळाने याबद्दल चर्चा केली पाहिजे. यामुळे मी जहांगीरजींना पत्र लिहिले आहे, त्याची प्रत मी सोबत जोडली आहे. ती वाच आणि त्यावर विचार कर. आपण जर चूक केली असेल तर तीच पुढे सुरू ठेवू नये असा माझा विश्वास आहे. परंतु घाबरून जाण्याची काहीही आवश्यकता नाही; मार्ग काढणे आपले काम आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

-----------------

# ६ मार्च १९४६. ५५. जेव्हा जाग येते तेव्हाच सकाळ

(याची गुजराती आवृत्ती हरिजनबंधूमध्ये हरिजनबरोबरच प्रकाशित झाली होती.)

माझ्या मित्रांप्रमाणेच मलाही स्पष्टपणे माहीत आहे की माझ्यात दुरुस्ती होऊ शकत नाही. चुका करून आणि त्या दुरुस्त करूनच मी शिकू शकतो. (गुजराती आवृत्तीत "मी चूका करून, त्या कबूल करून आणि त्यात दुरुस्ती करूनच मी शिकू शकतो असे आहे.") इतरांनी घेतलेल्या आक्षेपाने वा सावधगिरीच्या सूचनांनी मी का शिकू शकत नाही हे मला कळत नाही. (हे आणि पुढील तीन वाक्य गुजरातीतून भाषांतरित करून घेतले आहेत.) मी तेव्हाच शिकतो जेव्हा मला ठेच लागते, खाली पडतो आणि वेदना होतात. लहानपणी आपण सर्व याच पद्धतीने शिकत असतो. माझ्या ७६व्या वर्षीही माझी हीच परिस्थिती आहे. नुकताच माझी एक अशी चूक माझ्या लक्षात आली की जी मी कधीही करायला नको होती.

दिनशा मेहतांना मी कधीपासूनच ओळखत होतो. त्यांनी त्यांचे जीवन पूर्णपणे त्यांच्या संकल्पनेतील निसर्गोपचाराला वाहून टाकले आहे. हिंदुस्थानात पूर्णपणे निसर्गोपचाराला वाहिलेले विद्यापीठ स्थापन व्हावे ही त्यांची एकमेव आकांक्षा आहे. या नावाला शोभणारे विद्यापीठ व्हायचे असेल तर ते प्रामुख्याने ग्रामीण भागातील गोरगरिबांकरिता रोगप्रतिकारक आणि रोगनिवारक असले पाहिजे. जगात असे एकही विद्यापीठ नाही. पश्चिमेकडील संस्थांची घडण गरिबांच्या दृष्टीने नाही तर श्रीमंतांकरिता झाली आहे. आणि त्यासुद्धा विद्यापीठ तर मुळीच नाहीत. असे विद्यापीठ स्थापन झाले तर तिथे गरिबांच्या आजारावर नैसर्गिक पद्धतीने उपचार कसा केला जाऊ शकतो हे विशेषत्वाने शिकवले जाईल.

हिंदुस्थानच्या ग्रामीण लोकांकरिता निसर्गोपचाराची पद्धत कशी असावी हे मला माहीत आहे असा विश्वास मला वाटत होता. असे असताना मला ताबडतोब कळायला पाहिजे होते की पुण्यासारख्या शहरात ग्रामीण लोकांकरिता निसर्गोपचाराचा प्रयत्न करता येऊ शकत नाही. परंतु एक न्यास तयार करण्यात आला. त्यात डॉ. दिनशा मेहतांच्या निसर्गोपचार केंद्राचा

समावेश करण्यात आला. डॉ. मेहता आणि अतीशय व्यवहारकुशल जहांगीरजी पटेल हेही त्यात माझ्याबरोबर सामील झाले. आणि डॉ. मेहतांनी ज्या उपचारगृहाची स्थापना श्रीमंतांकरिता केली होती त्याचा गरिबांकरिता उपयोग करण्याच्या विचाराने मी ताबडतोब पुण्याला येऊन पोहोचलो. मी काही फार मोठ्या दुरुस्त्या सुचवल्या, परंतु गेल्या चार मार्चला (मार्च ४, १९४६; पाहा "दिनशा के. मेहता यांना पत्र", मार्च ४, १९४६) माझे मौन सुरू असताना माझ्या लक्षात आले की गरीब ग्रामीणांकरिता शहरात निसर्गोपचाराचा विचार करणेसुद्धा मूर्खपणा आहे. माझ्या लक्षात आले की मला जर गरीब आजाऱ्यांची काळजी वाटत असेल तर मी त्यांच्याकडे जायला पाहिजे, त्यांनी माझ्याकडे यावे अशी अपेक्षा मी करायला नको. जिथे ही गोष्ट साध्या वैद्यकीय औषधोपचाराकरितासुद्धा खरी आहे तिथे निसर्गोपचाराकरिता तर ही अजूनच खरी आहे. पुण्यात आलेल्या ग्रामीणाला मातीचा लेप, सूर्यस्नान, कटिस्नान, घर्षणस्नान, अथवा खाद्यान्नातील कोणताही भाग वाया जाणार नाही अशा प्रकारे अन्न कसे शिजवावे यासंबंधीच्या माझ्या सूचनांचे पालन कसे करावे हे कसे कळेल? (पुढील दोन वाक्ये गुजरातीतून भाषांतरित करून घेतली आहेत) याला मूर्खपणा म्हणायचे नसेल तर अजून काय म्हणावे? ग्रामीण माणूस येथून मान हलवत जाईल खरा परंतु हसत मनातल्या मनात तो म्हणेल की मला निसर्गोपचार करायला सांगणारा हा माणूस मूर्ख आहे. तो माझ्याकडे पुडीची वा फक्कीची मागणी करण्याकरिता वा औषध पिण्याकरिता येत असतो.

निसर्गोपचार एक जीवनपद्धती आहे व ती शिकावी लागत असते; आपल्याला वाटते ,तसा हा औषधोपचार नाही. हा उपचार प्रभावी होण्याकरिता रुग्णाला हा त्याच्या घराजवळ वा झोपडीजवळ मिळाला पाहिजे. निसर्गोपचारकाकडून रुग्णाला सहानुभूती, धैर्य आणि मानवी स्वभावाचे ज्ञान या गोष्टी हव्या असतात. निसर्गोपचारक जेव्हा अशा प्रकारे एखाद्या वा अनेक खेड्यात उपचार करतो आणि जेव्हा अनेक स्त्रीपुरुषांना निसर्गोपचाराचे रहस्य कळते तेव्हा निसर्गोपचारक त्यांचे मन जिंकतो व ते निसर्गोपचाराच्या पद्धतीने चालू लागतात, असे झाले की निसर्गोपचार विद्यापीठाच्या पाया घातला जातो.

ही साधी गोष्ट कळण्याकरिता मला संस्थेत ११ दिवस मुक्काम करावा लागण्याची आवश्यकता पडायला नको होती. या उपचाराकरिता शहरातील बंगल्याची आवश्यकता नाही हे मला ताबडतोब कळायला पाहिजे होते. माझ्या या चुकीबद्दल रडावे की हसावे हेच मला कळत नाही. मी त्यावर हसलो आणि एकही पैसा खर्च न करता हा कबुलीजबाब देऊन मी ही चूक दुरुस्त करतो आहे. (उरलेला परिच्छेद गुजरातीतून भाषांतर करून घेतला आहे.) एकदा काम सुरू केल्यानंतर ते सोडणे हे तर मी शिकलोच नाही. यामुळे माझ्याकरिता एकच पर्यायी मार्ग आहे. हे काम कोणत्या तरी गावात सुरू करणे.

माझ्या या चुकीपासून वाचकांनीही धडा शिकायला पाहिजे. महात्म्याने जरी एखादी गोष्ट सांगितली तरी ती गोष्ट जर आपल्या मनबुद्धीला पटत नसेल तर तिला वेदवाक्य मानू नये. महात्म्याचे म्हणणे सर्व दृष्टींनी आपल्याला पटत असेल तरच त्यावर विश्वास ठेवावा.

या प्रकरणी तर माझा मूर्खपणा इतका स्पष्ट आहे की हा प्रयोग जरी फार दिवस लांबला असता तरी खरेखुरे ग्रामीण उपचाराकरिता पुण्याला आलेच नसते, आणि आले जरी असते तरी एखाददुसराच. परंतु हा शोध मला फार उशिरा लागला. उपचाराचे काम थोडेफार सुरू केल्यानंतर जर ही चूक माझ्या लक्षात आली असती तर माझ्या स्वतःच्या दृष्टीतही माझी प्रतिष्ठा मातीमोल झाली असती. आत्मसन्मान नाहीसा होण्यामुळे माणूस जितका दुखावतो तितका इतर कशानेही नाही. आता माझ्या सहकाऱ्यांच्या विश्वासाकरिता मी पात्र आहे की नाही हे मला माहीत नाही. मी जर तो विश्वास गमावला असेल तर त्याकरिता मी पात्रच होतो असेच मी समजेन. परंतु वाचकांनी लक्षात ठेवावे की गरिबांच्या उपचाराकरिता त्यांच्या खात्यात जितका पैसा ठेवला होता त्यातील एक पैसुद्धा खर्च करण्यात आलेली नाही.

ही निसर्गोपचार संस्था पुढे कोणते रूप धारण करील आणि गरीब माणसाकरिता निसर्गोपचाराचा प्रयत्न कुठे आणि कसा केला जाईल हा या कबुलीजबाबाचा विषय नाही. माझ्या तथाकथित वार्धक्याच्या काळात मी हा जो उपक्रम सुरू केला तो या चुकीमुळे रद्द करता येऊ शकत नाही. उलटपक्षी हा उपक्रम करोडो लोकांकरिता असल्यामुळे तो जर व्यवहार्य असेल तर

अधिक स्पष्ट आणि अधिक जोमदार असला पाहिजे. तो शक्य तर निश्चितच आहे. (पुढील भाग गुजरातीतून भाषांतरित करून घेतला आहे.)

माझ्याकरिता इतके पुरेसे आहे की या चुकीनंतर माझ्या आदर्शाकडे पोहचण्याचा प्रयत्न करत असताना मी अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे. गरीब ग्रामीण निसर्गोपचार अनुसरतात की नाही हे काळच सांगेल. निसर्गोपचाराचे ते स्वागत करणार नाही असा संशय घेण्याकरिता कोणतेही कारण नाही.

पुणे, मार्च ६, १९४६

हरिजन, मार्च १७, १९४६

----------------------

# ७ मार्च १९४६. ६७. अखिल भारतीय निसर्गोपचार संस्थेत भाषण

(गांधीजींच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय निसर्गोपचार संस्थेच्या विश्वस्तांची जी पाचवी सभा झाली होती तिच्या इतिवृत्तातून हे भाषण उद्धृत केले आहे. या सभेत डॉ. दिनशा के. मेहता, जहांगीर पटेल हे विश्वस्त हजर होते आणि गुलबाई दि. मेहता यांनाही तिच्यात उपस्थित राहण्याचा परवानगी देण्यात आली होती.)

पुणे,

मार्च ७, १९४६

महात्मा गांधी म्हणाले की हिंदुस्थानच्या शहरांमध्ये आणि पाश्चात्य देशांत निसर्गोपचाराची जी पद्धत प्रचलित आहे ती हिंदुस्तानच्या खेड्यांमधील लोकांकरिता उपयुक्त नाही. ही पद्धती खेड्यात आणि खेड्यांच्या आजूबाजूला सहजपणे उपलब्ध असलेले साहित्य यांच्यावर आधारित असली पाहिजे आणि खेड्यांच्या अर्थव्यवस्थेशी अनुरूप असली पाहिजे. रोग्यावरील उपचाराऐवजी हिच्यात प्रामुख्याने रोगप्रतिबंधावर भर देण्यात आला पाहिजे. या दृष्टिकोनातून रामनाम आणि पंचमहाभूते म्हणजे भूमी, पाणी, वायू, सूर्य आणि आकाश यांच्यावर ही उपचार पद्धती आधारलेली असली पाहिजे.

महात्मा गांधींनी आपल्या पद्धतीच्या आधार म्हणून रामनामातील आणि निसर्गोपचार विज्ञानातील आध्यात्मिक मूल्यावर विशेष भर दिला. ते म्हणाले की पुण्याच्या आजूबाजूच्या खेड्यात मी एकदा माझ्या संकल्पनेतील निसर्गोपचाराची सुरुवात केली की निसर्गोपचाराबद्दलच्या माझ्या कल्पना स्पष्ट होत जातील व त्या संपूर्ण हिंदुस्शानातील खेड्यापाड्यांमध्ये पसरतील. . . .

यानंतर देशातील विविध निसर्गोपचार संस्थांचा अभ्यास करण्याकरिता दिनशा मेहतांना महात्मा गांधींनी हिदुस्थानच्या विविध भागात प्रवास करण्याचा सल्ला दिला.. . . . (डॉ. मेहता यांनी ही सूचना मान्य केली आणि तिला जहांगीर पटेल आणि गुलबाई मेहता यांनी पाठिंबा दिला.)

महात्मा खंड ७, पृष्ठ ९६ आणि ९७च्या मध्ये

------------------

# १२ मार्च १९४६. ८९. रुग्णांना

पुण्याच्या निसर्गोपचार केंद्रात दाखल होण्याकरिता अनेक रुग्णांची किती तरी पत्रे येत आहेत. सध्या तिथे अशी कोणतीही सुविधा नाही हे मी त्यांना कळवू इच्छितो. ज्या दर्जाची स्वच्छता तिथे ठेवण्याचा विचार होता त्या दर्जापर्यंत अजून पोहोचता आलेले नाही. गावकऱ्यांसाठी अजून काम सुरू झालेले नाही. जोपर्यंत प्राथमिक बदल पूर्ण होत नाहीत तोपर्यंत काहीही करता येऊ शकत नाही. यामुळे रुग्णांनी वाट पाहिली पाहिजे. डॉ. दिनशा मेहता यांचे मुंबई येथील उपचार गृह अर्थातच सुरू आहे. ते त्याच्या पुण्याला आणि सिंहगडला शाखासुद्धा उघडू शकतात. परंतु त्यांनी निसर्गोपचार न्यासाची मोठी जबाबदारी घेतलेली असल्यामुळे याकरिता वेळ लागू शकतो. रुग्णांकरिता त्यांचे शुल्क पूर्वीप्रमाणेच राहील.

मुंबई, मार्च १२, १९४६

हरिजन, मार्च १७, १९४६

----------------

# १५ मार्च १९४६. ११५. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या "विकली लेटर - १" मधून उद्धृत. या लेखातील मजकुराशी मार्च १६, १९४६च्या 'द बॉम्बे क्रॉनिकल'मधील मजकुराशी मेळ घालण्यात आला आहे. ही सभा रुंगटा भवनमध्ये घेण्यात आली होती.)

मुंबई,

मार्च १५, १९४६

. . . .

गांधीजी म्हणाले की उद्या मी मुंबई सोडणार आहे. यामुळे येथून निघत असताना मी तुम्हांला एक संदेश देतो. मला तुम्हाला निसर्गोपचाराबद्दल सांगायचे आहे. मी या विषयासंबंधी लिहिले आहे परंतु फारसे काम केलेले नाही. डॉक्टरने बाटलीतून औषध द्यावे त्याप्रमाणे निसर्गोपचार नाही. आरोग्य आणि समाधानी राहण्याचा हा खराखुरा नैसर्गिक मार्ग आहे. मी असे सांगतो हे पाहून तुम्हांला कदाचित आश्चर्य वाटेल; याचबरोबर रामनाम हा निसर्गोपचारातील एक उपाय आहे हेही मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगेन.

निसर्गोपचाराने सर्व रोग दुरुस्त होतात असा दावा कोणीही करू शकत नाही. कोणतीही औषधोपचार पद्धती हा दावा करू शकत नाही. असे नसते तर आपण सर्व अमर झालो असतो. परंतु यामुळे दुरुस्त न होणाऱ्या रोगातही माणूस अस्वस्थ न होता स्वस्थ चित्ताने त्या रोगाचे परिणाम सहन करण्याकरिता आपल्या मनाची तयारू करू शकतो. जे करोडो लोकांना मिळू शकत नाही ते आपल्याकरिताही निषिद्ध आहे असे आपण जर का ठरवले तर आपण स्वाभाविकपणेच निसर्गोपचाराकडे ओढले जातो, कारण हाच असा उपचार आहे की जो गरीब आणि श्रीमंतांना सारखाच मिळू शकतो.

निसर्गोपचारकाच्या शस्त्रागारात रामनाम हे सर्वात सामर्थ्यशाली शस्त्र आहे. याबद्दल कोणीही आश्चर्य मानण्याचे कारण नाही. एका प्रसिद्ध आयुर्वेदाच्या वैद्याने (ही संदर्भ वैद्य गणेश शास्त्री जोशी यांचा आहे; पाहा "आगा खान यांना संदेश", मार्च १०, १९४६) काही दिवसांपूर्वी मला सांगितले, "आयुष्यभर

मी लोकांवर औषधोपचार करत राहिलो. परंतु शारीरिक व्याधींवर तुम्ही रामनामाचा उपचार सांगितल्यानंतर वाग्भट आणि चरक यांनीही रामनामाचा उपचार सांगितले असल्याचे माझ्या लक्षात आले. परंतु रामनामाचा उपचार हा पर्वतांइतका जुना आहे. परंतु मोठ्या गोष्टीत लहान गोष्ट सामावलेली असते. आणि रामनामाचा जप हा सर्व शारीरिक रोगांवरील वैश्विक उपचार आहे हा माझा दावा आहे. निसर्गोपचार करणारा माणूस रुग्णाला म्हणणार नाही की "मला बोलवा आणि मी तुमच्या सर्व व्याधी दूर करीन." तो त्याला सर्व रोगांवरील उपचाराचे तत्त्व सांगेल, ते तत्त्व कसे जागृत करता येऊ शकते आणि त्याला आपल्या जीवनाची प्रेरक शक्ती करून आपले आजार कसे दूर करता येऊ शकतात हे तो रुग्णाला सांगेल. हिंदुस्थानला जर या तत्त्वाची शक्ती कळली तर आपण केवळ स्वतंत्रच होणार नाही तर आपण निरोगी लोकांची भूमी होऊ, आजप्रमाणे हा देश साथीच्या रोगांची आणि विविध आजाराची भूमी राहणार नाही.

अनेक दिवसांपासून मी शिकवतो आहे की संपूर्ण हिंदूस्थान जर सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान शिकेल तर हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळेल. मला याबद्दल इतकी खात्री वाटते की संपूर्ण जगाने जरी मला विरोध केला तरी मी या सिद्धांताचे प्रतिपादन करीन. याचप्रमाणे आजारी माणसाला रामनामाची मदत होऊ शकते याबद्दलही मला तितकीच खात्री वाटते. (हा परिच्छेद 'द बॉम्बे क्रॉनिकल'मधून घेतलेला आहे.)

असे असले तरी रामनामाची शक्ती काही अटींवर अवलंबून आहे आणि त्याला काही मर्यादा आहेत. रामनाम काळ्या जादूप्रमाणे नाही. कोणी जर आधाशाप्रमाणे खाऊन आजारी पडला आणि परत घशापर्यंत अन्न येईपर्यंत खाता यावे म्हणून त्याला त्याचे परिणाम टाळायचे असतील तर अशा माणसाकरिता रामनाम नाही. रामनामाचा उपयोग केवळ चांगल्याकरिता करता येऊ शकतो, वाईट उद्दिष्टाकरिता नाही. असे नसेल तर चोर, डाकू, लूटमार करणारे इत्यादी रामाचे सर्वात मोठे भक्त होतील. ज्या लोकांचे अंतःकरण शुद्ध आहे, ज्यांना पवित्र व्हायचे आहे आणि पवित्र राहायचे आहे त्यांच्याकरिता रामनाम आहे. रामनाम कधीही उपभोगात रममाण होणारांकरिता असू शकत नाही. आधाशी माणसाकरिता उपाय उपवास आहे प्रार्थना नाही.

उपवासाने आपले काम केल्यानंतरच प्रार्थनेचा उपयोग होऊ शकतो. रामनामामुळे उपवास सोपा आणि सह्य होऊ शकतो. अशाच प्रकारे तुम्ही तुमच्या शरीरात औषधे ओतत असताना रामनामाच्या जपाला काहीही अर्थ नसतो. जो डॉक्टर रुग्णाचे व्यसन पूर्ण करण्याकरिता आपल्या कौशल्याचा उपयोग करतो तो स्वतःचा आणि रुग्णाचाही अधःपात करतो. आपला देह आपल्या निर्मात्याची भक्ती करण्याकरिता आहे असे न समजता त्या देहाचीच पूजा करणे आणि काहीही करून तो देह टिकवून ठेवण्याकरिता पाण्यासारखा पैसा खर्च करणे याहून अधिक अधःपात कोणता असू शकतो? उलटपक्षी रामनाम आपल्याला दुरुस्त करत असतानाच शुद्धही करत असते, आणि म्हणून ते आपल्याला उन्नत करते. यातच रामनामाची उपयोगिता आहे आणि मर्यादाही आहेत. (यानंतरचा भाग द बॉम्बे क्रॉनिकलमधून घेतला आहे.)

गांधीजी म्हणाले की मी बॅरिस्टर होतो तेव्हापासून मी निसर्गोपचाराचा उपयोग करतो आहे. परंतु उपासमार होत असलेल्या करोडो खेड्यातील लोकांकरिताही निसर्गोपचाराचा उपयोग करता येऊ शकतो हे मात्र माझ्या उशिरा लक्षात आले.

हरिजन, एप्रिल ७, १९४६

-----------------

# १६ मार्च १९४६. ११९. सहज भेटण्याकरिता आलेल्यांशी चर्चा

[मार्च १६, १९४६ला वा त्यापूर्वी]

उपचाराच्या नेहमीच्या पद्धतीत रोग दुरुस्त होईल असे औषध घेण्याकरिता रुग्ण डॉक्टरकडे येतो. डॉक्टर त्याला औषध सांगतो. रुग्णातील विकार दूर झाले की डॉक्टरचे काम संपते व त्याचबरोबर रुग्णातील चिकित्सकाचा रसही संपतो. निसर्गोपचारक माणूस रुग्णाला रोगावरील उपचार विकत नसतो. तो त्याला त्याच्या घरी योग्य पद्धतीने कसे राहावे हे शिकवतो. यामुळे त्याची केवळ व्याधीच दूर होत नाही तर भविष्यात आजारी न पडण्यापासूनही तो त्याला वाचवतो. सर्वसामान्य डॉक्टरला वा वैद्याला रुग्णाच्या रोगाच्या अभ्यासातच रस असतो तर निसर्गोपचारकाला रुग्णाच्या स्वास्थ्याच्या अभ्यासात रस असतो. सर्वसामान्य डॉक्टरचा रस जिथे संपतो तिथे निसर्गोपचारकाला खरा रस वाटू लागतो; रुग्णाचा आजार दूर करण्यापासून निसर्गोपचारकाचे काम सुरू होत असते व तो त्याला असा जीवनमार्ग शिकवतो की ज्यामुळे माणसाच्या जीवनात आजाराला वा रोगाला स्थानच राहू नये. असा प्रकारे निसर्गोपचार ही जीवनपद्धती आहे, उपचार सांगणे नाही.

हरिजन, एप्रिल ७, १९४६

----------------

# १९ मार्च १९४६. १४७. वल्लभभाई पटेल यांना पत्र

पुणे,

मार्च १९, १९४६

भाई वल्लभभाई,

. . . .

निसर्गोपचाराकरिता मी एखादे गाव निवडले पाहिजे. त्याकरिता मी इथे आजूबाजूला शोध घेत आहे. फेब्रुवारी ते जुलैपर्यंतचा काळ तुलनात्मक दृष्टीने कोणत्या तरी थंड हवेच्या ठिकाणी, आणि यातील एप्रिल आणि मेमध्ये पर्वतावरील एखाद्या ठिकाणी घालवावा असा माझा विचार आहे. गुजरातमध्ये ही व्यवस्था करता येऊ शकत नाही. तिथे अबू हे एकमेव पहाडी भागातील ठिकाण आहे, आणि तिथेही पाचगणी वा महाबळेश्वरसारखे हवामान नाही. पुण्यासारखे थंड हवामानाचे ठिकाणही मला गुजरातमध्ये आढळत नाही. नंतर तुमची कोणतीही तक्रार असायला नको म्हणून मी हे सर्व तुम्हाला सांगतो आहे. असे असले तरी गुजरातमध्ये तुम्हाला असे कोणते ठिकाण आढळते काय की जिथे निसर्गोपचाराचे कामही करता येईल आणि वरील अटींची पूर्तताही होईल? आणि तुम्हाला ते खरोखरच पसंत असेल काय? निसर्गोपचार हा काही माझ्याकरिता शौक नाही. मी याकरिता विस्तृत प्रयत्न केला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

सरदार वल्लभभाई पटेल,

६८, मरीन ड्राईव्ह, मुंबई

गुजरातीवरून. बापूनो पत्रो - २ : सरदार वल्लभभाईने, पृष्ठ ३०२-३

----------------------

# २१ मार्च १९४६. १६३. प्रार्थना प्रवचन

पुणे,

मार्च २१, १९४६

गांधीजी म्हणाले की माझ्या जीवनात मी अनेक लढाया लढलो आहे. आता अजून एक लढाई लढायची आहे आणि ती आहे निसर्गोपचाराची.

डॉ. दिनशा मेहतांना मी दीर्घ काळापासून ओळखतो आणि त्यांचे निसर्गोपचार केंद्र गरिबांचे निसर्गोपचार केंद्र व्हावे म्हणून त्यांच्याबरोबर त्यांच्या निसर्गोपचार केंद्राचा विश्वस्त झालो. परंतु पुण्यात राहून मी गरिबांची सेवा करू शकत नाही असे माझ्या लक्षात आले. श्रीमंत लोकांना रुग्णालयात आणि चिकित्सालयात जाणे परवडते. तिथे त्यांना डॉक्टरची सेवा उपलब्ध होऊ शकते, परंतु गरीब लोकांना आपले घर सोडून शहरात जाणे परवडू शकत नाही. त्यांना निसर्गोपचाराची पद्धत शिकवण्याकरिता आणि त्यांची सेवा करण्याकरिता मी त्यांच्यापर्यंत जायला पाहिजे. मी निसर्गोपचाराचा अभ्यास केला आहे आणि त्या पद्धतीचा उपचारही केला आहे. आता जीवनाच्या संध्याकाळी माझे जिवनकार्य म्हणून निसर्गोपचार करोडो गरिबांपर्यंत पोहोचवण्याचे मी ठरवले आहे. मी उरुळी कांचन गावात काम करण्याकरिता आणि निसर्गोपचाराचा प्रयोग करण्याकरिता जात आहे. (उरुळी कांचन हे निसर्गोपचाराकरिता योग्य ठिकाण आहे काय हे पाहण्याकरिता उरुळी कांचन येथील किती तरी प्रमुख लोकांनी गांधीजींना उरुळी कांचनला येण्याची विनंती केली होती.)

द हिंदू, मार्च २३, १९४६

------------------

# २२ मार्च १९४६. १७३. प्रार्थना प्रवचन

उरुळी कांचन,

मार्च २२, १९४६

गांधीजींनी जाहीर केले. . . की उद्यापासून मी रुग्ण घेईन, त्यांना तपासेन आणि त्याच्या व्याधीवर काय उपचार आहे ते सांगेन. मला जर योग्य जागा मिळाली आणि जर काही कामाकरिता मला बाहेर जावे लागले तर माझ्यामागे दोन योग्य व्यक्ती इथे असतील.

महात्मा गांधी म्हणाले की शारीरिक आणि मानसिक व्याधींवर रामनाम हा सर्वात प्रभावी उपचार आहे. डॉक्टर आणि वैद्य औषध देऊन रोग दुरुस्त करण्याचे आश्वासन देतात. परंतु तुम्ही जर ईश्वराची प्रार्थना केली तर तो निश्चितच तुमची वेदना आणि काळज्यांपासून मुक्तता करील. परंतु प्रार्थनेचा प्रभाव पडण्याकरिता तुम्ही अंतःकरणापासून रामधून म्हणायला पाहिजे. असे झाले तरच तुम्हांला समाधान आणि शांतता मिळेल.

आताच आपण जे लांब भजन म्हणालो त्यात भक्त म्हणतो की “हे ईश्वरा, तू लोकांचे दुःख दूर करत असतो.” इथे दिलेले अभिवचन विश्वव्यापी आहे. ते काही विशेष प्रकारच्या व्याधीकरिता सीमित नाही. . . . . तुम्हांला जर राग येत असेल, तुमचे खाणे, झोपणे जर केवळ अस्तित्व टिकवण्याकरिता नसेल आणि उपभोगाकरिता असेल तर तुम्हांला रामनामाचा अर्थ कळत नाही. मग तुम्ही केलेला जप केवळ ओठांपासून असेल. रामनाम जर परिणामकारक व्हायचे असेल तर तुमचे संपूर्ण व्यक्तित्व त्यात विलीन व्हायला पाहिजे व ते तुमच्या जीवनातून अभिव्यक्त व्हायला पाहिजे. (हा परिच्छेद प्यारेलाल यांच्या “विकली लेटर - १” मधून घेतलेला आहे.)

गांधीजी म्हणाले की मी उरुळीला आलो कारण निसर्गोपचाराद्वारे जर मला गरिबांची सेवा करायची असेल तर मी गावांमधील त्यांच्या झोपड्यांपर्यंत जायला पाहिजे. मी ५० वर्षांपासून निसर्गोपचार करत आहे. परंतु मी ते माझ्याकरिता आणि माझ्या काही थोड्याश्या मित्रांकरिता करत होतो. आतापर्यंत या कामाचा व्याप वाढवावा असे मला वाटले नव्हते, आणि

आता जीवनातील माझ्या संध्याकाळी मी गरिबांमध्ये निसर्गोपचाराचा प्रसार करण्याचे काम हाती घेतले आहे. माझा विश्वास आहे की निसर्गोपचाराने गरीब आणि श्रीमंत या दोघांचाही लाभ होईल.

द हिंदू मार्च २४, १९४६ आणि शिवाय हरिजन, एप्रिल ७, १९४६

--------------------

# २३ मार्च १९४६. १८२. प्रार्थना प्रवचन

(हे प्यारेलाल यांच्या "विकली लेटर - १" उद्धृत केले आहे.)

उरुळी कांचन

मार्च २३, १९४६

सर्व शारीरिक आणि मानसिक आजारांमागे एकच कारण असते असे आढळून आले आहे. यामुळे या सर्वांकरिता एकच उपाय असणे स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणे रोगांमध्ये समानता आहे त्याचप्रमाणे उपचारातही समानता आहे. शास्त्रांचे हेच म्हणणे आहे. यामुळे माझ्याकडे जे रुग्ण आले त्या सर्वांना मी रामनाम आणि जवळपास एकच उपचार सांगितला आहे. परंतु शास्त्रांचा जेव्हा आपल्याला सोयीस्कर अर्थ लागत नाही तेव्हा व्यावहारिक जीवनातील कोणते ना कोणते कारण सांगून आपण ते टाकून देतो. शास्त्रांचा हवा तसा अर्थ लावण्याचे कौशल्य आपल्यामध्ये आहे. आम्ही स्वतःला या भ्रमात टाकले आहे की शास्त्राचा उपयोग आपल्या आत्म्याच्या पुढील जन्माच्या हितार्थच असतो, धर्माचा उपयोग पुढील जन्मी पुण्य मिळवण्याकरिताच आहे. मला हा दृष्टिकोन पटत नाही. धर्माचा या जीवनात व्यावहारिक उपयोग नसेल तर माझ्याकरिता त्याचा पुढील जन्मातही उपयोग नसेल.

या जगात क्वचितच कोणी असेल की जो शारीरिक वा मानसिक व्याधीपासून पूर्णपणे मुक्त आहे. यातील काहींकरिता तर कोणताही भौतिक उपचार नाही. उदाहरणार्थ रामनामाने तुम्ही गमावलेले इंद्रिय परत येऊ शकत नाही. हा चमत्कार रामनाम करू शकत नाही. पण ते याहून मोठा चमत्कार करू शकते. ही हानी होऊनही अनुपम आनंदात जीवन कसे कंठावे हे ते तुम्हांला शिकवते आणि जीवनाच्या अंतिम क्षणी मृत्यूचा डंख घालवून त्याच्या भीतीपासून ते तुम्हाला मुक्त करते. ज्याअर्थी लवकर म्हणा वा उशिरा प्रत्येकाला मृत्यू येणार आहे तर मग वेळेबद्दल माणसाने दुःख का करावे.

हरिजन, एप्रिल ७, १९४६

-----------------

# २४ मार्च १९४६. १८६. प्रार्थना प्रवचन

(हे प्यारेलाल यांच्या "विकली लेटर - १"उद्धृत केले आहे.)

उरुळी कांचन,

मार्च २४, १९४६

ज्या लोकांना निसर्गोपचार हवा आहे ते स्वतःहोऊन पुढे येत आहेत ही चांगली गोष्ट आहे (निसर्गोपचार घेऊ इच्छिणाऱ्या रुग्णांची संख्या ३० पासून ४३पर्यंत वाढली याचा हा संदर्भ आहे.).

गांधीजी म्हणाले की योजनेप्रमाणे हे काम जर पुढे जात राहिले तर तुमच्यामध्ये वर्षातून कमीतकमी चार महिने राहण्याची माझी इच्छा आहे. मी नसताना माझे सहकारी माझ्या सूचनेप्रमाणे तुम्हांला मार्गदर्शन करत राहतील.

निसर्गोपचार करण्याकरिता फार मोठ्या शैक्षणिक पात्रतेची वा विद्वत्तेची आवश्यकता नसते. विश्वात्मकतेचे लक्षण साधेपणा आहे. जी कोणती गोष्ट केवळ श्रीमंताकरिता हितावह असेल ती विश्वव्यापी होऊ शकत नाही. परंतु हिंदुस्थान त्याच्या प्रसिद्ध नसलेल्या, लहानलहान, हमरस्त्यावरून दूर असलेल्या सात लाख खेड्यांमध्ये राहतो. त्यापैकी काही खेड्यांची लोकसंख्या तर मुश्किलीने काही शंभर असेल.आणि अनेकदा तर ती काही विशीत असते. मला अशाच कोणत्या तरी खेड्यात जाऊन राहायचे आहे. तो खरा हिंदुस्थान आहे. खरा हिंदुस्थान हा माझा हिंदुस्थान आहे., त्याच्याकरिताच मी जगतो आहे. साधेभोळे लोक राहत असलेल्या हिंदुस्थानाIतील या खेड्यांमध्ये अतिशय उच्च शिक्षण घेतलेल्या डॉक्टरांना व त्यांच्या रुग्णालयांना त्यांच्या संसाधनांच्या लवाजम्यासहित नेऊ शकत नाही. साधा निसर्गोपचार आणि रामनाम हीच त्यांची एकमेव आशा आहे.

उरुळी कांचनमध्ये क्वचितच एखादा रोग असू शकेल असे मला सांगण्यात आले. याचा अर्थ इथे कोणताही साथीचा रोग नाही इतकाच होतो. रोगराईचा सामान्यपणे हाच अर्थ घेतला

जातो. परंतु गेल्या दोन दिवसात माझ्याकडे जे रुग्ण आले त्यावरून उरुळीमध्येही बरेच आजार आहेत हे स्पष्ट आहे.

गावकऱ्यांना ते म्हणाले - मी सांगतो तसे तुम्ही केले तर उरुळी असे आदर्श खेडे होईल की जे पाहण्याकरिता दूरवरून लोक येतील. माणसाचे भौतिक शरीर पंचमहाभूतांपासून तयार होत असते. ही पंचमहाभूते म्हणजे हवा, पाणी, माती, अग्नी वा तेज (शक्ती देणारे तत्त्व) आणि इथर म्हणजे पोकळी. आत्मा त्यात प्राण ओततो. यांतील सर्वात महत्त्वाचे तत्त्व वायू आहे. माणूस अन्नाशिवाय अनेक आठवडे राहू शकतो, पाण्याशिवाय काही काळ परंतु वायूशिवाय तो काही मिनिटांपेक्षा जास्त काळ जिवंत राहू शकत नाही. यामुळे ईश्वराने वारा सर्वत्र उपलब्ध होईल असे केले आहे. अन्न आणि पाण्याचा चणचण काही काळ भासू शकते परंतु हवा मात्र सर्वत्र उपलब्ध राहील हे ईश्वराने पाहिले आहे. असे असूनही मूर्खपणाने दारेखिडक्या बंद करून आपण झोपतो आणि ईश्वराने ताज्या आणि शुद्ध हवेचा दिलेला आशीर्वाद झिडकारतो. माणसाला चोराची भीती वाटत असेल तर हवे असेल तर त्याने रात्री दारेखिडक्या बंद कराव्या. परंतु माणसाने स्वतःला बंद का करावे? ताजी हवा मिळण्याकरिता माणसाने उघड्यावर झोपायला पाहिजे. परंतु उघड्यावर झोपून धुळीने आणि घाणीने भरलेल्या वाऱ्यात श्वास घेणे चांगले नाही. काही लोक धूळ आणि थंडीपासून बचाव करण्याकरिता आपला चेहरा झाकून घेतात. हा उपाय तर रोगापेक्षाही भयानक आहे. यानंतर तोंडाने श्वासोच्छ्वास करण्याची काहींना वाईट सवय असते. तोंड खाण्याचे इंद्रिय आहे, श्वासोच्छ्वासाचे नाही. नाकातून जाणारी हवा चाळून शुद्ध केली जाते आणि फुफ्फुसात शिरण्यापूर्वी ती गरम केली जाते. जो कोणी बेफिकीरपणे थुंकून, कचरा आणि घाण फेकून वा जमीन काही कारणाने घाण करून हवा घाणेरडी करतो तो माणूस आणि निसर्ग यांच्याविरुद्ध पाप करतो. माणसाचे शरीर हे ईश्वराचे मंदिर आहे. माणसाच्या या असा देहात शिरणारा वायू जो कोणी घाण करतो तो त्या देवळाला बाटवतो. त्याचा रामनामाचा जप व्यर्थ असतो.

शेवटी गांधीजी सावधगिरीची सूचना देत श्रोत्यांना म्हणाले की तुमच्याकडून मी कठोरपणे कसरत आणि मेहनत करवून घेईन. मी जर तुमच्यात राहिलो तर मी तुम्हांलाही सोडणार नाही आणि मला स्वतःलाही. मी तुमच्या घरांत येऊन पाहीन, तुमच्या गल्ल्या, नाल्या, स्वयंपाकघर, संडास हे सर्व कसे आहेत हे पाहीन. मला कुठेही धूळ वा घाण सहन होणार नाही.

हरिजन, एप्रिल ७, १९४६

---------------

# २५ मार्च १९४६. १८८. निसर्गोपचारात का फसलो?

(मुळात हे हिंदीत लिहिले होते. हे हरिजन सेवकमध्ये प्रकाशित झाले होते आणि त्याच वेळी हरिजनमध्येही.)

जीवनाच्या सायंकाळी तुम्ही निसर्गोपचारात का गुंतला? अनेक लोक मला हा प्रश्न विचारत आहेत. माझ्यामागे सध्या पुरेसे काम नाही काय? नवीन काही करायचे तुमचे आता वय राहिले आहे काय? माझ्या सध्याच्या कामांत अजून एखाद्या ओझ्याची भर घालावी अशी कोणी अपेक्षा करू शकतो काय? हे सर्व प्रश्न करण्यासारखे आहेत आणि माझ्याकरिताही विचार करण्यासारखे आहेत. परंतु माझ्या अंतःकरणातून याचा कोणताही प्रतिध्वनी निघत नाही. माझ्या आतील लहानसा आवाज अजूनही कुजबुजतो : इतर जे म्हणतात त्याची फिकीर का करतोस? मी तुला डॉ. दिनशासारखा सहकारी दिला आहे. ते तुला ओळखतात आणि तू त्यांना. गत ५० वर्षांपासून हौस म्हणून तू निसर्गोपचार करत असल्यामुळे तुला तुझ्या क्षमतेबद्दल आत्मविश्वास आहे. तू जर तुझ्या या क्षमतेचा उपयोग करणार नसशील आणि ती लपवून ठेवली तर तू चोर ठरशील. तुझे हे वागणे बरोबर नसेल. इशोपनिषदच्या पहिल्या श्लोकाची आठवण कर आणि तुझ्याजवळ जे काही आहे ते मला अर्पण कर. तुझे म्हणावे असे खरोखरी तुझे काहीही नाही. काही तरी तुझे आहे अशी तू केवळ कल्पना करत होता. ते सर्व माझे आहे. इतर गोष्टी ज्याप्रमाणे तू माझ्या निर्मितीला वाहतो तशीच ही गोष्टही देऊन टाक. तू जर परिपूर्ण अनासक्तीभाव विकसित केला तर यामुळे तुझ्या इतर कामाची कोणतीही हानी होणार नाही. तू १२५ वर्षे जगण्याची इच्छा बाळगली आहे. ती पूर्ण व्हावी की होऊ नये याची तू काळजी करण्याचे कारण नाही. तू केवळ तुझे कर्तव्य काय आहे हे समजून घेतले पाहिजे आणि ते पार पाडले पाहिजे आणि "विनाकारण कशाचीही काळजी करू नको." (फिलिपियन्स, "परमिट्स फॉर द ट्रान्सव्हाल"). हे असे विचार आहेत की जे मला भेडसावतात. या गावात माझा हा तिसरा दिवस आहे. मदतीकरिता येणारे रुग्ण दररोज वाढत आहेत. त्यांना आनंद होतो आणि त्यांची सेवा करताना मला आनंद होतो. स्थानिक लोकांचे मला सहकार्य मिळत आहे. मला माहीत आहे की इथे जर मी लोकांच्या अंतःकरणात प्रवेश करू शकलो तर आजार नाहीसे होतील आणि हे गाव स्वच्छता आणि

आरोग्याच्या दृष्टीने आदर्श गाव होईल. परंतु जर असे झालेही नाही तरी मला त्याचे काय? मी तर केवळ मला मिळालेल्या आदेशाप्रमाणे चालायला पाहिजे.

उरुळी [-कांचन], मार्च २५, १९४६

हरिजन, मार्च ३१, १९४६

----------------

# २५ मार्च १९४६. १९०. वल्लभभाई पटेल यांना पत्र

उरुळी,

मार्च २५, १९४६

भाई वल्लभभाई,

. . . .

निसर्गोपचाराचा माझा व्यवसाय फळफळत आहे. यात मी काहीही गमावू शकत नाही. आणि यामुळे माझे इतर कामही पुढे जाऊ शकते. माझ्याजवळ काही भांडवल आहे हे माहीत असूनही मी जर त्याचा उपयोग केला नाही तर माझ्यासारखा मूर्ख कोण असेल? माणसाने १२५ वर्षं जगण्याची आणि काम करण्याची इच्छा ठेवली पाहिजे. बाकी जन्ममृत्यूचा मालक केवळ ईश्वर आहे.

. . . .

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. बापूना पत्रो - २ : सरदार वल्लभभाईने, ३०४-५

--------------------

# ३० मार्च १९४६. २११. निसर्गोपचार केंद्राला सूचना

उरुळी कांचन,

मार्च [३०,] १९४६ ला वा त्यापूर्वी (या दिवशी गांधीजी उरुळीहून निघाले होते.)

१. जे कोणी राहण्याकरिता आले आहेत त्यांनी तसे सेवाभावनेने करावे. त्यांचे कोणावरही ओझे पडायला नको.

२. मणिभाईंवर सर्वसामान्य प्रशासनाची जबाबदारी राहील. ते व्यवस्थापक असतील.

३. डॉ. भागवत मुख्य वैद्यकीय अधिकारी असतील. इतर काम करणारे त्यांच्या सूचनेअंतर्गत काम करतील.

४. सूर्यस्नान, कटिस्नान, घर्षणस्नान, कुन्हेस्नान, मातीचा लेप, मालीश, वाफारा, यांच्यापर्यंत उपचार मर्यादित ठेवला पाहिजे.

५. रामनाम हा उपचारांचा राजा आहे. हे आपल्या आचरणाने सिद्ध केले पाहिजे. थोडे जरी लोक आले तरी सायंकाळची सामूहिक प्रार्थना घेतली पाहिजे.

६. सर्वांनी चार वाजता उठायला पाहिजे आणि सकाळी साडेचार वाजता प्रार्थना घेतली पाहिजे. सर्वांनी तालासुरात योग्य उच्चार करणे शिकायला पाहिजे.

सर्वांनी दोन्ही लिप्यांसह हिंदुस्तानी शिकायला पाहिजे आणि मराठीचे कामचलाऊ ज्ञान मिळवायला पाहिजे.

७. प्रत्येकाने रोजनिशी ठेवली पाहिजे आणि तिच्यात तासाप्रमाणे आपला कार्यक्रम दिला पाहिजे.

८. मणिभाईंनी पैपैचा हिशोब ठेवला पाहिजे.

९. कटिस्नान सर्वांकरिता उपलब्ध असले पाहिजे. उपयोगानंतर टब पाण्याने आणि गरम राखेने धुतला पाहिजे. राख काढण्याकरिता स्वच्छ ब्रश वापरला पाहिजे.

१०. स्वयंपाकघराचे आणि साफसफाईचे काम हाताने करण्यात यावे, नोकरांच्या मदतीने नाही. अन्न शक्य तितके साधे असावे. यासंबंधात डॉ. भागवतचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

११. उद्यापासून आपल्याला सर्व खर्च करावा लागेल. कोणाकडूनही फुकट काही मिळेल अशी अपेक्षा करू नका.

महात्मा - लाईफ ऑफ मोहनदास गांधी, खंड ७, पृष्ठ ९६-९७मधील चित्रावरून

------------------------

# ३० मार्च १९४६. २१६. प्रार्थना प्रवचन

उरुळी कांचन,

मार्च ३०, १९४६

उरुळीहून निघण्यापूर्वी महात्मा गांधींनी उरुळी गावातील लोकांना साफ आणि स्वच्छ जीवनाचे अनुसरण करून उरुळी गावाला आदर्श गाव बनवण्याची विनंती केली. त्याचबरोबर कताईचे महत्त्व सांगून तिचा अवलंब करण्याकरिताही सांगितले.

उरुळीतील ९ दिवसांच्या मुक्कामातील आपल्या कामाचा उल्लेख करत ते म्हणाले की मी तुम्हाला ज्या सूचना दिल्या त्यांचे तुम्ही अनुसरण कराल अशी आशा आहे. (या वृत्तात पुढे लिहिले होते : “उरुळीच्या लोकांनी गावात निसर्गोपचार केंद्र उघडण्याकरिता गांधीजींना १०,०००रुपये देण्याचे आश्वासन दिले.. . . . गांधीजींच्या सूचनेनुसार उरुळीत तीन डॉक्टर आणि त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या लोकांना उरुळीत ठेवण्यात आले.”)

द बॉम्बे क्रॉनिकल, मारच ३१, १९४६

-------------------

# ८ एप्रिल १९४६. २६२. मणिभाई देसाई यांना पत्र

[नवी दिल्ली,] (स्रोतात इथे मुंबई आहे.)

एप्रिल, ८, १९४६

ति. मणिलाल,

तुझ्याकडून मला एकही पत्र येऊ नये हे बरोबर नाही. मी तयार केलेल्या नियमांची (पाहा "निसर्गोपचार केंद्राकरिता सूचना,", मार्च ३०, १९४६) अंमलबजावणी होते काय? जर रुग्ण येत नसतील तर तू उरुळीबाहेर जरी नाही तरी उरुळीतील रुग्णांच्या घरी जाऊ शकतो. केवळ कांचन नाव ठेवण्याइतकाच नावात बदल करण्यात आला आहे काय? पिल्लै सोडून गेला असे डॉक्टरांनी कळवले आहे. जोशी आणि धिरू यांना लिहायला सांग. त्या ठिकाणचे हवामान सध्या कसे आहे? मला इथे १६ तारखेपर्यंत राहावे लागेल. नक्की तारीख हळूहळू कळेल. तिथे फारसे उकडत नसेल ना?

आशीर्वाद

बापू

गुजराती प्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७५३. सौजन्य - मणिभाई देसाई

---------------------

## ११ एप्रिल १९४६. २८७. डॉ. भागवत यांना पत्र

एप्रिल ११, १९४६

भाई भागवत,

तुमचे पत्र मिळाले. तुम्ही जिथे आहा तिथेच राहा. कोणीही आला नाही तरी काळजी करू नका. आपण लोकांच्या घरी जाऊ आणि त्यांना आरोग्याचे नियम समजावून सांगू. आपण शाळेत जाऊ आणि तिथे शिकवू. तिथे प्रत्येक मिनिटाला पुरेल इतके काम आहे. मला नियमितपणे लिहीत राहा. झोहराबेन आणि अमतुल यांनाही भेटा.

आशीर्वाद

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७५६. सौजन्य - मणिलाल पटेल

---------------------

# १७ एप्रिल १९४६. ३१७. मणिभाई देसाई यांना पत्र

(व्यवस्थापक, सर्वसामान्य प्रशासन, निसर्गोपचार केंद्र, उरुळी कांचन.)

[एप्रिल १७, १९४६] (प्यारेलाल पेपर्सवरून)

मला तुझे आणि थिरूचे सुंदर पत्र मिळाले. मला लिहीत जा आणि विस्तृत माहिती देत जा. तू सहजपणे जितक्या रुग्णांकडे लक्ष देऊ शकशील तितक्याच रुग्णांना दाखल कर. दुसरी महत्त्वाची गोष्ट रोगराईला प्रतिबंध करणे आहे, आणि लोकांना जर आपण ही कला शिकवू शकलो तर निसर्गोपचाराचे आपले उद्दिष्ट पूर्णपणे यशस्वी झाले असे मी समजेन. कृपाकरून हे सर्वांना - मुलांना, मुलींना, प्रौढांना शिकव. रुग्णाला कोणताही जरी संसर्गजन्य रोग झालेला असला तरी ज्या टबात रुग्णांना आंघोळ घालण्यात आली असेल तो टब जर गरम राखेने स्वच्छ करण्यात आला तर तो स्वच्छ होईल आणि मला जर कोणी अशा टबात आंघोळ करण्याकरिता सांगितले तर मी निःसंकोचपणे त्यात आंघोळ करीन. मला वाटते की न्याहरीत घरी तयार केलेले कुरकुरित बिस्कुट सोजीपेक्षा चांगले राहतील. ते फळाबरोबर चावावे लागतील. यानंतर दूध घेतले पाहिजे. वा तुम्ही दुपारी दूध घेऊ शकता. हे केवळ सूचना म्हणून. जोशी तिथे आले याचा मला आनंद होतो. गोखलेंना मला लिहिण्याकरिता सांग. मी काहीही झाले तरी २४ तारखेला पोहोचेन. (लॉर्ड पॅथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स आणि ए. व्ही अलेक्झॅन्डर या कॅबिनेट मिशनच्या सदस्यांनी आणि व्हाईसरायनी बोलावल्यामुळे गांधीजी १ एप्रिल १९४६ला दिल्लीला पोहोचले होते. पाहा "जी. इ. बी. एबेल यांना पत्र", मार्च २३, १९४६. तिथून ते मे २, १९४६ला सिमल्याला गेले.) त्यानंतर काय होईल हे मला माहीत नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७५४. सौजन्य - मणिभाई देसाई

--------------------

# १९ एप्रिल १९४६. ३३४. ए. के. भागवत यांना पत्र

नवी दिल्ली,

एप्रिल १९, १९४६

भाई भागवत (उरुळी कांचन येथील निसर्गोपचार केंद्राचे मुख्य वैद्यकीय अधिकारी),

तुमचे पत्र मिळाले. आत्मसंतोष मानाल तर सर्व काही ठीकच होईल. पूर्णान्नासंबंधीही विचारपरिवर्तनाकरिता अवकाश आहे.

या पत्रासंबंधी. टबाबद्दल सांगायचे तर मी ते अजून मिळवायचा प्रयत्न करीन. तोपर्यंत तुम्हाला शक्य असेल ते करा. संसर्गासंबंधी मी जे लिहिले आहे ते तुम्ही वाचलेच असेल. (पाहा "मणिभाई देसाई यांना पत्र", एप्रिल १७, १९४६) तुमची जर सुटका होऊ शकत असेल तर आप्पांना मदत करण्याकरिता अवश्य जा. सुरू केलेले काम बिघडायला नको. मला हे काम इतके महत्त्वाचे वाटते की त्यात व्यत्यय यायला नको.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७५२. सौजन्य - मणिभाई देसाई

----------------------

# १९ एप्रिल १९४६. ३३६. प्रार्थना प्रवचन

एप्रिल १९, १९४६

शुक्रवारच्या प्रार्थनेनंतर बोलताना गांधीजींनी त्यांच्या अगदी अलीकडील प्रेमाचा - निसर्गोपचाराचा - उल्लेख केला. ते म्हणाले की माझा निसर्गोपचारावर वर्षांपासून विश्वास आहे. आतापर्यंत मी मित्रांना आणि जवळच्या सहकाऱ्यांना जे सांगत होतो ते आता मला गावातील गरीब ग्रामीण जनतेलाही सांगायचे आहे. कस्तुरबा (कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मृती न्यास) कामाच्या निमित्ताने मी खेड्यांचा विशेष विचार करू लागलो आहे.

आजकाल चिकित्सा फार महाग झाली आहे. ज्यांना परवडते ते कोणत्या तरी डॉक्टरला बोलावतात. डॉक्टर अशा भाषेत उपचार लिहून देतात की सामान्य माणसाला ते कळूच शकत नाही. रुग्ण ती चिठ्ठी घेऊन औषध विक्रेत्याकडे जातो, औषध घेतो आणि त्यामुळे दुरुस्त होऊ असा विश्वास बाळगतो. उपचाराच्या या पद्धतीची गोष्ट वेगळी जरी ठेवली तरी ही गोष्ट सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरील आहे.

बंगाल आणि मद्रासच्या माझ्या अलीकडील दौऱ्यात किती तरी लोक प्रार्थनासभेत येत असत आणि सामूहिक रामधून म्हणत असत. यानंतर शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक अशा सर्व रोगांवरील अमोघ उपचार म्हणून मी रामधूनचा समावेश निसर्गोपचारातही केला.

गांधीजी पुढे म्हणाले की आपण काही नेहमीच गंभीर आजारी नसतो. राग, लोभ, मोह वगैरेंमळे निर्माण होणारे रोग नेहमीच त्यापेक्षा अधिक गंभीर असतात.

तसेच शरीराचा एखादा अवयव गमावण्यापेक्षा विवेक गमावणे हा गंभीर आजार असतो. आपण जेव्हा केवळ ओठांपासून नाही तर अंतःकरणपूर्वक रामनाम घेतो तेव्हा त्याचा या तिन्ही व्याधींवर सर्वात चांगला उपचार होत असल्याचे आढळते. बुद्धी अंतःकरणाचे अनुसरण करत असते. ती त्याला मार्गदर्शन करत नाही. अशा प्रकारे शुद्ध अंतःकरण मानसिक आरोग्याकरिताच

नाही तर शारीरिक आरोग्याकरिताही अतिशय आवश्यक असते, आणि अंतःकरण शुद्ध ईश्वरभक्तीने - रामनामाच्या जपानेच शुद्ध होऊ शकते.

महात्मा गांधी पुढे म्हणाले की कोणत्याही औषधोपचाराने सर्व शारीरिक रोग दुरुस्त होत नाहीत. परंतु रामनामामुळे जेव्हा हे रोग दुरुस्त होऊ शकत नाही तेव्हा ते दुःख शौर्याने आणि शांतपणे सहन करण्याची आपल्याला शक्ती मिळते. त्याचबरोबर रामनामाचा अर्थ नैसर्गिक आणि योग्य पद्धतीने जीवन व्यतीत करणे आहे. यामुळेच माझ्या वार्धक्याच्या काळात मी निसर्गोपचाराच्या कामाकडे वळलो आहे आणि माझ्यावर जे अनेक कामांचे ओझे आहे त्यात ही अतिरिक्त भर घातली आहे.

द हिंदुस्तान टाईम्स, एप्रिल ४, १९४६

---------------------

# २० एप्रिल १९४६. ३४८. प्रार्थनाप्रवचन

एप्रिल २०, १९४६

शनिवारच्या सायंकाळी प्रार्थनेकरिता आलेल्या जनसमुदायाला संबोधत महात्मा गांधी जोर देऊन म्हणाले की अंतःकरणपूर्वक जर आपण रामनाम म्हणालो तर तो शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक व्याधींवरील कधीही अपयशी न ठरणारा हा अचूक उपाय आहे. रामधूनमध्ये तुम्ही भाग घेत असताना माझे तुमच्याकडे लक्ष होते, परंतु तुम्ही अंतःकरणापासून रामधून म्हणत होता की नाही हे ईश्वराला वा तुम्हांलाच माहीत. परंतु माणूस न कळत आत्मवंचनाही करू शकतो. ही फार सोपी गोष्ट आहे. एक गोष्ट स्पष्ट आहे. जर एखादा माणूस वा स्त्री अंतःकरणापासून रामनाम म्हणत असेल आणि त्याच वेळी तो जर नेहमी आजारी पडत असेल वा क्रोधाला वशीभूत होत असेल तर यावरून त्याचा दावा खोटा असल्याचे सिद्ध होते.

टॉलस्टॉय म्हणाले की माणसाचे अंतःकरण क्षणाकरिता जरी ईश्वराच्या ध्यानापासून विचलित झाले तरी ताबडतोब तिथे सैतान प्रवेश करतो. रामनाम सैतानाला काढून टाकते. रामनाम खरोखरच आमच्या अंतःकरणातून निघते की नाही हे आम्हांला माहीत नाही असे प्रामाणिक स्त्रीपुरुष मला सांगत असतात. त्यांना माझे इतकेच उत्तर असते की तुम्ही असीम धैर्य ठेवून प्रयत्न करत राहायला पाहिजे. डॉक्टर होण्याकरिता भरपूर मेहनत करूनही एका मुलाला किमान १६ वर्षं लागत असतात. मग हृदयात रामनाम स्थापित करण्याकरिता किती अधिक वर्षं आवश्यक असतील?

माझ्या अंतःकरणात ईश्वराला स्थापित करण्याचा प्रयत्न करत आणि निसर्गाच्या पद्धतीवर विश्वास ठेवत मी तर रोगांच्या उपचारांकरिता पंचतत्त्वांपर्यंतच सीमीत राहीन. मी पहिले स्थान शुद्ध हवेला देईन. ती प्राथमिक आवश्यकता आहे. याचा अर्थ तुमची घरे आणि तुमचे सामाजिक वातावरण पूर्णपणे शुद्ध असले पाहिजे. तुम्ही बंद डब्यात म्हणजे घरात राहायला

नको. तुम्ही इतक्या मोकळ्या वातावरणात राहायला पाहिजे की तुम्ही जसे काही प्रार्थनेच्या मैदानावर आहा.

'द हिंदुस्तान टाईम्स', एप्रिल २१, १९४६

-----------------

# २१ एप्रिल १९४६. ३५४. प्रार्थना प्रवचन

एप्रिल २१, १९४६

गांधीजींच्या लक्षात आले होते की अनेक स्त्रीपुरुष रामधूनमध्ये योग्य वेळी ताल देत नव्हते. रविवारच्या प्रार्थनोत्तर प्रवचनात त्या लोकांची खरडपट्टी काढत गांधीजी म्हणाले की देवाचे नाव घेण्यात आणि योग्य वेळी ताल देण्यात लाज वाटण्यासारखे काहीही नाही. नम्रपणा हा कौतुकास्पद गुण आहे परंतु अस्थानी दाखवलेला नम्रपणा हा दोष होतो.

काल संध्याकाळच्या विषयाकडे म्हणजे निसर्गोपचाराकडे परत वळत गांधीजी म्हणाले की शुद्ध पाण्याला नैसर्गिक तत्त्वात म्हणजे पंचमहाभूतात दुसरे महत्त्वाचे स्थान आहे, पहिले स्थान हवेला आहे. त्याबद्दल मी शनिवारी (पाहा "प्रार्थना प्रवचन", एप्रिल २०, १९४६) बोललो होतो. या देशातील मोठ्या संख्येतील लोक अशुद्ध पाणी पितात आणि अशा पाण्यात आंघोळ करतात आणि कपडे धुतात की त्यामुळे शरीर आणि कपडे अजूनच घाणेरडे होतात. तुमच्यापैकी कोणीही नालीतील पाण्यात आंघोळ करील काय वा कपडे धुईल काय? परंतु अनेक लहान लहान तळी, जिथे लोक आंघोळ करतात आणि कपडे धुतात, गटारांपेक्षा स्वच्छ नाहीत. निसर्ग नम्र आहे. अनेकदा तो आपल्या चुकांबद्दल ताबडतोब शिक्षा करत नाही. अशा प्रकारे कोणताही दुष्परिणाम न होता आपण दीर्घ काळ अशुद्ध हवेत श्वासोच्छ्वास करतो आणि अशुद्ध पाणी पितो. परंतु यामुळे आपली जीवनशक्ती कमी होते आणि रोगराईला आपण सहज बळी पडतो यात काही संशय नाही.

हरिद्वारमध्ये पवित्र गंगेच्या किनाऱ्यावर काय पाहिले ते गांधीजींनी लोकांना सांगितले. ते म्हणाले की लोक तिथे आपले पाप धुवायला जातात, परंतु ते ठिकाण इतके घाणेरडे आहे की त्या पाण्याने त्यांचे शरीरसुद्धा स्वच्छ होत नाही. हरी की पैडीवर पोहोचण्याकरिता थोडासा जरी वेळ झाला तरी तिथे आंघोळ करणे मुळीच शक्य होत नाही. लोक नदीच्या काठावर शौच्याला जातात आणि तिच्यावर रेती टाकून ती झाकायचीही ते तसदी घेत नाहीत. फुले इकडेतिकडे

टाकून आणि ते पायदळी तुडवून लोक आंघोळ करण्याचा घाट घाणेरडा करतात. ही अंत्यत दुःखद गोष्ट आहे आपण हिंदुस्थानींना याची खरोखरच लाज वाटली पाहिजे.

निसर्गोपचाराबद्दल सागण्याचे मी नवीन काम सुरू केले आहे? रुग्णावर औषधोपचार करण्याकरिता डॉक्टरला पाच वर्षांचे प्रशिक्षण घ्यावे लागत असते. निसर्गोपचारकाकरिता असे नाही. स्वतःबद्दल सांगत गांधीजी म्हणाले की काही पुस्तके वाचून आणि या क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करून बाकीची माहिती मिळवून मी निसर्गोपचाराचे आवश्यक ज्ञान करून घेतले आहे. तुम्ही सर्वसुद्धा असे करून तुमचे स्वतःचे डॉक्टर होऊ शकता. जे सोपे असते ते चांगले नसते असा लोकांचा समज आहे. चरखा साधा आहे. यामुळे तो पुरातन आणि ओबडधोबड आहे असे समजण्यात येत असते. गिरणीकरिता किती तरी पैसे लागतात आणि ती जटिलही असते. ती प्रगतीची खूण समजली जाते. हा जर तुमचा दृष्टिकोन असेल तर तुम्हांला माझा काही उपयोग नाही अशी मला भीती वाटते. मी आहे साधा ग्रामीण माणूस आणि माझा विश्वास साधेपणाच्या तत्त्वज्ञानावर आहे. परंतु मला माहीत आहे की तुमच्यापैकीही बहुतेक स्त्रीपुरुषही माझ्याप्रमाणेच साधे आहेत आणि जरी तुम्ही शहरात राहत असाल तरी तरी तुमचा गावांशी संपर्क तुटलेला नाही. यामुळेच तुमच्यासमोर निसर्गोपचार ठेवण्याची मी हिंमत करतो आहे.

शुद्ध हवा आणि शुद्ध पाणी ही पहिली आवश्यकता आहे, आणि रामनाम तर नेहमीकरिता आहेच. जो माणूस रामनामाचा जप करून आपले अंतःकरण स्वच्छ करतो तो बाहेरची घाणही सहन करू शकत नाही. करोडो लोक जर अंतःकरणापासून रामनाम घेतील तर ना तर दंगली होतील, कारण या दंगली म्हणजे सामाजिक आजारच आहेत, आणि ना आजार येतील. मग स्वर्ग भूमीवर अवतरेल, भूमीवर ईश्वराचे राज्य स्थापित होईल.

द हिंदुस्तान टाईम्स, एप्रिल २२, १९४६

-------------

# २४ एप्रिल १९४६. ३७२. मणिभाई देसाई यांना पत्र

दिल्ली,

एप्रिल २४, १९४६

चि. मणिलाल,

तुम्ही मला 'तू' म्हणायला आणि 'लाल' वगळायला म्हणता, परंतु ही गोष्ट भविष्याकरिता असू द्या. जो फार उंच उंच चढतो तो पडण्याची भीती नसते काय? अखेरीस 'तुम्हाला' आणि 'तुला' यात काय अंतर आहे?

पंचायत जर फळ्या वगैरेंचा खर्च करील तर चांगलेच आहे. श्रीमंत माणसे जर बल्ल्या वगैरे देत असतील तर तू त्या घेऊ शकतो. तू बल्ल्यांच्याऐवजी बासे घेऊ शकतो, ते जर जाड असतील तर दोन. वा अधिक बासे मापाप्रमाणे घेऊन त्यांचे वरचे टोक जाड दोराने पक्के बांधून ते पाय ठेवण्यासारखे करता येऊ शकते. हे फार खर्चाचे होणार नाही. बासे एकमेकांना बांधले तर ते एक प्रकारे पुलाचे काम करू शकतात. पाय ठेवण्याकरिता वा बाशांच्या मदतीने पूल तयार केल्याशिवाय गड्डयांचा काही उपयोग नाही हे समजून घे. रेल्वेचे जुने स्लिपर जरी मिळाले तरी काम भागू शकते. जमीन मिळाली नाही ही दुःखाची गोष्ट आहे. गावाच्या पुढाऱ्याशी चर्चा करा.

आता तुम्हांला भरपूर रुग्ण मिळू लागले आहेत. डॉ. भागवतांकडून त्याच सेवेचा आपण स्वीकार केला पाहिजे जी सेवा ते स्वतःहोऊन देतील. न्यासाचे जे उपकरण आहेत तेसुद्धा सेवेकरिता आहेत. तुम्हांला जे काही करायचे असेल ते सौजन्याने करा.

आवश्यक असेल तर बाळकोबाकरिता गाय विकत घे. त्याला दूध मिळालेच पाहिजे हे लक्षात ठेव. तुझ्याजवळ तिथे मोठ्या प्रमाणात गायी असतील याची काळजी घे.

कांचनबेनसुद्धा तिथे आली असेल असे मी समजतो.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७५४. सौजन्य - मणिभाई देसाई

# २३ एप्रिल १९४६. ३६८. प्रार्थनाप्रवचन

एप्रिल २३, १९४६

. . . .

शेवटी गांधीजी परत निसर्गोपचाराकडे वळले. गांधीजी आधी श्रोत्यांशी हवा आणि पाण्याबद्दल बोलले होते. (पाहा "प्रार्थना प्रवचन", एप्रिल २०, १९४६ आणि"प्रार्थना प्रवचन", एप्रिल २१, १९४६) आज ते मातीबद्दल बोलले. ते म्हणाले की या मातीनेच मानवी शरीर बनलेले आहे व या मातीतच जाऊन ते मिसळणार आहे. मृताचे दहन करा की दफन माती मातीतच जाऊन मिळत असते. हवा आणि पाण्याप्रमाणेच माती हीही ईश्वराचीच निर्मिती आहे. आणि आपण ती घाणेरडी करू नये.

कुठेही थुंकण्याची, संत्र्याच्या साली वा कागदाचे तुकडे इकडेतिकडे फेकण्याची लोकांना सवय आहे. हे सर्व पाप आहे. एखादी गोष्ट तिच्या ठिकाणी न ठेवणे म्हणजे जमीन घाणेरडी करणे. प्रार्थना करणाऱ्या माणसाने असे करायला नको.

मृत्यू आपल्याला केव्हाही नेऊ शकतो. यामुळे जागृत राहून आपण नेहमी रामनाम म्हणायला पाहिजे. आपल्याला शक्य असेल तर आपण सफाई केली पाहिजे परंतु त्याच्या निर्मितीला कधीही घाणेरडे करायला नको.

'द हिंदुस्तान टाईम्स', एप्रिल २४, १९४६

-----------------

# २४ एप्रिल १९४६. ३७९. प्रार्थना प्रवचन

(हिंदुस्तानमधील या वृत्ताचा द हिंदुस्तान टाईम्समधील वृत्ताशी मेळ घालण्यात आला आहे.)

एप्रिल २४, १९४६

बुधवारी सायंकाळी प्रार्थनेनंतर बोलताना सुरुवातीला गांधीजींनी श्रोत्यांना सल्ला दिला की तुम्ही डोळे उघडे ठेवून कनू गांधींकडे लक्ष द्या आणि ते जसा ताल देतात तसा ताल तुम्ही दिला पाहिजे.

यानंतर आपले प्रवचन मातीवरच सुरू ठेवत गांधीजी म्हणाले की मातीचा आपल्या जीवनात फार मोठा भाग आहे. हवा आणि पाण्यानंतर मातीला निसर्गोपचारात फार मोठे स्थान आहे. निसर्गोपचारात मातीला दोन प्रकारे स्थान आहे. माती बारीक करून ती शरीरावर घासली तर त्याने कातडी स्वच्छ होते. भिजवलेली माती शरीराला लावून ती वाळू दिली तर त्याने अनेक त्वचारोग दुरुस्त होतात. चाळीसेक वर्षांपूर्वी माझ्या एका पुतण्याच्या शरीरावर खूप फोड आले होते. डॉक्टरांनी केलेल्या विविध उपचारांचाही त्यांच्यावर परिणाम होत नव्हता. अखेरीस मी त्याच्यावर उपचार करायचे ठरवले. मी त्या मुलाच्या संपूर्ण शरीरावर मातीचा लेप लावला आणि त्याला नग्नावस्थेतच पळायला लावले. मुलगा ८ ते १० दिवसात दुरुस्त झाला.

गांधीजी म्हणाले की मातीत अनेक अद्भुत गुण आहेत, आणि तिचा माणसाला इतर गोष्टींप्रमाणेच उपयोग होतो. आपण देह धारण करतो तो मातीचा असतो आणि परत तो मातीतच जाऊन मिसळतो. सकाळी म्हणण्यात आलेल्या प्रार्थनेतील श्लोकाचे उदाहरण देत गांधीजी म्हणाले की यात पृथ्वीला माता म्हणून संबंधण्यात आले आहे आणि तिला पायदळी तुडवत चालावे लागत असल्याबद्दल या श्लोकात क्षमा मागण्यात आली आहे. आपली प्रार्थना ऐकली जावी अशी आपली इच्छा असेल तर आपल्या अंतःकरणातील भक्ती आपल्या वागण्यातून दिसली पाहिजे. आज जसे आपण या भूमातेला घाणेरडी करतो तसे करायला नको. कोणी जर

अडाणीपणाने तिला घाणेरडी करत असेल वा तिच्यावर कुठेही थुंकत असेल तर आपण त्यावर कोरडी माती टाकून तिला झाकायला पाहिजे.

द हिंदुस्तान टाईम्स, एप्रिल २५, १९४६, आणि हिंदुस्तान, एप्रिल २५, १९४६

--------------

# २७ एप्रिल १९४६. ३९२. प्रार्थना प्रवचन

(द हिंदुस्तान टाईम्समधील या प्रार्थना प्रवचनातील मजकुराशी प्यारेलाल यांच्या हरिजनमधील "विकली लेटर"मधील मजकुराशी मेळ घालण्यात आला आहे.)

एप्रिल २७, १९४६

. . . .

नंतर गांधीजी परत निसर्गोपचाराच्या विचाराकडे वळले आणि इथर म्हणजे आकाश तत्त्वाबद्दल बद्दल त्यांनी चर्चा केली. माणूस मातीने बनलेला आहे परंतु मातीसुद्धा आकाशाने म्हणजे पोकळीने वेढलेली आहे. मानवी शरीरातील पोकळी, माणसाच्या कातडीला असलेली छिद्रे ही सर्व इथरने भरलेली आहेत. तारे, सूर्य, चंद्र हे सर्व पोकळीत लटकलेले आहेत. खगोलशास्त्रज्ञ म्हणतात की सूर्य, तारे यांच्यासारके अनेक असे ग्रह आहेत की जे मानवी डोळ्यांनी दिसू शकत नाही. गांधीजी म्हणाले की इथरने भरलेल्या पोकळीच्या व्याप्तीचा शोध घेण्याकरिता आपण आपल्या कल्पनाशक्तीला ताण दिला पाहिजे. माणसाला माहीत असलेली पोकळी ही सर्वाधिक अमूर्त गोष्ट आहे, परंतु या इथरलाही त्याहूनही अधिक गोष्टीने व्यापलेले आहे आणि ती म्हणजे ईश्वर.

निसर्गोपचारात आपल्याला जसा पृथ्वीशी संपर्क करायचा असतो तसाच इथरशीसुद्धा. तुम्ही आकाशाखाली झोपू शकता आणि असीम पोकळी पांघरू शकता. तुमचा जर इथरशी सूर जुळला तर आपण किती क्षुद्र प्राणी आहो आणि परस्परांशी भांडणे किती अशोभनीय आहे हे तुम्हाला जाणवेल.

. . . .

आपणा सर्वांची घडण माती, इथर आणि इतर पंचमहाभूतापासून झाली आहे. ईश्वर माणसामाणसामध्ये भेद करत नाही. आपण जर केवळ आपला विचार केला तर आपण क्षुद्र जंतू आहो. त्याची महत्ता जेव्हा आपल्यामधून अभिव्यक्त होते तेव्हा आपण महान होतो. आपण

जर त्याच्या सुरात सूर मिळवला तर आजार आपल्याला स्पर्शही करणार नाही. आणि योगायोगाने जर आपण आजारी पडलो तरी आपण त्याच्या कृपेने निसर्गात कुठेही सहजपणे आढळणाऱ्या साधनांद्वारे दुरुस्त होण्यावर समाधान मानू. आपले जीवन वाढवण्याकरिता आपण इकडे तिकडे पळणार नाही.

द हिंदुस्तान टाईम्स, एप्रिल २४, १९४६, आणि हरिजन, मे ५, १९४६

-------------------

# ६ मे १९४६. ४४१. मणिभाई देसाई यांना पत्र

सिमला,

मे ६, १९४६

चि. मणिलाल,

तुझे पत्र मिळाले, खरे म्हणजे दोन पत्र. तुझ्या कामाची चांगली प्रगती सुरू आहे असे दिसते. कोणतेही चांगले काम एका दिवसात पूर्ण होत नसते. जे काम एका दिवसात संपते त्याला फारसे मूल्य नसते. यामुळे आपण अंगी धीर बाणवला पाहिजे आणि अनासक्ती शिकायला पाहिजे. अनासक्तीमध्ये चांगल्या कामाचे फळ चांगलेच मिळेल या श्रद्धेचा समावेश असतो. या दृढ श्रद्धेमुळे आपल्याला फळाची चिंता राहत नाही. उद्या सूर्य उगवेल याची आपल्याला खात्री असते आणि आपण निश्चिंत असतो. चांगल्या कामाच्या फळाबद्दल आपली श्रद्धा याहूनही दृढ असली पाहिजे. कधी काळी एक दिवस असा उगवू शकेल की जेव्हा सूर्य उगवणार नाही, परंतु चांगल्या कामाचे फळ मिळणार नाही हे शक्यच नाही. यामुळे एक ना एक दिवस आपल्या कामाचे महत्त्व कळेल या श्रद्धेने तू तुझे काम करत राहा. सव्च्छतेला पहिले स्थान आहे, कारण तिच्यात बहुतेक इतर गोष्टींचा समावेश होतो.

या ओळी लिहीत असताना तुझे पत्र माझ्याजवळ नाही. यामुळे तुझा जर एखादा मुद्दा सुटला असेल तर मला परत विचार.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७४९. सौजन्य - मणिभाई देसाई

---------------

# ६ मे १९४६. ४५१. ए. के. भागवत यांना पत्र

सिमला,

मे ६, १९४६

भाई भागवत,

तुमचे विस्तृत पत्र मिळाले. संतुलित आहारात दुधात योग्य प्रमाणात तूप मिसळण्यात काही चूक नाही. तुम्ही जर दुधाशिवाय भागवू शकत असाल तर फार चांगले. [परंतु तुम्ही असे करू शकाल] याबद्दल मला फार मोठी शंका आहे.

टबबाथची व्यवस्था कशी करता येईल? तुम्ही जर जमिनीसंबंधी काही निश्चित निर्णयावर पोहोचू शकला तर वेगात प्रगती करता येईल.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७४८. सौजन्य - मणिभाई देसाई

---------------------

# १ मे १९४६. ४६५. आयूर्वेद आणि निसर्गोपचार

(याचे मूळ गुजराती मे १९, १९४६च्या हरिजनबंधूच्या अंकात प्रकाशित झाले असते.)

आयुर्वेद आणि वनस्पती शास्त्राचे प्राध्यापक वैद्य वल्लभराम लिहितात -

**आयुर्वेदात ऍलोपॅथीची भेसळ केल्याने आयूर्वेदाची मूळ पद्धत नाश होऊ पाहत आहे. पंचमहाभूतातील वायूतत्त्वाच्या दोषामुळे वायूचा विकार होतो, अग्नीतत्त्वाच्या दोषामुळे पित्त हा विकार होतो आणि जलतत्त्वाच्या विकारामुळे कफ हा विकार होतो. या विकारांचे चिन्ह शरीरात दिसू लागले की तेच विकाराचे मुख्य चिन्ह आहे असे समजून आयूर्वेद पुढे जात असतो. याच कारणामुऴे आजार दूर करण्याकरिता आयूर्वेदात जल, वायू आणि तेज यांच्या सेवनाला मुख्य स्थान देण्यात आले आहे, आणि त्याला धर्माचे रूप देऊन त्याच्या पालनाचा आग्रह करण्यात आला आहे. यामुळे आयूर्वेदाची चिकित्सापद्धती या प्रमाणात निसर्गोपचाराशी मिळतीजुळती आहे. आयुर्वेदात पथ्य हा शब्ध पारिभाषिक झाला आहे. याचा अर्थ आहे रोगमुक्तीकरिता आहारविहार निसर्गनियमाप्रमाणे केले पाहिजे.**

**ईश्वराची स्तुती आणि सदाचारी वर्तन केल्याने रोगमुक्ती होते असे चरक आदींच्या ग्रंथात लिहिले आहे. ते काहीही असले तरी तुम्ही जो प्रचार सुरू केला आहे त्याने आयुर्वेदालाही मदत होईल. आयूर्वेदात औषधाला स्थान पथ्यानंतर आहे हे खरे, परंतु त्याच्या गुणदोषाचा विचार पाच भौतिक रीतींच्या आधारावर केला जातो. काही औषध तर अगदी निर्दोष आहेत, जसे नीम, निंबू, मुलेठी, कोथिंबीर, पुनर्नवा, जव, गोखरू, गिलोय इत्यादी. अशा गोष्टींचा उपयोग निसर्गोपचारात होतो की नाही हे मला माहीत नाही. जर यांचा उपयोग केला जात असेल तर निसर्गोपचार आणि आयूर्वेद यांचा संबंध अजूनच दृढ होईल.**

रामनामाचा जप आणि शुद्ध राहणी हे सर्वात चांगले आणि सर्वात स्वस्त रोगप्रतिबंधक उपाय आहेत याबद्दल मला किंचितही संशय नाही. दुःखाची गोष्ट ही आहे की डॉक्टर, हकीम वा वैद्य रामनाच्या जपाच्या या वैश्विक उपाययोजनेचा उपयोग करत नाहीत. आयूर्वेदाच्या आधुनिक साहित्यात या उपचाराला कोणतेही स्थान नाही, आणि असेलही तरी त्याला मंत्रतंत्राचे रूप देऊन लोकांना अजूनच संशयाच्या विहिरीत ढकलले आहे. खरे म्हणजे रामनामात अंधश्रद्धेला कोणतेही स्थान नाही. तो निसर्गाचा सर्वोच्च नियम आहे. जो कोणी त्याचे अनुसरण करील तो रोगमुक्त होईल आणि नाही तर उलट होईल. जो नियम माणसाला रोगापासून दूर ठेवतो तोच

नियम त्याचा रोग दुरुस्तही करतो. प्रश्न असा उपस्थित होतो की जो रामनामाचे पालन करतो आणि ज्याचे वर्तनही शुद्ध असते त्याला रोग का होतात. माणूस निसर्गतःच अपूर्ण आहे. विचारी माणूस परिपूर्णतेकरिता धडपडत असतो, परंतु तो क्वचितच परिपूर्ण होत असतो, कारण इच्छा नसतानाही मार्गात तो अडखळतो. ईश्वराचा संपूर्ण नियम शुद्ध जीवनातून अभिव्यक्त झाला आहे. पहिली गोष्ट म्हणजे माणसाने आपल्या मर्यादा ओळखल्या पाहिजे. माणूस ज्या क्षणी त्या मर्यादांचे उल्लंघन करतो तो आजारी पडतो. यामुळे माणूस जेव्हा गरजेप्रमाणे संतुलित आहार घेतो तेव्हा तो रोगमुक्त होतो. आपल्याकरिता योग्य आहार कोणता आहे हे माणसाने कसे ओळखावे? अशा अनेक समस्यांची कल्पना करता येऊ शकते. या सर्वांचा आशय हाच आहे की प्रत्येकाने स्वतःचा डॉक्टर व्हायला पाहिजे आणि आपल्या मर्यादा शोधल्या पाहिजे. जो माणूस असे करील तो १२५ वर्ष जगला पाहिजे.

वैद्य वल्लभराम विचारतात की प्रसिद्ध घरगुती औषधांचा निसर्गोपचारात समावेश होऊ शकतो की नाही. डॉक्टर मित्रांचा दावा आहे की ते पूर्णपणे निसर्गोपचारकच आहेत कारण ते ज्या औषधांचा उपयोग करतात ते निसर्गानेच निर्माण केले आहेत. अशा प्रकारे तर कशाचेही स्पष्टीकरण देता येऊ शकते. मला तर इतकेच सांगायचे आहे की रामनाम सोडून बाकी सर्व निसर्गोपचार विरोधी आहेत. या केंद्रीय तत्त्वापासून जितके आपण दूर जाऊ तितके आपण निसर्गोपचारापासून दूर जातो. अशा प्रकारे विचार करून मी निसर्गोपचाराला पंचमहाभूतांपर्यंत सीमीत केले आहे. परंतु जो वैद्य या सीमांच्या पलीकडे जातो आणि अशा जडीबुटीचा उपयोग करतो की ज्या त्याच्या आजूबाजूच्या भागात उत्पन्न होतात वा उत्पन्न केल्या जाऊ शकतात, आणि तो असे पैशाकरिता नाही तर शुद्ध जनसेवेच्या भावनेने करतो त्याला निसर्गोपचारक म्हणता येऊ शकते. परंतु अशा वैद्यांचा शोध कुठे घ्यायचा? त्यांच्यातील बहुतांश लोक पैशामागे लागले आहेत. ते कोणतेही संशोधन कार्य करत नाहीत आणि त्याची हाव आणि मानसिक आळशीपणा यांच्यामुळे आयुर्वेदाच्या विज्ञानाची इतकी दयनीय अवस्था झाली आहे. आपल्या उणिवा मान्य न करता ते सरकारला आणि पुढाऱ्यांना दोष देतात. जे लोक आपल्या स्वतःच्या

दोषांमुळे असहाय होतात आणि आयुर्वेदाचे नाव धुळीत मिळवतात त्यांना सरकारलाही मदत करणे शक्य होत नसते.

सिमला, मे ९, १९४६

हरिजन, मे १९, १९४६

-----------------

# ११ मे १९४६. ४७५. हेम्प्ट यांना पत्र

चडविक, पश्चिम सिमला,

मे ११, १९४६

प्रिय श्री हेम्प्ट,

तुमचे लांब पत्र मिळाले. पत्रव्यवहाराद्वारे संक्षेपात सल्ला देणे शक्य नाही. मी इतकेच सांगू शकतो की तुम्ही डॉक्टरांच्या देखरेखीखाली विवेकपूर्ण उपवास करू शकता, उपवासाच्या दरम्यान खरोखरीची भूक लागली असेल तर तुमच्या प्रकृतीला आवश्यक असेल तितक्या वेळा पाण्यात एक अंस ताज्या लिंबाचा रस आणि ग्लुकोज घालून तुम्ही ते घेऊ शकता. खजूर खावा की खाऊ नये याबद्दल मतमतांतरे आहेत. तुम्ही जर पुरेशा प्रमाणात ग्लुकोज घेतले तर तुमची शक्ती कायम राहील आणि तुम्ही कामावरही जाऊ शकाल. इतर काहीही घेऊ नये. वैद्यकीय देखरेखीखाली उपवास १५ दिवस वा अधिक काळ सुरू ठेवावा.

अंतःकरणपूर्वक तुमचा,

मो. क. गांधी

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशिला नाय्यर

------------------

# १६ मे १९४६. ५१८. मणिभाई देसाई यांना पत्र

नवी दिल्ली,

मे १६, १९४६

चि. मणिलाल,

तुला पैसे पाठवण्याकरिता मी आधीच लिहिले आहे आणि सूचना दिल्या आहेत.

धिरूभाईंना जरी आपल्या स्वतःच्या कामाकडे वेळोवेळी लक्ष द्यावे लागत असेल आणि आणि परमानंदची पत्नी आजारी असल्यामुळे तोही अजून कामाला लागला नसेल तरी तू त्याच ठिकाणी राहून कसे तरी करून काम निभावून घेशील अशी आशा आहे. बालकृष्णलासुद्धा हे समजावून सांग.

१. तुला आवडेल असे न्यासाला तू कोणतेही नाव देऊ शकतो. याबाबतीत दिनशाच्या इच्छेचे पालन कर.

२. सध्या जे काम सुरू आहे तेच मुख्य काम राहील.

३. तू भविष्याबद्दल मुळीच चिंता करू नको. अर्थसंकल्प योग्य दिसतो. त्यात खोलात जाण्याकरिता मला वेळ नाही. हे इतकेसुद्धा लिहायला मला फार मुश्किलीने वेळ काढावा लागला.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७२७. सौजन्य - मणिभाई देसाई

---------------------

# २१ मे १९४६. १०. उरुळी कांचनमध्ये निसर्गोपचार

(याचे मूळ हिंदी हरिजन सेवकमध्ये मे २६, १९४६ला प्रकाशित झाले होते.)

भारतात खेड्यात निसर्गोपचार चालू शकतो हे दर्शविणारे उरुळीकांचन एक नमुना होऊ शकेल या आशेने आणि उरुळी कांचनच्या लोकांच्या आग्रहाने मी तिथे गेलो आणि काम सुरू केले. तेथील लोकांनी मला सहकार्य देण्याचे वचन दिले. त्यांनी जमीन पुरवायची होती आणि त्यावर इमारती बांधायच्या होत्या. गावकऱ्यांनी मदत केली. तिथे जी जमीन मिळणार होती आणि घरे बनणार होती ते तर अजून काही झाले नाही. गावकऱ्यांनी पैसे तर दिले परंतु केवळ पैसे दिल्याने काम होत नाही. लोकांनी जमीन शोधली पाहिजे, घरे बांधण्यात मदत केली पाहिजे. लोकांनी आर्थिक मदत देण्यापेक्षा या कामात सक्रिय रस घेणे जास्त महत्त्वाचे आहे.

परंतु मला जे लिहायचे आहे ती तर वेगळी गोष्ट आहे. तेथील सेवक मला लिहितात की उरुळी कांचनच्या लोकांना निसर्गोपचार कळू लागला आहे आणि त्यांना त्याचे महत्त्व वाटू लागले आहे. परंतु ते वास्तवात येऊ शकले नाही. सेवकांना इतका विश्वास वाटू लागला आहे आणि ते म्हणतात की जूनमध्ये जरी मी उरुळी कांचनमध्ये पोहोचलो तरी काळजी करण्याचे कारण नाही. त्यांचे म्हणणे आहे की उरुळी कांचनमधून लोकांचे इतके चांगले सहकार्य मिळत आहे की मी उन्हाळा संपल्यानंतर पाचगणी-महाबळेश्वर येथून उतरल्यानंतर जरी तिथे गेलो तरी काही हरकत नाही. हे सर्व ऐकून मला बरे वाटते आणि यावरून असा तर्क करता येतो की तेथील लोकांनाही निसर्गोपचाराचे महत्त्व कळू लागले आहे.

निसर्गोपचाराचे दोन पैलू आहेत - पहिला ईश्वरी शक्ती म्हणजे रामनामाने वेदना नाहीशा करणे आणि दुसरा वेदना होणारच नाहीत अशी उपाययोजना करणे. माझे सहकारी लिहितात की उरुळी कांचनचे लोक गावाच्या साफसफाईकरिता मदत करतात. ज्या ठिकाणी शरीर सफाई, घरसफाई, आणि गावसफाई असेल आणि आहार आणि व्यायाम यांची योग्य काळजी घेतली जात असेल तिथे कमीतकमी आजार होतात. आणि त्यात जर चित्तशुद्धी असेल तर तिथे

आजर होणे असंभव होते. रामनामाशिवाय चित्तशुद्धी होऊ शकत नाही. गावातील लोकांना जर इतकी गोष्ट कळली तर गावात वैद्य, हकीम वा डॉक्टरची गरजच पडणार नाही.

उरुळी कांचनमध्ये नाममात्रच गायी आहेत. हे दुर्दैवी आहे. तिथे काही म्हशी आहेत. परंतु माझ्याजवळ जे काही पुरावे आहेत ते सांगतात की गाय सर्वात उपयुक्त प्राणी आहे. गायीचे दूधही आरोग्यदायी आहे आणि गायीचा जो उपयोग करता येतो तो म्हशीचा करता येत नाही. आजाऱ्यांकरिता तर वैद्य गायीचे दूधच उपयोगी असल्याचे सांगतात. यामुळे मी आशा करतो की सर्वांना गायीचे ताजे आणि स्वच्छ दूध मिळावे म्हणून उरुळी कांचनवासी गायीचे कळप ठेवतील. प्रकृती चांगली ठेवण्याकरिता दुधाची फार आवश्यकता असते.

इमारती जितक्या लवकर बनू शकतील तितके चांगले आहे. पहिली गोष्ट म्हणजे दातारांच्या बंगल्याचा उपयोग कुठवर करणे चांगले राहील आणि दुसरी आणि अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जोपर्यंत घरे तयार होत नाहीत तोपर्यंत सर्वांवर सहजपणे उपचार करता येऊ शकत नाही. केव्हा केव्हा रुग्णाना उपचारगृहात ठेवणे आवश्यक असते. उरुळीकांचन सर्व दृष्टीने आदर्श गाव व्हावे अशी माझी अपेक्षा आहे. निसर्गोपचाराच्या गर्भात आदर्श मानवी जीवन आणि गाव वा शहर यांची आदर्श रचना येऊनच जाते. त्याचा मध्यबिंदू तर ईश्वरच असू शकतो.

नवी दिल्ली, मे २१, १९४६

हरिजनसेवक, मे २६, १९४६

-------------

# २३ मे १९४६. २६. बाळकृष्ण भावे यांना पत्र

नवी दिल्ली,

मे २३, १९४६

चि. बाळकृष्ण,

तुझे कसे सुरू आहे? तेथील लोक जमीन, इमारत आणि गायींची व्यवस्था करू शकत असतील तर चांगले. जमीन आणि इमारतींशिवाय पूर्ण शक्तीनिशी आपण ते काम करू शकणार नाही असे मला वाटते. हवामानाच्या दृष्टीने पाहिले तर ते ठिकाण निःसंशय चांगले आहे.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# २३ मे १९४६. २७. धिरूभाई दीक्षित यांना पत्र

नवी दिल्ली,

मे २३, १९४६

चि. धिरू.

दोन रुग्णाबद्दलच्या सूचना उत्साहवर्धक आहेत. ते जर पूर्णपणे दुरुस्त झाले तर ते खरोखरच फार चांगले होईल. तू मला प्राकृत्रिक जीवन आणि सत्यमय जीवन यासंबंधी विचारले होते हे खरे आहे, परंतु मी त्याबद्दल विसरलो. आपण जर या विषयात खोलवर शिरलो तर तुझ्या लक्षात येईल की हे दोन्ही एकच आहेत. तुम्ही जेव्हा इतरांवर उपचार करत असता तेव्हा तुम्ही स्वतःही दुरुस्त होत असता हे निसर्गोपचाराचे सौंदर्य आहे. निसर्गोपचाराची गोळी रुग्णाला दिली की काम झाले अशी अशी परिस्थिती नाही.

उरुळी कांचन, पुणेमार्गे

ता. क. - सोबत चार पत्रे जोडलेली आहेत - मणिलाल, बालकृष्ण, भागवत आणि कांचनबेन यांच्याकरिता

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# २४ मे १९४६. ३२. मेहतांची संस्था

(याचे मूळ गुजराती 'हरिजनबंधू'च्या जून २, १९४६अंकात प्रकाशित झाले होते.)

डॉ. दिनशा मेहता यांच्या संस्थेबद्दल मला अनेक प्रश्न विचारण्यात आले आहेत. त्यातील दोन लक्षात घेण्यासारखे आहेत. ते खाली दिलेले आहेत -

***ही संस्था जास्त वैज्ञानिक, अधिक आधुनिक आणि अधिक जनोपयोगी व्हावी म्हणून काही उत्साही आणि योग्य निसर्गोपचारकाला वा निसर्गोपचारकांना निसर्गोपचाराच्या उच्च शिक्षणाकरिता विदेशात पाठवणे उचित होणार नाही काय? असे तज्ज्ञ हिंदुस्थानात परतल्यानंतर हिंदुस्थानच्या वातावरणाशी जुळेल अशी निसर्गोपचाराची पद्धत विकसित करू शकणार नाही काय? आणि मग ती हिंदुस्थानात लोकप्रिय होऊन आपल्या पायावर उभी राहू शकणार नाही काय?***

***आपल्या खेड्यांकरिता तुम्हांला साधी आणि स्वस्त पद्धती पाहिजे. कुन्हे, जस्ट आणि कनाईप इत्यादींच्या निसर्गोपचार पद्धतीने हे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल काय? या पद्धती खेड्यांकरिता उपयोगी आणि अनुकूल होऊ शकतात काय?***

विश्वस्तांच्या मताप्रमाणे पुण्यातील निसर्गोपचार केंद्र ग्रामीण भागाच्या निसर्गोपचाराकरिता अनुकूल नाही. यामुळे ते बंद करण्यात आले आणि उरुळी कांचन येथे निसर्गोपचाराचे प्रयोग सुरू करण्यात आले. तिथे लहान प्रमाणात का होईना समाधानकारक रीतीने काम सुरू आहे. अजून तिथे पाहण्यासारखे काहीही नाही. इतकेच नाही तर जमिनीची खरेदीही झालेली नाही आणि इमारतीही उभ्या राहिलेल्या नाहीत.

आता आपण मुख्य प्रश्नाकडे वळू या. कोणत्याही गोष्टीत प्रगती करायची असेल तर पश्चिमेकडे पाहण्याच्या प्रवृत्तीवर निर्बंध घातले पाहिजे. आपण जर निसर्गोपचाराचा अभ्यास करण्याकरिता पश्चिमेकडे जाऊ तर त्याचा हिंदुस्थानला फारसा उपयोग होणार नाही. निसर्गोपचार अशी गोष्ट आहे की कोणीही आपल्या घरातच तो उपचार करू शकतो. प्रत्येक वेळी

निसर्गोपचार करणाराचा सल्ला आवश्यक नसतो. ही इतकी साधी गोष्ट आहे की कोणीही ती शिकू शकतो. रामनामाचा जप करणे शिकण्याकरिता आपल्याला जर युरोपमध्ये जावे लागेल तर त्याचा काहीही फायदा नसेल. माझ्या संकल्पनेतील निसर्गोपचाराचा मूलाधार रामनाम आहे. माती, पाणी, इथर, सूर्य आणि हवा यांचा उपयोग शिकण्याकरिता समुद्रापलीकडे जाण्याची गरज नाही. जे काही अजून शिकण्याची आवश्यकता आहे ते आपल्या गावातच शिकता येऊ शकते. उदाहरणार्थ जडीबूटीचा उपयोग करायचा असेल तर ती जडीबूटी आपल्या खेड्यात मिळणारी असली पाहिजे. आयुर्वेदाच्या शिक्षकांना त्या सर्वांची माहिती असते. आयुर्वेदाचे काही वैद्य बदमाश असतील तर ते विदेशात जाऊन चांगले लोक होऊ शकत नाहीत. शरीरविज्ञान आणि आरोग्यशास्त्र यांचे ज्ञान पश्चिमेकडून आले आहे. हे सर्व चिकित्सकांकरिता फार उपयुक्त आणि आवश्यक आहे. परंतु आपल्या देशातच ते शिकण्याकरिता किती तरी साधन आहेत. थोडक्यात पश्चिमेने ज्ञानक्षेत्रात जी काही भर घातली असेल ती सर्वत्र पोहोचली आहे आणि ते कुठेही शिकता येऊ शकते. याशिवाय मी इथे सांगेन की निसर्गोपचाराच्या ज्ञानाकरिता शरीररचनाशास्त्र आणि आरोग्यविज्ञान यांचे ज्ञान आवश्यक नाही.

कुन्हे, जस्ट आणि फादर कनाईप यांचे लेखन सर्वांकरिता सोपे, लोकप्रिय आणि उपयुक्त आहे. ते वाचणे आपले कर्तव्य आहे. प्रत्येक निसर्गोपचारकाला त्याबद्दल काही ना काही माहिती असतेच. निसर्गोपचार अजून खेड्यात गेलेला नाही. त्याबद्दल आपण सखोल विचार केलेला नाही आणि कोट्यवधी लोकांच्या दृष्टिकोनातून अजून त्याचा कोणीही विचार केलेला नाही. ही केवळ सुरुवात आहे. अखेरीस ते कोणते रूप घेईल हे कोणीही सांगू शकत नाही. ज्याप्रमाणे इतर सर्व शुभ कार्यांकरिता तपश्चर्या आवश्यक आहे त्याचप्रमाणे याकरिताही आवश्यक असली पाहिजे. याला यशस्वी करण्याकरिताही त्याग आणि वाहून घेण्याची आवश्यकता आहे. पश्चिमेकडे पाहण्यापेक्षा आपण आपल्या आंत शोध घेण्याची आवश्यकता असते.

नवी दिल्ली, मे २४, १९४६

हरिजन, जून २, १९४६

# २४ मे १९४६. ३५. प्रार्थना प्रवचन

(प्यारेलाल यांच्या साप्ताहिक पत्रातून उद्धृत)

नवी दिल्ली,

मे २४, १९४६

***गांधीजींनी सांगितले की एका पत्रलेखकाने मला लिहिले आहे की आपल्या "हृदयाजवळ रामनाम असावे" या अंधश्रद्धेमुळे काही लोक ते आपल्या कपड्यावर लिहून घेतात आणि ते कपडे घालतात. तर इतर काही लोक अगदी बारीकबारीक अक्षरात लाख वेळा कागदावर रामनाम लिहितात व आपल्या शरीरात रामनाम भिनलेले आहे हे दाखवण्याकरिता त्या कागदाचे लहानलहान तुकडे करून ते गिळतात! राम ईश्वराचा अवतार होता आणि अयोद्धेचा प्रसिद्ध राजा दशरथचा पुत्र होता म्हणून तुम्ही कोणत्याही रोगावर रामनामाचा उपचार सांगता काय असे दुसऱ्या एका पत्रलेखकाने गांधीजींना विचारले. काही लोक असेही आहेत की ज्यांना असे वाटते की मला भ्रम झाला आहे आणि या देशात आधीच ज्या लाखो अंधश्रद्धा आहेत त्यांत अजून एकीची भर घालून मी लोकांना भ्रमात टाकतो आहे. गांधीजी म्हणाले की अशा प्रश्नांचे मी काय उत्तर देऊ? मी तर स्वतःला हेच म्हणत असतो की जर सत्याचा दुरुपयोग करून त्याच्या नावावर पाखंडीपणाचे आचरण केले जात असेल तर त्याच्याशी माझा काय संबंध? ते म्हणाले की माझा माझ्या सत्यावर विश्वास असूनही लोक त्याचा दुरुपयोग करतील या भीतीने त्याची घोषणा करण्याचे मी कसा थांबवू शकतो.***

निरपेक्ष संपूर्ण सत्य तर जगात कोणाकडेही नाही. हा केवळ ईश्वराचा गुण आहे. यामुळे आपल्याला दिसणाऱ्या सत्याप्रमाणे आपण त्याचे अनुसरण करू शकतो. अशा प्रकारे अनुसरण करणारा मार्गावरून भरकटू शकत नाही.

***गांधीजींनी परत स्पष्ट केले की ज्या रामाच्या नावाला सर्व रोगावरील रामबाण उपाय म्हणून मी संबोधिले आहे तो ना तर ऐतिहासिक राम आहे ना ज्याच्या नावाचा उपयोग लोक जादूटोण्याकरिता करतात तो राम आहे. ते म्हणाले की ज्या रामाला मी सर्व रोगावरील रामबाण उपाय सांगितले आहे तो असा ईश्वर आहे की ज्याचे नाव घेतल्यामुळे भक्तांना पावित्र्य आणि शांतता प्राप्त होते. ते म्हणाले की माझा दावा आहे की रामनाम हा सर्व प्रकारच्या रोगांचा - मग ते मानसिक असो वा आध्यात्मिक वा शारीरिक - अचूक इलाज आहे. डॉक्टर अथवा वैद्याकडे जाऊन शारीरिक रोगावरील इलाज अर्थातच करता येऊ शकतो. परंतु रामनाम माणसाला स्वतःचा डॉक्टर वा वैद्य बनवते आणि त्याला आपल्या आतच सर्व रोग दूर करण्याची संजीवनी सापडते. रोग जेव्हा दूर होऊ शकत नाही, कारण शारीरिक व्याधी असाध्य झालेली असते, तेव्हासुद्धा ती व्याधी शांततापूर्वक सहन करण्याची शक्ती रामनाम त्याला देते.***

रामनामावर श्रद्धा असणारा माणूस काहीही करून आपले अस्तित्व लांबवण्याकरिता एका डॉक्टरपासून वा वैद्यापासून दुसऱ्या डॉक्टर वा वैद्याकडे धक्के खात धावपळ करत बसणार नाही. तसेच डॉक्टर वा वैद्याचे उपचार जेव्हा प्रतिसाद देत नाहीत तेव्हा घेण्याकरिताही रामनाम नसते. डॉक्टर वा वैद्यांशिवायही काम भागवणारे रामनाम आहे. रामनामावर विश्वास ठेवणाराकरिता हीच त्याच्यावरील उपचाराची सुरुवात असते आणि हाच अंतिम वेळेचाही उपचार असतो.

हरिजन, जून २, १९४६

---------------

# २५ मे १९४६. ३९. गरिबांकरिता निसर्गोपचार

प्रश्न - गरीब माणसाला ज्वारीच्या भाकरीसारख्या साध्या जेवणाची जिथे मारामार असते तिथे त्याला संत्र्याच्या रसावर राहायला सांगणे ही क्रूर थट्टा नाही काय?आपल्या बायकोचे व मुलांचे पोट भरण्याकरिता त्याला दिवसभर राबावे लागत असते. त्याला त्यांच्या जगण्यापेक्षाही त्याची जमीन आणि मुलेबाळे महत्त्वाची असतात. निसर्गोपचार हा श्रीमंतांकरिता असतो ज्यांच्याजवळ भरपूर वेळ आणि पैसा असतो.

तुम्हाला जर निसर्गोपचाराद्वारे खरोखरच ग्रामीण लोकांची सेवा करायची असेल तर तुम्हाला योग्य पद्धतीचे निसर्गोपचारगृह प्रत्येक ठिकाणी सुरू करावे लागतील वा त्यांचा शोध घ्यावा लागेल. निसर्गोपचारगृहात रुग्णांकरिता विनामूल्य अन्न, वस्त्र आणि झोपण्याची व्यवस्था असली पाहिजे. आणि रुग्ण जर घरातील कमावता पुरुष असेल तर त्याच्या कुटुंबाच्या पोषणाचीही व्यवस्था केली पाहिजे.

तुम्ही म्हणता त्याप्रमाणे निसर्गोपचार जगण्याची नवीन पद्धती आहे. असे असेल तर या उपचाराबरोबरच तसेच जीवन व्यतीत करण्याचे शिक्षण व त्यावर अंमल करता यावे असे साधन त्याला देण्याचीसुद्धा गरज नाही काय?

उत्तर - ही शंका उपस्थित करणारे आपले अज्ञान प्रदर्शित करत आहेत. मी जे लिहिले आहे ते विचारपूर्वक वाचण्याचीसुद्धा त्यांनी काळजी घेतलेली नाही. निसर्गोपचारात अध्याहृत आहे की त्याच्या उपचारात कमीत कमी खर्च आणि अगदी साध्या साधनांची आवश्यकता पडली पाहिजे. निसर्गोपचाराचा आदर्श हा आहे की शक्यतोवर गावखेड्यातच त्याचा उपचार करता येईल अशी त्याची साधने असली पाहिजे. आणि जे साधन तिथे उपलब्ध नसेल ते तिथेच तयार करता आले पाहिजे. जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचाही निसर्गोपचारात समावेश आहे. ही काही एखाद्या वैद्याने पुडी देण्याची गोष्ट नाही आणि दवाखान्यात जाऊन फकट औषध घेण्याची वा तिथे भरती होण्याचीही गोष्ट नाही. जो

**फुकटचे औषध घेतो तो भिक्षुक होतो. जो निसर्गोपचार करतो तो कधीही भिक्षुक होणे कबूल करत नाही. तो आपली प्रतिष्ठा वाढवतो व दुरुस्त होण्याचा उपाय स्वतःच शोधतो. तो आपल्या शरीरातील विष बाहेर काढतो आणि परत कधीही आजारी न पडण्याचा प्रयत्न करतो. आणि निसर्गोपचारात केंद्रबिंदू तर रामनामच आहे. रामनाम घेतल्याने माणसाला सुरक्षित वाटते. परंतु ते सर्व प्रकारच्या व्याधींवरील रामबाण व्हावे असे वाटत असेल तर ते अंतःकरणातून निघाले पाहिजे आणि म्हणून अंतःकरणापासून रामनाम निघण्याकरिता आवश्यक नियमपालन आवश्यक होऊन जाते. निसर्गोपचाराकरिता संत्र्यांचा रस आवश्यक नाही. यात ना खर्चाचा प्रश्न उपस्थित होतो ना त्रासाचा. पथ्य पाळणे आणि योग्य आहार घेणे हे मात्र त्याकरिता आवश्यक असते. असे केले तर माणूस निरोगी होतो. आमची खेडी आमच्याप्रमाणेच कंगाल झाली आहेत. खेड्यात भाजीपाला, फळे, दूध वगैरे गोष्टी उत्पन्न करणे हा निसर्गोपचाराचा भाग आहे. याकरिता जो वेळ लागतो तो वेळ वाया गेला असे समजण्यात येऊ नये, जात नसतो. उलट त्यामुळे सर्व खेड्यांचा आणि परिणामतः संपूर्ण भारताचा लाभ होत असतो. हे खरे आहे की खेड्यांमध्ये तसेच शहरातही असे उपचारगृह सुरू झाले पाहिजे. ईश्वराची इच्छा असेल तर असे होईल. माणसाने आपले कर्तव्य करण्यावर समाधान मानावे आणि राहिलेले ईश्वरावर सोपवावे.**

***नवी दिल्ली, मे २५, १९४६***

हरिजन, जून २, १९४६

------------------

# ११२. उरुळी कांचन

(याचे मूळ नोंदी या शिर्षकाखाली हरिजन सेवकच्या जून ९, १९४६च्या अंकात प्रकाशित झाले होते.

उरुळी कांचनला दूरदुरून रुग्ण येतात असे माझ्या तेथील सहकाऱ्यांनी कळवले आहे. हरिजन सेवकमध्ये मी आधीच लिहिले आहे (पाहा उरुळी कांचनमध्ये निसर्गोपचार, मे २१, १९४६) की अजून तरी तिथे जागेचीसुद्धा सोय झालेली नाही. आताच बातमी मिळाली आहे की आता तिथे जमीन मिळाली आहे परंतु तिच्यावर इमारती वगैरे बांधायचे काम राहिलेले आहे. तिथे रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांकरिता राहण्याला जागा नाही. यामुळे बाहेरच्या रुग्णांना घेता येणार नाही. हे गाव शहर होण्याचे साहस करू शकत नाही. खरे म्हणजे ध्येय तर असे आहे की प्रत्येक गावात ज्याप्रमाणे एक शाळा असली पाहिजे त्याचप्रमाणे तिथे एक निसर्गोपचार केंद्रही असले पाहिजे. उरुळी कांचनमधील माझे सहकारी पत्रांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्याकरिता असमर्थ आहेत. जे लोक दूरवरच्या ठिकाणी राहतात ते स्वतःचे निसर्गोपचार केंद्र ठेवू शकतात. कोणता माणूस स्वतः रामनामाचा जप करू शकत नाही? तसेच तो जिथे कुठे असेल तिथे कटिस्नानाची व्यवस्था करू शकतो.

मसुरी, जून २, १९४६

हरिजन, जून ९, १९४६

-----------------

# २४ मे १९४६. ४९. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

मे २५, १९४६ (प्यारेलाल यांच्या साप्ताहिक पत्रातून उद्धृत)

**गांधीजींनी त्या सर्व अटी समजावून सांगितल्या ज्यांची परिपूर्ती झाली तर माणसाच्या त्रिविध व्याधींवरील उपचार करता येऊ शकतो. त्यातील पहिली अट म्हणजे रामनाम, ते अंतःकरणातून निघाले पाहिजे. याचा अर्थ काय? शारीरिक रोग मानसिक वा आध्यात्मिक रोगापेक्षा तुलनात्मक दृष्टीने नगण्य असले तरी त्यांच्या उपचाराकरिता लोक जगाच्या या टोकावरून त्या टोकापर्यंत जाण्याकरिता मागेपुढे पाहत नाहीत.**

माणसाचे शरीर तर अखेरीस नाशिवंत आहे. नेहमीकरिता टिकू नये असेच त्याचे स्वरूप आहे. तरीही माणूस ते जपून ठेवण्याच्या मोहात पडलेला असतो आणि आतील आत्म्याची उपेक्षा करतो.

**जो माणूस रामनामावर विश्वास ठेवतो त्याला शरीराचा मोह वाटत नसतो, उलट त्याला ते शरीर ईश्वराच्या सेवेचे साधन आहे असे वाटत असते, आणि त्याला सेवेचे उत्तम साधन करण्याचा उपाय रामनाम आहे.**

**रामनाम हृदयात ठसवण्याकरिता असीम धैर्याची आवश्यकता असते. त्याकरिता किती तरी युग लागू शकतात. तरीही तो प्रयत्न करण्यासारखा असतो. आणि असे असूनही त्याचे यश पूर्णपणे ईश्वरावर अवलंबून असते.**

**जोपर्यंत माणूस आपल्या आत आणि बाहेर सत्य, प्रामाणिकपणा आणि पावित्र्य हे गुण अंगी बाणवत नाही तोपर्यंत रामनाम अंतःकरणातून बाहेर पडू शकत नाही. दररोज सायंकाळी आपण जे श्लोक म्हणतो त्यांत आपण स्थितप्रज्ञाच्या गुणांचे वर्णन करत असतो. गांधीजी म्हणाले की आपल्यापैकी प्रत्येकजण स्थितप्रज्ञ होऊ शकतो. त्याकरिता आपण आपली इंद्रिये आपल्या ताब्यात ठेवली पाहिजे व आपले खाणेपिणे आवश्यक प्रमाणात**

**असले पाहिजे आणि मनोरंजन वगैरे तितक्याच प्रमाणात केले पाहिजे की ज्यामुळे सेवा करण्याची आपली क्षमता कायम राहील. माणसाचे जर आपल्या विचारांवर नियंत्रण नसेल वा कोणी दारे खिडक्या बंद करून बंद खोलीत झोपत असेल आणि कुंद हवेत श्वासोच्छ्वास करत असेल, घाणेरडे पाणी पीत असेल तर त्याला रामनामाच्या जपाचा फायदा होणार नाही.**

**याचा अर्थ असा नाही की आपल्यामध्ये आवश्यक पावित्र्य नाही म्हणून रामनामाचा जप करणे आपण सोडून द्यावे. रामनामाचा जप हा पावित्र्य मिळवण्याकरितासुद्धा आहे.**

जो माणूस अंतःकरणपूर्वक रामनामाचा जप करत असेल त्याच्यात आवश्यक पावित्र्य आणि आत्मसंयम येणे सोपे असते. प्रकृतीस्वास्थ्याच्या आणि स्वच्छतेच्या नियमांचे पालन करणे हा रामनाम घेणाऱ्या माणसाच्या स्वभावाचा मग एक भागच होऊन जाईल. त्याचे जीवन नियमबद्ध होईल. त्याला कोणालाही दुखवण्याची इच्छा होणार नाही. इतरांच्या यातना कमी करण्याकरिता स्वतः यातना भोगणे हा त्याच्या अस्तित्वाचा भाग होऊन जाईल व त्यामुळे त्याला शब्दांतीत शाश्वत आनंद मिळेल.

***गांधीजी म्हणाले की यामुळे जागृतावस्थेत आपण सतत रामनामाचा जप केला पाहिजे. अखेरीस अशी वेळ येईल की ते सुप्तावस्थेतही आपली साथ सोडणार नाही. आणि मग ईश्वरी कृपा आपल्याला शरीर, मन आणि आत्म्याने पूर्णपणे निरोगी करील.***

इंग्रजीवरून. हरिजन, जून २, १९४७

---------------

# २८ मे १९४६. ६७. जहांगीर पटेल यांना पत्र

[मे २८, १९४६] (हे पत्र २८ ते ३१ मेच्या पत्रांमध्ये ठेवलेले आहे. गांधीजी मसूरीला २८ मे, १९४६ला पोहोचले होते.)

भाई जहांगीरजी,

मला तुमचे पत्र मिळाले. मी तुमच्या सूचनेचे स्वागत करतो. तुम्हाला उरुळीचे काम आवडले याचा मला आनंद होतो. तेथील घरे वगैरे तयार झाल्यानंतरच आपण इतर लोकांना तयार करू शकतो.

भाई दिनशांना मला दिल्लीतच सोडावे लागले. मी इथे आजच आलो. सर्व काही ठीक आहे. मी इथे जवळपास १० दिवस राहीन.

सेठ जहांगीर पटेल

पटेल कॉटन कंपनी,

१० चर्चगेट, फोर्ट, मुंबई

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# २९ मे १९४६. ८१. श्रद्धोपचार विरुद्ध रामनाम

एका मित्राने खालील शब्दांत माझी फार चांगली थट्टा केली आहे -

**मार्च १७, १९४६च्या 'हरिजन'च्या अंकात मी तुमचे "कन्फेशन ॲन्ड क्युअर" हा लेख वाचला. यामुळे निसर्गोपचारपद्धतीचा श्रद्धोपचार म्हणून ओळखल्या जाण्याऱ्या पद्धतीशी काही जवळचा संबंध आहे की काय असा विचार सहजच माझ्या मनात आला.** (केवळ काही उतारे उद्धृत केले आहेत.)

***. . . . देवीकरिता कोणताही उपचार केला जात नाही, उलट ती ईश्वरी लीला आहे असे समजले जाते. आम्ही देवीकरिता मरिअम्माची पूजा करतो आणि अधिकांश रोगी चांगले होतात हा एक चमत्कारच वाटतो. पोटदुखीकरिता - अगदी जुनाट पोटदुखीकरिताही अनेक लोक तिरुपतीच्या देवाला नवस करतात. . . . माझ्या आईलाही हाच त्रास होता आणि तिरुपतीला गेल्यानंतर ती दुरुस्त झाली.***

***याबाबतीत तुम्ही माझे समाधान करू शकाल काय आणि लोकांनी निसर्गोपचाराबद्दलही अशीच श्रद्धा का ठेवू नये असे मी विचारू शकतो काय?***

जे उदाहरण मी वर उद्धृत केले आहेत व ज्यांचा मी यात समावेश केला आहे ते ना तर नैसर्गिक उपचारासंबंधीचे आहेत आणि ना रामनामासंबंधीचे. परंतु निसर्ग आपल्याला कसा रोगमुक्त करतो इतके मात्र यातून कळते. हिंदुस्थानी जनजीवनात अंधश्रद्धांचा किती प्रभाव असतो हे अशा उदाहरणांवरून स्पष्ट होते यात काही शंका नाही. निसर्गोपचाराच्या केंद्रस्थानी असलेले रामनाम अंधश्रद्धाविरोधी आहे. विवेकाची चाड नसलेले लोक ज्याप्रमाणे इतर गोष्टींचा वा पद्धतीचा दुरुपयोग करतात त्याचप्रमाणे काही लोक रामनामाचाही दुरुपयोग करू शकतात. केवळ ओठांनी रामनामाचा उच्चार करण्याचा रामनामाच्या उपचाराशी काहीही संबंध नाही. मला जर बरोबर कळत असेल तर मित्र म्हणतात त्याप्रमाणे श्रद्धोपचार हा अंधोपचार आहे व यामुळे असे करणारा ईश्वराच्या जीवनदायी नावाची चेष्टा करतो. रामनाम हा काही

कल्पनाविलास नाही. ते अंतःकरणातून निघायला पाहिजे. रामनाम म्हणजे ईश्वरावर जागृत विश्वास आणि त्याच्या नियमांचे ज्ञान. ते इतर कशाच्याही मदतीशिवाय माणसाला विकारमुक्त करते. स्वस्थ मन हा स्वस्थ शरीराचा आधार असतो हा तो नियम आहे. आणि असे मन शुद्ध हृदयातून विकसित होत असते, त्या हृदयातून नाही की जे डॉक्टरांच्या स्टेथॅस्कोपमधून आपल्याला कळते. उलट ते हृदय ईश्वराचे आसन असते. असे म्हणतात की हृदयात ईश्वराला प्रतिष्ठित केल्यानंतर मनात वाईट विचार येऊच शकत नाही. जिथे विचार शुद्ध असतात तिथे आजार अशक्य असतो. अशी अवस्था प्राप्त करणे कठीण असू शकेल. परंतु याची ओळख झाली की आपण आरोग्याकडे पहिले पाऊल टाकतो. जेव्हा आपण त्यानुसार प्रयत्न करू लागतो तेव्हा आपण दुसरे पाऊल टाकतो. माणसाच्या जीवनात हा क्रांतिकारक बदल झाला की स्वाभाविकपणेच आपल्याला इतर निसर्गनियमांचेही ज्ञान होते व आपण त्यांचे पालन करू लागतो. निसर्गनियमाशी खेळ करून माझे अंतःकरण शुद्ध आहे असा दावा माणूस करू शकत नाही. आणि जगातील सर्व ऋषिमुनींनी हाच मार्ग अनुसरला आहे. ते धर्मात्मा होते, दांभिक वा ढोंगी नव्हते.

हे जर ख्रिश्चन विज्ञान असेल तर माझे काही त्यांच्याशी भांडण नाही. रामनामाचा मार्ग हा काही माझा शोध नाही. शक्य आहे की ख्रिश्चन युगाच्या ते आधीचे असेल.

आवश्यक आणि योग्य शस्त्रक्रियेला रामनाम त्याज्य समजतो काय असे एका पत्रलेखकाने विचारले आहे. रामनाम अर्थातच त्यांना त्याज्य मानत नाही. अपघातात तुटलेला पाय रामनाम परत बसवू शकत नाही. अनेक प्रकरणी शस्त्रक्रिया अनावश्यक असते. जिथे तिची आवश्यकता असेल तिथे ती केली पाहिजे. परंतु धार्मिक व्यक्तीचे एखादे इंद्रिय निकामी झाले वा कापावे लागले तरी ती व्यक्ती त्याची चिंता करणार नाही. रामनामाचा जप ना तर भौतिक पद्धती आहे ना कामचलाऊ उपाययोजना.

मसुरी, मे २९, १९४६

'हरिजन', जून ९, १९४६

-----------------

# जून २, १९४६. ११२. उरुळी कांचन

(याचे मूळ नोंदी या शीर्षकाखाली 'हरिजन सेवक'च्या जून ९, १९४६च्या अंकात प्रकाशित झाले होते.)

उरुळी कांचनला दूरदुरून रुग्ण येतात असे माझ्या तेथील सहकाऱ्यांनी कळवले आहे. 'हरिजन सेवक'मध्ये मी आधीच लिहिले आहे (पाहा उरुळी कांचनमध्ये निसर्गोपचार, मे २१, १९४६) की अजून तरी तिथे जागेचीसुद्धा सोय झालेली नाही. आताच बातमी मिळाली आहे की आता तिथे जमीन मिळाली आहे परंतु तिच्यावर इमारती वगैरे बांधायचे काम राहिलेले आहे. तिथे रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांकरिता राहण्याला जागा नाही. त्यामुळे बाहेरच्या रुग्णांना घेता येणार नाही. हे गाव शहर होण्याचे साहस करू शकत नाही. खरे म्हणजे ध्येय तर असे आहे की प्रत्येक गावात ज्याप्रमाणे एक शाळा असली पाहिजे त्याचप्रमाणे तिथे एक निसर्गोपचार केंद्रही असले पाहिजे. उरुळी कांचनमधील माझे सहकारी पत्रांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्याकरिता असमर्थ आहेत. जे लोक दूरवरच्या ठिकाणी राहतात ते स्वतःचे निसर्गोपचार केंद्र ठेवू शकतात. कोणता माणूस स्वतः रामनामाचा जप करू शकत नाही? तसेच तो जिथे कुठे असेल तिथे कटिस्नानाची व्यवस्था करू शकतो.

मसुरी, जून २, १९४६

'हरिजन', जून ९, १९४६

-----------------

# ३१ मे १९४६. १००. भगवानजींना पत्र

[मे ३१, १९४६ला वा त्यानंतर]

चि. भगवानजी,

मला तुमचे पत्र मिळाले. मला वाटते की तुमच्या मित्राने उपोषण सुरू करून चूक केली आहे. आजार दुरुस्त व्हावा म्हणून उपोषण करण्यावर निर्बंध नाही. ती त्या प्रसंगाची गरज असते. याशिवाय तुम्ही कारणही सांगितले नाही. जोपर्यंत मला कारण कळत नाही तोपर्यंत तुम्हाला सुचवता येईल अशी उपाययोजना मला कळू शकत नाही. निसर्गोपचाराकरिता इकडेतिकडे भटकण्याची गरज नाही आणि नसू शकते. मला कळलेल्या निसर्गोपचाराप्रमाणे रामनामाला प्रथम स्थान आहे, तोच केंद्रबिंदू आहे. परंतु ही समजून घेण्याची गोष्ट आहे. ज्यांना निसर्गोपचार कळत नाही त्यांना त्याचा उपयोग नाही. तुमचा मित्र मोकळ्या हवेत झोपतो काय? तो नाकाने श्वासोच्छ्वास करतो काय? तो अगदी सकाळी सूर्यस्नान करतो काय? तो कटिस्नान आणि घर्षण स्नान करतो काय? तुम्हाला हे दोन्ही स्नान माहीत आहेत. रात्रीच्या वेळी तो पोटावर मातीच्या लेप लावतो काय? डॉ. दिनशांनी गरिबांच्या शुश्रूषेचे काम अजून हातात घेतलेले नाही आणि पुण्याला ते जे काम करत होते ते स्थगित करण्यात आलेले आहे. आपल्या कामाची पुनर्रचना करण्यासंबंधी सध्या ते विचार करत आहेत. परंतु मला जेव्हा तुमच्या मित्राची अजून माहिती कळेल तेव्हाच मी त्यांना सल्ला देईन. सोबत भानूभाईंकरिता असलेले पत्र आहे. अशाच परिस्थितीत तुम्ही त्यांना वा इतरांना कशी मदत करू शकाल? तुमच्यासारखा माणूस तिथे उपलब्ध असल्यामुळे अशा प्रकारची प्रकरणे तुम्ही तिथल्या तिथेच निपटवू शकता. भानूभाईंना लिहिलेले पत्र वाचल्यानंतर त्यांना द्या.

आशीर्वाद

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# १ जून १९४६. १०९. गुरुनाथ जोशी यांना पत्र

मसुरी,

जून १, १९४६

भाई गुरुनाथ जोशी,

मला तुमचे पत्र मिळाले. तुम्ही काहीही लिहिले असले तरी लिहिले हे चांगले केले. माझ्या मते नैतिक दृष्टीने गंभीर चूक करण्याचा दोष तुमच्याकडे येतो. ही अशी गोष्ट आहे की ज्याने अनेक व्यवसाय बदनाम झाले आहेत. तत्त्व म्हणून सर्व व्यवसाय लोककल्याणार्थ असतात, म्हणजे धार्मिक कार्यार्थच असतात. याचा अर्थ ते धार्मिक वृत्तीने करायचे असतात. धार्मिक वृत्तीत आर्थिक विचाराला महत्त्व नसते. माणूस जर धार्मिक वृत्तीने कोणतेही काम करील तर त्याला आजीविका निश्चितच मिळेल. परंतु अनेक वेळा याचीसुद्धा आवश्यकता नसते. माणसाला आपल्या निर्वाहाकरिता जरी पुरेसे मिळाले नाही तरी त्याने आपली धार्मिक वृत्ती सोडू नये. वृत्तीचा अर्थ इथे दृष्टी म्हणजे दृष्टिकोन आहे. तुम्ही या दृष्टिकोनाच्या विपरीत इंजेक्शन इत्यादींच्या मोहात पडला. गणेशशास्त्री जोशी तुमचे गुरू होते. त्यांनी तुम्हाला आयुर्वेदात आणले. त्यांनी स्वतः मला आयुर्वेदाची मार्गदर्शक तत्त्वे सांगितली होती. त्यांचे म्हणणे होते की रामनाम हा आयुर्वेदाचा पाया आहे. आणि रामनामाच्या चिरंतनत्वाचे प्रतीक म्हणून आपण पंचमहाभूताचा उपयोग करतो. तुम्ही हा धडा विसरला. उरुळी कांचनमध्ये मी तुम्हाला सांगितले होते की तुम्हाला आयुर्वेदाच्या औषधांना विसरावे लागेल म्हणजे तुम्हाला त्यांचा उपयोग करता येणार नाही. तुमचे पहिले काम रामनाम शिकवणे होते. ज्या लोकांची रामनामावर उत्स्फूर्त श्रद्धा असते व त्यानेच त्यांच्या सर्व कृती प्रेरित झालेल्या असतात तेच रामनामाची अद्भुत चमत्काराची साक्ष देऊ शकतात. मी म्हणालो त्याप्रमाणे रामनाम हे तिन्ही प्रकारच्या विकारांवर रामबाण उपाय आहे. रामाच्या बाणाचा नेम ज्याप्रमाणे कधीही चुकत नाही त्याचप्रमाणे रामाचे नावसुद्धा कधीही चुकत नाही. आपल्या सर्व कृती या तत्त्वाने प्रेरित झाल्या पाहिजे. संपत्तीचे आकर्षण हासुद्धा एक

प्रकारचा विकारच आहे. तोसुद्धा रामनामानेच दुरुस्त होऊ शकतो. हे रामनाम अंगी रुजवण्यात तुम्ही अपयशी झाला आहा. असे असताना तुम्ही इतरांना निसर्गोपचाराने दुरुस्त करू शकाल असे तुम्हाला कसे वाटते? काय झाले याचा विचार करू नका. आता तुम्हाला जर उरुळी कांचनला यायचे असेल तर कुठेही असलात तरी नवजीवन देणाऱ्या रामनामाच्या जडीबुटीचा उपयोग करा. त्याद्वारे पैसा मिळवण्याचा विचार सोडून द्या आणि जेव्हा पैशाच्या मोहापासून तुम्ही पूर्णपणे मुक्त व्हाल, तेव्हा तुमची जीवनपद्धती पूर्णपणे बदललेली असेल. जेव्हा मी उरुळी कांचनला असेन तेव्हा मला भेटा. तुम्ही हे पत्र गणेशशास्त्री जोशींना दाखवू शकता. ते म्हणतील तसे करा.

तुमचे नेहमी कल्याण होवो. वीरगावला विसरा. ... (मूळ स्रोतात वगळलेले आहे.) प्रेरणा होईल तितकेच आपण करावे.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------

# ११४. मणिभाई देसाई यांना पत्र

मसुरी,

जून २, १९४६

चि. मणिलाल,

अखेरीस तुम्हाला जमीन मिळाली याचा मला आनंद होतो. सर्व जमीन माझ्या नावाने नोदवण्यात आली असेल तर ते बरोबर नाही. माझा विश्वस्त म्हणून उल्लेख करण्यात आला असेल तर त्याला काही हरकत नाही. जमीन जर माझ्या नावाने नोंदवण्यात आली असेल व एकाएकी माझा मृत्यू झाला तर तुम्हाला किती अडचणी येतील याची तुम्ही कल्पना करू शकता. जर असे काही घडले तर तुम्ही माझे पत्र दाखवू शकता आणि जर एखादा वाद निर्माण झाला तर संबंधित लोकांना सांगू शकता की ही जमीन माझी खाजगी जागा नसून उरुळी कांचनच्या लोकांची प्रकृती चांगली राहावी म्हणून व त्यासंबंधीच्या योजना राबवता याव्या म्हणून उरुळी कांचनच्या लोकांना मदत करण्याकरिता घेतलेली ही जमीन आहे. माझ्यानंतर डॉ. दिनशा मेहता, जहांगिर पटेल वा बालकृष्ण विश्वस्त असतील.

तुम्ही पाठवलेल्या योजनेची कागदपत्रे मी रजिस्टर्ड पोस्टाने परत पाठवत आहे. त्यात सुचवलेल्या दुरुस्त्या मला मान्य आहेत. सर्व संडास सेप्टिक टॅन्कला जोडणे शक्य असेल तर तसे करण्याबद्दल माझा कोणताही आक्षेप नाही. असे टॅन्क तयार करताना योग्य काळजी घेतली नाही वा आपण त्यांचा उपयोग योग्य पद्धतीने केला नाही तर गंभीर धोका होऊ शकतो हे तुम्हाला माहीत असेलच.

डॉ. भागवत आणि भाई दातार यांना भेटून त्यांच्याशी याबद्दलची पुढील चर्चा करावी. बालकृष्णलासुद्धा दोन्ही धोक्यांबद्दलची माहिती आहे. माझ्या सूचनेतील संदिग्धतेबद्दल मी समाधानी नाही परंतु मीच अजून निश्चित निर्णयावर पोहोचू शकलेलो नाही. या क्षेत्रात अनुभव असलेल्या काही लोकाशी मी चर्चा केली परंतु हा विषय इतका क्लिष्ट आहे की (इथे मूळ स्रोत खराब

झालेले आहे). त्यांचीसुद्धा निर्णय घेण्याकरिता मदत होऊ शकली नाही. यामुळे सध्या तुम्ही मी उल्लेखिलेल्या तीन लोकांच्या सल्ल्याप्रमाणे वागा.

मी तिथे जुलै महिन्यात निश्चितच येईन. तोपर्यंत तुम्ही फारशी प्रगती करू शकला नाही तर मग ते काम माझ्या हाती घेईन. कोणत्याही परिस्थितीत दिल्लीत मी जून १५पर्यंत असेन. इतकेच नाही तर मी तिथे २१ तारखेपर्यंतही राहू शकेन. त्यानंतर मी ...(इथे मूळ स्रोत खराब झालेले आहे). (शक्य आहे की) पाचगणीला जाईन. ऑगस्टमध्ये मी सेवाग्रामला परतायलाच पाहिजे. यामुळे उरुळी कांचनकरिता (इथे मूळ स्रोतात खराब झालेले आहे). मला केवळ जुलै महिनाच मिळेल अशी भीती वाटते (इथे मूळ स्रोत खराब झालेले आहे). माझ्याकरिता समाधानाची गोष्ट इतकीच आहे की तुम्ही लोक तिथे इतके उत्तम काम करत आहा की तिथे सुरू असलेल्या हळूवार परंतु सुंदर रीतीने सुरू असलेल्या कामात माझ्या उपस्थितीमुळे अडथळा तर येणार नाही ना अशी मला भीती वाटते. परंतु ईश्वर जशी बुद्धी देईल तसे होईल असा विचार करून मी ही भीती मनातून काढून टाकतो.

एका सुदैवी अपघातामुळे कांचन आणि झोहरा दोघेही तिथे आहेत. परंतु त्या केव्हाही ते ठिकाण सोडू शकतात. उत्तम गोष्ट म्हणजे तेथील एखाद्या स्थानिक बाईला वा काही बायांना प्रशिक्षित करून कामाला लावावे.

तुम्ही इमारतींमध्ये जी दुरुस्ती सुचवली आहे तिचे काम सुरू करा. व्यक्तीशः दारांची रुंदी ३ फुटांवरून ४ फूट करावी असे मला वाटते कारण अरुंद दार नंतर बदलता येत नाही. रुंद दारांचा एक लाभ मी स्वतः अनुभवला आहे. त्यांच्यातून रुग्ण, त्याचा बिछाना, खाट इत्यादींना आतबाहेर नेणेआणणे सोपे होते. परंतु डॉ. भागवत यांचा सल्ला मानणे हा उत्तम मार्ग असेल. प्रत्येकाला सर्व गोष्टींचे फायदेतोटे सांगण्याचा अधिकार आहे. परंतु मतभेद असतील कर माझ्या अनुपस्थितीत त्यांचा सल्ला मानणेच योग्य राहील. इतक्या अंतरावरून मी निश्चित अशा कोणत्याही निष्कर्षावर पोहोचू शकत नाही. (इथे मूळ स्रोत खराब झालेले आहे). व त्यात कोणता फेरबदल करावा हे मला कळू शकत नाही.

तुम्हाला गायीबद्दल काय म्हणायचे आहे ते मी समजू शकतो.

ब्रह्मचर्याबद्दल तुम्ही मला कोणतेही प्रश्न विचारले तरी मी त्याचे उत्तर देईन. परंतु तुमचे अंतःकरण उत्स्फूर्तपणे ज्याला प्रतिसाद देईल तेच तुम्ही स्वीकारले पाहिजे. विनोबांचे लेख अर्थातच सुंदर आहेत. परंतु ज्या माणसाची रामनामाबरोबर अतूट श्रद्धा असते त्याच्याकरिता त्याशिवाय इतर कोणताही आधार नसतो. रामनामाच्या शक्तीवर जेव्हा इतकी श्रद्धा निर्माण होते तेव्हा रामनाम विवेकाच्या क्षेत्रात राहत नसते तर ते पूर्णपणे हृदयाच्या क्षेत्रात जाते. मला क्षणोक्षणी वाटत असते की अशा व्यक्तीकरिता केवळ रामच त्याच्या हृदयाचा राजा असतो, आणि ज्याचा मालक राम असतो तो आपल्या वेळेच्या एका क्षणाचाही अपव्यय करू शकत नाही. धिरूला आज मी वेगळे लिहीत नाही. हे वेळ वाचवण्याकरिता.

आशीर्वाद

बापू

गुजराती प्रतीवरून.सी. डब्ल्यू. २७४५. सौजन्य - मणिभाई देसाई.

----------------

# ११५. विनोद यांना पत्र

(हे आणि यापुढील दोन पत्रे देवनागरी लिपीत आहे.)

मसुरी,

जून २, १९४६

चि. विनोद,

मला तुझे पत्र मिळले. तू माझी फसवणूक करणार नाही असे मी समजतो. तुम्ही सर्वांनी मला जी अभिवचने दिली आहेत ती पूर्ण करा. कोणतीही अडचण न येता तिथून जेव्हा तुझी सुटका होत असेल तेव्हाच सुटी घे. असे एकही ठिकाण नसते की जिथे एखाद्या माणसाकरिता सर्व परिस्थिती अनुकूल असते. उरुळी कांचनमध्ये राहण्याबद्दल तू म्हणतोस ते बरोबर आहे. सध्याच्या कामावरून तुझी सहज सुटका होऊ शकत असेल आणि उरुळी कांचनला माझ्या सहवासात काही दिवस तिथे अनुभव घेतल्यानंतर तुला तिथे राहावेसे वाटत असेल तर तिथे राहणे योग्य होईल. तू तयार होईपर्यंत कदाचित हे सत्र संपलेले असेल. मीसुद्धा अजून दिल्लीजवळ अडकलेलो आहे. या महिन्याच्या शेवटीच बहुधा मी येथून निघू शकेन. ऑगस्टमध्ये मी सेवाग्रामला पोहोचायलाच पाहिजे. चि. काकूंना माझे आशीर्वाद सांग.

आशीर्वाद

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल.

-------------

# १२०. ए. के. भागवत यांना पत्र

मसुरी,

जून २, १९४६

भाई भागवत,

मला तुमचे पत्र मिळाले. काम चांगल्या प्रकारे सुरू आहे. तुम्ही केलेल्या सूचना मला वाटते की मी आधीच हरिजनमध्ये दिल्या आहेत. मी तसे केले नसेल तर करीन. (पाहा उरुळी कांचन, जून २, १९४६)

इमारतीबद्दल मी तार पाठवली आहे. माझ्या अनुपस्थितीत तुमच्या निर्णयाप्रमाणे कृती झाली पाहिजे. प्रत्येकाचे ऐकून घ्या. परंतु अंतिम निर्णय तुमचा असला पाहिजे. दुरून निर्णय घेण्याइतके मला फारसे कळत नाही - कळून घेण्याची इच्छाही नाही.

आशीर्वाद

बापू

हिंदी प्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७४४. सौजन्य - मणिभाई देसाई.

-----------------

# १७९. मणिभाई देसाई यांना पत्र

नवी दिल्ली,

जून ९, १९४६

चि. मणिलाल,

मला तुझे पत्र मिळाले. तू आणि तुझ्या लोकांनी दातारांच्या बंगल्याला निजधाम (ईश्वराचे घर) हे नाव दिले काय की त्या बंगल्याचे आधीपासूनच हे नाव होते?

. . . .

तू इमारतीबद्दल काय म्हणतो ते मला कळते. जे काही शक्य असेल ते कर. मी तिकडच्या बाजूला येण्याची वेळ जवळ येत आहे. उरुळी कांचनला मी धावती भेट दिली तर चालेल काय? तुम्ही सर्व तिथे जे चांगले काम करत आहा त्यात हस्तक्षेप करू नये असे मला वाटते. या आणि इतर बाबींवर चौकशी कर आणि मला कळव. मसुरीहून इथे आम्ही सकाळच्या १ वाजता पोहोचलो.

आशीर्वाद

बापू

गुजराती प्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७४३. सौजन्य - मणिभाई देसाई

--------------

# ३२०. एक आवाहन

[जुलै १०, १९४६ नंतर]

(हे अमृत कौर यांच्या जुलै १०च्या मागे लिहिलेले आहे.)

बंधूंनो आणि भगिनींनो,

तुम्ही दुसरी थैली दिल्याबद्दल आभारी आहे. अजूनही आपण जितके पैसे गोळा करायचे ठरवले होते त्यापासून थोडेसे दूर आहो. परंतु मला आश्वासन देण्यात आले आहे की उर्वरित रक्कमही येत्या एकदोन महिन्यात गोळा केली जाईल.

तुम्ही जे काही करू शकता त्या दृष्टीने पाहता दिलेली वर्गणी किमान आहे असे मी समजतो. आपण इथे जे महान कार्य सुरू केले आहे त्यात मला तुमचे संपूर्ण सहकार्य पाहिजे. हे काम उरुळीच्या सर्वांगीण म्हणजे भौतिक, मानसिक आणि आध्यात्मिक विकासापेक्षा मुळीच कमी नाही. या कामात मला स्त्री, पुरुष, मुले या सर्वांची मदत पाहिजे. आपण जात वा धर्माचा भेद विसरायला पाहिजे.असे केले तरच आपली त्रिविध तापापासून मुक्ती होईल. उरुळी कांचनने जर हे कार्य पूर्ण केले तर भारतातील सात लाख खेड्यांना काही आशा करण्याकरिता जागा राहील.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती लेखागार आणि ग्रंथालय. सौजन्य बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

--------------

# ४६५. डी. डी. जोशी यांना पत्र

(हे मूळ गुजराती पत्र ऑगस्ट १८, १९४६च्या हरिजनबंधूमध्ये प्रकाशित झाले होते. व त्याचा अनुवाद प्रश्नपेटी या शीर्षकाखाली ऑगस्ट ११, १९४६च्या 'हरिजन'मध्ये प्रकाशित झाला होता.)

उरुळी कांचन, पुणे मार्गे

ऑगस्ट१, १९४६

भाई जोशी,

मी तुमचे पत्र वाचले. तुमच्या प्रश्नाचे हे उत्तर आहे. (निसर्गोपचारात क्ष-किरणचिकित्सेचा आणि ज्या औषधींचा लाभ होतो असे सिद्ध झालेले आहे त्यांचा निसर्गोपचारात उपयोग करता येतो काय हा तो प्रश्न होता)

ही गोष्ट केवळ ग्रामीणांकरिता आणि गावांकरिता आहे. यामुळे इथे सूक्ष्मदर्शक (मायक्रोस्कोप) वा एक्स रे यांना कोणतेही स्थान नाही. तसेच निसर्गोपचारात क्विनाईन, पेनिसिलीन आणि अशाच प्रकारच्या औषधांनाही स्थान नाही. गावांची साफसफाई, घरातील साफसफाई, वैयक्तिक स्वच्छता आणि प्रकृतीची काळजी यांना पहिले आणि पूर्ण स्थान आहे. यामागील कल्पना अशी आहे की असे करण्यात आले तर रोगच होऊ शकत नाही. आणि जर रोग झालाच तर रामनाम आणि निसर्गनियमांचे पालन हा त्यावरील उपाय आहे. उपचार करणाऱ्याला जोपर्यंत रामनामाची सिद्धी प्राप्त होत नाही तोपर्यंत हा उपचार सार्वत्रिक होऊ शकत नाही. यामुळे रामनामाचा उपचार ताबडतोब सार्वत्रिक होऊ शकत नाही. यामुळे पंचमहाभूते म्हणजे पृथ्वी, जल, आकाश, तेज आणि वायू यांच्याकडून जी शक्ती मिळू शकते त्या शक्तीचा उपयोग करून व्याधी दूर करण्याचा या उपचारात प्रयत्न केला जातो. आणि माझ्या मते निसर्गोपचार इथे थांबतो. यामुळे उरुळी कांचन येथे जो प्रयोग केला जात आहे त्यात ग्रामीण लोकांना प्रकृती चांगली ठेवण्याची कला शिकवणे आणि जे लोक आजारी आहेत त्यांचे रोग पंचमहाभूतांच्या आधारे बरे करण्याच्या प्रयत्नाचा समावेश होतो. यात त्या त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या जडीबूटीचाही समावेश होतो. त्यात खाण्यापिण्यावरील निर्बंधांचाही समावेश होतो.

मो. क. गांधी

डी. डी. जोशी, मुंबई.

गुजराती फोटोप्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# ४६६. सरलादेवी साराभाई यांना पत्र

उरुळी कांचन, पुणे मार्गे

ऑगस्ट १, १९४६

चि. सरलाबेन,

राजकुमारीला तुम्ही २९ तारखेला लिहिलेले पत्र आज इथे पोहोचले. राजकुमारी आणि इतरांना पुण्याला ठेवून मी इथे चार दिवसांकरिता आलो आहे. कोणाला माझ्याशी काही काम असले तर दुपारी येऊन सायंकाळपर्यंत तो वा ती परत जाऊ शकेल. मला इथे गर्दी नको आहे.

तुमचा रक्तदाब बराच जास्त आहे.

मी पूर्णपणे धोक्याबाहेर आहे असे जरी मी म्हणू शकत नाही तरी माझा रक्तदाब नियंत्रणात आहे असे वाटते. एकाच कारणाकरिता प्रत्येकाचा रक्तदाब उच्च होत नसतो. (उच्च) रक्तदाब हा स्वतः आजार नाही, ते इतर कोणत्या तरी आजाराचे चिन्ह आहे. तो मूत्रपिंडाच्या विकारामुळे होऊ शकतो. रोगी मूत्रपिंडाचा विकार म्हणजे संपूर्ण शरीरात विष पसरणे. मूत्रपिंडाचा विकार अतिशय काळजी केल्याने वा तणावाखाली काम केल्याने होतो. माझ्या मते कारण कोणतेही असले तरी फलाहार हा त्यावरील प्रभावी उपाय आहे. संत्री, डाळींब, अननस आणि अंगूर ही याकरिता उत्तम फळे आहेत. माणसाने चांगले झोपायला पाहिजे. झोपणे म्हणजे विश्रांती घेणे. फळे जशी आहेत तशी वा त्यांचा रस काढून घेतली पाहिजे. ते दोन्ही स्वरूपात घेता येतात. तुम्ही हळूहळू चालूफिरू शकता. असे काही व्यायाम आहेत की जे अंथरुणात पडल्यापडल्या घेता येतात. याबरोबर तुम्ही जर रामाला तुमच्या अंतःकरणात प्रतिष्ठित कराल तर तुमचा रक्तदाब कमी होईल याची मला खात्री आहे. राम म्हणजे ज्या स्वरूपात आपण ईश्वराची भक्ती करतो त्या स्वरूपातील ईश्वर. ही अंधश्रद्धा नाही. हा वैज्ञानिक निष्कर्ष आहे. याच्या योग्यायोग्यतेच्या भानगडीत मी तुम्हाला पाडणार नाही. मी तुम्हाला हे लिहितो आहे कारण तुम्ही संतप्रवृत्तीच्या स्त्री आहात हे मला अनेक वर्षांपासून माहीत आहे. तुम्ही श्रीमंत माणसाची

मुलगी आहा आणि एका श्रीमंत माणसाशी तुमचा विवाह झालेला आहे याचा मी विचार केलेला नाही.

आशीर्वाद

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. ११११५०. सौजन्य - साराभाई फाउन्डेशन.

---------------

# ४७०. रुग्णालयाचे समर्पण

(प्यारेलाल यांच्या ऑगस्ट ५, १९४६च्या साप्ताहिक पत्रातून उद्धृत)

पुणे,

ऑगस्ट १, १९४६

हे रुग्णालय (उरुळी कांचन निसर्गोपचार केंद्र) सर्व जातीजमातींच्या, सर्व प्रांतांच्या आणि सर्व धर्मांच्या हिंदुस्थानी रुग्णांकरिता आहे. आणि हरिजनांकरिता कोणतेही रुग्णालय नसल्यामुळे आणि या रुग्णालयाचा मालक स्वतः हरिजन असल्यामुळे या रुग्णालयात हरिजनांना पहिले प्राधान्य देण्यात येईल. आणि या रुग्णालयातील पहिली शैय्या हरिजनांकरिता असेल. याशिवाय या रुग्णालयात गरीब लोकांना श्रीमंत लोकांच्यावर प्राधान्य दिले जाईल.

सही

मणिबेन नानावटी

ईश्वर आम्हांला ही शपथपूर्ती करण्याचे सामर्थ्य देवो.

मो. क. गांधी

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# ४८०. निसर्गोपचाराचा अर्थ

(याचा अनुवाद हरिजनच्या ऑगस्ट ११, १९४६च्या अंकात प्रकाशित झाला होता.)

निसर्गोपचार शिकण्याकरिता अनेक लोकांची उरुळी कांचनला येण्याची इच्छा आहे. मी त्यांना नाही म्हणतो. उरुळी कांचमध्ये काम करणारी संस्था ग्रामीण लोकांकरिता असलेल्या विश्वस्तसंस्थेतर्फे काम करते. तिच्या विश्वस्तात डॉ. दिनशा मेहता, श्री जहांगीर पटेल आणि मी स्वतः आहे. डॉ. दिनशा मेहता यांना निसर्गोपचाराचा जरी बराच अनुभव असला तरी त्यांनी तो अनुभव शहरात मिळवला आहे. ते पुण्यात जेव्हा निसर्गोपचार केंद्र चालवत होते तेव्हा ते गरीब रुग्ण घेत असत व त्यांच्यावर तोच उपचार करत असत जो ते श्रीमंतावर करत असतात. ग्रामीण लोकांकरिताच्या निसर्गोपचाराचा अर्थ असा आहे की तो अशा उपचारांपर्यंत मर्यादित असावा की जो ग्रामीण भागात उपलब्ध असेल आणि ज्यात वीज वा बर्फाचा उपयोग करण्यात येत नसेल. ही या उपचाराची मर्यादा आहे.

हे काम माझ्यासारख्या माणसाचे आहे जो शहरात जरी राहत असला तरी ग्रामीण झाला आहे व ज्याचे अंतःकरण गावात आहे. यामुळे विश्वस्तांनी हे काम माझ्याकडे सोपवले आहे. मी काम सुरू केले आहे परंतु माझ्याकडे प्रशिक्षित माणसे नाहीत. ही गोष्ट वेगळी आहे की माझी इच्छा असते तेव्हा मी डॉ. मेहता यांची मदत घेतो. डॉ. भागवत यांच्या स्वरूपातही मला एक चांगला मदतनीस मिळाला आहे. त्यांचेही अंतःकरण गावात आहे आणि त्यांची राहणीही अगदी साधी आहे. ते जरी ॲलोपॅथ असले तरी त्यांचा निसर्गोपचारावर विश्वास आहे आणि शारीरिक श्रमाची त्यांना घृणा वाटत नाही. ते काम करताना कधीही थकत नाहीत. इतर सर्व सेवाभावनेने भरलेले असले तरी या कामाकरिता ते नवीन आहेत मलासुद्धा हे काम नवीन आहे. श्री दातार यांनी या कामाकरिता आपले घर वापरण्याकरिता दिले आहे. ते भाडे घेत नाहीत. यामुळे काम सुरू आहे. परंतु नवीन विद्यार्थ्यांना घेतले तर त्यांच्याकरिता या घरात जागा नाही. मीसुद्धा नेहमीकरिता उरुळी कांचनमध्ये राहू शकत नाही. ईश्वराची इच्छा असली तर भविष्यात सहा

महिने पुण्याच्या आजूबाजूच्या परिसरात आणि सहा महिने सेवाग्रामला राहण्याची माझी इच्छा आहे. ज्या लोकांना निसर्गोपचार शिकण्याची इच्छा आहे त्यांनी लक्षात ठेवावे की सध्याच्या परिस्थितीत कोणालाही निसर्गोपचार शिकण्याकरिता इथे ठेवता येणे अशक्य आहे.

आता माझ्या कल्पनेतील निसर्गोपचाराबद्दल थोडेसे सांगतो. याबद्दल मागील अंकांमध्ये वेळोवेळी मी थोडेबहुत लिहेले आहेच. परंतु ही कल्पना विकसित होत असल्यामुळे उरुळी कांचनमध्ये सुरू असलेल्या निसर्गोपचाराच्या मर्यादा मी सांगितल्या पाहिजे. खेड्यात असो वा शहरात आजार तीन प्रकारचे असतात : शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक. आणि जी गोष्ट व्यक्तीबद्दल खरी असते तीच शहरांबद्दलही खरी असते. उरुळी कांचनमध्ये राहणारे बहुतेक लोक व्यवसायी वा व्यापारी आहेत. उरुळी कांचनच्या एका भागात मांग राहतात आणि दुसऱ्या भागात महार राहतात आणि अजून एका भागात कांचन राहतात. या गावाचे नाव या शेवटच्या गटापासून आले आहे. इथे काही गारुडीही राहतात. कायद्याप्रमाणे त्यांची गणना गुन्हेगार जमातीत केली गेली आहे. मांग दोर वगैरे विणण्याचे काम करून आपली उपजिविका मिळवत असत. युद्धाच्या काळात त्यांचे काम चांगले सुरू होते परंतु आता त्यांचा मंदीचा काळ आला आहे व त्यांना अतिशय गरिबीत दिवस कंठावे लागत आहेत. , हा आजार काही लहान नाही, मांगांच्या या आजाराचे काय करावे असा प्रश्न आता निसर्गोपचारकांना पडला आहे. त्यांचा हा आजार दूर करणे हे व्यापारी वा व्यवसायी लोकांचे काम आहे. हा आजार कॉलऱ्याप्रमाणे घातक असला तरी या आजारावरील औषध कोणत्याही दवाखान्यात मिळू शकत नाही. मांगांची काही घरे तर अशी आहेत की ती जाळून टाकण्याच्याच लायकीची आहेत. परंतु ती जाळून टाकण्याने त्यांना राहण्याकरिता नवीन घरे मिळणार नाहीत. मग ते ऊन, पाऊस आणि थंडी यांच्यापासून स्वतःचे रक्षण कसे करतील? ते आपले सामानसुमान कुठे ठेवतील? हे सर्व असे प्रश्न आहेत की ज्याच्याकडे निसर्गोपचारक दुर्लक्ष करू शकत नाही. गारुड्यांचे काय करायचे? गुन्ह्यांबद्दल त्यांना प्रेम वाटते म्हणून ते गुन्हे करत नाहीत. पिढ्यांपासून त्यांना ही सवय लागली आहे आणि यामुळे गुन्हेगार जमात म्हणून त्यांचे वर्णन करतात. या लोकांना गुन्हेगारीपासून परावृत्त करणे

हे उरुळी कांचनच्या लोकांचे काम आहे. निसर्गोपचारक या कामाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. निसर्गोपचार करणाऱ्या कार्यकर्त्यांना असे अनेक प्रश्न भेडसावत असतात. अशा प्रकारे निसर्गोपचार हा स्वराज्य मिळवण्याचाच मार्ग आहे व त्याचे क्षेत्र फार व्यापक आहे. ईश्वराची इच्छा असली तर यात यश मिळू शकते, अट इतकीच आहे की आम्ही, उरुळी कांचनच्या रहिवाशानी सत्याचरण केले पाहिजे व आमच्यामध्ये चिकाटी असली पाहिजे.

उरुळी कांचन, ऑगस्ट ३, १९४६

हिंदीवरून. हरिजनसेवक, ऑगस्ट ११, १९४६

---------------------

# २ जून १९४६. ११२. उरुळी कांचन

(याचे मूळ नोंदी या शीर्षकाखाली 'हरिजन सेवक'च्या जून ९, १९४६च्या अंकात प्रकाशित झाले होते.)

उरुळी कांचनला दूरदुरून रुग्ण येतात असे माझ्या तेथील सहकाऱ्यांनी कळवले आहे. 'हरिजन सेवक'मध्ये मी आधीच लिहिले आहे (पाहा उरुळी कांचनमध्ये निसर्गोपचार, मे २१, १९४६) की अजून तरी तिथे जागेचीसुद्धा सोय झालेली नाही. आताच बातमी मिळाली आहे की आता तिथे जमीन मिळाली आहे परंतु तिच्यावर इमारती वगैरे बांधायचे काम राहिलेले आहे. तिथे रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांकरिता राहण्याला जागा नाही. त्यामुळे बाहेरच्या रुग्णांना घेता येणार नाही. हे गाव शहर होण्याचे साहस करू शकत नाही. खरे म्हणजे ध्येय तर असे आहे की प्रत्येक गावात ज्याप्रमाणे एक शाळा असली पाहिजे त्याचप्रमाणे तिथे एक निसर्गोपचार केंद्रही असले पाहिजे. उरुळी कांचनमधील माझे सहकारी पत्रांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्याकरिता असमर्थ आहेत. जे लोक दूरवरच्या ठिकाणी राहतात ते स्वतःचे निसर्गोपचार केंद्र ठेवू शकतात. कोणता माणूस स्वतः रामनामाचा जप करू शकत नाही? तसेच तो जिथे कुठे असेल तिथे कटिस्नानाची व्यवस्था करू शकतो.

मसुरी, जून २, १९४६

'हरिजन', जून ९, १९४६

-----------------

# २ जून १९४६. ११४. मणिभाई देसाई यांना पत्र

मसुरी,

जून २, १९४६

चि. मणिलाल,

अखेरीस तुम्हाला जमीन मिळाली याचा मला आनंद होतो. सर्व जमीन माझ्या नावाने नोंदवण्यात आली असेल तर ते बरोबर नाही. माझा विश्वस्त म्हणून उल्लेख करण्यात आला असेल तर त्याला काही हरकत नाही. जमीन जर माझ्या नावाने नोंदवण्यात आली असेल व एकाएकी जर माझा मृत्यू झाला तर तुम्हाला किती अडचणी येतील याची तुम्ही कल्पना करू शकता. जर असे काही घडले तर तुम्ही माझे पत्र दाखवू शकता आणि जर एखादा वाद निर्माण झाला तर संबंधित लोकांना सांगू शकता की ही जमीन माझी खाजगी जागा नसून उरुळी कांचनच्या लोकांची प्रकृती चांगली राहावी म्हणून व त्यासंबंधीच्या योजना राबवता याव्या म्हणून उरुळी कांचनच्या लोकांना मदत करण्याकरिता घेतलेली ही जमीन आहे. माझ्यानंतर डॉ. दिनशा मेहता, जहांगिर पटेल वा बालकृष्ण विश्वस्त असतील.

तुम्ही पाठवलेल्या योजनेची कागदपत्रे मी रजिस्टर्ड पोस्टाने परत पाठवत आहे. त्यात सुचवलेल्या दुरुस्त्या मला मान्य आहेत. सर्व संडास सेप्टिक टॅन्कला जोडणे शक्य असेल तर तसे करण्याबद्दल माझा कोणताही आक्षेप नाही. असे टॅन्क तयार करताना योग्य काळजी घेतली नाही वा आपण त्यांचा उपयोग योग्य पद्धतीने केला नाही तर गंभीर धोका होऊ शकतो हे तुम्हाला माहीत असेलच.

डॉ. भागवत आणि भाई दातार यांना भेटून त्यांच्याशी याबद्दलची पुढील चर्चा करावी. बालकृष्णलासुद्धा दोन्ही धोक्यांबद्दलची माहिती आहे. माझ्या सूचनेतील संदिग्धतेबद्दल मी समाधानी नाही परंतु मीच अजून निश्चित निर्णयावर पोहोचू शकलेलो नाही. या क्षेत्रात अनुभव असलेल्या काही लोकांशी मी चर्चा केली परंतु हा विषय इतका क्लिष्ट आहे की (इथे मूळ स्रोत खराब

झालेले आहे). त्यांचीसुद्धा निर्णय घेण्याकरिता मदत होऊ शकली नाही. यामुळे सध्या तुम्ही मी उल्लेखिलेल्या तीन लोकांच्या सल्ल्याप्रमाणे वागा.

मी तिथे जुलै महिन्यात निश्चितच येईन. तोपर्यंत तुम्ही फारशी प्रगती करू शकला नाही तर मग ते काम माझ्या हाती घेईन. कोणत्याही परिस्थितीत दिल्लीत मी जून १५पर्यंत असेन. इतकेच नाही तर मी तिथे २१ तारखेपर्यंतही राहू शकेन. त्यानंतर मी . . . (इथे मूळ स्रोत खराब झालेले आहे). (शक्य आहे की) पाचगणीला जाईन. ऑगस्टमध्ये मी सेवाग्रामला परतायलाच पाहिजे. यामुळे उरुळी कांचनकरिता (इथे मूळ स्रोत खराब झालेले आहे). मला केवळ जुलै महिनाच मिळेल अशी भीती वाटते (इथे मूळ स्रोत खराब झालेले आहे). माझ्याकरिता समाधानाची गोष्ट इतकीच आहे की तुम्ही लोक तिथे इतके उत्तम काम करत आहा की तिथे सुरू असलेल्या हळूवार परंतु सुंदर रीतीने सुरू असलेल्या कामात माझ्या उपस्थितीमुळे अडथळा तर येणार नाही ना अशी मला भीती वाटते. परंतु ईश्वर जशी बुद्धी देईल तसे होईल असा विचार करून मी ही भीती मनातून काढून टाकतो.

एका सुदैवी अपघातामुळे कांचन आणि झोहरा दोघेही तिथे आहेत. परंतु त्या केव्हाही ते ठिकाण सोडू शकतात. उत्तम गोष्ट म्हणजे तेथील एखाद्या स्थानिक बाईला वा काही बायांना प्रशिक्षित करून कामाला लावावे.

तुम्ही इमारतींमध्ये जी दुरुस्ती सुचवली आहे तिचे काम सुरू करा. व्यक्तीशः दारांची रुंदी ३ फुटांवरून ४ फूट करावी असे मला वाटते कारण अरुंद दार नंतर बदलता येत नाही. रुंद दारांचा एक लाभ मी स्वतः अनुभवला आहे. त्यांच्यातून रुग्ण, त्याचा बिछाना, खाट इत्यादींना आतबाहेर नेणेआणणे सोपे होते. परंतु डॉ. भागवत यांचा सल्ला मानणे हा उत्तम मार्ग असेल. प्रत्येकाला सर्व गोष्टींचे फायदेतोटे सांगण्याचा अधिकार आहे. परंतु मतभेद असतील तर माझ्या अनुपस्थितीत त्यांचा सल्ला मानणेच योग्य राहील. इतक्या अंतरावरून मी निश्चित अशा कोणत्याही निष्कर्षावर पोहोचू शकत नाही. (इथे मूळ स्रोत खराब झालेले आहे). व त्यात कोणता फेरबदल करावा हे मला कळू शकत नाही.

तुला गायीबद्दल काय म्हणायचे आहे ते मी समजू शकतो.

ब्रह्मचर्याबद्दल तुम्ही मला कोणतेही प्रश्न विचारले तरी मी त्याचे उत्तर देईन. परंतु तुमचे अंतःकरण उत्स्फूर्तपणे ज्याला प्रतिसाद देईल तेच तुम्ही स्वीकारले पाहिजे. विनोबांचे लेख अर्थातच सुंदर आहेत. परंतु ज्या माणसाची रामनामावर अतूट श्रद्धा असते त्याच्याकरिता त्याशिवाय इतर कोणताही आधार नसतो. रामनामाच्या शक्तीवर जेव्हा इतकी श्रद्धा निर्माण होते तेव्हा रामनाम विवेकाच्या क्षेत्रात राहत नसते तर ते पूर्णपणे हृदयाच्या क्षेत्रात जाते. मला क्षणोक्षणी वाटत असते की अशा व्यक्तीकरिता केवळ रामच त्याच्या हृदयाचा राजा असतो, आणि ज्याचा मालक राम असतो तो आपल्या वेळेच्या एका क्षणाचाही अपव्यय करू शकत नाही. धीरूला आज मी वेगळे लिहीत नाही. हे वेळ वाचवण्याकरिता.

आशीर्वाद

बापू

गुजराती प्रतीवरून.सी. डब्ल्यू. २७४५. सौजन्य - मणिभाई देसाई.

----------------

# २ जून १९४६. ११५. विनोद यांना पत्र

(हे आणि यापुढील दोन पत्रे देवनागरी लिपीत आहेत.)

मसुरी,

जून २, १९४६

चि. विनोद,

मला तुझे पत्र मिळले. तुम्ही लोक माझी फसवणूक करणार नाही असे मी समजतो. तुम्ही सर्वांनी मला जी अभिवचने दिली आहेत ती पूर्ण करा. कोणतीही अडचण न येता तेथून जेव्हा तुझी सुटका होत असेल तेव्हाच सुटी घे. असे एकही ठिकाण नसते की जिथे एखाद्या माणसाकरिता सर्व परिस्थिती अनुकूल असते.

उरुळी कांचनमध्ये राहण्याबद्दल तुझे म्हणणे बरोबर आहे. सध्याच्या कामावरून तुझी सहज सुटका होऊ शकत असेल आणि उरुळी कांचनला माझ्या सहवासात काही दिवस तिथे अनुभव घेतल्यानंतर तुला तिथे राहावेसे वाटत असेल तर तिथे राहणे योग्य होईल. तू तयार होईपर्यंत कदाचित हे सत्र संपलेले असेल. मीसुद्धा अजून दिल्लीजवळ अडकलेलो आहे. या महिन्याच्या शेवटीच बहुधा मी येथून निघू शकेन. ऑगस्टमध्ये मी सेवाग्रामला पोहोचायलाच पाहिजे.

चि. काकूंना माझे आशीर्वाद सांग.

आशीर्वाद

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल.

-------------

# २ जून १९४६. १२२. रामशंकरलाल यांना पत्र

मसुरी,

जून २, १९४७

भाई रामशंकरलाल,

मला तुमचे पत्र मिळाले. जी श्रद्धा फलाशा ठेवते ती श्रद्धा नसते. रामनाम हेच त्याचे फळ आहे. ज्यांना याबद्दल संशय वाटतो त्यांच्या अंतःकरणात रामनाम रुजलेले नाही. रामनामाचे मोठेपण यात आहे की माणसाला हवे ते जरी मिळाले नाही तरी माणूस समाधानी असतो. तुमच्या मुलाच्या सुटकेकरिता मृत्यू आला नव्हता हे तुम्हाला कसे माहीत? जीवन आणि मृत्यू माणसाच्या हातात नसतात.

आशीर्वाद

बापू

हिंदी प्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७४४. सौजन्य - मणिभाई देसाई.

----------------

# ३ जून १९४६. १३१. दिनशा के. मेहता

मसुरी,

जून ३, १९४६

मला आजच तुमचे पत्र मिळाले. मी त्याची वाटच पाहत होतो. सर स्टॅफर्ड एकदम चांगले आहेत हे चांगले आहे. मला वाटते की आता तुमच्या इथे येण्याला काहीही अर्थ नाही. आम्ही तिथे ८ वा ९ तारखेला पोहोचू. तुम्हाला जास्तीत जास्त दोन आणि फार तर तीन दिवस मिळतील. याशिवाय तुम्ही स्टॅफर्ड यांना कसे सोडू शकता? आज माझे मौन आहे आणि यामुळे हे मी स्वतःच लिहीत आहे. मला आशा आहे की माझे हस्ताक्षर तुम्हाला वाचता येईल.

गुलबेनला पैशाची वाट का पाहावी लागते? विश्वस्तसंस्थेने सिंहगड येथे जमिनीवर वा इमारतीवर (पैसा ) खर्च करण्याची कल्पना मला पटत नाही. तुम्ही तुमचे काम चांगल्या प्रकारे चालवले पाहिजे असे मला वाटते. परंतु तुम्ही आणि जहांगीरनी जे काही कबूल केले असेल ते मला मान्य आहे. गुलबाईकरिता जे आवश्यक असेल ते तुम्ही घ्याल तर मला त्याचे काही वाटणार नाही. आपण जेव्हा भेटू तेव्हा यासंबंधी चर्चा करू. मी कागदपत्रे परत करत आहे.

आशीर्वाद

बापू

गुजराती प्रतीवरून, प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# ९ जून १९४६. १७९. मणिभाई देसाई यांना पत्र

नवी दिल्ली,

जून ९, १९४६

चि. मणिलाल,

मला तुझे पत्र मिळाले. तू आणि तुझ्या लोकांनी दातारांच्या बंगल्याला निजधाम (ईश्वराचे घर) हे नाव दिले की त्याचे आधीपासूनच हे नाव होते?

तू आंब्याच्या कोयी गोळा करून मगजाचा उपयोग करतो की त्या फेकून देतो? आपल्याजवळ असा काही जादूई दिवा नाही की ज्यामुळे मद्यपान, जुगार, वेश्यावृत्ती, व गुंडांचे अड्डे बंद करून टाकता येतील. परंतु माझा विश्वास आहे की आपल्यामध्ये शुद्ध चारित्र्याची शक्ती असेल तर या गोष्टीसुद्धा थांबतील. जे लोक मद्यपान करतात त्यांच्यावर तुम्ही लक्ष ठेवले पाहिजे आणि मग त्या संबंधात जे काही करता येईल ते तुम्ही केले पाहिजे. मद्यपान करणाऱ्यांमध्ये कोणकोण होते व दारू कुठून येते इत्यादी गोष्टींचीसुद्धा तुम्ही चौकशी केली पाहिजे. तुम्ही जर काही गोष्टींची उदाहरणार्थ गुंड कोण आहेत, सट्टेबाज कशावर सट्टा लावतात, वेश्यांचा त्यांच्या घरातच वा अजून कुठे व्यवसाय चालतो या व अशाच इतर गोष्टींची जवळून चौकशी केली तर याबाबतीत काही तरी करता येईल असे मला वाटते.

तू इमारतीबद्दल काय म्हणतो ते मला कळते. जे काही शक्य असेल ते कर. मी तिकडच्या बाजूला येण्याची वेळ जवळ येत आहे. उरुळी कांचनला मी धावती भेट दिली तर चालेल काय? तुम्ही सर्व तिथे जे चांगले काम करत आहा त्यात हस्तक्षेप करू नये असे मला वाटते. या आणि इतर बाबींवर चौकशी कर आणि मला कळव. मसुरीहून इथे आम्ही सकाळच्या एक वाजता पोहोचलो.

आशीर्वाद

बापू

गुजराती प्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७४३. सौजन्य - मणिभाई देसाई

# १ ऑगस्ट १९४६. ४६५. डी. डी. जोशी यांना पत्र

(हे मूळ गुजराती पत्र ऑगस्ट १८, १९४६च्या 'हरिजनबंधू'मध्ये प्रकाशित झाले होते. व त्याचा अनुवाद 'प्रश्नपेटी' या शिर्षकाखाली ऑगस्ट ११, १९४६च्या हरिजनमध्ये प्रकाशित झाला होता.)

उरुळी कांचन, पुणे मार्गे

ऑगस्ट १, १९४६

भाई जोशी,

मी तुमचे पत्र वाचले. तुमच्या प्रश्नाचे हे उत्तर आहे. (निसर्गोपचारात क्ष-किरणचिकित्सेचा आणि ज्या ओषधींचा लाभ होतो असे सिद्ध झालेले आहे त्यांचा निसर्गोपचारात उपयोग करता येतो काय हा तो प्रश्न होता)

ही गोष्ट केवळ ग्रामीणांकरिता आणि गावांकरिता आहे. यामुळे इथे सूक्ष्मदर्शक (मायक्रोस्कोप) वा एक्स रे यांना कोणतेही स्थान नाही. तसेच निसर्गोपचारात क्विनाईन, पेनिसिलीन आणि अशाच प्रकारच्या औषधांनाही स्थान नाही. गावांची साफसफाई, घरातील साफसफाई, वैयक्तिक स्वच्छता आणि प्रकृतीची काळजी यांना पहिले आणि पूर्ण स्थान आहे. यामागील कल्पना अशी आहे की असे करण्यात आले तर रोगच होऊ शकत नाही. आणि जर रोग झालाच तर रामनाम आणि निसर्गनियमांचे पालन हा त्यावरूल उपाय आहे. उपचार करणाराला जोपर्यंत रामनामाची सिद्धी प्राप्त होत नाही तोपर्यंत हा उपचार सार्वत्रिक होऊ शकत नाही. परंतु रामनामाचा उपचार ताबडतोब सार्वत्रिक होऊ शकत नाही. यामुळे पंच महाभूते म्हणजे पृथ्वी, जल, आकाश, तेज आणि वायू यांच्याकडून जी शक्ती मिळू शकते त्या शक्तीचा उपयोग करून व्याधी दूर करण्याचा या उपचारात प्रयत्न केला जातो. आणि माझ्या मते निसर्गोपचार इथे थांबतो. यामुळे उरुळी कांचन येथे जो प्रयोग केला जात आहे त्यात ग्रामीण लोकांना प्रकृती चागली ठेवण्याची कला शिकवणे आणि जे लोक आजारी आहेत त्यांचा रोग पंचमहाभूतांच्या आधारे

बरा करण्याचा प्रयत्न करण्याचा समावेश होतो. यात त्या त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या जडीबुटीचाही समावेश होतो. त्यात खाण्यापिण्यावरील निर्बंधांचाही समावेश होतो.

मो. क. गांधी

डी. डी. जोशी, मुंबई.

गुजराती फोटोप्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# १ ऑगस्ट १९४६. ४६६. सरलादेवी साराभाई यांना पत्र

उरुळी कांचन, पुणे मार्गे

ऑगस्ट १, १९४६

चि. सरलाबेन,

राजकुमारीला तुम्ही २९ तारखेला लिहिलेले पत्र आज इथे पोहोचले. राजकुमारी आणि इतरांना पुण्याला ठेवून मी इथे चार दिवसांकरिता आलो आहे. कोणाला माझ्याशी काही काम असले तर दुपारी येऊन सायकाळपर्यंत तो वा ती परत जाऊ शकेल. मला इथे गर्दी नको आहे.

तुमचा रक्तदाब बराच जास्त आहे.

मी पूर्णपणे धोक्याबाहेर आहे असे जरी मी म्हणू शकत नाही तरी माझा रक्तदाब नियंत्रणात आहे असे वाटते. एकाच कारणाकरिता प्रत्येकाचा रक्तदाब उच्च होत नसतो. (उच्च) रक्तदाब हा स्वतः आजार नाही, ते इतर कोणत्या तरी आजाराचे चिन्ह आहे. तो मूत्रपिंडाच्या विकारामुळे होऊ शकतो. रोगी मूत्रपिंड म्हणजे संपूर्ण शरीरात विष पसरणे. मूत्रपिंडाचा विकार अतिशय काळजी केल्याने वा तणावाखाली काम केल्याने होतो. माझ्या मते कारण कोणतेही असले तरी फलाहार हा त्यावरील प्रभावी उपाय आहे. संत्री, डाळींब, अननस आणि अंगूर ही याकरिता उत्तम फळे आहेत. माणसाने चांगले झोपायला पाहिजे. झोपणे म्हणजे विश्रांती घेणे. फळे जशी आहेत तशी वा त्यांचा रस काढून घेतली पाहिजे. ते दोन्ही स्वरूपात घेता येतात. तुम्ही हळूहळू चालूफिरू शकता. असे काही व्यायाम आहेत की जे अंथरुणात पडल्यापडल्या घेता येतात. याबरोबर तुम्ही जर रामाला तुमच्या अंतःकरणात प्रतिष्ठित कराल तर तर तुमचा रक्तदाब कमी होईल याची मला खात्री आहे. राम म्हणजे ज्या स्वरूपात आपण ईश्वराची भक्ती करतो त्या सरूपातील ईश्वर. ही अंधश्रद्धा नाही. हा वैज्ञानिक निष्कर्ष आहे. याच्या योग्यायोग्यतेच्या भानगडीत मी तुम्हाला पाडणार नाही. मी तुम्हाला हे लिहितो आहे कारण तुम्ही संतप्रवृत्तीच्या

स्त्री आहात हे मला अनेक वर्षांपासून माहीत आहे. तुम्ही श्रीमंत माणसाची मुलगी आहा आणि एका श्रीमंत माणसाशी तुमचा विवाह झालेला आहे याचा मी विचार केलेला नाही.

आशीर्वाद

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. १११५०. सौजन्य - साराभाई फौन्डेशन.

---------------

# ३ ऑगस्ट १९४६. ४८०. निसर्गोपचाराचा अर्थ

(याचा अनुवाद 'हरिजन'च्या ऑगस्ट ११, १९४६च्या अंकात प्रकाशित झाला होता.)

निसर्गोपचार शिकण्याकरिता अनेक लोकांची उरुळी कांचनला येण्याची इच्छा आहे. मी त्यांना नाही म्हणतो. उरुळी कांचमध्ये काम करणारी संस्था ग्रामीण लोकांकरिता असलेल्या विश्वस्तसंस्थेतर्फे काम करते. तिच्या विश्वस्तात डॉ. दिनशा मेहता, श्री जहांगीर पटेल आणि मी स्वतः आहे. डॉ. दिनशा मेहता यांना निसर्गोपचाराचा जरी बराच अनुभव असला तरी त्यांनी तो अनुभव शहरात मिळवला आहे. ते पुण्यात जेव्हा निसर्गोपचार केंद्र चालवत होते तेव्हा ते गरीब रुग्ण घेत असत व त्यांच्यावर तोच उपचार करत असत जो ते श्रीमंतावर करत असतात. ग्रामीण लोकांकरिताच्या निसर्गोपचाराचा अर्थ असा आहे की तो अशा उपचारांपर्यंत मर्यादित असावा की जो ग्रामीण भागात उपलब्ध असेल आणि ज्यात वीज वा बर्फाचा उपयोग करण्यात येत नसेल. ही या उपचाराची मर्यादा आहे.

हे काम माझ्यासारख्या माणसाचे आहे जो शहरात जरी राहत असला तरी ग्रामीण झाला आहे व ज्याचे अंतःकरण गावात आहे. यामुळे विश्वस्तांनी हे काम माझ्याकडे सोपवले आहे. मी काम सुरू केले आहे परंतु माझ्याकडे प्रशिक्षित माणसे नाहीत. ही गोष्ट वेगळी आहे की माझी इच्छा असते तेव्हा मी डॉ. मेहतांची मदत घेतो. डॉ. भागवतांच्या स्वरूपातही मला एक चांगला मदतनीस मिळाला आहे. त्यांचेही अंतःकरण गावात आहे आणि त्यांची राहणीही अगदी साधी आहे. ते जरी ॲलोपॅथ असले तरी त्यांचा निसर्गोपचारावर विश्वास आहे आणि कोणत्याही प्रकारच्या शारीरिक श्रमाची त्यांना घृणा वाटत नाही. ते काम करताना कधीही थकत नाहीत. इतर सर्व सेवाभावनेने भरलेले असले तरी या कामाकरिता ते नवीन आहेत मलासुद्धा हे काम नवीन आहे. श्री दातार यांनी या कामाकरिता आपले घर वापरण्याकरिता दिले आहे. ते भाडे घेत नाहीत. यामुळे काम सुरू आहे. परंतु नवीन विद्यार्थ्यांना घेतले तर त्यांच्याकरिता या घरात जागा नाही. मीसुद्धा नेहमीकरिता उरुळी कांचनमध्ये राहू शकत नाही. ईश्वराची इच्छा असली तर भविष्यात सहा

महिने पुण्याच्या आजूबाजूच्या परिसरात आणि सहा महिने सेवाग्रामला राहण्याची माझी इच्छा आहे. ज्या लोकांना निसर्गोपचार शिकण्याची इच्छा आहे त्यांनी लक्षात ठेवावे की सध्याच्या परिस्थितीत कोणालाही निसर्गोपचार शिकण्याकरिता इथे ठेवता येणे अशक्य आहे.

आता माझ्या कल्पनेतील निसर्गोपचाराबद्दल थोडेसे सांगतो. याबद्दल मागील अंकांमध्ये वेळोवेळी मी थोडेबहुत लिहेले आहेच. परंतु ही कल्पना विकसित होत असल्यामुळे उरुळी कांचनमध्ये सुरू असलेल्या निसर्गोपचाराच्या मर्यादा मी सांगितल्या पाहिजे. खेड्यात असो वा शहरात आजार तीन प्रकारचे असतात : शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक. आणि जी गोष्ट व्यक्तीबद्दल खरी असते तीच शहरांबद्दलही खरी असते. उरुळी कांचनमध्ये राहणारे बहुतेक लोक व्यवसायी वा व्यापारी आहेत. उरुळी कांचनच्या एका भागात मांग राहतात आणि दुसऱ्या भागात महार राहतात आणि अजून एका भागात कांचन राहतात. या गावाचे नाव या शेवटच्या गटापासून आले आहे. इथे काही गारुडीही राहतात. कायद्याप्रमाणे त्यांची गणना गुन्हेगार जमातीत केली गेली आहे. मांग दोर वगैरे विणण्याचे काम करून आपली उपजिविका मिळवत असत. युद्धाच्या काळात त्यांचे काम चांगले सुरू होते परंतु आता त्यांचा मंदीचा काळ आला आहे व त्यांना अतिशय गरिबीत दिवस कंठावे लागत आहेत. हा आजार काही लहान आजार नाही. मांगांच्या या आजाराचे काय करावे असा प्रश्न आता निसर्गोपचारकांना पडला आहे. त्यांचा हा आजार दूर करणे हे व्यापारी वा व्यवसायी लोकांचे काम आहे. हा आजार कॉलऱ्याप्रमाणे घातक असला तरी या आजारावरील औषध कोणत्याही दवाखान्यात मिळू शकत नाही. मांगांची काही घरे तर अशी आहेत की ती जाळून टाकण्याच्याच लायकीची आहेत. परंतु ती जाळून टाकण्याने त्यांना राहण्याकरिता नवीन घरे मिळणार नाहीत. मग ते ऊन, पाऊस आणि थंडी यांच्यापासून स्वतःचे रक्षण कसे करतील? ते आपले सामानसुमान कुठे ठेवतील? हे सर्व असे प्रश्न आहेत की ज्याच्याकडे निसर्गोपचारक दुर्लक्ष करू शकत नाही. गारुड्यांचे काय करायचे? गुन्ह्यांबद्दल त्यांना प्रेम वाटते म्हणून ते गुन्हे करत नाहीत. पिढ्यांपासून त्यांना ही सवय लागली आहे आणि यामुळे गुन्हेगार जमात म्हणून त्यांचे वर्णन करतात. या लोकांना गुन्हेगारीपासून

परावृत्त करणे हे उरुळी कांचनच्या लोकांचे काम आहे. निसर्गोपचारक या कामाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. निसर्गोपचार करणाऱ्या कार्यकर्त्यांना असे अनेक प्रश्न भेडसावत असतात. अशा प्रकारे निसर्गोपचार हा स्वराज्य मिळवण्याचाच मार्ग आहे व त्याचे क्षेत्र फार व्यापक आहे. ईश्वराची इच्छा असली तर यात यश मिळू शकते, अट इतकीच आहे की आम्ही, उरुळी कांचनच्या रहिवाशानी सत्याचरण केले पाहिजे व आमच्यामध्ये चिकाटी असली पाहिजे.

उरुळी कांचन, ऑगस्ट ३, १९४६

हिंदीवरून. 'हरिजनसेवक', ऑगस्ट ११, १९४६

--------------------

# ४ ऑगस्ट १९४६. ४८५. डॉक्टरवर टीका

१. डॉक्टरांनी केलेले निदान नेहमीच बरोबर नसते आणि अनेकदा एकाच रुग्णाच्या बाबतीत वेगवेगळ्या वेळी ते वेगवेगळे निदान करतात तसेच एकाच वेळी वेगवेगळे डॉक्टर एकाच रुग्णासंबंधी वेगवेगळे निदान करतात आणि अनेक रुग्णांना काय झाले हे तो रुग्ण बरा होईपर्यंत वा मरेपर्यंत निदान होतच नाही असा अनुभव अनेकांना येत नाही काय?

२. रोगनिदान बरोबर झाले तरी त्यावर योग्य उपाययोजना होऊन रुग्ण दुरुस्त झाला नाही वा तो दुरुस्त होणार की नाही हेसुद्धा सांगता आले नाही तर त्या रोगनिदानाचा उपयोग काय? याबद्दल वैद्यकीय पुस्तकांमध्येही बरोबर मत आढळत नाही. केवळ निसर्गोपचाराचा उपचार करायचा असेल तर रोगनिदानाची आवश्यकताच काय? कारण सर्व रोगांचे मूळ एकच आहे असे निसर्गोपचारात मान्य करण्यात आले आहे. डॉक्टर ज्याप्रमाणे शेकडो रोगांची नावे सांगतात व त्यावर विश्वास ठेवतात तसे या उपचारपद्धतीत काहीही नाही.

३. शस्त्रक्रिया सोडली तर वैद्यकीय उपचार करत असताना डॉक्टर लोक शरीरासंबंधीच्या आपल्या ज्ञानाचा उपयोग करतात काय? असे नसेल तर एके काळी शरीरविज्ञान आणि आरोग्यविज्ञान वाचल्याचे श्रेय डॉक्टर लोकांनी का घ्यावे? वास्तवात औषधोपचार करताना या गोष्टींचा उपयोग होत नसल्यामुळे ते लवकरच या गोष्टी विसरलेले असतात. असे असेल तर वैद्य त्रिदोषाच्या (वात, कफ व पित्त) आपल्या ज्ञानाचा रोगनिदान करताना मुळीच उपयोग करत नाहीत वा फारच कमी उपयोग करतात म्हणून दोष का द्यावा?

४. वैद्यांमध्ये जे दोष दाखवले जातात त्याला कारण सरकारचे धोरण नाही काय? शासनाने त्यांच्याकरिता संशोधन इत्यादिंची काही तरतूद केली आहे काय? व्यक्तीच्या दोषाकरिता एखाद्या व्यवस्थेला दोष कसा देता येऊ शकतो? इतकेच नाही तर खाजगी व्यवसाय करणारे डॉक्टरसुद्धा संशोधनाचे कोणतेही काम करत नसतात आणि त्यांच्यातील फार कमी लोक विदेशात जे संशोधन सुरू असते त्यासंबंधी वाचत असतात.

५. महात्माजींच्या शरीराची तपासणी नेहमी डॉक्टरांकडून करवली जाते. यामुळे डॉक्टरांना ज्याचा अधिकार नाही असे अनुचित महत्त्व मिळत नाही काय? यामुळे इतर चिकित्सापद्धतीचे स्थान गौण होते. महात्माजींवर त्या पद्धतींचा अधिक जरी नाही तरी बरोबरीचा हक्क असायला नको काय?

श्री ब्रिजलाल नेहरूंनी विचारलेल्या वरील प्रश्नांना माझे उत्तर असे आहे -

१. यात सांगण्यात आलेला मुद्दा अगदी बरोबर आहे. परंतु तरीही डॉक्टर लोक फळफळतच आहेत. या गोष्टीचा आपण सर्वांनी विचार केला पाहिजे.

२. माझा अनुभव तर असा आहे की जिथे रोगनिदान चांगले होते तिथे त्यानुसारच उपचार केला जातो. वैद्यकीय पुस्तकांमध्ये अनेक उपचार सांगितले आहेत म्हणून त्यांना दोष देणे उचित नाही. माणसाच्या शरीराची घडण इतकी क्लिष्ट आहे की त्या सर्वांना एकच उपचार लागू पडू शकत नाही. निसर्गोपचारात रोगनिदानाची आवश्यकता नाही असे म्हणणे चूक आहे. निसर्गोपचाराप्रमाणे सर्व रोगांचे मूळ एकच आहे आणि सर्व उपचारांमध्येही एक मूलभूत ऐक्य आहे. यामुळे यात रोगनिदान सोपे असते. परंतु असे तर सर्वांबद्दलच म्हणता येऊ शकते. कोणताही निसर्गोपचारक आंधळेपणाने प्रत्येक रुग्णावर मातीच्या लेपाचा उपचार करणार नाही.

३. डॉक्टर लोक शरीरविज्ञान आणि आरोग्यविज्ञान यांचा उपचार करतांना काहीही उपयोग करत नाहीत असे म्हणणे चूक आहे. डॉक्टर आणि वैद्य यांची तुलना करता येऊ शकत नाही कारण या दोघांची उपचार पद्धती वेगवेगळी आहे. त्रिदोष सिद्धांताच्या मूल्याबद्दल मी अगदीच अनभिज्ञ आहे.

४. संशोधन संस्थांची तरतूद न केल्याबद्दल शासनाला दोष देणे मला मुळीच मान्य नाही. खऱ्या संशोधनाबद्दलच्या शिथिलतेबद्दल वैद्यांना मी नेहमीच दोष देत आलो आहे. नामांकित लोक पैसे कमावण्यात गुंग आहेत. इतर इतके अज्ञानी आहेत की त्यांना असे करण्याची

आवश्यकता वाटत नाही अथवा परंपरागत आयुर्वेदाच्या पुस्तकात जे लिहिले आहे त्यावर ते समाधान मानतात. या दृष्टिकोनाबद्दल मला खेद होतो. या मातीला अनुकूल असलेल्या आयुर्वेदिक आणि युनानी चिकित्सा पद्धतीबद्दल अतिशय आदर असूनही मला या निष्कर्षापर्यंत यावे लागले.

५. माझ्या शरीराची सतत तपासणी केल्यामुळे त्यांना अकारण महत्त्व मिळते असे मला वाटत नाही. त्यांना कोणत्याही मदतीची आवश्यकता नाही. मी रंगभूमीवर येण्यापूर्वीच त्यांचा व्यवसाय फळफळत होता. यामुळे इतर चिकित्सापद्धती पार्श्वभूमीत जातात असे म्हणणेही बरोबर नाही. वैद्य आणि हकीमही माझे मित्र आहेत. परंतु त्यांना सविस्तर व सततच्या रोगनिदानाची आवश्यकता वाटत नाही. मी माझा देह रोगनिदानाकरिता सुपूर्द करतो याची दुर्दैवाने जाहिरात केली जाते. परंतु मी त्यांचे औषध घेत नाही. उपचार मुख्यत्वे पंचमहाभूत, आहारातील फेरबदल, आणि मालीश यांच्यापर्यंत मर्यादित असतो.

निसर्गोपचार आणि देशी चिकित्सापद्धती यांच्यासंबंधीच्या प्रेमाने आणि पश्चिमी चिकित्सा पद्धतीला मी काळी जादू समजत असलो तरी मला त्यांनी इतके आंधळे केलेले नाही की मला पश्चिमी चिकित्सापद्धतीने केलेली प्रगती दिसू नये. मी कठोर शब्द वापरले होते आणि मी ते मागेही घेत नाही कारण त्यामुळे चिरफाडीला आणि तिच्याशी संबंधित इतर निर्दयपणाच्या गोष्टींना प्रोत्साहन मिळते. माणसाला जिवंत ठेवण्याकरिता कितीही वाईट असले तरी सर्व प्रकारचे काम करण्याची तिची तयारी असते व देहात राहणाऱ्या अमर आत्म्याकडे ती दुर्लक्ष करते. निसर्गोपचाराची शक्ती कितीही मर्यादित असली व त्याचे चिकित्सक कितीही खोटे दावे करत असले तरी मी त्याला कधीही सोडू शकत नाही. याशिवाय निसर्गोपचारात प्रत्येकजण स्वतःचा डॉक्टर होऊ शकतो. असे इतर चिकित्सापद्धतीत होऊ शकत नाही.

उरुळी कांचन, ऑगस्ट ४, १९४६

हरिजन, ऑगस्ट ११, १९४६

-------------------

# ४ ऑगस्ट १९४६. ४८७. दिनशा मेहता यांना पत्र

उरुळी कांचन, जिल्हा पुणे,

ऑगस्ट ४, १९४६

चि. डॉ. दिनशा,

उरुळी कांचन आणि भारतातील खेड्यांमध्ये निसर्गोपचाराबदल्लची माझी कल्पना वेगात विकसित होत आहे. याचा उद्देश व्यक्तीला आणि समाजाला तन, मन आणि आत्मा यांच्या आरोग्याची निगा राखणे शिकवणे आहे. अशा प्रकारे उरळी कांचनमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी रस्त्यांची साफसफाई करणे आणि माती, आकाश, प्रकाश आणि पाणी यांच्या सम्यक उपयोगाने रुग्णांच्या शारीरिक व्याधी दूर करण्याशिवाय कायद्यात गुन्हेगार जमाती म्हणून निर्देश करण्यात आलेल्या गारुडी समाजाचे (याशिवाय पाहा "निसर्गोपचाराचा अर्थ", ऑगस्ट ३, १९४६.) दारिद्र्य दूर करणे आणि पठाणी वृत्तीने सक्तीने व्याज वसूल करण्याकडेही लक्ष द्यावे लागेल कारण हे सर्व सामाजिक आजार आहेत आणि ते सर्व उपचाराकरिता निसर्गोपचारकाची वाट पाहत आहेत. निसर्गोपचाराच्या पुस्तकात या साध्या गोष्टींचा उल्लेख नाही याची मला काळजी वाटत नाही. मला आणि तुम्हाला आवडत असेल तर हिंदुस्थानातील खेड्यांमधील आणि शहरातील निसर्गोपचार संस्थेच्या विश्वस्तांचे याहून कमीवर समाधान होऊ शकत नाही. अशाच पद्धतीने आपण लठ्ठपणा आणि इतर आजारांवर उपचार केला आणि आपल्याला माहीत असले की याच आजाराकरिता हा रुग्ण पुढे दरवर्षी उपचाराकरिता परत येणार आहे तर आपले समाधान होणार नाही. उरुळी कांचनमधील कार्यकर्ते मी वर वर्णन केलेल्या पद्धतीप्रमाणे जरी नाही तरी अशाच पद्धतीने काम करत असतात. आता येथील कार्यकर्त्यांनी अशी कार्यक्षमता मिळवल्याशिवाय आणि त्यांच्या ठिकाणी जे कार्यकर्ते येतील त्यांनाही अशाच प्रकारे प्रशिक्षित केल्याशिवाय समाधान मानू नये. याकरिता आपल्याला लांब अभ्यासक्रमाची आवश्यकता नाही. आपले उद्दिष्ट आधुनिक काळातील शल्यचिकित्सकांना वा

डॉक्टरांची वा हकीम वगैरेमंडळींची जागा घेणे नाही. आपल्या कामाची परिकल्पना काही वेगळ्या प्रकारे करण्यात आली आहे. त्याकरिता नवीन पद्धतीच्या प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. आपल्याला नवीन पुस्तके लिहावी लागतील. याकरिता उरुळी कांचनमधील कामावर लक्ष केंद्रित करावे लागेल. अशा प्रकारच्या कामाचे स्पष्ट चित्र आपल्यासमोर उभे राहणार नाही आणि तुम्ही ते पूर्णपणे समजून घेणार नाही तोपर्यंत सिंहगडमध्ये आपण विशेष काही करू शकणार नाही.

महात्मा, खंड ७, पृष्ठ १९२

---------------

# ४ ऑगस्ट १९४६. ४८८. प्रार्थना प्रवचन

(सभेत लेखी भाषण वाचून दाखवण्यात आले.)

ऑगस्ट ४, १९४६

बंधूंनो आणि भगिनींनो,

तुम्ही मला दुसरी थैली दिली आहे आणि त्याकरिता मी आभारी आहे. परंतु तरीही त्यात काही उणीव आहे. ही उणीव दोन वा तीन महिन्यात पूर्ण केली जाईल असे मला सांगण्यात आले आहे.

तुम्ही दिलेला पैसा किमान आहे असे मी समजतो. इथे जे महान काम करण्यात येत आहे त्याकरिता मला तुमचे सहकार्य पाहिजे. उरुळीच्या लोकांच्या शरीराचा, मनाचा आणि आत्म्याचा विकास करण्याचे हे काम आहे. याकरिता सर्व जातींचे, म्हाताऱ्यांचे आणि तरुणांचे, मुलांचे आणि स्त्रियांचे सहकार्य पाहिजे. आपण जेव्हा जातींमधील भेद विसरू तेव्हाच हे त्रिविध दुःख दूर होऊ शकतात. उरुळी कांचनमध्ये जर हे काम पुर्णत्वास गेले तर भारतातील सात लाख खेड्यांना काही भवितव्य आहे असे म्हणता येईल.

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७४२. सौजन्य - मणिभाई पटेल.

--------------------

# १० ऑगस्ट १९४६. ७. मंगलदास पक्वासा यांना पत्र

सेवाग्राम,

ऑगस्ट १०, १९४६

भाई पक्वासा,

मी तुम्हाला पाचगणी येथील विश्वस्त संस्थेच्या मसुदा आणि उच्च न्यायालयाद्वारे झालेल्या लिलावाची कागदपत्रे पाठवत आहे. बाकीचे तुम्ही स्वतःच उच्च न्यायालयातून मिळवू शकाल. आणि जे काही तुम्हाला आता मिळू शकत नाही ते तुम्हाला तिथे जेव्हा उपलब्ध होतील तेव्हा मिळू शकतील. तरीही मी तुम्हाला काही पाठवण्यासारखे असेल तर तसे मला कळवा. विश्वस्त संस्थेचा दस्तावेज एक तर गुजरातीत वा मराठीत वा हिंदुस्तानीत असला पाहिजे. तो नागरी आणि उर्दू लिपीत असला पाहिजे. परंतु इंग्रजीत नसावा. याचा आम्ही आमच्या धोरणात समावेश केला आहे. अंतिम मसुदा तयार झाल्यानंतर तुम्ही तो माळवणकर यांना दाखवू शकता. हे काम झाले पाहिजे असा शांतिलालचा आग्रह आहे.

तुमची प्रकृती चांगली असेल अशी आशा आहे. नियमांचे पालन करा.

आशीर्वाद

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. ४७८५. सौजन्य - मंगलदास पक्वासा

---------------

# १५ ऑगस्ट १९४६. २६. दिनशा के. मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

ऑगस्ट १५, १९४६

चि. दिनशा,

तुम्हाला पत्र लिहिण्याचा सारखा विचार करत होतो परंतु कार्यकारिणीच्या कामाचे दडपण असेपर्यंत ना मी स्वतः लिहू शकत होतो ना मजकूर सांगून कोणाकडून लिहवून घेऊ शकत होतो. आज कार्यकारिणीचे सर्व सदस्य आणि कॉंग्रेसचे अध्यक्षसुद्धा गेलेले असल्यामुळे अगदी मोठ्या पहाटे मजकूर सांगून हे पत्र लिहवून घेत आहे. तुम्ही मागील वेळी कशाचा उल्लेख केला होता याचा मी सारखा विचार करतो आहे. तुमच्याकडून मी ज्या कामाची अपेक्षा करतो त्या कामाकरिता तुमच्या अपेक्षेप्रमाणे मी व्यवस्था करू शकेन असे मला वाटत नाही. तुम्हाला गावांची सेवा करायची असल्यामुळे तुम्ही तुमची स्थिती समजून घेऊन सर्वांत मिळूनमिसळून राहायला शिकायला पाहिजे व संस्थेतील इतरांबरोबर एकरूप व्हायला पाहिजे. आणि तुम्ही जर हे माझ्या सहवासात शिकू शकत नसाल तर तुमच्याकरिता इतरत्र कुठेही हे शिकणे कठीण होईल. तुम्ही म्हणता तशा सोयीसवलती जर मी तुमच्याकरिता निर्माण केल्या तर त्याचा अर्थ तुम्ही काही विशिष्ट परिस्थितीतच निसर्गोपचार करू शकता असा होईल. म्हणजे शहरात वा शहरासारखी परिस्थिती जिथे निर्माण करता येऊ शकते तिथेच तुम्ही निसर्गोपचार करू शकता. हे तुमचे अपयश आहे असे मला म्हणायचे नाही. माझे अनेक मित्र आहेत की ज्यांच्या तुमच्यासारख्याच सवयी आहेत. त्यांच्याकडून जितके घेता येईल तितक्यावर मी समाधान मानत असतो. परंतु तुम्ही स्वतःच म्हणाला होता की तुम्हाला किती तरी द्यायचे आहे आणि त्यामुळे मी तुमच्याकडून बरेच काही मिळवण्याची अपेक्षा करत होतो. माझ्या अपेक्षेप्रमाणे जरी मला मिळाले नाही तरी मी समाधान मानेन. अशा परिस्थितीत आपण दोघांनीही वा असे म्हण ना की आपण तिघांनीही ही गोष्ट समजून घेतली पाहिजे. आणि माझ्या बाजूने बोलायचे तर तुम्ही येथे आरामात काम करू शकाल असे मला

वाटत नाही. परंतु मी तुमच्याबरोबर काही काळ राहिलो आणि तुम्हाला माझ्या पद्धतीची सवय झाली तर तुम्ही पूर्ण जोमात काम करू शकाल.

याकरिता या पत्रातील गुजराती भाषा तुम्हाला अनाकलनीय होत असेल तर वालजी भाईंना वारंवार भेटला आणि त्यांना वा त्यांच्या घरातील मुलांना विचारले तर ते तुम्हाला योग्य अर्थ समजावून सांगू शकतील. तुम्ही त्यांच्या सतत संपर्कात असावे असे मी तुम्हाला सुचवीन. ते अतिशय सुसंस्कृत आणि विद्वानही आहेत. त्यांच्या घरी जाऊन भेटणे केव्हाही हितकर राहील. येथून मी दिल्लीला गेलो तर ती आश्चर्याची गोष्ट होणार नाही. परंतु ते मला माहीत नाही.

हे पत्र गुलबाईला वाचून दाखवा. यात व्यक्त केलेल्या कल्पना जर जहांगीरलाही कळल्या तर फार चांगले होईल.

आशीर्वाद

बापू

डॉ. दिनशा मेहता

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# १६ ऑगस्ट १९४६. ४१. मगनलाल यांना पत्र

सेवाग्राम,

ऑगस्ट १६, १९४६

भाई मगनभाई,

काल रात्री मला चि. परमानंद भेटले आणि त्यांनी मला तुमचा ५००० रुपयांचा चेक दिला. मी तो उरुळी कांचनला पाठवत आहे. उरळी कांचन येथे इतक्याच रकमेची जमीन विकत घेण्याकरिता तो खर्च केला जाईल. चि. परमानंदने मला सांगितले की माझी संमती असली तर तुमची उरुळी कांचनचे विश्वस्त बनण्याची तयारी आहे. जहांगीर पटेल आणि डॉ. दिनशा मेहता हे माझे सहविश्वस्त आहेत. याशिवाय एका स्थानिक सद्गृहस्थांनाही विश्वस्तमंडळात घेण्यात आले आहे. या सर्वांची मला संमती घ्यावी लागेल. ही प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी मी तुम्हाला सांगितले पाहिजे की ही या विश्वस्तमंडळातील नावे केवळ नावाला शोभा आणण्याकरिता नाही. या सर्व विश्वस्तांनी काम केले पाहिजे. मूळ विश्वस्तांमध्ये याकरिता मौन संमती आहे. यामुळे वेळोवेळी तुम्ही उरुळी कांचनला येऊन राहिल्याशिवाय आणि येथील कामकाजात भाग घेतल्याशिवाय तुम्ही विश्वस्त होण्याला काहीही अर्थ राहणार नाही. मला माहीत आहे की तुम्ही परिश्रमी माणूस आहे. यामुळे तुम्हाला असे करायचे असेल तर संस्थेला तुमचा बराच उपयोग होऊ शकेल. याशिवाय तुमची निसर्गोपचारावर श्रद्धा असली पाहिजे. तुमची जर तशी श्रद्धा नसेल तर तुम्ही विश्वस्त होणे ही थट्टाच होईल. आणि मी तुम्हाला अशा विचित्र परिस्थितीत कसा टाकू शकतो? परमानंदकडून मी असेही ऐकले आहे की उरुळी कांचन येथे राहण्याकरिता घर बांधण्याची तुमची इच्छा आहे. या घराची मालकी संस्थेकडे जाईल या अटीवर याचे मी निश्चितच स्वागत करीन. घराचा उपयोग संस्थेच्या नियमाप्रमाणे होईल आणि जेव्हा तुम्ही या घराचा उपयोग करणार नसाल तेव्हा संस्थेच्या कामकाजाकरिता त्याचा उपयोग केला जाईल. परमानंदचे तुमच्या मुलीशी जर लग्न

झाले तर हे जोडपेसुद्धा स्वाभाविकपणे या घराचा उपयोग करू शकेल. तुम्ही अर्थातच तिथे असाल.

श्रीयुत मगललाल चोपडा

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# १६ ऑगस्ट १९४६. ४२. मणिलाल बी. देसाई यांना पत्र

सेवाग्राम,

ऑगस्ट १६, १९४६

चि. मणिलाल,

चि. परमानंदने मला तेथील सर्व बातम्या सांगितल्या. त्याने ५,००० रुपयांचा चेक आणला. तो केवळ तिथेच जमा करता येईल. मगनलालला जर विश्वस्त म्हणून घ्यायचे असेल तर कोणकोणत्या समस्या सोडवाव्या लागतील हे मी त्याला लिहिले आहे (पाहा आधीचा विषय). परमानंद तुला सांगेल. गंगाबेन आली आहे असेसुद्धा मला कळले आहे. ही चांगली गोष्ट आहे, मला वाटते की पुरुषोत्तम तिथे चांगला राहील. तुमच्या तिथे पुरेसा पाऊस पडला असेल अशी अपेक्षा आहे. तुम्ही मी दिलेल्या सूचनांवर काम करणे सुरू केले काय? गोखलेंचे कसे सुरू आहे? बालकृष्णने मला लिहिले पाहिजे.

सर्व मित्रांना आशीर्वाद

बापू

श्रीयुत मणिलाल देसाई

उरुळी कांचन

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# १७ ऑगस्ट १९४६. ५१. जहांगीर पटेल यांना पत्र

सेवाग्राम,

ऑगस्ट १७, १९४६

भाई जहांगीर,

मला तुमचे इंग्रजीतील पत्र मिळाले. तुम्हाला माझी पत्रे वाचून दाखवण्यात आली काय? तुम्ही माझी पत्रे स्वतः वाचू शकता की कोणी तरी तुम्हाला ते वाचून दाखवून त्यांचा अर्थ स्पष्ट करून सांगत असेल तर त्यासंबंधी मी काही तरी करू शकेन. रामप्रकाशसंबंधी निर्णय घ्यायला अधिक वेळ लागणार असेल तर मला त्यासंबंधी थोडा विचार करावा लागेल. तुम्हाला ताबडतोब माणसाची निकड आहे व त्याकरिता मंजुरी घेणे केवळ उपचार आहे असे मला वाटत होते. परंतु तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. तुमच्या संस्थेशी विचारविनिमय करा व त्यानंतरच निर्णय घ्या. याकरिता किती वेळ लागेल हे तुम्ही मला सांगू शकलात तर बरे होईल. परंतु रामप्रसादला इथे कामावर ठेवलेले नाही हे तुम्ही लक्षात असू द्या. मला इतकेच सांगायचे आहे की माझी कोणतीही गैरसोय न होता मी त्याला पाठवू शकतो.

रामनामबद्दल तुम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला 'हरिजन'मध्ये सापडेल. (पाहा "रामनामासंबंधीचा संभ्रम", ऑगस्ट १७, १९४७.) तुम्हाला जर हे कळले नसेल वा त्यामुळे तुमचे समाधान झाले नसेल तर मला परत विचारा. तुम्ही त्याप्रमाणे आचरण करता की नाही हा वेगळा प्रश्न आहे असे मला वाटते. ते काहीही असले तरी एक विश्वस्त म्हणून तुम्हाला हे नीट कळलेले असणे आवश्यक आहे. आणि मी जर चुकत असेन तर तुम्ही मला दुरुस्त करायला पाहिजे. दिनशा तुम्हाला भेटत असतात हे माझ्या लक्षात आले. मी व्यक्त केलेल्या मतांबद्दल तुम्हाला काही सांगायचे असेल तर मला लिहा.

आशीर्वाद

बापू

श्रीयुत जहांगिर पटेल

पटेल हाऊस

चर्चगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# १८ ऑगस्ट १९४६. ६०. आत्माराम के. भागवत यांना पत्र

सेवाग्राम,

ऑगस्ट १८, १९४६

भाई भागवत,

चि. परमानंद इथे आला आहे. त्याने सर्व बातम्या दिल्या. तुमचे काम चांगले सुरू आहे आणि तुम्ही शांतपणे काम करत असता असा ठसा सर्वांच्या मनावर उमटला आहे. मला तुमच्याकडून तीन गोष्टी समजून घ्यायच्या आहेत. (१) जोड्यांबद्दल काय? (२) स्वच्छतेच्या नियमांकडे दुर्लक्ष का? (३) आणि लांब केस वाढवण्याचे कारण काय?

समतोल आहाराबद्दलचे प्रयोग मला फार आवडले. माझी ते स्वतः करण्याची इच्छा आहे. त्यामुळे आपल्या अनेक अडचणी दूर होतील. परंतु अजून मी त्याची सुरुवात करू शकलो नाही याचा मला खेद होतो.

आशीर्वाद

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७४१. सौजन्य - मणिलाल बी. देसाई

---------------

# २३ ऑगस्ट १९४६. ७९. दिनशा के. मेहता यांना तार

जलद

ऑगस्ट २३, १९४६

डॉक्टर दिनशा

६, तोडीवाला मार्ग,

पुणे

तुमची तार. निसर्गोपचारात कितीही अडचणी असल्या तरी निराशेला स्थान नाही. १५ तारखेला पत्र लिहिले होते (हे दिनशा मेहता यांना मिळाले नव्हते; पाहा "डी. व्ही रामस्वामी यांना पत्र", ऑगस्ट २९, १९४६). रविवारी दिल्लीला जात आहे. आई चांगली असेल अशी आशा आहे. तुम्हीसुद्धा.

स्नेह,

बापू

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# २६ ऑगस्ट १९४६. १०२. नयी तालीममध्ये औषधांचे स्थान

(याचा अनुवाद सप्टेंबर १, १९४६च्या हरिजनमध्ये प्रकाशित झाला होता.)

श्रीमती आशादेवी आर्यनायकम आपल्या कामात लागलेल्या असतात आणि माझा वेळ वाचवण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु एके दिवशी मात्र त्यांनी मला ५ मिनिट मागितले. त्यांचे म्हणणे होते की नयी तालीममध्ये औषधांचे प्राथमिक ज्ञान दिले पाहिजे आणि हे शक्य होईल काय हा प्रश्न त्यांना पडला होता. याकरिता त्यांनी  स्वतः ४ वा ५ वर्षांचा औषधीशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण करायला पाहिजे काय?

माझ्या एकदम लक्षात आले की भरपूर प्रयत्न करूनसुद्धा त्या जुन्या शिक्षणपद्धतीतून स्वतःला मुक्त करू शकलेल्या नाहीत. अखेर त्यांनी वाङ्मय पारंगतची (एम. ए.) पदवी इंग्रजांनी तयार केलेल्या विद्यापीठातूनच घेतली आहे ना? मला स्वतःला कोणतीही पदवी मिळालेली नाही आणि उच्च माध्यमिक शाळेत मला जे काही ज्ञान मिळाले त्याला महत्त्व देणे मी कधीचेच सोडले आहे. याशिवाय निसर्गोपचाराचे तर मी बरेच रसपान केले आहे. यामुळे मी त्यांना म्हणालो : "तुम्ही म्हणता की आपल्या मुलांना पहिला पाठ प्रकृती कशी चांगली ठेवावी आणि आजूबाजूचा परिसर कसा स्वच्छ ठेवावा हा असायला पाहिजे." माझे म्हणणे आहे की आपल्याला इतक्याच वैद्यकीय ज्ञानाची गरज आहे. यातच आपली सर्व डॉक्टरी येऊन जाते. नयी तालीम कोट्यवधी ग्रामीण लोकांकरिता आहे. ती त्यांच्या कल्याणाकरिता आहे. ते निसर्गाच्या सानिध्यात राहतात परंतु तरीही त्यांना नैसर्गिक जीवनाचे नियम माहीत नाहीत. ज्यांना ते नियम माहीत आहेत ते त्यांचे अनुसरण करत नाहीत. त्यांची जीवनपद्धती पाहूनच आपण नयी तालीमला जन्म दिला आहे. नयी तालीम जे ज्ञान देते ते पुस्तकांमधून क्वचितच मिळू शकते. हे ज्ञान निसर्गात आहे आणि तिथूनच ते घ्यावे लागते. निसर्गाच्या याच पुस्तकातून आपल्याला कोणते वैद्यकीय ज्ञान हवे आहे हे ठरवावे लागते. याचा अर्थ आपल्याला जर स्वच्छतेचे नियम माहीत असतील व आपण त्यांचे अनुसरण केले तर आपण स्वतःचे डॉक्टर होऊ शकतो. जो माणूस जगण्याकरिता खातो, जो

मूलभूत पंचमहाभूतांच्या म्हणजे पृथ्वी, जल, आकाश, सूर्य आणि वायू यांच्या सहवासात राहतो, ज्या ईश्वराने हे सर्व निर्मिले त्या ईश्वराचा जो सेवक असतो तो कधीही आजारी पडू शकत नाही. आणि जर तो आजारी पडलाच तर तो ईश्वराला शरण जाईल व आपले जीवन संपवील. तो औषध म्हणून त्याच जडीबुटींचा उपयोग करील ज्या त्याच्या गावाच्या आजूबाजूच्या परिसरात निर्माण होतात. कोट्यवधी लोक अशाच प्रकारे जगतात आणि मरतात. त्यांनी डॉक्टरचे नावसुद्धा ऐकलेले नसते, मग त्याला पाहण्याची गोष्ट तर दूरच. आपण अगदी असेच व्हायला पाहिजे. गावांमधील जी मुले आणि जे प्रौढ स्त्री-पुरुष आपल्याकडे येतात त्यांनीसुद्धा असेच राहायला पाहिजे. डॉक्टर म्हणतात की ९९ टक्के रोग अस्वच्छतेमुळे होतात, ज्या गोष्टी खाण्यायोग्य नसतात त्या खाल्ल्यामुळे व पौष्टिक पदार्थाच्या अभावामुळे होतात. आपण ९९ टक्के लोकांना जर जगण्याची कला शिकवू शकलो तर राहिलेल्या १ टक्क्यांना आपण विसरू शकतो. त्यांना सुशीला नाय्यर सारखे कोणते ना कोणते डॉक्टर आढळतीलच. त्यांच्याबद्दल आपण फार काळजी करण्याची आवश्यकता नाही. आज शुद्ध पाणी, शुद्ध माती आणि शुद्ध हवा उपलब्ध नाही. आपण सुर्यापासून दूर छताखाली राहतो. आपण जर या गोष्टींकडे लक्ष दिले व योग्य आहार घेतला तर आपण युगांचे काम करून टाकू. हे ज्ञान मिळवण्याकरिता ना तर पदवी पाहिजे आणि ना कोट्यवधी रुपये हवे. याकरिता काही हवेच असेल तर ते म्हणजे ईश्वरावरील श्रद्धा, सेवाभावना, पंचमहाभूतांचा काहीसा परिचय आणि योग्य आहाराचे ज्ञान. हे सर्व आपण आपल्या प्रयत्नांनी मिळवू शकतो आणि तेही कोणत्याही शाळेत वा महविद्यालयात न जाता फार कमी वेळात.

दिल्लीला जाणाऱ्या आगगाडीतून, ऑगस्ट २६, १९४६

हिंदीवरून. 'हरिजन सेवक', सप्टेंबर १, १९४६

--------------

# ५ सप्टेंबर १९४६. १७६. मणिलाल बी. देसाई यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर ५, १९४६

चि. मणिलाल,

मला तुझे पत्र मिळाले. ते अगदी स्पष्ट आहे. तुझ्या १२ वर्षांच्या प्रतिज्ञेला पूर्ण यश मिळो. मला तू याची पूर्वकल्पना द्यायला विसरला वा माझी पूर्व परवानगी घेतली नाही याचा विचार करू नको. तेथील काम पुढे जाईल परंतु हळूहळू. उरुळी कांचनमध्ये हरिजनांच्या तीन वस्त्या आहेत. यापैकी कोणत्या वस्तीत तू प्रार्थना घेत असतो? आपण जिथे गेलेलो आवडत नाही तिथे जाऊन प्रार्थना घेणे बरोबर नाही असे मला वाटते. आपण आपला धर्म इतरांवर लादू शकत नाही. यामुळे वस्तीतील हरिजनांशी सल्लामसलत करून तू तिथे गेला असशील तर आता तिथून बाहेर पडण्याची आवश्यकता नाही. ते काहीही असले तरी हरिजनांच्या प्रत्येक वस्तीत आळीपाळीने जाण्यात काही चूक आहे असे मला वाटत नाही. तुम्ही सर्वांनी परस्परात सल्लामसलत करून जे काही योग्य असेल ते करावे.

आशीर्वाद,

बापू

श्री मणिभाई

उरुळी कांचन

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# ५ सप्टेंबर १९४६. १७७. मोहनलाल मो. शाह यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर ५, १९४६

भाई मोहनलाल,

मला तुमचे पत्र मिळाले. प्रेस्टनची जमीन घेता येत असेल तर जरूर घे. सर चुन्नीलालची इच्छा असेल तर ते त्या जागेवर निश्चितच इमारत बांधू शकतात. अंतिम मालकी विश्वस्त संस्थेची असावी. विश्वस्त संस्थेला तिचे ओझे सहन करता येईल अशा प्रकारे तिचा उपयोग केला पाहिजे. तो प्लाट इतका मोठा आहे की सर चुन्नीलाल यांना हवी असेल तर त्यातील लहानशी जागा ते स्वतःकरिता घेऊ शकतात. अशा प्रकारचा तुकडा वेगळा काढता येऊ शकतो काय हे केवळ डॉ. दिनशा मेहताच सांगू शकतात. त्यांना त्या जागेचा कानाकोपरा माहीत आहे. मी तिथे केवळ एकदाच गेलो आहे. कुमारप्पांना मी लिहीत आहे आणि त्यांनी त्या जागेला एकदा भेट द्यावी असे सुचवत आहे. बछराज यांना मी वेगळे लिहीत नाही.

आशीर्वाद,

बापू

श्रीयुत मोहनलाल गधडावाला

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# ५ सप्टेंबर १९४६. १७८. पुरुषोत्तम भट्ट आणि गंगा भट्ट यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर ५, १९४६

चि. पुरुषोत्तम आणि गंगा,

मला तुमचे पत्र मिळाले. तुम्हा दोघांचेही पत्र वाचल्यामुळे मला आनंद झाला. तुम्हाला शक्य असेल तितके सर्वांमध्ये मिसळा. तुमच्या क्षमतेबाहेर काहीही करू नका. रमालासुद्धा तुम्ही लिहिण्याकरिता का सांगत नाही? ती काय करते? जे पदार्थ तुम्हाला पचत नाहीत वा जे तुमच्या प्रकृतीला मानवत नाही ते बळजबरीने खाऊ नका. हा नियम काटेकोरपणे पाळला पाहिजे. तुम्ही जे काही खाता ते औषध म्हणून खातो असे समजायला पाहिजे आणि केवळ रसनेच्या तृप्तीकरिता तुम्ही काहीही खाऊ नये.

आशीर्वाद,

बापू

श्रीमती गंगाबेन भट्ट

उरुळी कांचन

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# ५ सप्टेंबर १९४६. १७९. डॉ. आत्माराम के भागवत यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर ५, १९४६

भाई भागवत,

मला तुमचे पत्र मिळाले. त्यात मी काही तरी सांगावे असे असले तरी ते निर्मळ आहे. परंतु तुम्ही बरोबर आहा. आपण भेटू तेव्हाच आपण काही तरी ठरवू शकू. स्वच्छतेकरिता साबण आवश्यक नाही असे माझे मत आहे. किती तरी वर्षांपासून मी साबण वापरणे सोडले आहे. केवळ संडासला गेल्यानंतर हात धुण्याकरिता मी साबण वापरतो. याचा अर्थ एक साबण मला वर्षभर पुरतो. साबणापेक्षा मला रिठे जास्त फायदेशीर वाटतात. ते काहीही असले तरी डोळ्यात वा दातात वा कानात घाण गोळा होऊ देणे हा मला अपराध वाटतो. आरोग्याचे नियम पाळण्यात आपण फार हयगय करतो असे माझ्या लक्षात आले आहे. बाकी आपण भेटू तेव्हा.

डॉ. भागवत

उरुळी कांचन

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------

# ६ सप्टेंबर १९४६. निसर्गोपचार - एक अमोघ उपचार

प्रश्न - असे म्हणतात की कोणत्याही आजारावर निसर्गोपचार हा अमोघ उपाय आहे. असे असेल तर त्यामुळे दूरची वा जवळची दृष्टी वा डोळ्यांचे इतर विकार दुरुस्त होऊ शकतील काय? माणसाचा चष्मा निघू शकेल काय? निसर्गोपचाराने अंतर्गळ (हर्निया), टॉन्सिल अशा सारखे विकार, ज्यांच्याकरिता डॉक्टरच्या चाकूचीच आवश्यकता असते, दुरुस्त होऊ शकतात काय?

उत्तर - निसर्गोपचाराबद्दल वर उल्लेखिलेला दावा काही लोक करतात हे मला माहीत आहे परंतु त्यात मी नाही. परंतु इतके मात्र त्याबद्दल निश्चित सांगता येऊ शकते. की निसर्गनियमांचे जाणीवपूर्वक वा अज्ञानाने भंग केल्यामुळे रोग उद्भवतात. यावरून असा निष्कर्ष निघतो की आपण वेळीच निसर्गोपचाराकडे वळलो तर आपली प्रकृती पूर्ववत होऊ शकते. ज्या माणसाने निसर्गनियमांच्या मर्यादांचा अमर्याद भंग केला आहे त्याला एक तर निसर्गाने दिलेली शिक्षा भोगावी लागेल वा त्या परिणामांपासून वाचण्याकरिता परिस्थितीप्रमाणे त्याला शरीरचिकित्सकाकडे वा शल्यचिकित्सकाकडे जावे लागेल. कोणतीही योग्य शिक्षा शांतपणे सहन केली तर तर त्यामुळे मनोबल वाढते, आणि ती टाळल्यामुळे ते कमी होते.

नवी दिल्ली, सप्टेंबर ६, १९४६

'हरिजन', सप्टेंबर १५, १९४६

----------------

# २६ सप्टेंबर १९४६. ३४६. सीताराम पुरुषोत्तम पटवर्धन यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर २६, १९४६

भाई आप्पा,

तुमच्या आजारासंबंधी वाचून लाज वाटली. आपण कार्यकर्तेच आजारी पडत राहू तर आपण करत असलेली सेवाही आजारी असेल. आणि निसर्गोपचारकाला कोणताही आजार कसा होऊ शकतो? आता लवकर बरे व्हा आणि मला सविस्तर लिहा. तुमच्यासारख्या लोकांमुळे डॉ भागवत यांच्या व्यावसायिक सेवानिवृत्तीत अडथळा येईल. नाही काय?

आशीर्वाद,

बापू

आप्पासाहेब पटवर्धन

पोस्ट - लांजे, जि. रत्नागिरी

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------------

# १७ ऑक्टोबर १९४६. ४९६. मणिलाल बी. देसाई यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १७, १९४६

चि. मणिलाल,

मला तुझे लांब, सविस्तर आणि सुंदर पत्र मिळाले. पत्रे लिहिण्याकरिता मला वेळ मिळत नाही. मी इथे अडकलो आहे आणि येथून बाहेर पडू शकत नाही.

गंगाबेन सोडून गेल्या ही दुर्दैवाची गोष्ट आहे. तिच्यात अतिशय सेवाभावना होती. परंतु स्त्रीचा संसार असाच असतो. पुरुष कोणत्याही कारणाकरिता बायकोला सोडून देऊ शकतो परंतु स्त्री निःस्वार्थ सेवेच्या कारणाकरितासुद्धा असे करू शकत नाही. धर्मात हा दोष आहे, परंतु तो इतका खोलवर रुजला आहे की त्यातून आपण सुटका करून घेऊ शकत नाही (पाहा मागील विषय). तुझ्याजवळ कोणती तरी स्त्री कार्यकर्ती असली पाहिजे आणि नसेल तर एखाद्या स्त्रीला तू तिथेच प्रशिक्षत केले पाहिजे. तुम्हा सर्वांच्या अंतःकरणातील पावित्र्यच काम करू शकते. पूर्ण विचार करून कृती कर. घाई करू नकोस. तुला स्त्री कार्यकर्तीशिवाय जरी भागवावे लागले तरी काळजी करू नको. तुम्ही सर्व जर पूर्णपणे पवित्र असाल तर तुम्हाला कोणी ना कोणी सापडल्याशिवाय राहणार नाही. शक्य आहे की गंगाबेनच परत येतील. आपण कांचनबद्दल विचार करत होतो परंतु सध्या तरी तिचा विचार करता येत नाही. अमतुस्सलाम मोठी व्यक्ती आहे. तिला कदाचित बंगालमध्ये जावे लागेल. शिवाय माझ्याशिवाय ती तिथे थांबणार नाही.

इतर कोणाचाही मी विचार करू शकत नाही.

तू जे करतो आहेस ते चांगले आहे.

आता सकाळचे सहा वाजले आहेत आणि माझी आता फिरायला जाण्याची वेळ झाली आहे. यामुळे

इतक्यावरच समाधान मान.

सर्वांना आशीर्वाद,

मणिलाल

उरुळी कांचन (पुणे)

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------

# १७ ऑक्टोबर १९४६. ४९९. दातार यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १७, १९४६

भाई दातार,

तुमचे काम केव्हा सुरू होईल? आपण जेव्हा कोणाचे तरी पैसे घेऊन काम करतो तेव्हा त्या कामाची वेळ पाळली पाहिजे; हीच गोष्ट परोपकाराकरिता केलेल्या कामालाही लागू होते.

आशीर्वाद,

बापू

श्री दातार,

निजधाम, उरुळी कांचन

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

--------------------

# २१ ऑक्टोबर १९४६. ५४५. मणिलाल देसाई यांना पत्र

ऑक्टोबर २१, १९४६

चि. मणिलाल,

तुझ्या पत्रात कामाच्या वाटपासंबंधी तू जे लिहिले होते त्यासंबंधी मी लिहायला विसरलो (निसर्गोपचार केंद्रात, मणिलाल देसाई प्रबंधक होते). मला ते आवडले. प्रत्येकाने त्याप्रमाणे वागायला पाहिजे आणि आपल्या दररोजच्या कामाचा हिशेब ठेवला पाहिजे.

धिरूचे वजन वाढत नाही याचे कारण सध्या त्याचे जितके वजन आहे तितकेच त्याची शरीरप्रकृती सहन करू शकत असेल. इतकेच की त्याचा उत्साह कायम राहिला पाहिजे आणि त्याचे वजन अजून कमी होणार नाही याची त्याने काळजी घेतली पाहिजे.

प्रकरण चांगल्या प्रकारे पार पडले. दातारने (दातार सिंग) काही उत्तर दिले काय?

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७३९. सौजन्य - मंगलदास पक्वासा

--------------

# ५ नोव्हेंबर १९४६. ६४६. मणिलाल बी. देसाई यांना पत्र

कलकत्ता,

नोव्हेंबर ५, १९४६

चि. मणिलाल,

सध्या तरी तुम्ही सर्वांनी मी उरुळीला येण्याबद्दलची आशा सोडून दिली पाहिजे. मी बंगाल आणि बिहार सोडू शकत नाही. या दंगली थांबल्या नाही तर मला उपवास करावा लागेल असे वाटते. तुला वर्तमानपत्रांमधून सर्व काही कळेल. मी स्वतः कदाचित लिहू शकणार नाही परंतु मी इतरांकडून लिहवून घेईन. कोणत्याही प्रकारची काळजी न करता प्रत्येकाने आपापल्या कामात व्यस्त राहिले पाहिजे. माझे काहीही झाले तरी उरुळीमधील काम सोडू नकोस. डॉ. भागवत, धिरू, बालकृष्ण (बालकृष्ण भावे, विनोबा भावे यांचे भाऊ) आणि तू अर्थातच तिथे आहा. परमानंद जर तिथे राहण्याचा निर्णय घेत असेल तर तो आणि त्याची भावी पत्नी भरपूर होतील. हे पत्र तुम्हा सर्वांकरिता आहे. पैशाबद्दल प्रश्न उभा राहू नये.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७३८. सौजन्य - मणिलाल बी. देसाई

----------------

# ५ नोव्हेंबर १९४६. ६४७. दिनशा का. मेहता यांना पत्र

कलकत्ता,

नोव्हेंबर ५, १९४६

चि. दिनशा,

माझ्या नियंत्रित आहाराचा आज सातवा दिवस आहे. मी चांगला आहे. हा आहार सुरू करण्याचे मुख्य कारण कफ आणि पुरळ वगैरे होते. आता तो सुरू राहील आणि कदाचित मी उपवासही करीन. बिहारमध्ये इतक्यातच झालेली कत्तल हे याचे कारण आहे. जे काही घडायचे असेल ते घडेल. माझ्याकडे धावपळ करत येण्याची आवश्यकता नाही. तुझी आई तिथे आहे, तिची सेवा कर. तुझे आरोग्यकेंद्र सुस्थिर पायावर उभे कर. तुला मला काही विचारायचे असेल तर मला लिही.

गुलबाई आणि मुले चांगली असतील अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# १८ नोव्हेंबर १९४६. ४५. दिनशा के. मेहता यांना पत्र

नोव्हेंबर १८, १९४६

चि. दिनशा,

तुझे ११ तारखेचे पत्र आज मिळाले. जे काही करायचे असेल ते शांतपणे आणि विचारपूर्वक कर. निसर्गोपचार केवळ शरीराकरिताच नसून मनाकरितासुद्धा आहे. या वेळी तुझे कर्तव्य तुझ्या आईजवळ थांबणे आहे. ती चांगली झाल्यानंतरच तू इथे येण्याचा विचार करू शकतो. तू तिथे जे काही करतो आहेस ते कर्तव्यच आहे. याशिवाय तिथे आरोग्यकेंद्राचेही काम आहे. त्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. नेहमीप्रमाणे माझे सुरू आहे. माझी काळजी घेण्याकरिता ईश्वर आहे.

गुलबेन, मुले आणि तुला आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता,

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# १३ डिसेंबर १९४६. १८४. मणिलाल बी. देसाई यांना पत्र

श्रीरामपूर,

डिसेंबर १३, १९४६

चि. मणिलाल,

मी इतक्यात तुला लिहिले नाही याचा अर्थ असा नाही की मी तुझा वा इतरांचा वा उरुळी कांचनचा विचार करत नाही. मी लिहू शकत नाही याचे मला खरोखरच वाईट वाटते. तिथे आणि पाचगणीतही मी खूप खर्च केला आणि लोकांनाही करायला लावला आणि आता ईश्वराने मला इथे फेकले आहे व तो माझी परीक्षा घेत आहे. या सर्व गोष्टींमुळे "ईश्वरेच्छेप्रमाणे होईल" हे शब्द माझ्या कानात घुमत असतात.

तिथूनसुद्धा सविस्तर माहिती सांगणारे आठवड्यातून एक पत्र मला लिहिले तर मला ते आवडेल. संस्थेशी माझे नाते तुटलेले नाही. डॉ. भागवत यांच्या प्रयोगाची प्रगती कशी सुरू आहे? आहारावरील काही प्रयोग सुरू आहेत काय?

इथे आम्हाला कुठेही स्वच्छ पाणी मिळत नाही. हे पाणी सहजपणे कसे शुद्ध करता येईल हे तिथे कोणी तरी सांगू शकेल काय? धिरू कसा आहे? परमानंद अजूनही तिथे आहे काय? या लग्नाचे काय झाले? बालकृष्ण कसा आहे? गंगाबेन (गंगा पी. भट्ट) अधूनमधून येते काय? कोणा स्त्री कार्यकर्तीला तिथे प्रशिक्षण दिले काय? गोखलेंचे काय? स्थानिक लोक मदत करतात काय? इमारतीचे काय सुरू आहे? तुझी डॉ. मेहतांची कधी काळी भेट होते काय?

येथील परिस्थिती वर्णन करण्यासारखी नाही. आता मी इथे अडकलो आहे. कोणी तरी मोतिलालच्या प्रकरणात लक्ष घालत असते काय? त्यांच्यामागे कोण आहे?

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७३७. सौजन्य - मणिलाल बी. देसाई

# २६ डिसेंबर १९४६. २५४. मणिलाल बी. देसाई यांना पत्र

श्रीरामपूर,

डिसेंबर २६, १९४६

चि. मणिलाल,

तुझे पत्र आणि पुरवणी मिळाली. तू उल्लेख करत असलेले पत्र मला आठवत नाही, आणि ते शोधण्याचा त्रासही मी घेत नाही. काटेकोरपणे बोलायचे तर गायींबद्दल करण्यात आलेली सूचना विश्वस्त संस्थेच्या कार्यक्षेत्रात पडत नाही. तू गोसेवा संघाशी संपर्क करू शकतो. तू जर ते काम करशील तर तू हाती घेतलेले काम करू शकणार नाही. जास्त मोह केला तर साधूने ज्याप्रमाणे हे आणि दुसरे जग गमावले होते त्याप्रमाणे तूसुद्धा दोन्हींमध्ये अपयशी होण्याचा धोका आहे. अथवा ज्याला या कामाची माहिती त्याच्याशी सल्लामसलत करून तू हे काम हाती घेतले पाहिजे. आरोग्यभवन आपल्या पायावर उभे करण्याची कल्पना वाईट नाही. परंतु त्या कामाकरिता तू दोन माणसे लावली तरी कोणतेही काम होणार नाही आणि शेती करण्याची तुझी योजना तुला सोडून द्यावी लागेल. पैशाची अडचण सोडवता येईल. केवळ त्याच कामाकरिता काही लोक नेमण्याची आवश्यकता नाही. अंतिम निर्णय कळल्याबरोबर मी पैशाची व्यवस्था करू शकेन. तुला अर्थातच विहीर लागेल. एक विहीर खोदून घे. मला वाटते की तुला ४,००० रुपये खर्च करून खोल विहीर खोदून घ्यायची आहे. माझा कल अशा विहिरीच्या बाजूने आहे. अथवा सैन्यात ज्याप्रमाणे पाण्याकरिता व्यवस्था करतात त्याप्रमाणेही आपण करू शकतो व त्यांच्याप्रमाणे पाणी आणू शकतो. त्यांनी वाटरवर्ककरिता जे काम केले आहे त्यातून आपण भरपूर पाणी आणू शकू असे मला वाटते. गोशाळेत म्हशी असू शकत नाहीत. या मुद्द्यावर मी निःशंक आहे. आपण जर केवळ गायी ठेवण्याचा आग्रह धरला नाही तर निश्चितपणे लक्षात ठेव की गाय मरेल. आणि गायींच्या मागे म्हशींचीही तीच गत होईल. पशुउत्पादनातील तज्ज्ञ या

निष्कर्षावर आलेले आहेत. मधमाशांकरिता जागा विकत घेण्याची कल्पना मला फारशी कळू शकली नाही. मी इतकेच म्हणू शकतो की तुला जे सर्वात चांगले वाटेल ते कर.

मला वाटते की आता तुझ्या सर्व प्रश्नांचे उत्तर मी दिले आहे. यामुळे इतके आता सगळे अंतर कापून येण्याची तुला आवश्यकता नाही. सकाळी तीन वाजता उठल्यानंतर मी या पत्राचा मजकूर सांगत आहे. आता डॉ. भागवत, धिरूभाई आणि इतरांना पत्र लिहिण्याची माझ्यात हिंमत नाही कारण आताच चार वाजू लागले आहेत. आणि आता मी प्रार्थनेच्या तयारीला लागलो पाहिजे.

मी धुळ्याबद्दल समजू शकतो. मगनभाई जर तिथे सतत मुक्काम करू शकत नसतील आणि विश्वस्त संस्थेच्या कामात कमीत कमी काही महिने तरी सक्रिय रस घेऊ शकत नसतील तर त्यांना विश्वस्त बनवण्यात काहीही अर्थ नाही. मला वाटते की यासंबंधी मी तुला मागील पत्रातही लिहिले होते. यामुळे आता मी अधिक लिहिणार नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७३६. सौजन्य - मणिलाल बी. देसाई

--------------

# २६ जानेवारी १९४७. ४५४. मणिलाल बी. देसाई यांना पत्र

जानेवारी २६, १९४७

चि. मणिलाल,

मला तुझी पत्रे काहीशी उशिरा मिळत आहेत. परंतु या यात्रेच्या दरम्यान दररोज एका गावाहून दुसऱ्या गावी फिरत असताना बाहेरच्या कामाकडे लक्ष देणे कठीण आहे.

डॉ. भागवतांना तो आहार का सोडावा लागला? त्यांनीसुद्धा पराभव स्वीकारला काय? यातून मला असे सुचवायचे नाही की त्यांनी जर पराभव स्वीकारला नसेल तर त्यांनी परत आहारासंबंधीचा संपूर्ण प्रयोग परत करावा. माणसाने तोच आहार घ्यावा ज्यामुळे त्याची प्रकृती चांगली राहील. भाई दातार जर इमारत बांधण्याचे काम थांबवतील तर दुसऱ्या कोणाला ते काम करण्याची इच्छा होईल काय? तेथील लोकांशी चर्चा कर व मला कळव. दातार त्यांच्या बंगल्याचा उपयोग करायला परवानगी देतील काय? निधी जरी कमी पडला तरी तू जहांगीरजींना त्रास देऊ नको. गरज पडली तर आश्रमातून तू अजून ५,००० मागव. अखेरीस त्या ठिकाणी येणारा खर्च त्या गावालाच द्यावा लागेल. ते जर तसे करू शकत नसतील तर आपण तिथे कायमचे राहायचे की नाही हे ठरवावे लागेल. बाहेरून पैसा आणून प्रत्येक गावात निसर्गोपचाराचा प्रसार करता येत नाही. डॉ. दिनशा गावाचे काम सांभाळू शकत नाही ही गोष्ट माझ्या लक्षात आली नाही असे मुळीच नाही. यामुळे तू घाबरू नको. ही विश्वस्त संस्था पुण्याच्या विश्वस्त संस्थेची उपसंस्था झाली वा स्वतंत्र संस्था झाली तरी हानी नाही. ती जर उपविश्वस्त संथा झाली तरी तिच्यात गावातील काही ग्रामस्थांना सामावून घेतले पाहिजे. ग्रामस्थांची अखेरीस काय इच्छा आहे याची आपण खात्री करून घेतली पाहिजे. गंगाबेन अधूनमधून त्या ठिकाणाला भेट देतात याचा मला आनंद होतो. आप्पासाहेबांनी पाठवलेली स्त्री तिथे कायम मुक्कामी राहण्याकरिता तयार आहे काय? तिचे इतर स्त्रियांशी मैत्रीसंबंध निर्माण झाले काय? गोखले अजून शांत झाले याचा मला आनंद होतो. पुरुषोत्तम पूर्णपणे दुरुस्त झाला असे म्हणता

येऊ शकते काय? परमानंदचा गजकर्ण पूर्णपणे दुरुस्त झाला असेल अशी आशा आहे. मी येथून जिवंत परतेन की नाही हे निश्चित नसल्यामुळे त्याला सांग की तू ताबडतोब विवाह करून घे. यामुळे विवाह उरकून घेणे हाच उत्तम मार्ग आहे. जोपर्यंत मला माहीत आहे विवाह हे काही उपभोगाचे साधन नाही. अशा प्रकारच्या विवाहाची ही वेळ नाही. माझा विश्वास आहे की आत्मनियंत्रणाकरिता विवाह असतात. माझे गृहीतक जर बरोबर असेल तर मी कुठे आहे याला महत्त्व नाही. विहिरीची समस्या कठीण वाटते. खोल विहीर जर यशस्वी होणार असेल तर तशी विहीर खोद, ते फार मोठे काम म्हणवले जाईल. परंतु अशा प्रयत्नांना नेहमीच यश येते असे नाही. तू यावर अधिक विचार करणार आहे असे तू लिहिले. ही चांगली गोष्ट आहे. सरकारी लोक जर याबाबतीत तुला काही मदत करू शकत असतील तर मोरारजीभाईंना विचार.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७३४. सौजन्य - मणिलाल बी. देसाई

-----------------

# २६ जानेवारी १९४७. ४५८. आत्माराम के. भागवत यांना पत्र

जानेवारी २६, १९४६

भाई भागवत,

तुमच्याकडून एकही पत्र नाही. मणिभाई (मणिलाल बी. देसाई) लिहितात की काम चांगले सुरू आहे. तुम्ही संपूर्णान्नाचा प्रयोग थांबवला हे कसे? यात तुम्हाला काही अपूर्णान्नाचा अनुभव आला काय? आणि त्यात काय उणीव आहे? आप्पा साहेब पूर्णपणे दुरुस्त झाले काय?

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७३२. सौजन्य : मणिलाल बी. देसाई

---------------------

# ३१ जानेवारी १९४७. ४८३. मणिलाल बी. देसाई यांना पत्र

जानेवारी ३१, १९४७

चि. मणिलाल,

मला तुझे पत्र मिळाले. तुला माझे लांब पत्र मिळाले असेल (पाहा "मणिलाल बी. देसाई यांना पत्र", जानेवारी २६, १९४७). मला वाटते की मगनभाईंचा विश्वस्तांमध्ये समावेश केला पाहिजे. हे दिनशाजी आणि जहांगीरजींना दाखव. शक्य झाले तर मी त्यांना वेगळे लिहीन. नाही तर या पत्राचा उपयोग कर. मी मगनभाईंना लिहीत आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७३३. सौजन्य - मणिलाल बी. देसाई

----------------

# १८ फेब्रुवारी १९४७. ८. मणिभाई देसाई यांना पत्र

फेब्रुवारी १८, १९४७

चि. मणिलाल,

तुझे नोव्हेंबर १४, १९४६चे पत्र तीन की चार दिवसांपूर्वीच मिळाले. इथे इतका गोंधळ आहे. तू मला माझ्या काळज्यांमधून मुक्त केले आहे आणि त्यामुळे मला पूर्णपणे मोकळेपणा वाटत आहे. मला वाटते की तुझ्या सर्व प्रश्नांचे उत्तर मी तुला पाठवलेल्या मागील पत्रात दिले आहेत. जहांगीरजी आणि डॉ. दिनशा विश्वस्त संसंथेचे सदस्य असलेच पाहिजे कारण त्यांच्या मनात संस्थेबद्दल अतिशय निष्ठा आहे आणि मूळ विश्वस्त संथेचे ते सदस्यही होते. ते माझ्या दृष्टीकोनाशी पूर्णपणे सहमत नाहीत असा आक्षेप घेता येऊ शकतो. परंतु मला वाटते की त्याबद्दल काही करता येऊ शकत नाही. मला खात्री आहे की ते तिथे माझ्या इच्छेविरुद्ध काही करणार नाहीत वा आदेश देणार नाहीत. इतर ज्या व्यक्तींची विश्वस्त म्हणून निवड करायची आहे ते तिथेच राहणारे असले पाहिजे. मी गुलबाईचे नाव पसंत करतो. मगनभाईंबद्दलसुद्धा मी तुला लिहिलेले आहे.

तुला जर वाटत असेल की ४ वा ५ हजाराच्या दरम्यान विहीर खोदता येत असेल तर तो खर्च करण्यासारखा आहे. परंतु असे आश्वासन कोणाची देण्याची तयारी आहे काय हे आधी मला कळू दे. कोणी भागीदार शेतकरी ठेवण्याची माझी तयारी आहे परंतु बैल वा इतर आवश्यक साहित्य विकत घेण्याकरिता पैसे उधार देण्याची माझी तयारी नाही. आपण मालक नाही तर विश्वस्त आहो. विश्वस्त काही निश्चित उद्दिष्टांकरिताच नेमला जात असतो. आपला उद्देश निसर्गोपचार आहे. त्या उद्देशाच्या परिपूर्तीकरिता आपण असे खर्च करू शकत नाही. आपल्या स्वतःच्या श्रमाने आपल्याला जे काही करता येईल ते आपण करू शकतो. दोन्ही परिस्थितीत पाण्याची गरज पडणारच आहे. यामुळे ही योजना यशस्वी होईल असे कोणी आश्वासन देत असेल तर आपण खर्च करू. पिकाबद्दल बोलायचे तर आपल्या श्रमाने आपण जे पिकवू शकतो तेच

पेरावे. आपण अन्नधान्य पिकवू शकत नाही. आपल्याला दूध लागेल म्हणून गाईची व्यवस्था आवश्यक आहे. त्याकरिता आवश्यक असलेला खर्च आपल्याला करावा लागेल. इमारत जर आणि जेव्हा तयार होईल तेव्हा आपल्याला काही सतरंज्या वगैरे विकत घ्याव्या लागतील. दातार स्वतः बांधकामाकडे पाहणार असतील तर ही समस्या सुटली म्हणून समज. आप्पासाहेबांनी पाठवलेल्या स्त्रीबद्दल काही गैरसमज झाले आहेत असे दिसते. परंतु ती एरव्ही चांगली असेल आणि मेहनत करण्याची तिची तयारी असेल तर ती खादी वापरत नाही याकडे मी दुर्लक्ष करीन. हळूहळू खादी वापरण्याकरिता तू तिची समजूत घालू शकशील. तुझी इच्छा असेल तर मी आप्पासाहेबांना लिहिण्याकरिता तयार आहे. परंतु या बाबतीत काळजीपूर्वक विचार कर आणि मला सांग. तुझ्याकडून काही कळेपर्यंत मी वाट पाहीन. . . . .

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७३१ : मणिलाल बी. देसाई

------------

# १३ एप्रिल १९४७. २९०. उरुळी कांचन येथील ग्रामसुधार न्याससंबंधी टिपण

(बहुधा हे मणिभाई देसाईंकरिता असावे. ते गांधीजींबरोबर प्रवासात होते.

पाहा “चिमणलाल एन. शाह यांना पत्र”, एप्रिल १३, १९४७)

पटण्याला आगगाडीने जात असताना,

एप्रिल १३, १९४७

उरुळी येथील स्थानिक न्यास मूळ न्यासापासून (अखिल भारतीय निसर्गोपचार केंद्र) वेगळा ठेवता येऊ शकतो. हा न्यास स्वतंत्र झाल्यानंतरच तुम्ही ग्रामोद्धाराचे काम या न्यासातर्फे सुरू करू शकाल. यात तुम्ही शेती, गोपालन, कापड विणणे, तेल काढण्याची हातघाणी इत्यादींचा समावेश करू शकाल. या न्यासाला ग्रामसुधार न्यास म्हणता येईल. निसर्गोपचार हे त्याच्या कामापैकी एक काम राहील. न्यासपत्रात सर्व कामांचा उल्लेख असावा. मंगलदास पक्वासांना तुम्ही न्यासाचा मसुदा तयार करण्याकरिता सांगू शकता. तो लवकर तयार करून घ्या. बालकृष्णसुद्धा (बालकृष्ण भावे) तो तयार करू शकतो. हा न्यास मूळ न्यासाची शाखा असावी की स्वतंत्र न्यास असावा हे स्थानिक कार्यकर्त्यांनी ठरवावे. तुम्हांला जर स्वतंत्र न्यास म्हणून हवा असेल तर तुम्ही तुमच्या पायावर उभे राहायला पाहिजे आणि सर्व जबाबदारी घेतली पाहिजे. तुम्ही जर उप-न्यास तयार केला तर तुम्हाला मूळ न्यासाच्या घटनेअंतर्गत काम करावे लागेल. मग तुम्ही ग्रामपुनर्रचनेचे काम हाती घेऊ शकणार नाही.

विश्वस्तांमध्ये माझ्याशिवाय डॉ. दिनशा आणि जहांगीरजी (त्यांची जर विश्वस्त होण्याची तयारी असेल), मगनभाई, गुलबाई (दिनशा के. मेहता यांची पत्नी) बालकृष्ण आणि काम करण्याकरिता योग्य असेल तर एक स्थानिक कार्यकर्ता असेल. बालकृष्णने एक विश्वस्त होण्याकरिता मान्य केले पाहिजे. मगनभाई मूळ विश्वस्तांमधील नाहीत. त्यांचा केवळ उरुळीच्या न्यासात समावेश करण्यात आला आहे.

शेती, गोपालन, तेलाची हातघाणी आणि असेच इतर काम न्यासातर्फे करायचे असतील तर ते आत्मनिर्भर असले पाहिजे. ते या पद्धतीने चालवण्याची तुमची तयारी असली पाहिजे. तुम्ही जर बैलांशिवाय काम भागवू शकाल तर मला आनंद होईल. गोसेवेच्या कामाकरिता तुम्ही त्या गावात राहणाऱ्या लोकांच्या सेवेचा उपयोग केला पाहिजे. आपली कामाची पद्धत भांडवलदारांसारखी नसावी. ज्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये शेती, गोपालन, हातघाणी इत्यादी कामांबद्दल रस असेल त्यांना तुम्ही कामावर ठेवू शकाल. या कार्यकर्त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांनीसुद्धा आपली सेवा दिली पाहिजे.

या सर्व कामांकरिता तुम्हांला सेवाग्रामहून पैसा मिळू शकेल. मी चिमणलालला चिठ्ठी लिहीन (चिमणलाल न शाह,; पाहा "चिमणलाल न शाह यांना पत्र", एप्रिल १३, १९४७). तुम्ही मूळ न्यासाचा पैसा उपयोगात आणू नये आणि एकूण खर्च १ लाखावर येऊ नये. गावातील लोक जर रुग्णालयात प्रवेश घेत नसतील तर तुम्ही बाहेरील रुग्णांना प्रवेश देऊ शकता. स्थानिक रुग्णांना प्राधान्यक्रमाने प्रवेश दिला पाहिजे आणि त्यांचा खर्चसुद्धा संस्थेने केला पाहिजे. बाहेरच्या रुग्णांकरिता तुम्ही शुल्क ठरवू शकता. प्रत्येकाकरिता उपचाराचा दर्जा साधा असेल. न्यासाच्या उद्दिष्टात याचा उल्लेख असला पाहिजे. बाहेरच्या स्त्री-पुरुषांची जर न्यासाच्या कामात सहभागी होण्याची इच्छा असेल तर ते तसे करू शकतील परंतु त्यांनी तसे सेवाभावनेने केले पाहिजे. त्यांना कोणतेही पारिश्रमिक देता येणार नाही. दहाबारा वर्षांच्या मुलाला पगार देऊन त्यांना वर्धा शिक्षण योजनेनुसार शिक्षण देऊ शकता. सेवाभावना असलेले काही कार्यकर्ते मिळाले पाहिजे. गावातील काही नोकरांना आणि मुलांना प्रशिक्षण द्या आणि तितक्याच रुग्णांना प्रवेश द्या जितक्यांची तुम्ही सहजपणे काळजी घेऊ शकाल. काम करणारांना आश्रमाच्या नियमांप्रमाणे वागावे लागेल. काम करणारांकरिता तुम्ही थोडे कमी कडक नियम करू शकता. अशा गोष्टींकरिता पोटनियम असतील. लग्नानंतर परमानंद जर वेगळा राहणार असेल तर त्याचा खर्च भागू शकेल इतकी पगार आपण त्याला देऊ. गोखलेंना गरज असेल तर आपण त्यांनाही काही तरी देऊ. बालकृष्णशी सल्लामसलत करून ही रक्कम ठरवा. रुग्णालयाची उपकरणे अगदी

साधी असली पाहिजे. तुम्ही जर ती गावातच करून घेऊ शकत असाल तर ती अत्युत्तम प्रतीची असली पाहिजे. टबकरिता तुम्ही गंगाळीसारखे भाजलेल्या मातीचे मोठे भांडे वापरू शकता. वा तुम्ही ते टिनाचे करून घेऊ शकता. खाट तयार करण्याकरिता तुम्ही चार पायांच्या ठिकाणी विटा ठेवू शकता व त्यावर तक्ते ठेवू शकता. हे केवळ सूचना म्हणून आहे. उपचारात मांसाहाराला कोणतेही स्थान नाही असे माझे मत आहे. मी या गोष्टीकडे धार्मिक दृष्टीने पाहत नाही. चहाच्या ठिकाणी हिंदुस्थानी पद्धतीचा काढा तुम्ही देऊ शकता. कोणत्याही परिस्थितीत गव्हाच्या कॉफीने काम भागू शकेल. आपण बिड्या पुरवू शकत नाही. या गोष्टीचे व्यसन असलेले लोक भरती होत नसतील तर फिकीर करू नका. याचे कारण लोकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करा. क्षयरोग, महारोग आणि इतर संसर्गजन्य रोग असलेल्या रुग्णांना वेगळे ठेवण्याची व्यवस्था असेल तर त्यांनाही भरती करून घेता येईल. अहिंसक मध गावातच काढला जावा. स्थानिक मध काढणारीला आधुनिक पद्धतीने मध कसा काढावा हे शिकवा. तुम्हीसुद्धा मधमाशा पाळण्याचे काम सुरू करू शकता. गायीचे दूध आणि तूप पुरवण्याची व्यवस्था करा. तुम्ही बकरीचे वा म्हशीचे दूधही पुरवू शकता.

होशियारीबेनचे शिक्षण पूर्ण होताच तिला तुम्ही परत पाठवू शकता. चांगली प्रकृती ठेवण्याकरिता आवश्यक असेल तर अधिक खर्च करू शकता. प्रत्येक आश्रमवासीयाने कमीतकमी सात वर्ष काम केले पाहिजे. प्रत्येकाला आपला स्वतःचा स्वयंपाक करण्याचे स्वातंत्र्य दिलेले मला आवडेल. बालकृष्णशी चर्चा केल्यानंतर आश्रमाचे नियम ठरवा. या विषयावर मला वेळ मिळेल तेव्हा मी लिहीन. इतर केंद्रांना भेट देण्याचा विचार भागवत (ए. के. भागवत) सध्या सोडतील तर चांगले होईल.

सध्या सुरू असलेल्या बांधकामावर जो अतिरिक्त खर्च येईल तोसुद्धा सेवाग्रामहून घेण्यात यावा. डॉ. मेहता कबूल करत असतील तर तो पैसा त्यांच्या ताब्यात ठेवण्यात यावा. असे असले तरी उरुळीतील एखाद्या नावाजलेल्या बँकेत तो पैसा ठेवणे चांगले. माझी उपस्थिती

आवश्यक असेल अशी विश्वस्तांची सभा सध्याच बोलावण्याची आवश्यकता नाही. इतके पुरे आहे.

मो. क. गांधी

महात्मा खंड ७च्या पृष्ठ ४४८ आणि ४४९मधील चित्रावरून. शिवाय सी. डब्ल्यू. २७२९. सौजन्य - मणिभाई बी. देसाई

---------------

# १३ एप्रिल १९४७. २९५. चिमणलाल न. शाह यांना पत्र

आगगाडीतून.

एप्रिल १३, १९४७

चि. चिमणलाल,

मणिभाई आगगाडीत आहेत. मी सविस्तर चर्चा केवळ आगगाडीतच करू शकतो. आपल्या उरुळी येथील संस्थेकरिता तू मणिभाईंना एक लाख रुपयापर्यंतची रक्कम मला न विचारता ते मागतील तेव्हा पाठवू शकतो. या पैशाचा उपयोग इमारतींच्या बांधकामाकरिता व चालू खर्चाकरिता होईल. त्यांना जर अधिक लागेल तर ते उरुळी गावातून ती रक्कम मिळवण्याचा प्रयत्न करतील. उरुळीच्या बाहेरून आर्थिक मदत घ्यायची नाही असे मणिभाईंनी ठरवले आहे. मी जगलो आणि आपण उरुळीला राहायला गेलो तर मी स्वतः कामाकडे लक्ष देऊ लागलो तर काय करायचे हा वेगळा प्रश्न आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७३०. सौजन्य - मणिभाई बी. देसाई

----------------

# १३ एप्रिल १९४७. २९६. बालकृष्ण भावे यांना पत्र

आगगाडीतून,

एप्रिल १३, १९४७

चि. बालकृष्ण,

माझी मणिभाईंशी दीर्घ चर्चा झाली (पाहा "उरुळी कांचन येथील ग्रामसुधार न्याससंबंधी टिपण", एप्रिल १३, १९४७). मी मनूबद्दल समजू शकतो. त्या कृतीचे इतरांवर काय परिणाम होऊ शकतील याला मूलतः महत्त्व नाही. त्याला केवळ तुलनात्मक महत्त्व आहे. आणि आपण केवळ त्या गोष्टीकडेच लक्ष दिले तर आपण कोणतीही प्रगती करू शकणार नाही. सुधारकामध्ये अर्थातच दांभिकपणा, असत्य वा अहंकार असू नये हेही त्याचबरोबर आवश्यक आहे. यापेक्षा याबद्दल आताच काही सांगण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

उरुळीची संपूर्ण जबाबदारी तुझ्यावर आणि मणिभाईंवर असेल. डॉ. भागवत, धिरूभाई (धिरूभाई दिक्षित), आणि गोखले अर्थातच तिथे आहेत. परंतु त्यांना सुरुवातीपासून सुरू करावे लागेल. ते जरी यात सहभागी झाले तरी तुमच्या शेवटच्या श्वासापर्यंत तुम्हीच या संस्थेची सेवा करण्याकरिता राहाल. सर्व कार्यकर्त्यांचा स्वभाव सारखा नसेल, त्यांच्यात संस्था चालवण्याचा गुण नसेल तर संस्था अपयशी होणे अपरिहार्य आहे.

तुझ्याबद्दलसुद्धा माझी एक अट आहे आणि ती म्हणजे तुझी प्रकृती. मणिभाई त्याबद्दल तुला सांगतील. माझ्या सध्याच्या स्वतःच्या मर्यादांबद्दलही ते तुला सांगतील. लगतच्या भविष्यकाळात मी त्यातून मुक्त होऊ शकेन अशी शक्यता मला वाटत नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. ८२१.सौजन्य - बालकृष्ण भावे

-----------------

# १३ एप्रिल १९४७. २९९. एक पत्र

(पत्रातील वगळलेला भाग मूळ स्रोताप्रमाणे आहे.)

आगगाडीतून,

एप्रिल १३, १९४७

चि. ...,

. . . माझ्याबरोबर आहे. मला बरेच लिहायचे आहे. मी असे केव्हा करू शकेन ते पाहू या. आता तर मी कामात बुडालेलो आहे. ... आला आणि मला भेटला. त्यांच्याशी माझी स्पष्ट चर्चा झाली. माझी खात्री पटू शकली नाही. कुठे तरी असत्य आहे. परंतु तुझे समाधान झाले असेल तर तू माझ्या मताकडे दुर्लक्ष करू शकतो. मी अजूनच निसर्गोपचाराबद्दल विचार करतो आहे. माझे विचार अधिकाधिक दृढ होत चालले आहेत. उरुळी न्यास स्वतंत्र आणि वेगळा असला पाहिजे. त्यात निसर्गोपचारासह ग्रामोद्धाराच्या संपूर्ण कामाचा समावेश असावा. मला न्यासाशी संबंध असलेला आवडेल. नर्गिसबेनला (दादाभाई नौरोजी यांची नात.) त्रास देण्याची आवश्यकता पडू नये. त्यांची इच्छा असेल तर त्या सहभागी होऊ शकतात. उरुळीचा विकास वेगळ्या प्रकारे झाला पाहिजे. त्याच्या खर्चावरील सीमा ठरवलेली आहे. बाहेरून १ लाखापर्यंतची मदत घेण्याचे ठरवण्यात आले आहे, आणि तीही माझ्या माध्यमातून. याहून अधिक पैसा लागणार असेल तर तो उरुळीच्या लोकांनी पुरवला पाहिजे. वा आपण आपले काम कमी केले पाहिजे. विदेशी उपकरणांना अर्थातच परवानगी नसेल.

गुजराती वरून. बिहारनी कौमी आगमां, पृष्ठ १९६-७

----------------

# १६ मे १९४७. ७६. दिनशा के. मेहता यांना पत्र

(या आणि यानंतरच्या पत्रातील गाळलेला मजकूर मुळाप्रमाणे आहे.)

मे १६, १९४७

. . . जहांगीर (जहांगिर पटेल हे गांधीजी आणि दिनशॉ मेहता यांच्याबरोबर उरुळी कांचन निसर्गोपचार केंद्राचे विश्वस्त होते.) काही दिवसांकरिता जपानला जाणार आहे असे सांगणारी तार मला काल आली होती. ते तुमच्या बाजूने आहेत हे माहीत असल्यामुळे मला काळजी नव्हती. तुमच्याबद्दल विचार करण्याचे कधीच थांबले नव्हते. मी तुमच्याकडे आकर्षित झालो होतो व तुमचे अनुसरण करत निसर्गोपचार केंद्रात गुंतलो होतो. परंतु त्यात शिरल्यानंतर मला तीव्रतेने जाणीव होऊ लागली आहे की आपल्या दृष्टिकोनात महदंतर आहे. आता मी माझा दृष्टिकोन बदलू शकेन असे मला वाटत नाही. आणि बहुधा तुम्हीही तुमचा दृष्टिकोन बदलवू शकणार नाही. यामुळे आपण दोघांनीही आपापल्या दृष्टिकोनाबद्दल निर्णय घेतला पाहिजे. तुम्ही घाईत माझ्याकडे येण्याचे कारण नाही. मी परिवर्तानाच्या प्रक्रियेत आहे, मी परिपूर्ण होण्याचा प्रयत्न करतो आहे. मला सतत हालत राहावे लागत असते. मी माझी अहिंसा परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करतो आहे. त्यातून लक्ष काढून इतर गोष्टीत मी लक्ष घालू शकत नाही. माझ्याकरिता निसर्गोपचारसुद्धा अहिंसेत मोडतो. तुमच्याबद्दल बोलायचे तर सध्या तरी तुमचा धर्म, तुमची साधना दोन गोष्टीत येते. तुम्ही माजीची सेवा केली पाहिजे, तिच्या बाजूने राहिले पाहिजे व तुमच्या गरजांचा विचार केला पाहिजे. माझ्याबरोबर राहून हे करता येऊ शकत नाही कारण माजी माझ्याबरोबर नाहीत आणि मी त्यांच्याबरोबर. पैशाबद्दलसुद्धा तुम्ही स्वतःच विचार केला पाहिजे.

आता दुसरी गोष्ट माझ्याकरिता लाजेचा विषय आहे. चि. मनू नेहमीच माझ्या सूचनांचे पालन करते आणि यामुळे मी तिला माझ्याबरोबर कुठवर नेऊ शकतो याचा मी विचार करत होतो. दिल्लीत असतानासुद्धा तिला आंत्रपुच्छाचा विकार झाला असावा असा संशय मला आला होता. परंतु माझे ज्ञान वरवरचे असल्यामुळे मी माझ्यावर कसा काय विश्वास ठेवू शकत होतो?

असे असूनही मी तिच्यावर माती आणि पाणी यांचा उपचार करण्याचा प्रयत्न केला. मी तिचा आहारसुद्धा ठरवला. मी तिला बस्ती (इनिमा) घेण्याकरिता सांगितले. बद्धकोष्ठतेनंतर तिला परसाकड होऊ लागली. त्यानंतर तिचा आंत्रपुच्छ लक्षात आला. दोन निसर्गोपचारक माझ्या मार्गाने आले. परंतु त्या गरीब बिचाऱ्यांना फार कमी ज्ञान होते. अजून तरी मला परिपूर्ण निसर्गोपचारक भेटलेला नाही. तुम्हाला त्या श्रेणीत ठेवण्याची माझी इच्छा होती. परंतु तसे करत असताना माझ्या लक्षात आले की मी अपूर्ण जरी असलो तरी स्वभावतःच निसर्गोपचारक आहे. नंतर मी इथे आलो आणि मला इथे दहा दिवस राहावे लागणार असल्यामुळे मला काही फावला वेळ मिळाला. एकाऐवजी चार डॉक्टर आले. त्यांनी शस्त्रक्रियेची शिफारस केली. पराभव स्वीकारून मी शस्त्रक्रियेची परवानगी दिली. आज दुसरा दिवस आहे. मी हे सकाळी लिहवून घेत आहे. मनू चांगली आहे अशी रुग्णालयाकडून मला माहिती कळली आहे. मला शस्त्रक्रियेची कल्पना अगदीच आवडली नाही. मला जर तज्ज्ञाप्रमाणे ज्ञान असते तर मी शस्त्रक्रियेची कधीही परवानगी दिली नसती. अशाच परिस्थितीत तुम्ही काय केले असते? मी हा प्रश्न विचारत आहे कारण भविष्यात मला काही मदत झाली पाहिजे. तुम्हाला वेळ असेल तेव्हा तुमच्या सोयीप्रमाणे तुम्ही उत्तर देऊ शकता. काही घाई नाही. माझ्या सध्याच्या माहितीप्रमाणे २५ तारखेला मी दिल्लीत असेन. उद्या मी कुठे असेन हे केवळ ईश्वरालाच माहीत. तम्हाला मनःशांती लाभली असेल अशी मला आशा आहे. माजी बरोबरच असल्या पाहिजे... आणि दोन्ही मुले मजेत असतील.

गुजरातीवरून, बिहारनी कौमी आगमाँ, पृष्ठ ३७३-४

-----------------

# १९ मे १९४७. १०५. दिनशा मेहता यांना पत्र

पटना,

मे १९, १९४७

चि. दिनशा,

काल १३ तारखेला मला तुमचे पत्र मिळाले आणि ते मी आजच वाचू शकलो.

मी आधी तयार केलेली नोंद (पाहा ग्रामसुधार केंद्र विश्वस्त संस्था, उरुळी कांचन संबंधीची नोंद, एप्रिल १३, १९४७) परत वाचली. मला तिच्यातील मजकूर आठवतो. तरीही मला वाटते की ज्या प्रकारे तेथील कामकाज स्वतंत्रपणे सुरू आहे त्याच प्रकारे ते सुरू ठेवणे बरे राहील. (मूळ विश्वस्त संस्थेचे भवितव्य काहीही असले तरी उरुळीचे काम सुरू राहावे असे मला वाटते.) कामाची प्रगती पूर्णपणे मणीभाईंवर अवलंबून आहे या गोष्टीकडेही आपण दुर्लक्ष करू शकत नाही. यामुळे ती स्वतंत्र राहू देणे चांगले होईल. आपण मूळ विश्वस्त नवीन विश्वस्त संस्थेवर राहूच आणि आपला दृष्टिकोन कायम राखला जाईल हे पाहू.

जहांगीरने मला सांगितले होते की त्यांच्यात आणि तुमच्यात काही मतभेद होते. हे घडणे अपरिहार्य होते.

पुरंदरकरितासुद्धा तुम्ही स्वतंत्र विश्वस्त संस्था तयार केली तर मला काही वाटणार नाही. कालौघात ती विद्यापीठात परिवर्तित होऊ शकेल. मी अशी कोणतीही आशा बाळगत नाही. आपल्याजवळ माणसे कुठे आहेत? निसर्गोपचाराकरिता कोणतीही शाळा वा महाविद्यालय नाही. त्याशिवाय आपल्याजवळ विद्यापीठ कसे असू शकेल? तुम्ही पुरंदर येथील कामाला वाहून घेऊ शकत असाल तर त्यामुळे विश्वस्त संस्थेची काही हानी होईल असे मला वाटत नाही. तुम्ही एका ठिकाणचे काम हाती घेतले, मग ते कोणते का ठिकाण असेना, आणि त्यात यशस्वी झाला तर तुम्ही विश्वस्त संस्थेची सेवा केली असे मी समजेन.

त्या प्रकल्पाविषयीची कागदपत्रे वा सविस्तर माहिती तुम्ही मला पाठवू शकता. मला वाटते की निसर्गोपचाराची लोकप्रियता वाढवण्यात तुम्ही जर यश मिळवले तर त्याचा संस्थेला लाभ झाल्याशिवाय राहणार नाही.

तुम्ही जर गुजरातीत जलद लिहू शकत नसाल तर तुमची प्रगती कशी होईल? त्या परिस्थितीत तुम्ही खेड्यात काम कसे करू शकाल? तुमच्यावरील दयेमुळे मला इंग्रजीत लिहावेसे वाटते, परंतु ती खरी मैत्री नसेल.

माजीबद्दल मी समजू शकतो. मी २५ तारखेला दिल्लीला पोहोचत आहे.

आशीर्वाद

बापू

गुजराती प्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७२८. सौजन्य मणीभाई देसाई.

-----------------

# २० मे १९४७. ११३. एक पत्र

पटना,

मे २०, १९४७

चि....,

तुझे पत्र. कोसंबींबद्दल बोलायचे तर मी ...ला लिहिलेले पत्र पाहा. रुग्णालयाबद्दल तुला काय म्हणायचे आहे ते मी समजू शकतो. तरीही याबद्दल तू ...शी चर्चा करणे तुझे कर्तव्य आहे. कोसंबी तिथे असेपर्यंत तू आश्रम सोडायला नको. तू म्हणतोस की निसर्गोपचाराला स्वतःच्या मर्यादा आहेत. म्हणजे मोडलेला पाय कापून त्या ठिकाणी कृत्रिम पाय बसवणे निसर्गोपचाराच्या क्षमतेपलीकडे आहे. हीच गोष्ट आंत्रपुच्छाला लागू होते काय? पाय मोडलेला माणूस कृत्रिम पायाशिवाय भागवू शकत असेल आणि वेदना सहन करू शकत असेल तर वेगळी गोष्ट आहे. आंत्रपुच्छामुळे वेदनाग्रस्त झालेल्या माणसाने मृत्यूचा सामना करावा लागेपर्यंत गेले पाहिजे काय?

निसर्गोपचारकांमध्ये गोंधळ असेल तर हिंदुस्थानात असे कोणतेही दोन निसर्गोपचारक नाहीत की ज्यांचे एखाद्या गोष्टीबद्दल एकमत होईल असा त्याचा अर्थ होईल. प्रत्येकजण आपल्या अहंकाराला चिकटून असतो. आपल्या ज्ञानात वृद्धी करण्याचा ते विचारसुद्धा करत नाहीत. अशी परिस्थिती म्हणजे गोंधळ. तू गोधळचा अर्थ बेशिस्त असा लावू शकतोस. आता मी स्पष्ट केले काय?

आशीर्वाद

बापू

हिंदीवरून, बिहारनी कौमी आगमाँ, पृष्ठ ३८७-८

--------------

# २८ मे १९४७. १५३. विदेशातील निसर्गोपचारकाला पत्र

(सुशिला नाय्यर यांच्या मेडिसिन्स फॉर मासेसमधून उद्धृत)

(मे २८, १९४७)

(बिहार पछी दिल्लीमधून)

तुम्हाला कळून आनंद होईल की कुन्हे यांचे 'न्यू सायंन्स ऑफ हिलींग' आणि जस्टचे 'रिटर्न टू नेचर' ही निसर्गोपचारावरील पुस्तके वाचल्यानंतर जवळपास ४० वर्षांपूर्वी मी पूर्णपणे निसर्गोपचाराकडे वळलो होतो. मी कबूल केले पाहिजे की 'रिटर्न टू नेचर'चा अर्थ मला पूर्णपणे कळला नाही. असे माझ्या अनिच्छेमुळे झाले नसून अज्ञानामुळे झाले. आता हिंदुस्थानातील करोडो गरीब लोकांना परवडेल आणि मानवेल अशी निसर्गोपचारपद्धती विकसित करण्याचा मी प्रयत्न करतो आहे. माती, पाणी, प्रकाश, हवा आणि आकाश म्हणजे महान पोकळी यांच्याद्वारे रोगदुरुस्ती करण्याची पद्धती सध्या विकसित करण्याचा मी प्रयत्न करतो आहे. यामुळे माणूस स्वाभाविकपणेच सर्व प्रकारच्या विकारांच्या दुरुस्तीकरिता ईश्वराच्या नामस्मरणाच्या सार्वत्रिक उपचाराकडे वळेल. यालाच हिंदुस्थानातील करोडो लोक 'राम'म्हणून ओळखतात तर दुसरे काही करोडो लोक 'अल्ला' म्हणून ओळखतात. अशा प्रकारे अंतःकरणपूर्वक केलेल्या नामस्मरणामुळे माणसाला निसर्गनियमांची माहिती करून घ्यावी लागते आणि माणसाकरिता असलेल्या त्या नियमांचे अनुसरण करावे लागते. या प्रकारे पुढे विचार करत गेलो तर 'रोगप्रतिबंध हा रोगावरील उपचारापेक्षा चांगला असतो' या निष्कर्षावर आपण पोहोचतो. यामुळे अपरिहार्यपणे माणसाला आरोग्याच्या नियमांकडे म्हणजे मन, शरीर आणि परिसर यांच्या स्वच्छतेकडे वळावे लागते.

हरिजन, जून, १५, १९४७

---------------

# २८ मे १९४७. १५४. निसर्गोपचारकाला पत्र

मे २८, १९४७

मला तुमचा उत्साह आवडला. परंतु हिंदुस्थानी निसर्गोपचार व्यवस्था केवळ उत्साहावर टिकू शकत नाही वा माझे तिच्याशी नाव जुळल्यामुळेही तिला जिवंत ठेवण्याकरिता मदत होऊ शकत नाही. याचे कारण या विज्ञानात मला काही कळत नाही. तुम्ही तुमच्या उत्साहाचे जर काही ज्ञानात परिवर्तिन कराल तर त्यामुळे कदाचित काही मदत होऊ शकेल.

तुम्ही तुमच्या पद्धतीमधील उणिवा जर कबूल करत असाल तर तुम्ही निसर्गोपचाराच्या अभ्यासात शरीररचनाशास्त्र आणि शरीरविज्ञानशास्त्र यांची भर का घालत नाही? ॲलोपॅथीच्या म्हणजे आधुनिक वैद्यकशास्त्राच्या लोकांनी वर्षानुवर्षांच्या कष्टपूर्वक संशोधनातून मिळवलेले ज्ञान जर तुमच्याजवळ असेल तर मी केलेली चूक (मनू गांधीच्या विकाराचे निदान करण्यासंबंधीची चूक) तुम्ही करणार नाही. ॲलोपॅथीला शासनाकडून मिळणाऱ्या राजाश्रयामुळे तिचे एवढे गुणगान होत आहे असे म्हणून तुम्ही स्वतःची फसवणूक करून घेऊ नका. माझ्या मते जगात आज तिला जे स्थान मिळाले आहे ते, ते जरी खोटे विज्ञान असले तरी, तिच्या उपासकांच्या तिच्यावरील श्रद्धेमुळे व तिला विकसित करण्याकरिता त्यांनी केलेल्या फार मोठ्या बलिदानामुळे. परंतु आधुनिक निसर्गोपचारकांनी कोणताही त्याग केलेला नाही. त्यांचे फार थोडक्यात समाधान होते. यामुळे गरिबांना लुबाडण्याचा व श्रीमंत होण्याचा आपल्याला अधिकार आहे असे त्यांना वाटत असेल तर नवल नाही.

मी हे सर्व ॲलोपॅथीची स्तुती करण्याकरिता लिहीत नाही आहे. ॲलोपॅथशी माझे मूलभूत मतभेद आहेत. आपल्या अर्धवट ज्ञानावर ते सहजपणे संतुष्ट होतात आणि आपल्या पदवीचा उपयोग खिसे भरण्याकरिता करतात. विशेषज्ञ होण्याकरिता पश्चिमेकडे धाव घेण्याचे आज एक प्रकारे वेड लागले आहे. त्यांना असे वाटते की पश्चिमेत ज्ञानाचा सर्व खजिना भरलेला आहे. वैद्यकशास्त्रातील सर्व डॉक्टरांना आणि होऊ घातलेल्या डॉक्टरांना माझी कळकळीची विनंती

आहे की त्यांनी भारतातील ७ लाख खेड्यांच्या दृष्टीने विचार करावा. तसे केले तर त्यांना आढळून येईल की पश्चिमेच्या शैलीत नाही तर ग्रामीण औषधीविज्ञानाच्या दृष्टीने प्रशिक्षण घेतलेल्या वैद्यकशास्त्रातील विद्यार्थ्यांची हिंदुस्थानला नितांत गरज आहे. असे केले तर हिंदुस्थानात खास देशी पद्धतीने सुरू असलेल्या आणि यश मिळालेल्या ग्रामीण औषधोपचाराचाही त्यात ते समावेश करून घेतील व आपल्या देशात भरपूर नैसर्गिक औषधी कंदमुळे, झाडपाला असतानाही केवळ आयात केलेल्या विदेशी औषधांचे वितरण करण्याचे काम ते करणार नाहीत. मला वाटते त्याप्रमाणे वैद्यकीय व्यावसायिकांचे खरे काम देशी वा विदेशी औषधोपचार करणे नसून लोकांना आरोग्याचे नियम शिकवून रोगप्रतिबंध करणे आहे.

गुजरातीवरून. बिहार पछी दिल्ली, पृष्ठ २४-५

--------------

# २८ मे १९४७. १५५. दिनशा के. मेहता यांना पत्र

मे २८, १९४७

चि....(मुळात तरी हे पत्र कोणाला पाठवले याचा उल्लेख नसला तरी मजकुरावरून हे दिनशा मेहतांना आहे असे वाटते.),

तुम्ही जे ...ला (नाव मूळ स्रोतात वगळलेले आहे.) लिहिले ते बरोबर आहे. हे निसर्गोपचारक डॉक्टरचे अपयश आहे, निसर्गोपचाराचे नाही. चक्रैय्या (मूळ स्रोतात जरी नाव वगळलेले असले तरी पुढील विषयाप्रमाणे. चक्रैय्या आंध्र प्रदेशातील होता आणि सेवाग्राम आश्रमात तो १९३५ साली राहण्याकरिता आला होता. मेंदूच्या गाठीवरील शस्त्रक्रिया होत असताना बॉम्बे हॉस्पिटलमध्ये तो मे २३, १९४७ला वारला. पाहा प्रार्थना प्रवचन मे ३१, १९४७) डॉक्टरांच्या हातात आहे. त्याच्या जगण्याची शक्यता फार कमी आहे. मी त्याच्या संपर्कात आहे.

मला तुमचे पत्र मिळाले. माझा तुमच्याबद्दल मुळीच गैरसमज झालेला नाही, मग मी तुमच्यावर नाराज होण्याचा प्रश्नच नाही. तुम्ही तुमचे विचार स्पष्टपणे मांडले याचा मला आनंद होतो. माझे मन कसे काम करत होते, आणि माझ्या दृष्टीत निसर्गोपचार दिवसेंदिवस कशी सोपी गोष्ट होत आहे इतकेच मी तुम्हाला स्पष्ट करून सांगितले होते.

माझ्याकरिता तुम्ही इथे यावे अशी माझी इच्छा नाही कारण शक्यतोवर शुद्ध रामनामाच्या आधारावर मी माझी प्रकृती उत्तम ठेवू शकेन असे मला वाटते. हे कठीण काम आहे. परंतु मला प्रयत्न करणे आवडते. याशिवाय मला वाटते की तुमचे स्थान तिथे आहे. असे असूनही तुम्ही तुमची इच्छा आवरू शकत नसाल तर तुमच्या येण्याला निश्चितच मनाई नाही. मी इथे किती दिवस आहे हे मला माहीत नाही.

आणि आता ...च्या (मूळ स्रोतात नाव वगळलेले आहे.) घरासंबंधी. आपण ते विश्वस्त संस्थेच्या नावावर विकत घेऊ शकत नाही याबद्दल मला मुळीच शंका नाही. आपण इमारत खरेदी करण्यापूर्वी आपल्याजवळ (काम करण्याकरिता) माणसे असली पाहिजे. परंतु तुम्हाला मिशनरी कामासाठी कोणी ती देत असेल तर मी आक्षेप कसा घेऊ शकतो?

उरुळी कांचनबद्दल बोलायचे तर तिची वेगळी संस्था केली तर मूळ संस्थेला हानी पोहोचत नाही असा जर तुमचा विश्वास असेल तर माझा तुमच्या प्रस्तावाला आक्षेप नाही. असे असले तरी शुद्ध कायद्याच्या दृष्टिकोनातून तिचा उपयोग इतर उद्दिष्टे साध्य करण्याकरिता होणार नाही.

भाई पक्वासांचा (मंगलदास पक्वासा, सॉलिसिटर, अध्यक्ष मुंबई विधिमंडळ १९३३-४७, उरुळी कांचन येथील निसर्गोपचार विश्वस्त संस्थेचे नोंदणी पत्र तयार करण्याकरिता मदत,१९४५ पाहा बालकृष्ण मावळणकर यांना पत्र. मे १४, १९४५) सल्ला घ्या. मला खात्री आहे की तिला वेगळी संस्था बनवल्यानंतरही मूळ विश्वस्त संस्थेला धक्का लागत नाही. आईची प्रकृती चांगली आहे हे ऐकून मला आनंद झाला.

गुजरातीवरून. बिहार पछी दिल्ली, पृष्ठ २५

-------------

# १ जून १९४७. १६९. मणिभाई बी. देसाई यांना पत्र

नवी दिल्ली,

जून १, १९४७

चि. मणीलाल.

तुम्हाला पैसे पाठवण्याकरिता मी त्यांना आधीच सांगितले आहे. धिरुभाई अनेकदा आपल्या कामात व्यस्त असले आणि परमानंदच्या बायकोची प्रकृती चांगली नसल्यामुळे जरी तो अजून स्थिरावला नाही तरी तुम्ही तुमच्या जागेवर स्थिर राहाल आणि काहीही करून सर्व काही ठीक कराल अशी आशा आहे. या विषयावर विचार करण्याकरिता बालकृष्णलाही सांगा.

(१) विश्वस्त संस्थेला तुम्ही हवे ते नाव देऊ शकता. या बाबतीत दिनशांच्या विचारांचा आदर करा.

(२) मुख्य कामकाज पूर्वीचेच राहील.

(३) भविष्याबद्दलचा विचार करण्याची गरज नाही. अर्थसंकल्प योग्य वाटतो. या विषयात खोलवर जाण्याकरिता माझ्याजवळ वेळ नाही. हेच मी अतिशय अडचणीतून वेळ काढून लिहीत आहे.

आशीर्वाद

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०४३९, सौजन्य मणीभाई बी. देसाई

--------------

# १ जून १९४७. १६९. मणिभाई बी. देसाई यांना पत्र

नवी दिल्ली,

जून १, १९४७

चि. मणिलाल.

तुम्हाला पैसे पाठवण्याकरिता मी त्यांना आधीच सांगितले आहे. धिरुभाई अनेकदा आपल्या कामात व्यस्त असले आणि परमानंदच्या बायकोची प्रकृती चांगली नसल्यामुळे जरी तो अजून स्थिरावला नाही तरी तुम्ही तुमच्या जागेवर स्थिर राहाल आणि काहीही करून सर्व काही ठीक कराल अशी आशा आहे. या विषयावर विचार करण्याकरिता बालकृष्णलाही सांगा.

(१) विश्वस्त संस्थेला तुम्ही हवे ते नाव देऊ शकता. या बाबतीत दिनशांच्या विचारांचा आदर करा.

(२) मुख्य कामकाज पूर्वीचेच राहील.

(३) भविष्याबद्दलचा विचार करण्याची गरज नाही. अर्थसंकल्प योग्य वाटतो. या विषयात खोलवर जाण्याकरिता माझ्याजवळ वेळ नाही. हेच मी अतिशय अडचणीतून वेळ काढून लिहीत आहे.

आशीर्वाद

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०४३९, सौजन्य मणिभाई बी. देसाई

--------------

# १८ जून १९४७. २७१. दिनशा के. मेहता यांना पत्र

नवी दिल्ली,

जून १८, १९४७

चि. दिनशा,

मला तुमचे पत्र मिळाले. उरुळी कांचनचे (निसर्गोपचार केंद्र) वेगळे असू द्या.

माझ्या मनात असलेल्या गोष्टीकरिता पुरंदरच्या निसर्गोपचार केंद्राची आवश्यकता नाही, परंतु तुमच्याजवळ पैसा असेल तर गुलबाईकरिता तो तुम्ही विकत घेऊ शकता.

मी तुम्हाला बोलावण्याच्या परिस्थितीतही नाही आणि त्याकरिता मला वेळही नाही. मला कोणत्याच गोष्टीत रस वाटत नाही. तुम्हाला मार्गदर्शन करण्याची शक्तीसुद्धा माझ्यात नाही. निसर्गोपचारासंबंधीसुद्धा रामनामाशिवाय इतर कशालाही अर्थ नाही असे मला वाटते. गुजराती आणि इंग्रजी या दोन्ही हरिजन साप्ताहिकांकरिता आजकाल मी जे लिहितो ते वाचा.

तुमची जेव्हा इच्छा असेल तेव्हा तुम्ही मला इंग्रजीत लिहू शकता. आपल्या दोघांमध्ये जे प्रेमबंधन निर्माण झाले आहे ते कायम राहणार आहे. परंतु तुम्ही शहरी, पाश्चात्त्य रीतिरिवाजात मुरलेले सद्गृहस्थ आहा तर मी साधाभोळा खेडूत आहे. यामुळे एकच गोष्ट तुम्हाला आणि मला सारखी दिसत नाही. याचप्रमाणे माझे इंग्रज मित्र आणि माझ्यात फार जवळीक असली तरी ते त्यांच्या आणि मी माझ्या मार्गाने जातो. तरीही प्रेम वाढतच असते, कमी तर ते निश्चितच होत नाही. सत्याने आम्हा सर्वांना बांधून ठेवले आहे.

आता मी सर्व मुद्द्यांवर लिहिले आहे. अजून काही आहे काय?

तुम्ही अर्थातच तुमची इच्छा असेल तेव्हा येऊ शकता.

तुम्ही मनूबद्दल जे म्हणता ते मी समजू शकतो. तुम्ही बरेच काही सांगितले आहे.

तुम्ही हे सर्व वाचू शकता काय?

तुम्हा सर्वांना आशीर्वाद

बापू

गुजराती प्रतीवरून, प्यारेलाल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल

----------------

# २८ जून १९४७. ३३४. चिमणलाल शाह यांना पत्र

नवी दिल्ली,

जून २८, १९४७

चि. चिमणलाल,

तू लावलेला अर्थ बरोबर आहे, परंतु तरीही मला ही गोष्ट थोडी अधिक स्पष्ट करू दे. तालिमीसंघाकरिता अर्थसंकल्पात या वर्षाकरिता जी रक्कम ठेवली आहे ती त्यांना दिली पाहिजे हे योग्य आहे. अजून काही देणे आहे काय हेसुद्धा आपण पाहू. मणिभाईंना जर संपूर्ण पैसे एकरकमी हवे असतील तर त्यांच्याकरिता ठेवलेले पैसे त्यांना हवाली करणे योग्य राहील. ते ती मागणी करत आहेत आणि बालकृष्ण यामागील प्रेरणा आहे हे मला माहीत आहे. ज्याअर्थी सेवाग्रामहून या सर्व गोष्टींकडे लक्ष ठेवणे शक्य नाही त्याअर्थी वर्षभराकरिता त्यांच्याकरिता असलेली रक्कम त्यांना देणे बरे राहील. यामुळे ते त्यांचे काम शक्य तितक्या चांगल्या पद्धतीने करू शकतील.आपले जहाज श्रद्धेवर चालते आणि ते तसेच चालले पाहिजे. तू स्वतंत्रपणे निर्णय घेणार नाही हे मी समजू शकतो. मी जिवंत असेपर्यंत आणि माझ्यात क्षमता असेपर्यंत हे ओझे मलाच वाहावे लागेल.

तुझ्या प्रकृतीबद्दल तुला काय म्हणायचे आहे हे मी समजू शकतो. प्रयत्नात कोणतीच उणीव पडू देऊ नकोस. तुझ्या उपचाराबद्दल वा आहाराबद्दल मला काही विचारायचे असेल तर विचार.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# ३० जून १९४७. ३५८. एक पत्र

जून ३०, १९४७

तुझ्या आजाराचे वृत्त वाचून वाईट वाटले. ज्याला सेवा करायची आहे त्याने आजारी पडायला नको. आणि ज्याला आजारी पडायचे नसेल त्याने निसर्गाच्या नियमांचे उल्लंघन करायला नको! तू जर निसर्गाने दिलेल्या देणग्यांचा म्हणजे हवा, सूर्यप्रकाश, माती, पाणी, अन्न आणि विश्रांती यांचा योग्य उपयोग केला व त्याचबरोबर रामनामाचा जप सुरू ठेवला असता तर तुला असा गंभीर आजार झाला नसता. भरपूर पाणी पी, मातीचा लेप लाव, आंघोळ करत जा आणि केवळ फळांच्या रसावर राहा. आपल्याला फळाचा आहार महाग वाटतो, परंतु ही फार मोठी चूक आहे. सत्य हे आहे की आपण आपल्या आळशीपणामुळे भाज्या आणि फळे उगवण्याकरिता आवश्यक त्रास घेत नाही. आपण जर आपली सुस्ती आणि अज्ञान झटकून टाकले तर वरवर महाग दिसणारा आहार अगदी कमी खर्चाचा असल्याचा आढळून येईल व तो घेतल्याने आपण आपले आरोग्य एकदम चांगले राखून ठेवू शकू. सकाळच्या वेळी डोके सोडून बाकीचे संपूर्ण शरीर विवस्त्रावस्थेत ठेवून सूर्यस्नान घेतले पाहिजे. त्याचबरोबर कोमट आणि थंड पाण्यात तू कटिस्नान घेतले पाहिजे. तुला जर परसाकड साफ होत नसेल तर बस्ती घे. आणि पूर्ण विश्रांती घे. मनाचासुद्धा शरीरावर फार मोठा परिणाम होतो. यामुळे स्वतःला फार न थकवता काही चांगली पुस्तके वाच वा भक्तिभावाने कोणाकडून ती वाचून घे. डोळे मिटून ईश्वराचे ध्यान कर. तू इतके केलेस तर तू चांगला होशील याची मला खात्री आहे. कोणाकडून पत्र लिहवून घेऊन वेळोवेळी मला पत्र पाठवत जा. स्वतः लिहिण्याचा त्रास घेऊ नकोस.

गुजरातीवरून. बिहार पछी दिल्ली, पृष्ठ २४३

------------

# २९ जुलै १९४७. २४६. दिनशा का. मेहता यांना पत्र

नवी दिल्ली,

जुलै २९, १९४७

चि. दिनशा,

सुशीलाबेनने मला कळवले आहे की तू तिला निराशा आणि दुःखाने भरलेली पत्रे पाठवत असतोस. तू मला लिहिलेल्या पत्रातूनही तुझ्या दुःखाचे दर्शन होते. मी उद्या काश्मीरकरिता निघत आहे. (गांधीजी काश्मीरला जुलै ३१, १९४७ला गेले होते.) मी दोन दिवसात परतेन. यामुळे मी तुला तिथे बोलावणार नाही परंतु तू मला पटण्यात भेटू शकतो. माझी तिथे पोहोचण्याची तारीख तुला वृत्तपत्रांमधून कळू शकेल. शक्य आहे की मी तिथे ९ तारखेला पोहोचेन. मी तिथे डॉ. महमूदकडे राहीन. त्यानंतर मी नोआखालीला जाईन. तुला यायचे असले तर मी तुला सोबत घेऊन जाईन. तुला काही नवीन अनुभव येईल. आपण आपल्या मनात जे काही आहे ते सर्व बोलू आणि आपल्यात जे मतभेद आहेत ते समजून घेऊ. आपल्यात कितीही मतभेद असले तरी आपल्या संबंधांवर त्यांचा परिणाम होणार नाही. काही पैसा मिळवण्याचा तू जो प्रयत्न करतो आहेस त्यात अडथळा येऊ नये केवळ इतक्याकरिता मी तुला आधी येण्याकरिता म्हणालो नाही. आता मला कळले की तू या गोष्टीला फार कमी महत्त्व देतोस. आशा आहे की आई चागली असेल. गुलबाई (दिनशा मेहता यांची पत्नी) आणि मुलेसुद्धा चांगली असतील.

गुजराती प्रतीवरून, प्यारेलाल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल.

---------------

# ११ ऑगस्ट १९४७. २९७. बालकृष्ण भावे यांना पत्र

सोदेपूर,

ऑगस्ट ११, १९४७

चि. बालकृष्ण,

दिनशांनी आताच मला तुझे पत्र दिले. पशुपालनाच्या कामाकरिता योग्य स्रोतांकडून आर्थिक मदत घेण्यात काहीही हरकत नाही असे मला वाटते. योग्य स्रोत म्हणजे असे लोक की जे दिलेल्या मदतीचा मोबदला मागणार नाहीत. या दृष्टिकोनातून इंदोरहून आपण मदत घेऊ शकत नाही असे मी सुचवले होते. त्याबद्दल काही अडचणी आहेत. तुझ्या चांगुलपणाचा आदर वा गोसेवा केवळ यापैकी एक वा दोन्ही कारणांकरिता दिलेली मदत योग्य आहे.

तुझी प्रकृती फारशी बरी नाही असे दिनशा मला सांगत होते. हे बरोबर आहे काय? तुला खोकला आहे काय? काळजी घे आणि आजारी पडणार नाही हे पाहा.

आशीर्वाद

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून, सी. डब्ल्यू. ८२४, सौजन्य जीवनजी डी. देसाई.

-------------------

# २६ ऑगस्ट १९४७. ३८७. ए. के. भागवत यांना पत्र

कलकत्ता,

ऑगस्ट २६, १९४७

भाई भागवत, (उरळी कांचन येथील निसर्गोपचार केंद्राचे)

मला तुमचे पत्र मिळाले. सकाळच्या प्रार्थनेनंतर मी त्यावरून नजर फिरवली. दुधाशिवाय प्रकृती स्वास्थ्य टिकवता येऊ शकते याचा प्रचार करता येणे कठीण आहे अशी मला भीती वाटते. व्यावहारिक अनुभवावरून ही भीती दूर करता येणे कठीण आहे. जे लोक दुधाशिवाय राहू शकतात त्यांच्यावर आपण निश्चितच प्रयोग करू शकतो.

आपण सर्व उरुळीत एकत्र मिळून कार्य करू या. मला वाटते की बाळकोबा आणि मणिभाई यांच्या अनुभवाचा आपण उपयोग करून घेणे वांछनीय राहील. आश्रमाच्या नियमांतर्गत वैयक्तिक जीवन शक्य तितके उंचावण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

डॉ. मेहता इथे आहेत. त्यांच्याबरोबर काहीही ठरले नाही.

मी तिथे नाही कारण मी असहाय आहे.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून, सी. डब्ल्यू. २७२५. सौजन्य मणिभाई बी. देसाई

-----------------

# २९ ऑगस्ट १९४७. ४०६. बालकृष्ण भावे यांना पत्र

कलकत्ता,

ऑगस्ट २९, १९४७

चि. बाळकोबा,

मला तुझे मत्र मिळाले.

मी आधीच गोशाळेबद्दल लिहिले आहे. (पाहा ई. डब्ल्यू. आर्यनायकम यांना पत्र, ऑगस्ट २०, १९४७) जे लोक कोणत्याही प्रकारचा मोबदल्याची अपेक्षा न ठेवता केवळ परोपकारी मनोवृत्तीने देणगी देतात त्यांच्याकडून देणगी स्वीकारायला काहीही हरकत नाही.

धिरूभाईला बरोबर घेण्याची तुझी इच्छा आहे काय? तू जर त्याला बरोबर घेतसेस तर माझा काही आक्षेप असणार नाही असे मी त्याचे उत्तर दिले आहे (पाहा धिरूंना पत्र, ऑगस्ट २७, १९४७)

तू तुझ्या प्रकृतीची काळजी घेतो आहेस अशी आशा आहे. इमारतीबद्दल तुला काय म्हणायचे आहे ते मी समजू शकतो.

आशीर्वाद

बापू

श्री बाळकोबाजी,

निजधाम,

उरुळी कांचन,

पुणे

गुजराती फोटोप्रतीवरून, सी. डब्ल्यू. ८२५

---------------

# ५ सप्टेंबर १९४६. १७६. मणिलाल बी. देसाई यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर ५, १९४६

चि. मणिलाल,

मला तुझे पत्र मिळाले. ते अगदी स्पष्ट आहे. तुझ्या १२ वर्षांच्या प्रतिज्ञेला पूर्ण यश मिळो. मला तू याची पूर्वकल्पना द्यायला विसरला वा माझी पूर्व परवानगी घेतली नाही याचा विचार करू नको. तेथील काम पुढे जाईल परंतु हळूहळू. उरुळी कांचनमध्ये हरिजनांच्या तीन वस्त्या आहेत. यापैकी कोणत्या वस्तीत तू प्रार्थना घेत असतो? आपण जिथे गेलेलो आवडत नाही तिथे जाऊन प्रार्थना घेणे बरोबर नाही असे मला वाटते. आपण आपला धर्म इतरांवर लादू शकत नाही. यामुळे वस्तीतील हरिजनांशी सल्लामसलत करून तू तिथे गेला असशील तर आता तिथून बाहेर पडण्याची आवश्यकता नाही. ते काहीही असले तरी हरिजनांच्या प्रत्येक वस्तीत आळीपाळीने जाण्यात काही चूक आहे असे मला वाटत नाही. तुम्ही सर्वांनी परस्परात सल्लामसलत करून जे काही योग्य असेल ते करावे.

आशीर्वाद,

बापू

श्री मणिभाई,

उरुळी कांचन.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# ५ सप्टेंबर १९४६. १७६. १७७. मोहनलाल मो. शाह यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर ५, १९४६

भाई मोहनलाल,

मला तुमचे पत्र मिळाले. प्रेस्टनची जमीन घेता येत असेल तर जरूर घे. सर चुन्नीलालची इच्छा असेल तर ते त्या जागेवर निश्चितच इमारत बांधू शकतात. अंतिम मालकी विश्वस्त संस्थेची असावी. विश्वस्त संस्थेला तिचे ओझे सहन करता येईल अशा प्रकारे तिचा उपयोग केला पाहिजे. तो प्लॉट इतका मोठा आहे की सर चुन्नीलाल यांना हवी असेल तर त्यातील लहानशी जागा ते स्वतःकरिता घेऊ शकतात. अशा प्रकारचा तुकडा वेगळा काढता येऊ शकतो काय हे केवळ डॉ. दिनशा मेहताच सांगू शकतात. त्यांना त्या जागेचा कानाकोपरा माहीत आहे. मी तिथे केवळ एकदाच गेलो आहे. कुमारप्पांना मी लिहीत आहे आणि त्यांनी त्या जागेला एकदा भेट द्यावी असे सुचवत आहे. बछराज यांना मी वेगळे लिहीत नाही.

आशीर्वाद,

बापू

श्रीयुत मोहनलाल गधडावाला

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# ५ सप्टेंबर १९४६. १७६. १७९. डॉ. आत्माराम के भागवत यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर ५, १९४६

भाई भागवत,

मला तुमचे पत्र मिळाले. त्यात मी काही तरी सांगावे असे असले तरी ते निर्मळ आहे. परंतु तुम्ही बरोबर आहा. आपण भेटू तेव्हाच आपण काही तरी ठरवू शकू. स्वच्छतेकरिता साबण आवश्यक नाही असे माझे मत आहे. किती तरी वर्षांपासून मी साबण वापरणे सोडले आहे. केवळ संडासला गेल्यानंतर हात धुण्याकरिता मी साबण वापरतो. याचा अर्थ एक साबण मला वर्षभर पुरतो. साबणापेक्षा मला रिठे जास्त फायदेशीर वाटतात. ते काहीही असले तरी डोळ्यात वा दातात वा कानात घाण गोळा होऊ देणे हा मला अपराध वाटतो. आरोग्याचे नियम पाळण्यात आपण फार हयगय करतो असे माझ्या लक्षात आले आहे. बाकी आपण भेटू तेव्हा.

डॉ. भागवत,

उरुळी कांचन.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# ६ सप्टेंबर १९४६. १८१. प्रश्नपेटी

## निसर्गोपचार - एक अमोघ उपचार

**प्रश्न - असे म्हणतात की कोणत्याही आजारावर निसर्गोपचार हा अमोघ उपाय आहे. असे असेल तर त्यामुळे दूरची वा जवळची दृष्टी वा डोळ्यांचे इतर विकार दुरुस्त होऊ शकतील काय? माणसाचा चष्मा निघू शकेल काय? निसर्गोपचाराने अंतर्गळ (हर्निया), टॉन्सिल अशा सारखे विकार, ज्यांच्याकरिता डॉक्टरच्या चाकूचीच आवश्यकता असते, दुरुस्त होऊ शकतात काय?**

उत्तर - निसर्गोपचाराबद्दल वर उल्लेखिलेला दावा काही लोक करतात हे मला माहीत आहे, परंतु त्यात मी नाही. परंतु इतके मात्र त्याबद्दल निश्चित सांगता येऊ शकते. की निसर्गनियमांचे जाणीवपूर्वक वा अज्ञानाने भंग केल्यामुळे रोग उद्भवतात. यावरून असा निष्कर्ष निघतो की आपण वेळीच निसर्गोपचाराकडे वळलो तर आपली प्रकृती पूर्ववत होऊ शकते. ज्या माणसाने निसर्गनियमांच्या मर्यादांचा अमर्याद भंग केला आहे त्याला एक तर निसर्गाने दिलेली शिक्षा भोगावी लागेल वा त्या परिणामांपासून वाचण्याकरिता परिस्थितीप्रमाणे त्याला शरीरचिकित्सकाकडे वा शल्यचिकित्सकाकडे जावे लागेल. कोणतीही योग्य शिक्षा शांतपणे सहन केली तर तर त्यामुळे मनोबल वाढते, आणि ती टाळल्यामुळे ते कमी होते.

नवी दिल्ली, सप्टेंबर ६, १९४६

'हरिजन', सप्टेंबर १५, १९४६

-----------------

# १३ सप्टेंबर १९४६. २५१. जहांगीर पटेल यांना पत्र

नवी दिल्ली,

सप्टेंबर १३, १९४६

भाई जहांगीर, (यातील मायना आणि सही हिंदीत आहे.)

मी हे पत्र तुम्हाला इंग्रजीत पाठवत आहे. रामप्रसादने मला जे सांगितले ते जर खरे असेल तर आता तुमची परिस्थिती दिवाळे निघाल्यासारखी झाली असल्याचे मला जाणवू लागले आहे. आणि अशा परिस्थितीत चांगले काम करणारा व पैसा गोळा करणारा सेवक मिळेल अशी अपेक्षा करणे अगदीच चूक आहे. यासंबंधी बाळासाहेबांशी (बी. जी. खेर) बोललेले मला आवडेल. बापाही यात सामील आहेत असे मी गृहीत धरतो. रामप्रसादने मला सांगितले की तुमची संस्था कर्जाखाली दबलेली आहे. त्या कर्जाची परतफेड करण्याच्या दृष्टीने त्याचा काहीही उपयोग नाही. जोपर्यंत संस्थेच्या प्रबंधनाचा संबंध आहे, आणि तोही आदिवासींमध्ये काम करण्याचा, त्याची उपयोगिता निरपवाद आहे. त्याने सांगितलेल्या इतर अडचणी सहजपणे दूर केल्या जाऊ शकतात. त्याने मला हे सांगितले आहे परंतु त्याचा उपयोग निधी गोळा करण्याकरिता होऊ नये. आणि कृपा करून लक्षात ठेवा की तुम्हाला अथवा संस्थेचा इतर कोणत्याही सदस्याला रामप्रसादच्या सेवेचा उपयोग करण्याचा अधिकार नाही.

रामनामाबद्दल बोलायचे तर आपण त्याबद्दल चर्चा केली पाहिजे. आपण ते यांत्रिकपणे घेऊ शकत नाही. ते काही क्विनाईन वा सूर्यस्नान नाही. त्याचे स्वतःचे महत्त्व आहे व त्याला स्वतःचा आधार आहे. चुकीच्या गोष्टीशी संबंध असल्यामुळे अहुरमझ्दला तुमचा असलेला आक्षेप मी समजू शकतो व त्याचे मला कौतुकही वाटते. यामुळे मानवी यातनांमध्ये आणि माणसाला जेव्हा दुःख असह्य होते तेव्हा आपण ईश्वराचे गुणगान करतो. तुम्ही जरी विश्वस्त असला तरी सध्या तरी तुम्ही तुमच्या इंजेक्शन आणि गोळ्या यांच्यावरच विसंबून राहायला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

श्री जहांगीर पटेल,

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

--------------------

# ४ नोव्हेंबर १९४७. २०२. एका पत्रातील अंश

नोव्हेंबर ४, १९४७

माझी खात्री आहे की माझ्या संकल्पनेप्रमाणे निसर्गोपचाराचा उपयोग केला तर खेड्यापाड्यातील करोडो लोकांना त्याचा फार मोठा लाभ होईल. उदाहरणार्थ एखादा ग्रामीण क्ष-किरण चिकित्सा करण्याकरिता गेला तर त्या गरीब माणसाला शहराकडे वा जिथेकुठे वीज आहे तिथे धाव घ्यावी लागेल. आणि यात त्याचा आणि त्याच्या कुटुंबाचा पैसा खर्च होईल. याऐवजी दररोज सकाळी त्याच्या गावात उगवणाऱ्या सूर्यदेवाच्या असीम कृपेची मदत त्याने का घेऊ नये? याला पाणी, आहार, माती आणि आजूबाजूच्या वातावरणाची व कुटुंबाच्या देवतेच्या जपाची जोड द्या. या सर्व गोष्टींचा असाध्य रोगातसुद्धा चिकाटीने उपचार केला तर एक पैसाही खर्च न करता तो आजार निघून जाईल याबद्दल मला शंका नाही.

गुजरातीवरून. दिल्लीमां गांधीजी - १, पृष्ठ १९३-४

------------

# १२ नोव्हेंबर १९४७. २६८. डी. बी. जगताप यांना पत्र

नोव्हेंबर १२, १९४७

मला तुमचे पत्र मिळाले. डॉ. दिनशाच्या ज्या पत्रासंबंधी तुमची तक्रार आहे ती सर्व माझ्याबद्दल आहे असे समजा. थोडासाही अपमान झाला असेल तर तो मी केला आहे. हेतू तर असा असूच शकत नव्हता. परंतु डॉ. दिनशाच्या पत्रात माझी भाषा होती. आता तर ही गोष्ट विसराल ना? डॉ. दिनशा मेहता आणि जहांगीर पटेल दोनचार दिवसांपासून इथेच आहेत. आम्ही खूप चर्चा केली. यामुळे माझे मत आहे की तुम्हाला विश्वस्त संस्थेचे घटनापत्र (ट्रस्ट डिड) नामंजूर करायचे असेल तर तसे तुम्ही आताच करू शकता. तुम्ही आरोग्यभवनही हटवू शकता. त्यामुळे कोणतीही कायद्याच्या प्रक्रियेची अडचण येणार नाही आणि पंचांचीही भानगड राहणार नाही. तुमची इच्छा असेल तर डॉ. दिनशा मेहतांच्या यादीत काही भर घालू शकता वा त्यांच्याशी चर्चा करू शकता. मी इतकेच म्हणू शकतो ती विश्वस्त संस्था राहावी असे वाटत असेल तर तुम्ही विश्वस्त संस्थेला ती जमीन दिली पाहिजे जी मी वापरत होतो व जिथे रुग्णांवर उपचार होत होते. यात त्या जमिनीमागील भागाचाही समावेश असावा जिथे मजूर काम करत होते. ही जागा काही उत्पादन घेण्याकरिता उपयोगात येणार नाही तर रुग्णांकरिता काही माणसांना ठेवायचे असेल तर ठेवता यावे म्हणून त्या जागेचा विकास करता येऊ शकेल. उर्वरित सर्व जमीन तुम्हाला परत केली जाईल. मग तिथे आरोग्यभवनही राहणार नाही. याचा अर्थ मी ज्या जमिनीची व इमारतीची मागणी केली आहे व ज्याचा तुम्ही वापर करत आहा आणि ज्याचा अनुसूचीत समावेश आहे तो भाग तुम्ही वापराल. मी जेव्हा या कामातून मोकळा होईन तेव्हा मी आणि विश्वस्त संस्थेचे इतर सदस्य विश्वस्त संस्थेला देणगी दिलेल्या जागेत राहू शकू. दिनशा, त्यांची पत्नी, आई आणि त्यांच्या इतर ज्या नातेवाईकांना त्या जागेत सामावून घेता येईल ते तिथे राहू शकतील. मला तुमचा पाहुणा म्हणून राहू देण्याचा दिनशांचा मुळीच हेतू नाही अशी तुमची तक्रार असल्याचे जहांगीर सांगत होता. हे तर चूक आहे. माझ्या सूचनेचा स्वीकार केला तर मी दानाच्या घरात

राहिलो तरी तुमचाच पाहुणा असेन. बकरीच्या दुधाची जी व्यवस्था करायची ती तर तुम्हीच करणार ना? मी जितक्या जागेची अपेक्षा करतो तितक्या जागेत तर बकऱ्या वगैरे राहू शकत नाहीत. आणि इतके अजून सागंतो की एकदा ट्रस्टला दान दिल्यामुळे तुम्ही काहीही गमावणार नाही. डॉ. दिनशांची तुमच्या जमिनीवर १ लाखाहूनही अधिक खर्च केला आहे. ज्या जागेची मी मागणी करत आहे त्यात न्हाणी, बाष्पगृह इत्यादींचीही त्यांनी व्यवस्था केली आहे. मी मागत असलेल्या जमिनीवर भर घालण्यात आलेली जमीन तुम्ही घ्याल तर या सर्व गोष्टींचा तुम्हाला काहीही उपयोग होणार नाही. आता तुम्हाला योग्य वाटेल ते तुम्ही करू शकता. यासंबंधी तुम्हाला अजून चर्चा करायची असेल तर ती तुम्ही डॉ. दिनशा आणि जहांगीर यांच्याशी करू शकता.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# १२ नोव्हेंबर १९४७. २६३. मोरारजी देसाई यांना पत्र

नोव्हेंबर १२, १९४७

भाई मोरारजी, (१८९६-१९९५; मंत्री मुंबई, १९३७-३९ आणि १९४६-५१; मुख्यमंत्री मुंबई, १९५२-५६; मंत्री, केंद्र सरकार, १९५६-८, १९५८-६२; उपप्रधानमंत्री, १९६७-६९; प्रधानमंत्री, १९७७-७९)

तुमच्या या पत्राचा मजकूर मी सकाळी चार वाजता सांगत आहे. सध्या डॉ. दिनशा मेहता आणि जहांगीर पटेल माझ्याबरोबर आहेत. आम्ही या निर्णयावर आलो आहो की डॉ. दिनशा मेहता पुणे येथील विश्वस्त संस्थेबाहेर (अखिल भारतीय निसर्गोपचार विश्वस्त संस्था) जो निसर्गोपचार करतील त्याबद्दल त्यांनी आपल्या उदरनिर्वाहाकरिता रुग्णाकडून आवश्यक तितके शुल्क घ्यावे. एक वेळ अशी होती की आपण दिनशा मेहतांना विश्वस्त संस्थेच्या निधीतून निर्वाह भत्ता देण्याचा विचार करत होतो. परंतु डॉ. दिनशा मेहतांना ही गोष्ट मान्य नव्हती. इतर कोणते तरी आवश्यक काम करून उदरनिर्वाहाकरिता पैसा मिळवला पाहिजे असा विचार त्यांनी केला होता. सध्या ही गोष्टसुद्धा शक्य नाही. यामुळे शहरातील लोकांना त्यांनी आपल्या दृष्टिकोनातून निसर्गोपचार द्यावा आणि त्याचे शुल्क आकारावे असे ठरले. याकरिता त्यांनी एक तर मुंबईच्या आपल्या निसर्गोपचार केंद्रात वाढ करावी वा पुरंदर येथील उपचार केंद्राद्वारे ते असे करू शकतात. यापैकी एकाही संस्थेला माझ्या संकल्पनेतील निसर्गोपचाराला स्थान नाही. तो तर केवळ गावातर्फे आणि गावातच केला जाऊ शकतो. त्याच्या मुळाशी व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात परिवर्तन करण्याची मूलभूत गोष्ट आहे. यामुळे ही विश्वस्त संस्था वेगळीच राहील. तिथे जर शहरी लोकांचा उपचार केला जाईल तर त्याकरिता शासकीय मदत घ्यावी लागेल. याशिवाय आजकाल जागा मिळू शकत नाही. मुंबईत जिथे दिनशा मेहतांचे काम चालते तिथे अजून मजले लागतील वा दुसऱ्या इमारतीची व्यवस्था करावी लागेल. सांगण्याचा मुद्दा हा आहे की पुरंदरमध्ये तुम्ही डॉ. दिनशा मेहतांना पुरेशी जागा शासकीय मदतीशिवाय योग्य भाड्यात वा किंमत देऊन मिळवून देऊ शकत असाल तर मिळवून द्यावी आणि असे करताना

त्यांच्यावर मेहेरबानी केल्यासारखे होऊ नये. यामागे मुख्य मुद्दा तर सार्वजनिक सेवेचाच असू शकतो. श्रीमंतांनासुद्धा शुल्क देऊन निसर्गोपचार मिळू शकतो. सरकारला जर हे योग्य वाटत असेल तर तेसुद्धा योग्य इमारत देऊन याची व्यवस्था करू शकते. मुंबई सरकार जर या दृष्टिकोनातून काही विचार करू शकत असेल तर हे पत्र अस्थानी ठरू नये.

जगतापच्या जागेबद्दल आपण विश्वस्त वेगळा विचार करत आहो. (पाहा डी. बी. जगतापला पत्र, नोव्हेबर १२, १९४७) याबद्दल सरकारला काही सांगायचे असेल तर मी अजून कधी लिहीन.

मुंबईत वा पुरंदरमध्ये वा अजून कुठे किती जागा लागेल हे मी येथून सागू शकत नाही. याकरिता मला अधिक माहिती आणि समस्येची कल्पना असली पाहिजे. ही गोष्ट सध्या माझ्याजवळ नाही. यामुळे केवळ डॉ. दिनशा अथवा जहांगीरच यासंबंधी तुमच्याशी चर्चा करू शकतात.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------------

# १२ नोव्हेंबर १९४७. २७३. मणिभाई बी. देसाई यांना पत्र

नवी दिल्ली,

नोव्हेंबर १२, १९४७

चि. मणिभाई,

तुमचे ५ तारखेचे पत्र मिळाले. डॉ. दिनशा आणि जहांगिर पटेल यांच्याशी माझी दीर्घ चर्चा झाली. काकासाहेबांच्या (दत्तात्रेय. बालकृष्ण. कालेलकर, १८८५-१९८१; शिक्षणशास्त्रज्ञ, लेखक आणि गांधीजींचे जवळचे सहकारी; गुजरात विद्यापीठाचे कुलगुरू, १९२८-३६; अध्यक्ष, हिंदुस्तानी प्रचार सभा) हस्ते उद्घाटन होणार आहे याचा मला आनंद होतो.

उरुळीच्या सर्व मित्रांना सांगा की मी कार्यक्रमाला उपस्थित राहू शकत नाही याचा मला आनंद आणि दुःख दोन्ही होत आहेत. मला आनंद होतो कारण इथे मी जे काम करतो आहे ते माझ्या मताप्रमाणे उरुळीच्याच कामाचा एक भाग आहे. कारण माझ्या संकल्पनेतील निसर्गोपचारात मन आणि शरीर या दोघांवरील उपचाराचा समावेश आहे. या दृष्टाने विचार केला तर कळेल की येथील लोकांची मानसिक विकृती दूर झाली तर त्याचा परिणाम उरुळीवरही होणे अपरिहार्य आहे आणि हे निसर्गोपचाराचे सुंदर उदाहरण गणले जाईल.

गोखले आणि परमानंद सोडून गेले याचे मला दुःख होत नाही. डॉ. भागवत (डॉ. ए. के. भागवत) राहिले तर तितके पुरे आहे. धिरू जर शेवटपर्यंत संस्थेला चिकटून राहिला व त्याने सर्व नियमांचे पालन केले तर मला आनंद होईल. परंतु बाळकोबा (बाळकृष्ण भावे, विनोबा भावे यांचे लहान भाऊ.) आणि तुम्ही (मणिभाई देसाई उरुळी कांचन येथील निसर्गोपचार केंद्राचे प्रबंधक होते.) राहिलात तरी मला आनंद होईल. याचा अर्थ तुम्ही एकट्याने जरी उरुळीकरिता जीवन वाहून टाकायचे ठरवले तरी मला आनंद होईल. हळहळू उरुळीवासीयांमधून तुम्हाला अजून कार्यकर्ते मिळतील. बाहेरून कार्यकर्ते बोलवावे लागावे ही गोष्ट मला अपमानास्पद वाटते. याचा अर्थ निसर्गोपचाराचे अपयश असा होईल.

तुमच्यावर सध्या जे फार मोठे ओझे येऊन पडले आहे ते तसेच राहणार नाही. तुम्ही तितक्याच रुग्णांना प्रवेश द्या जितक्यांकडे तुम्ही सहजपणे लक्ष देऊ शकाल. तेथीलच काही तरुण जर तुम्हाला स्वयंसेवक म्हणून मिळाले तर तुम्ही त्यांना प्रशिक्षित करू शकता. तुम्ही स्वतः तेथूनच कोणत्याही स्त्रीला या कामात ओढू शकणार नसल्यामुळे तुम्हाला बाहेरून एखादी स्त्री कार्यकर्ता बोलवावी लागेल. भविष्यात काय आहे ते पाहू या.

निसर्गोपचार, ग्रामोद्धार आणि आश्रमीय जीवन अशी तीन भागातील विभागातील वाटणी मला योग्य वाटते. परंतु निसर्गोपचाराच्या दृष्टिकोनातून या तिन्ही गोष्टी अविभाज्य आहेत. तुम्ही जेव्हा निसर्गोपचाराला त्याच्या उच्चतम क्षमतेकडे नेता तेव्हा त्यात ग्रामोद्धाराचासुद्धा समावेश होईल. आणि मी ग्रामीण लोकांकरिता अशा निसर्गोपचाराची कल्पना करू शकत नाही ज्यात आश्रमीय जीवनाच्या आदर्शाचे पालन केले जाणार नाही. तुम्ही जर मजुरीवर येणाऱ्या मजुरांच्या भरवशावर शेती कराल तर शक्य आहे की तुम्हाला अखेरीस पश्चात्ताप होईल. परंतु माझा असा दृष्टिकोन असला तरी तुम्ही सर्व लोक काळजीपूर्वक विचार करून जो निर्णय घ्याल तो मी मान्य करीन.

या देणगीत भंसाळींना (जयकृष्ण भंसाळी) काही दोष दिसतो आहे. यामुळे मी ती नाकारणे पसंत करीन. ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर काही घेणे मला योग्य वाटत नाही. मला म्हशींऐवजी गायी ठेवणे का आवडते हे मी आधीच स्पष्ट केले आहे. बाळकृष्ण जर आवश्यक पैसा गोळा करू शकत नसेल तर ती योजना विसरून जा. ही गोष्ट मुळीच काळजी करण्यासारखी नाही. अखेरील काय फलित निघते हे पाहून नंतरच मी काही तरी लिहीन.

कस्तुरबा स्मारक निधीतर्फे प्रेमाबेन (प्रेमा कंटक, कस्तुरबा राष्ट्रीय स्मारक निधीच्या महाराष्ट्रातील प्रतिनिधी.) तिथे काही काम करू शकत असतील तर चांगलेच होईल. परंतु अशा कामाकरिता आपण कोणतीही आर्थिक जबाबदारी घेऊ शकत नाही. कस्तुरबा निधीच्या मर्यादेत राहून जे काही करता येणे शक्य असेल ते करण्याकरिता तुम्ही त्यांना परवानगी देऊ शकता.

बाहेरून कोणी तज्ज्ञ निसर्गोपचारक मिळेल या आशेवर राहू नका. तुम्हाला स्वतःला जे काही ज्ञान मिळवता येईल ते मिळवा. धिरू जर तिथे थांबत असेल तर त्यानेसुद्धा त्यात प्राविण्य संपादन केले पाहिजे. त्याला सध्याच थोडीफार माहिती आहे.

तुम्हाला जर कोणी असा तज्ज्ञ निसर्गोपचारक मिळत असेल की जो आश्रमाचे नियम पाळण्याकरिता तयार नसेल तर आपल्या उद्दिष्टाच्या दृष्टीने योग्य व्यक्ती म्हणून मी त्याचा स्वीकार करणार नाही. नंतर मी बाळकृष्ण आणि डॉ. भागवत यांनाही लिहीन.

मी याचा मजकूर रात्रीच्या वेळी सांगत आहे. मी आता अधिक श्रम घ्यायला नको.

आशीर्वाद

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. २७२३. सौजन्य - मणिभाई बी. देसाई

-------------

# ११ डिसेंबर १९४७. २२. मणिलाल बी. देसाई यांना पत्र

डिसेंबर ११, १९४७

चि. मणिलाल,

मला आजच तुमचे पत्र मिळाले. दिनशाबरोबर पाठवलेले एक पत्रही मिळाले. आता मी पहिल्या पत्राचे उत्तर देत आहे. गंगाबेन (पुरुषोत्तम भट्ट यांची पत्नी) तिथे गेल्या ही खरोखरच स्वागतार्ह बातमी आहे.

त्या जर तिथे नेहमीकरिता राहू शकत असतील तर त्याहून अधिक चांगले काहीही असू शकत नाही. परंतु हे पुरुषोत्तमच्या (पुरुषोत्तम भट्ट) प्रकृतीवर अवलंबून असेल.

प्राथमिक शिक्षकांचे शिबीर तिथे होणार असेल तर मला आनंदच होईल. शिबिरामुळे कोणतीही आर्थिक जबाबदारी येऊ नये ही अट रास्तच आहे.

बाळकोबाचा निधी पूर्ण होईल अशी आशा आहे. धिरू चिकाटीपूर्वक प्रयत्न करत आहे ही आश्चर्याची गोष्ट नाही कारण तो त्याचा स्वभाव आहे.

हरिभाऊ फाटक यांनी पाठवलेले गृहस्थ तिथे राहू शकत असतील व त्यांची तुम्हाला मदत होऊ शकत असेल तर ते चांगले होईल. परंतु त्यांची काम करण्याची शक्यता त्यांना मूर्च्छा येण्यावर अवलंबून आहे.

रामनाम जमीन विकत न घेता अजून कोणती तरी जमीन विकत घेण्याचा निर्णय चांगला आहे. तुम्हाला त्याकरिता पैसा कुठून मिळेल?

उरुळीचे काम कितीही हळू चालले तरी ते योग्य पद्धतीने चालत असेल तर माझे समाधान होईल.

तुमच्या आजीवन सेवेचा प्रतिध्वनी इतर लोकांमध्ये निश्चितच उमटेल. त्यांच्यावर पडणारा प्रभाव अहिंसेचे फळ असेल. अहिंसेशिवाय ग्रामोद्धार मला अशक्यप्राय वाटतो.

आशीर्वाद

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. २७२४. सौजन्य - मणिभाई बी. देसाई

-----------------

# भाग २

# निसर्गोपचाराची काही उदाहरणे

## ‘दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास’मधून

त्या काळात मुलांच्या निरागसतेविषयी माझ्या मनात जितकी श्रद्धा होती तितकीच श्रद्धा निसर्गोपचाराविषयी होती. साधे आणि सरळ जीवन व्यतीत करणाराला कोणताही आजार होऊच शकत नाही आणि झालाच तर त्याचा उपचार मी करू शकेन अशी त्या काळात माझी मान्यता होती. आरोग्याविषयीचे माझे पुस्तक माझ्या प्रयोगाची आणि त्या काळातील माझ्या श्रद्धेची टिपणवहीच आहे. मी कधी आजारी पडूच शकत नाही असा अभिमान मला वाटत होता. केवळ पाणी, माती, उपवासाचे प्रयोग आणि आहारातील परिवर्तन यांनी सर्व प्रकारच्या आजाराचा उपचार करता येऊ शकतो असा माझा विश्वास होता. फार्मवरील एकाही व्यक्तीच्या आजारात मी औषधांचा वा डॉक्टरचा उपयोग केला नव्हता. उत्तर हिंदुस्तानातील सत्तर वर्षांचा एक म्हातारा तिथे होता. त्याला दम्याचा आणि खोकल्याचा विकार होता. हे रोगही आहारातील बदल आणि पाण्याच्या प्रयोगाने बरे झाले होते. परंतु आता असे प्रयोग करण्याची हिंमत मी हरवून बसलो आहे, आणि दोनदा स्वतः आजारी पडल्यामुळे असा प्रयोग करण्याचा अधिकारही मी गमावून बसलो आहे असे मला वाटते.

* * *

आहारातील या प्रयोगांबरोबरच औषधांच्या मदतीशिवाय नैसर्गिक म्हणजे पाण्याच्या आणि मातीच्या उपचाराने रोग दूर करण्याचा प्रयत्नही मी करत आलो आहे. त्या काळात माझ्या अशिलांशी माझे कोटुंबिक संबंध जुळायचे. यामुळे आपल्या सुखदुःखात ते मला सहभागी करून घ्यायचे. माझ्या काही अशिलांना माझ्या आरोग्यविषयक प्रयोगांची माहिती असल्यामुळे ते या बाबतीतही माझी मदत घेत असत. अशी मदत घेणारे लोकही कधीकधी टॉलस्टॉय फार्मवर

येऊन धडकायचे. यातील एक होता लुटावन नावाचा म्हातारा अशील. तो उत्तर हिंदुस्तानातून करारबद्ध मजूर म्हणून दक्षिण आफ्रिकेत आला होता. त्याचे वय ७० पेक्षा जास्त असावे. किती तरी वर्षांपासून त्याला दम्याचा आणि खोकल्याचा त्रास होता. वैद्याच्या पुड्यांचा आणि डॉक्टरच्या बाटल्यांचा त्याने किती तरी अनुभव घेतला होता. त्या वेळी निसर्गोपचारावर माझा असीम विश्वास होता. तू जर माझ्या सर्व अटी कबूल करून फार्मवर राहण्याकरिता तयार असशील तर मी तुझ्यावर माझा प्रयोग करण्याकरिता तयार आहे असे मी त्याला सांगितले. त्याने माझा औषधोपचार मान्य केला असे मी कसा म्हणू? त्या म्हाताऱ्याने माझ्या सर्व अटी कबूल केल्या. लुटावनला तंबाखूचे मोठे व्यसन होते. अनेक अटींमध्ये तंबाखू सोडण्याचीही एक अट होती. लुटावनला मी एक दिवसाचा उपवास करायला लावला. दररोज दुपारी मी त्याला कटिस्नान करायला लावत असे. त्या वेळी उन्हात बसण्यासारखा ऋतू होता. आहारात मी त्याला थोडा भात, थोडे ऑलिव्ह तेल, मध आणि मधाबरोबर कधीकधी खीर आणि गोड नारिंगी अथवा द्राक्षे आणि गव्हाची कॉफी देत असे. मीठ आणि सर्व प्रकारचे मसाले मी बंद केले होते. ज्या घरात मी झोपत होतो त्याच इमारतीतील मागील खोलीत लुटावनचे अंथरुण असायचे. एक अंथरण्याकरिता आणि एक पांघरण्याकरिता असे अंथरूण म्हणून प्रत्येकाला दोन कांबळी दिली जात. शिवाय एक लाकडाची उशी असायची. एका आठवड्याचा काळ लोटला. लुटावनचे शरीर थोडे तेजस्वी दिसू लागले. दमा कमी झाला. खोकलासुद्धा कमी झाला. परंतु दिवसाऐवजी त्याला रात्री दम्याचा आणि खोकल्याचा जास्त त्रास होऊ लागला. तो लपूनछपून तंबाखू ओढत असावा असा संशय मला आला. मी त्याला विचारले. तो म्हणाला, “नाही बुवा, मी तंबाखू ओढत नाही.” अजून एकदोन दिवस गेले. परंतु तरीही जेव्हा फरक पडला नाही तेव्हा गुप्तपणे त्याची परीक्षा घेण्याचा निर्णय मी घेतला. सर्व लोक जमिनीवर झोपायचे. साप वगैरेची भीती तर होतीच. यामुळे कॅलनबॅक यांनी मला एक विजेरी दिली होती. ते स्वतःही विजेरी जवळ ठेवत असत. एका रात्री अंथरुणावर पडल्यापडल्या मी जागे राहण्याचे ठरवले. दाराबाहेर ओसरीत माझे अंथरुण असायचे, आणि दाराच्या आत जवळच लुटावनचे अंथरुण असे. लुटावनला मध्यरात्री खोकला

आला. आगपेटीची काडी उगाळून त्याने बिडी प्यायला सुरुवात केली. यामुळे मी हळूच त्या्च्या अंथरुणाजवळ गेलो आणि विजेरीचे बटन दाबले. लुटावन घाबरला. परिस्थिती त्याच्या लक्षात आली. बिडी विझवून तो झटकन उठून बसला आणि त्याने माझे पाय धरले. "मी फार मोठा गुन्हा केला, आता मी कधीही तंबाखू ओढणार नाही. मला माफ करा" असे म्हणता असताना लुटावनचा गळा दाटून आला. मी त्याचे सांत्वन करत म्हणालो की बिडी न पिण्यात तुझाच फायदा आहे. माझ्या हिशोबाने आतापर्यंत तुझा खोकला थांबायला पाहिजे होता. तो जेव्हा थांबला नाही तेव्हा तू लपूनछपून बिडी पीत असावा अशी शंका मला आली. लुटावनची बिडी सुटली  बिडी सुटल्याबरोबर त्याचा दमा आणि खोकला दोन्ही कमी होऊ लागले. लुटावन खूप तेजस्वी आणि ताकदवान झाला आणि त्याने आमचा निरोप घेतला.

स्टेशन मास्तरच्या मुलाला, जो अंदाजे दोन वर्षांचा होता, विषमज्वर झाला होता. त्यांनाही निसर्गोपचाराची माहिती होती. यामुळे त्यांनी माझा सल्ला मागितला. त्या मुलाला पहिल्या दिवशी तर खाण्याकरिता मी काहीही दिले नाही. दुसऱ्या दिवसापासून अर्धे केळे कुस्करून आणि त्यात ऑलिव्ह तेल एक चमचा आणि नारिगीच्या रसाचे काही थेंब टाकून त्याला देऊ लागलो. त्याचे इतर सर्व खाणे मी बंद केले. रात्री त्याच्या पोटावर मातीचा लेप लावलेल्या पट्ट्या ठेवू लागलो. त्याचाही रोग दूर झाला. शक्य आहे की त्या मुलाच्या रोगासंबंधी करण्यात आलेले निदान चुकीचे असेल आणि त्याला विषमज्वर झालेलाच नसेल.

टॉलस्टॉय फार्मवर असे किती तरी प्रयोग मी केले. परंतु एकाही प्रयोगात अपयश आल्याचे मला आठवत नाही. परंतु आज हाच उपचार करण्याचा मला धीर होणार नाही. विषमज्वराच्या रोग्याला केळे आणि ऑलिव्ह तेल देण्याचा धीर मला होणार नाही. माझा हात थरथरू लागेल. १९१८साली हिंदुस्तानात मला जो भयंकर आमांश झाला होता त्याचा उपचारसुद्धा मी करू शकलो नव्हतो. आणि एके काळी दक्षिण आफ्रिकेत जे उपचार ज्या प्रमाणात यशस्वी झाले होते त्याच उपचारांना आज हिंदुस्तानात तितके यश येत नाही. याचे कारण माझ्यातील आत्मविश्वासाची उणीव आहे की येथील वातावरणाशी या उपचारपद्धतीचा मेळ बसत नाही हे

आहे ही गोष्ट आजपर्यंत मला कळू शकलेली नाही. इतके मात्र मला माहीत आहे की अशा प्रकारच्या घरगुती उपचारामुळे आणि टॉलस्टॉय फार्मवर अवलंबिण्यात आलेल्या साध्या जीवनशैलीमुळे जास्त जरी नाही तरी समाजाचे दोनतीन लाख रुपये तरी वाचले असतील.

-----------

# डॉ. कुळकर्णी यांना 24 जानेवारी 1918ला लिहिलेले पत्र

“भाई श्री कुळकर्णी,

“तुम्ही जेव्हा तुमचे शेवटचे पत्र टपालात टाकले तेव्हाच तुम्ही पाठवलेले साहित्य माझे वाचून झालेले होते. परंतु माझ्या प्रयोगापासून मला खात्रीपूर्वक दूर करायला लावण्याकरिता हे पुरेसे नव्हते. तुम्ही म्हणता ते खरेही असू शकेल वा नसूही शकेल. मीठ जर सर्व रोगांवर उपाय असेल तर त्याचा वापर दुप्पट वा चौपट व्हावा म्हणून मेहनत करण्यात कोणताही कसूर ठेवायला नको. मला तर प्लेगसारख्या रोगावर मिठाचा काय परिणाम होतो याचे आकडे पाहिजे. वनस्पती आहारासंबंधात पुस्तकांमध्ये मी मिठाच्या प्रयोगासंबंधी बरेच काही वाचलेले आहे. यामुळे मी स्वतः मीठ सोडून पाहिले. जवळपास सात वर्षांपूर्वी कस्तुरबां जोरदार रक्तप्रदराने पीडित होत्या. कुन्हेचे कटिस्नानाचे आणि आहाराचे प्रयोग मी तिच्यावर करत होतो. परंतु त्यामुळे मी जवळपास निराश झालो होतो. तेव्हाच डॉ. वॅलेसनी मिठाविरुद्ध आणि डॉ. हेगेलनी डाळीविरुद्ध खूप काही लिहिले आणि मीठ सोडण्याचा प्रयोग करावा असे मला वाटले. डॉ. वॅलेसचा युक्तिवाद असा होता की मीठ उत्तेजक आणि सूज निर्माण करणारे आहे. ते प्राणीज नसल्यामुळे पचल्याशिवायच बाहेर निघून जाते आणि निघत असताना ते सर्वप्रकारचे नुकसान करत असते. अन्न पचवणाऱ्या ग्रंथींना ते अकारण जास्त उत्तेजित करते. माणसाला ते आवश्यकतेपेक्षा अधिक खायला लावते. अशा प्रकारे ते पचनशक्तीच्या इंद्रियांवर अकारण जास्त ओझे टाकते आणि रक्त दुर्बल करते. इतर अनेकांप्रमाणे कस्तुरबाई आणि मी - आम्हा दोघांनाही मीठ आवडत होते आणि आम्ही ते बऱ्याच प्रमाणात घेत होतो. माझ्या मनाशी मी युक्तिवाद केला की शरीराला जे मीठ मिळते आहे तेच कदाचित तिचा आजार लांबवण्याकरिता जबाबदार असेल. डाळीबद्दल मी जो युक्तिवाद केला होता तो स्वतःवर लागू करण्याची त्या वेळी मला आवश्यकता वाटली नाही. त्या वेळी माझी प्रकृती बरीच चांगली होती. प्रकृतीच्या कारणामुळे मला आहारात कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नव्हती. परंतु माझ्या

लक्षात आले की मी जर मीठ आणि डाळी या गोष्टी सोडल्या नाही तर कस्तुबाईंची तसे करण्याकरिता मी समजूत घालू शकणार नाही. यामुळे या दोन्ही गोष्टी मी सोडल्या आणि कस्तुरबाईलाही सोडायला लावल्या. त्यांना मी दुसरा कोणताही बदल करायला लावला नव्हता. एका आठवड्यातच त्यांचा रक्तप्रवाह बंद झाला आणि त्यांचे हाडबंडल झालेले शरीर परत भरू लागले. तेव्हापासून मी अजूनही मीठ खात नाही. परंतु कस्तुरबाईला तर मिठाची इतकी काही सवय लागलेली होती की ते सोडण्याची जेव्हा गरज राहिली नाही तेव्हा त्या त्या मोहाचा सामना करू शकल्या नाही. यामुळे पूर्णपणे चांगल्या झाल्यानंतर त्यांनी परत मीठ घ्यायला सुरुवात केली. आतासुद्धा त्यांना अधूनमधून रक्तप्रवाह सुरू होत असतो आणि मग त्या मीठ आणि डाळी सोडत असतात आणि घर्षण स्नान घेत असतात. असे करून त्या एकदम चांगल्या होतात. या सात वर्षांच्या दरम्यान मी दम्याच्या आणि फुफ्फुसांच्या इतर व्याधींच्या रुग्णांवर मिठाशिवायच्या आहाराचा प्रयोग केला आहे आणि प्रत्येक वेळी त्याचे चांगले परिणाम मिळाले आहेत. ज्या कोणाच्या संपर्कात नंतर मी आलो आहे त्यांना मीठ न घेतल्यामुळे अजून कोणताही नवीन आजार झालेला नाही. मी असेही समजतो की मिठाशिवायच्या आहाराची मला माझ्या ब्रह्मचर्य व्रतातही चांगलीच मदत झाली आहे. हे सर्व अनुभव माझ्यासमोर असल्यामुळे मिठाबद्दल तुमचा आग्रह मला धक्कादायक वाटतो. माझ्या शरीरात एक मोठा फेरबदल होत असल्याचे मला आढळते आहे आणि त्यासंबंधात मी डॉक्टरांशीही चर्चा केली आहे. परंतु तुम्ही त्यासंबंधात कोणताही प्रकाश टाकू शकत नाही. मला जर कोणतीही जखम झाली तर तिला मलम लावल्यानंतर आधीपेक्षा ती फार लवकर दुरुस्त होते. लांब प्रवास केल्यानंतर मला जो थकवा जाणवत असायचा तो आता जाणवत नाही. असे वाटते की माझ्यात परत 'हिरवाई (ग्रीनस्टिक)' आली आहे. माझी कातडी नाजूक आणि लवचित झाली आहे. सुरीने अपेक्षेपेक्षा ती लवकर कापली जाते. मी जरी नेहमी अनवाणी चालत असलो तरी माझ्या तळव्यात इतरांप्रमाणे राठपणा येत नाही, ते जाड होत नाहीत. माझ्या दाढा नरम झाल्या आहेत आणि माझ्या तोंडात जे थोडेसे दात आहेत ते उपयोगापेक्षा शोभेकरिताच जास्त आहेत. हा जो नाजूकपणा माझ्यात

आला आहे तो मिठाशिवायच्या आहारामुळे आहे काय? माझ्या जीवनपद्धतीत मी इतरही अनेक फेरबदल केले आहेत. यामुळे या सर्व परिवर्तनाकरिता केवळ मिठाला जबाबदार धरता येणे कठीण आहे. माझ्या शरीरात हा जो बिघाड झाला आहे - जर त्याला बिघाड म्हणता येत असेल तर - त्याकडे जर माझे लक्ष वेधले गेले तर मला जे इतर अनेक लाभ आढळतात त्याकरिता मी मिठाशिवायच्या आहाराची जोरदार शिफारस करीन. मला जर तुमच्याकडून काही नवीन माहिती कळली तर थोड्या काळाकरिता का होईना मी परत मीठ खाणे पसंत करीन. आणि माझ्या शरीरावर त्याचे काय परिणाम होतात ते मी पाहीन. माझे प्रयोग थाडा वेळ बंद करायचे की नाही याची चर्चा मी डॉ. देवशी करत असतानाच तुमचे पत्र आले. माझे मागीत पत्र मी त्याचेच उत्तर म्हणून लिहिले होते. या पत्रासंबंधात तुमच्याजवळ जर काही निश्चित माहिती असेल आणि तुम्ही वैज्ञानिक दृष्टी ठेवण्यासंबंधात इतके आग्रही असल्यामुळे आणि  उत्साहाच्या आवेगातही सत्याच्या मार्गावरून विचलित होणे तुम्हाला जर मान्य नसेल तर मी प्लेगची चौकशी आणि शोधाच्या दृष्टीने आहारात मिठाचे किती महत्त्व आहे याचा शोध घेण्याकरिता तुमच्या मदतीची अपेक्षा करीन. तुम्ही सांगितलेली पुस्तके मिळवण्याचा मी प्रयत्न करीन.

सेवक,

मो. क. गांधी

-------------------

# १३ एप्रिल १९३७. १. हरिभाऊ उपाध्याय यांना पत्र

१३ एप्रिल १९३७

चि. हरिभाऊ,

तुझे पत्र मिळाले. कटिस्नानामध्ये तू मोठा बदल केला आहे. कुन्हे आणि जस्ट यांच्या पुस्तकांच्या मदतीने रोगी स्वतःला उपयुक्त होतील असे बदल खरोखरच करू शकतो. निसर्गोपचार काही सर्वसामान्य औषधांप्रमाणे नाही. विशिष्ट औषध मला जमत नाही म्हणून रुग्ण सांगू शकतो. इतकेच नाही तर कोणत्या उपचाराने आपल्याला फायदा होईल हे निसर्गोपचारात रुग्णाला कळत असते. आणि विविध प्रकारचे निर्बंध मान्य केल्यानंतर कोणत्या प्रकारचा उपचार घ्यायचा आणि किती प्रमाणत घ्यायचा हेही तो स्वतःच ठरवू शकतो. याचे कारण असे आहे की रुग्णाच्या शरीरात कोणते बदल होत आहेत हे मार्गदर्शकाला कळत नसते. जे काही बदल आवश्यक आहेत असे वाटत असेल ते कर. परंतु आताप्रमाणे मला कळवत राहा.

# २७ मे १९३७. २. चिमणलाल न. शाह यांना पत्र

२७ मे १९३७

उकळलेल्या कांद्याचा रेचकासारखा उपयोग होतो. उकळलेला कांदा खात असताना त्यासोबत थोडासा कच्चा कांदा खाल्ला तरी त्यात काहीही हानी नाही. तांदुळदासारख्या उकळलेल्या भाज्या तू घ्यायलाच पाहिजे. त्यामुळे रक्तस्त्राव थांबणे अपरिहार्य आहे.

खंड ८०

## १३ जानेवारी १९४१. ३ सुशीला नाय्यर यांना पत्र

१३ जानेवारी १९४१

चि. सुशीला,

काल महादेवभाईंबरोबर तुला निरोप पाठवला होता. आजही प्रकृतीत सुधारणा सुरू आहे. सकाळी रक्तदाब १५४।८६ होता. दुपारी १४५।८७ होता. हे खोलात जाऊन तपासले पाहिजे असे मला वाटते. देशी उपचारात आहारात बदल करण्याकरिता स्थान आहे, पश्चिमेत कुठे स्थान आहे? वनस्पती औषध आहे अशी माझी नेहमीच मान्यता राहिली आहे आणि या स्वरूपात तिची आठवण ठेवली की औषधाला फार गौण स्थान उरते. या कामामागे डॉ. दास लागले असल्याचे मला दिसते. शंकरनलाही या कामात रस आहे, यामुळे दोघांचे खूप जुळते. दासची व्यवस्था सध्या रुग्णालयाच्या खोलीत केली आहे. शास्त्रीजींच्या प्रकृतीत सुधारणा आहेच, जानकीबेनही ठीक आहे.

सुशीला नाय्यर,

वुमेन्स हॉस्पिटल,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

--------------------------

# जून २८, १९४२. ७०. ४. वल्लभराम वैद्य यांना पत्र

जून २८, १९४२

भाई वल्लभराम,

मी तुम्हाला आधीच सांगितले आहे की आयूर्वेदाला ना पैशाने वाचवता येऊ शकते ना शासनाच्या मदतीने. देशी जडीबुटीपासून बनवलेल्या पाकाकरिता वा कल्पाकरिता शासनाने दरमहा हजारो हजारो रुपये जरी दिले तरी ते आयूर्वेदाला पुनर्जिवित करू शकेल काय? ऍलोपॅथीच्या प्रसाराकरिता हजारो लोकांनी आपले प्राण समर्पित केले आहेत. तसा विचार केला तर ऍलोपॅथी महाग नाही, परंतु डॉक्टरांनी आणि औषध निर्मात्यांनी आणि विक्रेत्यांनी ती महाग केली आहे. महत्त्वाच्या औषधांची माहिती आणि त्यांची किंमत देणारी त्यांची पुस्तके तुम्ही पाहिली नाही. बेयरचे सारसापरिला तयार करण्याकरिता दीड पैसा लागतो आणि बाजारात त्याची किंमत १० रुपये असते. डॉक्टरांच्या शुल्काचीही तीच गोष्ट आहे. आयूर्वेदाचार्य गणनाथ सेन बाहेरगावी जाण्याचे शुल्क एका दिवसाकरिता १,००० रुपये घ्यायचे. यज्ञ केल्याशिवाय तुम्ही काहीही साध्य करू शकत नाही. यज्ञ म्हणजे अथक ज्ञानपूर्ण श्रम, यज्ञ म्हणजे मेहनत करून घाम वाहवणे आणि हे सर्व ईश्वरार्पण भावनेने करणे. आयूर्वेद अजून विज्ञान झालेले नाही. विज्ञानात प्रगतीकरिता नेहमी वाव असतो. इथे प्रगती कुठे आहे? तुमची इच्छा असेल तेव्हा या.

. . . .

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. २९१९. सौजन्य - वल्लभराम वैद्य

-----------------

खंड ८५

# ५ जानेवारी १९४५. ४२८. दिनशा मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी ५, १९४५

चि. दिनशा,

मी तुझ्या तारा वाचल्या. मला त्या आवडल्या. मी माझ्याच दोषामुळे आजारी पडलो होतो. आता मी मला माहीत असलेला केवळ निसर्गोपचार घेत आहे. मी आयुर्वेदाते विष बाहेर फेकत आहे. माझ्यात दररोज सुधारणा होत आहे. मी जर आता तुला बोलावले तर मी तुझा पूर्ण उपचार घेईन. परंतु दुधाच्या उपचारावर माझा विश्वास बसत नाही आणि वारंवार बस्ती घेण्यावरूनही माझा विश्वास उडाला आहे. आहार आणि मातीच्या लेपाच्या पट्ट्या अधिक फायदेशीर आहेत असा माझा विश्वास बसला आहे. केवळ मालीशसाठी मी तुझा वेळ घेणार नाही. मला गरज जाणवली तर मी पत्राने चौकशी करीन. तू तुझे काम करत राहा. आर्देशीर (दिनशा मेहतांचा मुलगा) चांगला असेल अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------

# ५ जानेवारी १९४५. ४२९. देवदास गांधी यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी ५, १९४५

चि. देवदास,

मला तुझ्या तारा वगैरे मिळाल्या. तू दाखवलेला संयम मला आवडला. तू जर इथे असतास तर हसला असता. मी माझ्या चुकीची किंमत मोजतो आहे. ज्याप्रमाणे डॉक्टर माझ्याकरिता नाहीत त्याचप्रमाणे आयुर्वेदही माझ्याकरिता नाही. माझ्या स्वतःच्याच उपचाराने मी विषापासून मुक्त होत आहे. दुरुस्त झाल्यानंतर जंत आणि ऍमिबाबद्दल काय करायचे ते मी पाहीन. दररोज माझ्या प्रकृतीत सुधारणा होत आहे.

. . .

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------

# १८ जानेवारी १९४५. ४९०. वसुमती पंडित यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी १८, १९४५

चि. वसुमती,

. . . .

तू तुझ्याबरोबर भरपूर औषधे घेतली नाही हे फार चांगले केले. अनेक दुखणी थोड्याशा उपचाराने दुरुस्त होत असतात. औषधांवर विसंबून राहणे ही अंधश्रद्धा आहे. स्थानिक जडीबुटी ही वेगळी गोष्ट आहे. पोट दुखण्याकरिता माणसाने उपवास केला पाहिजे, गरम पाणी प्यायला पाहिजे आणि गरम पाण्याने शेक घेतला पाहिजे. जर हगवणी होत असतील तर उपवास अत्यावश्यक आहे. रुग्णाचा फारच आग्रह असेल तर सोडा बाय कार्ब वा कडूनिंबाच्या पानाचे चूर्ण दिले पाहिजे. जर कोणाचे डोके दुखत असेल तर त्याने डोक्याला मातीचा लेप लावावा आणि भरपूर पाणी प्यावे आणि असेच किती तरी. हा केवळ मार्ग दाखवण्याचा प्रयत्न आहे. धीर धर, स्वतःबद्दल विचार कर, रामनामाचा जप कर आणि तसे करण्याकरिता इतरांची समजूत घाल.

आशीर्वाद,

बापू

वसुमतीबेन पंडित,

समौ, पोस्ट पुराना डिसा,

उत्तर गुजरात

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------

# २१ जानेवारी १९४५. ५१२. दिनशा के. मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी २१, १९४५

चि. दिनशा,

मला तुझे पत्र मिळाले. मी चांगला आहे. माझी शक्ती वाचवण्याकरता मी दिवसा मौन ठेवतो.

दुधाच्या उपचारपद्धतीवर अजून माझा विश्वास बसलेला नाही. परंतु मला जर तुझ्याबरोबर राहण्याची संधी मिळाली तर तुझ्या निरीक्षणाखाली मी तो उपचार निश्चितच घेईन. सध्या तर येथून निघण्याची इच्छाच होत नाही. मी येथील कामही करतो आहे. ईश्वर जेव्हा मला तिथे आणील तेव्हा मी येईन.

आपल्यात काही मतभेद आहेत. परंतु मला त्याची काळजी वाटत नाही. मी तुझ्याकडून काम घेऊ शकतो इतके माझ्याकरिता पुरे आहे.

देवदासला तू लिहिलेले पत्र तीक्ष्ण आहे, परंतु तू ते लिहिले हे योग्य केले. तू काय केले इतकेच तू लिहू शकला असता. खरे म्हणजे तू लिहिण्याआधीच मी त्याला लिहिले होते (पाहा "देवदास गांधी यांना पत्र", जानेवारी १, १९४५.).

न्यास तयार होईल. परंतु तो तयार होवो वा न होवो आपल्याला जर पुरेशी जमीन मिळाली तर आपण काम सुरू करण्याचा विचार करू शकतो. आणि तसाही तू काही रिकामा बसलेला नाही.

आर्देशीर चांगली प्रगती करत असेल. जिना साहेबांबद्दल तुला काय म्हणायचे आहे ते मला कळते.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता,

६, टोडीवाला रोड,

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------

# २४ जानेवारी १९४५. ५२६. घनश्यामदास बिर्ला यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी २४, १९४५

चि. घनश्यामदास,

मला तुझे पत्र मिळाले. माझा खोकला कधीचाच थांबला आहे. थकवा आहे, परंतु तोसुद्धा हळूहळू जात आहे. या वेळी मी केवळ निसर्गोपचार घेत आहे. हवाबदल करण्याची मला फारशी इच्छा नाही. तशी आवशयकता वाटली तर मी जाईन. . . . .

दिनशाकडून सविस्तर कळण्याची वाट कशासाठी पाहायची? तुझ्या म्हणण्याचा आशय तर तोच होता. केवळ काही हजार रुपयांची तर ही गोष्ट आहे. त्यात जितकी वाढ करायची असेल तितकी होऊन जाईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. सी. डब्ल्यू. ८०६४. सौजन्य - घनश्यामदास बिर्ला. शिवाय प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

--------------

# ३ फेब्रुवारी १९४५. ५८४. दिनशा के. मेहता

सेवाग्राम,

फेब्रुवारी ३, १९४५

चि. दिनशा,

मला तुझे पत्र, धनादेश, फोटो इत्यादी मिळाले. माझ्या यानंतरच्या पत्राबरोबर मी फोटो परत करीन. कोणीही मला अडवत नाही. माझाच दुग्धोपचारावर विश्वास बसत नाही. बाकी गोष्टींबाबत मी तुझ्याशी सहमत आहे.

आपल्यामध्ये जे मतभेद आहेत ते काळानुसार आपोआपच निवळतील.

घनश्यामने दिलेली देणगी काहीही झाले तरी निनावी राहिली पाहिजे. तिची आपण एखाद्या नावानेसुद्धा ओळख देणार नाही. त्या आकड्यापर्यंत पोहोचेपर्यंत तो देणे सुरू ठेवणार आहे. ही रक्कम आपल्याकडे एकदम येणार नाही. हिशोबात अर्थातच लहान लहान रकमा दिसतील. मला भिवंडीवाला वा फक्रियार जंग अशा नावांचा समावेश करणे आवडेल. याबद्दल मी तुला लिहीन. आता या क्षणी अजून काही लिहिण्याचा मी विचार करू शकत नाही. मला वाटते की मी थोडे जास्तच काम करून राहिलो आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

# ५ फेब्रुवारी १९४५. ६०१. ब्रिजलाल नेहरूंना पत्र

सेवाग्राम,

फेब्रुवारी ५, १९४५

भाई ब्रिजलाल,

मला तुमची स्नेहपूर्ण तार मिळाली. अशाच प्रकारे पाठवत राहा. अजून तरी मी काहीही घेतले नाही. परंतु आयुर्वेदाचे अथवा निसर्गोपचाराचे लोक काहीही करू शकत नसतील तर काय करावे हा प्रश्न आहे. ऍलोपॅथीचे डॉक्टर काही कमी वेळ घेत नाहीत. काय करावे ते मला सांगा?

आशीर्वाद,

बापू

ब्रिजलाल नेहरू,

अकौंटंट जनरल, काश्मीर

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------

# २३ फेब्रुवारी १९४५. ७०१. किशोरीलाल मश्रूवाला यांना पत्र

वर्धा,

फेब्रुवारी २३, १९४५

चि. किशोरीलाल,

तू आजारी पडला तेव्हापासून मला काळजी वाटत होती. तुम्ही दोघांनीही याचा विचार केला पाहिजे. मला वाटते की उपचार केला तर तुम्ही दोघेही दुरुस्त होऊ शकता. पहिली गोष्ट म्हणजे पुरेशी विश्रांती, काही निसर्गोपचार आणि योग्य योगासने. कटिस्नान हा उपचार फार गुणकारी असतो. त्याचा प्रयोग करून पाहा.

आशीर्वाद,

बापू

किशोरीलाल मश्रूवाला,

आश्रम, सेवाग्राम

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-------------

खंड 85

## २३ ऑक्टोबर १९४४. १०८. दिनशा के. मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

ऑक्टोबर २३, १९४४

चि. दिनसा.

मला तुझे विस्तृत पत्र मिळाले. न्यासपत्राचे काम सुरू असेल अशी आशा आहे. देवदास थोडा हळू आहे, परंतु मी त्याला त्याबद्दल विसर पडू देणार नाही. तू उल्लेखिलेल्या अडचणींची मी काळजी करत नाही कारण आपली दोघांचीही काळजी घेण्याकरिता ईश्वर आहे. आपण स्वतःकरिता काहीही करत नाही, करतो काय? जमीन आणि प्रवासाच्या सुविधांबद्दल मी रामेश्वरदासला लिहीत आहे. तुला माझे मागील पत्र मिळाले असेल अशी आशा आहे (पाहा "दिनशा मेहता यांना पत्र", ऑक्टोबर ९, १९४४.). आर्देशीर दिवसेंदिवस काही प्रगती करत असेल याची खात्री आहे.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - तुझ्या औषधोपचाराकरिता तुला काही औषधांची भर घालायची आहे काय? आवश्यक असेल तर ती आपण मिळवू शकू. तुझे गुजराती चांगले आहे.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------------

# १४ नोव्हेंबर  १९४४. २४९. दिनशा के. मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

नोव्हेंबर १४, १९४४

चि. दिनशा,

तुझे पत्र. जमिनीबद्दल आपण फार घाई करू नये. गोष्टींना वेळ होत आहे परंतु त्यातही ईश्वराचा हात आहे. माझ्या उपवासाबद्दल तुला काय म्हणायचे आहे ते मी समजू शकतो. त्याबद्दल अजून काहीही निश्चित नाही. आणि तो चाळीस दिवसांचा की कमी काळाचा राहील हेही ठरलेले नाही. मी प्रार्थना करतो आहे. मी उपोषण करीन तेव्हा तुझ्याबरोबर असलेले मला आवडेल परंतु या उपोषणाबद्दल काहीही ठरवणे माझ्या हाती नाही. अखेरीस मला तर माझी सोय पाहण्याची तरी संधी आहे काय? हा उपवास काम मी माझ्या प्रकृतीस्वास्थ्याकरिता करतो आहे? हे ईश्वराचे काम आहे त्याला मला जिथे न्यायचे असेल तिथे तो मला नेईल. कृपाकरून माझ्याकरिता कोणतीही तयारी करू नको. तू तुझ्या कामात पूर्णपणे व्यस्त राहा, हीच तुझी सर्वात जास्त मदत असेल. तुमच्यापैकी कोणीही काळजी करू नये. अर्देशीर प्रगती करत राहो. त्याला अजून पुढे जायचे आहे. त्याला अहिंसा शिकवा.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

-----------

# २ डिसेंबर १९४४. ३७६. अकबरभाई चावडा यांना पत्र

सेवाग्राम,

डिसेंबर २, १९४४

चि. अकबर,

तुझ्याकरिता मी घड्याळाची व्यवस्था केली आहे. तुला ते लवकरच मिळेल. मी तुझी सर्व पत्रे वाचली आहेत. तू चांगले काम करतो आहेस. ईश्वर तुला यश देईल.

तुला बरीचशी औषधे मिळतील परंतु त्यांची फारशी मदत होणार नाही. जोपर्यंत पाणी, अग्नी आणि माती उपलब्ध आहेत तोपर्यंत औषधांची आवश्यकता नाही. लोकांना उकळलेले पाणी प्यायला दे. यामुळे बहुतांश तक्रारी दूर होतील. तुझ्याजवळ असेल तर सोडा (बाय कार्ब) चा उपयोग कर. सोडा असलेल्या पाण्याने हगवण थांबेल. अन्न थांबवले पाहिजे. अन्न घेणे थांबवण्याकरिता लोकांची समजूत घाल. जे लोक तुझे ऐकणार नाहीत त्यांना मरू दे. ग्रामीण जडीबुटीचा शोध घे. तुझ्या तिथे निंबाची झाडे असतील. तू जर लोकांना निंबाची पाने चघळायला सांगितली आणि त्यांनी उपवास केला तर बहुधा त्यांचा ताप निघून जाईल. निंबाची पाने पाण्यात उकळ आणि त्यांनी फोड धू. पाणी कोमटच पाहिजे. फोडांच्या जखमांवर स्वच्छ मातीच्या पट्ट्या लाव. फोडांवर पट्टी बांधण्याकरिता स्वच्छ कापड घे. तुला जर चिंच मिळू शकत असेल तर लिंबाचे रस मिसळलेल्या पाण्याऐवजी तू चिंचोणी देऊ शकतो. लोकांचे निसर्गोपचाराचे ज्ञान ताजे करत राहिले पाहिजे. स्थानिक औषधी लोकांना उपलब्ध करून दिल्या पाहिजे. दुधाऐवजी भाताची पेज दे. तू जर त्यात गुळ मिसळला तर त्यामुळे अधिक शक्ती मिळेल. लोकांना आरोग्याचे नियम शिकव. ताप असलेल्या वा हगवण लागलेल्या लोकांना अन्न देणे बंद केले आणि त्यांना उकळलेल्या पाण्यावर ठेवले तर ५० टक्केपेक्षा अधिक लोक दुरुस्त होतात. याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही. पन्नास टक्के हा काटकसरीने केलेला अंदाज आहे. नारूकरिता गरम पाण्याने शेक आणि नारू बाहेर येताच त्याला बांधून ठेव. त्याचबरोबर कांद्याचा

पोल्टीस त्यावर बांधून पाहा. किशोरीलालभाई आणि सुशीलाबेन यांनी पाठवलेल्या सूचनाही तुला मिळाल्या असतील. मी केवळ साधे उपचार सुचवले आहेत. देवीबेनची इच्छा असेल त्याप्रमाणे तिला पाठवू दे. जर गायी, म्हशी, बकऱ्या कोणी देत असेल तर त्या घे. मांसाहारी लोकांना तू निःसंकोचपणे मटनाचे सूप देऊ शकतो. सूप म्हणजे ज्या पाण्यात मांस उकळले आहे ते पाणी. या गोष्टी उकळल्यानंर गरम द्याव्या. शाकाहाराचा प्रचार करण्याच्या प्रसंगाची ही धार्मिक वेळ नाही. जिथे दूध उपलब्ध नाही तिथे सूपचा फायदा होणे अपरिहार्य आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ३२३६

-------------

# ५ जानेवारी १९४५. ४२८. दिनशा मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी ५, १९४५

चि. दिनशा,

मी तुझ्या तारा वाचल्या. मला त्या आवडल्या. मी माझ्याच दोषामुळे आजारी पडलो होतो. आता मला माहीत असलेला केवळ निसर्गोपचार घेत आहे. मी आयुर्वेदाते विष बाहेर फेकत आहे. माझ्यात दररोज सुधारणा होत आहे. मी जर आता तुला बोलावले तर मी तुझा पूर्ण उपचार घेईन. परंतु दुधाच्या उपचारावर माझा विश्वास बसत नाही आणि वारंवार बस्ती घेण्यावरूनही माझा विश्वास उडाला आहे. आहार आणि मातीच्या लेपाच्या पट्ट्या अधिकफायदेशीर आहेत असा माझा विश्वास बसला आहे. केवळ मालीशसाठी मी तुझा वेळ घेणार नाही. मला गरज जाणवली तर मी पत्राने चौकशी करीन. तू तुझे काम करत राहा. आर्देशीर (दिनशा मेहतांचा मुलगा) चांगला असेल अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------

# ५ जानेवारी १९४५. ४२९. देवदास गांधी यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी ५, १९४५

चि. देवदास,

मला तुझ्या तारा वगैरे मिळाल्या. तू दाखवलेला संयम मला आवडला. तू जर इथे असतास तर हसला असता. मी माझ्या चुकीची किंमत मोजतो आहे. ज्याप्रमाणे डॉक्टर माझ्याकरिता नाहीत त्याचप्रमाणे आयुर्वेदही माझ्याकरिता नाही. माझ्या स्वतःच्याच उपचाराने मी विषापासून मुक्त होत आहे. मी दुरुस्त झाल्यानंतर जंत आणि ऍमिबा यांच्याबद्दल काय करायचे ते पाहीन. दररोज माझ्या प्रकृतीत सुधारणा होत आहे.

डॉ. दिनशांचा न्यास अजून अस्तित्वात आलेला नाही. तो लगेच आकार घेईल तर चांगले होईल. त्याने भरपूर वेळ घेतला आहे.

लक्ष्मी आणि मुले चांगली असतील अशी आशा आहे. चिरंजीव सुमीला मी लिहिले आहे (पाहा “सुमित्रा गांधी यांना पत्र”, जानेवारी ४, १९४५.).

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------

# ९ जानेवारी १९४५. ४४१. घनश्यामदास बिर्ला यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी ९, १९४५

चि. घनश्याम,

मी तुझी पत्रे वाचली वा वाचून घेतली. वैज्ञानिक दृष्टी न ठेवता मी आयुर्वेदाकडे वळलो नव्हतो. जे काही आहे तेच आपले धन आहे. यामुळेच ग्रामीण भागात आपण आयुर्वेदाला नेऊ शकलो तर चांगले होईल. पंडित शिवशर्मावर माझा विश्वास बसला आणि मी त्यांचा उपचार घेतला. याशिवाय त्यांच्या मर्यादा कळण्याचा इतर कोणताही मार्ग नव्हता. एकदा जेव्हा मर्यादा कळल्या तेव्हा वाटले की जिथे मी चूक केली आहे तिथून मी दूर झालो पाहिजे. यामुळे मी माझ्या निसर्गोपचाराचा आश्रय घेतला. निसर्गोपचारात चूक होण्याची फार कमी शक्यता असते. दररोज माझा काही ना लाभ होतो. तू जर इथे आला आणि तुझ्या डोळ्यांनी पाहिले तर तुझी सर्व भीती निघून जाईल. जंत आणि अमिबा याबद्दल मी तुमचाच औषधोपचार घेईन असे मी डॉक्टरांना सांगितले आहे. अजूनही मला जो थोडासा थकवा जाणवतो तो गेल्यानंतर याबद्दल मी अधिक चांगला विचार करू शकेन.

मला हवापालट करण्याची गरज नाही. मला जर आवश्यकता वाटली तर मी मुंबई, पुणे वा कदाचित पाचगणीला जाईन.

मला दिल्लीला जाणे आवडेल परंतु त्याबद्दल मी मागेपुढे पाहतो आहे. तरीही मी आग्रह धरणार नाही. तू जर मला कस्तुरबा निधीच्या संदर्भात घेऊन गेला तर मी दिल्लीला जाईन. तू जिथेकुठे नेशील तिथे मी येईन.

दिनशाबद्दलचे दस्तावेज तयार होणे आवश्यक आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. सी. डब्ल्यू. ८०६३. घनश्याम दास बिर्ला

# ९ जानेवारी १०४५. ४. ४२. आनंद तोताराम हिंगोराणी यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी ९, १०४५

चि. आनंद,

तुझे पत्र मिळाले. तुझे कान दुरुस्त होतात की नाही याला काय महत्त्व आहे? जितके आपण ईश्वरावर विसंबून राहू तितके आपण सुखी होऊ. वैद्य वगैरे आहेत परंतु ते आपल्याला ईश्वरापासून दूर ठेवतात. यामुळेच मी तुम्हा तिघांना तिथे पाठवणे पसंत केले. निसर्गोपचार आपल्याला ईश्वराजवळ घेऊन जातो. तोसुद्धा आपण घेतला नाही तरी माझा आक्षेप नाही. परंतु आपण उपवास का टाळावा? (याशिवाय पाहा "ए. एन. शर्मा यांना पत्र", जानेवारी ८, १९४५.) निसर्गोपचार म्हणजे निसर्गाकडे जाणे, ईश्वराकडे जाणे. मी कुठे पोहोचलो ते आपण पाहू या. आतून जी हाक येईल त्याप्रमाणे मी करेन.

आशीर्वाद,

बापू

हिंदी मायक्रोफिलमवरून. सौजन्य - राष्ट्रीय संग्रहालय भारत सरकार आणि आनंद तो. हिंगोराणी

--------------

# १८ जानेवारी १९४५. ४९०. वसुमती पंडित यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी १८, १९४५

चि. वसुमती,

मला तुझे पत्र मिळाले. मला तुझी मागील पत्रेसुद्धा मिळाली. मी हे जोहराला देत आहे.

मी चांगला आहे. माझ्याबद्दल मुळीच काळजी करू नको.

तू गेलीस हे चांगले केले. तुला भरपूर अनुभव मिळेल. अकबर तुझी काळजी तर घेईलच. तू तुझ्याबरोबर भरपूर औषधे घेतली नाही हे फार चांगले केले. अनेक दुखणी थोड्याशा उपचाराने दुरुस्त होत असतात. औषधांवर विसंबून राहणे ही अंधश्रद्धा आहे. स्थानिक जडीबुटी ही वेगळी गोष्ट आहे. पोट दुखण्याकरिता माणसाने उपवास केला पाहिजे, गरप पाणी प्यायला पाहिजे आणि गरम पाण्याने शेक घेतला पाहिजे. जर हगवणी होत असतील तर उपवास अत्यावश्यक आहे. रुग्णाचा फारच आग्रह असेल तर सोडा बाय कार्ब वा कडूनिंबाच्या पानाचे चूर्ण दिले पाहिजे. जर कोणाचे डोके दुखत असेल तर त्याने डोक्याला मातीचा लेप लावावा आणि भरपूर पाणी प्यावे आणि असेच किती तरी. हा केवळ मार्ग दाखवण्याचा प्रयत्न आहे. धीर धर, स्वतःबद्दल विचार कर, रामनामाचा जप कर आणि तसे करण्याकरिता इतरांची समजूत घाल.

आशीर्वाद,

बापू

वसुमतीबेन पंडित,

समौ,

पोस्ट पुराना डिसा,

उत्तर गुजरात

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------

# २१ जानेवारी १९४५. ५१२. दिनशा के. मेहता यांना पत्र

सेवाग्राम,

जानेवारी २१, १९४५

चि. दिनशा,

मला तुझे पत्र मिळाले. मी चांगला आहे. माझी शक्ति वाचवण्याकरता मी दिवसा मौन ठेवतो.

दुधाच्या उपचारपद्धतीवर अजून माझा विश्वास बसलेला नाही. परंतु मला जर तुझ्याबरोबर राहण्याची संधी मिळाली तर तुझ्या निरीक्षणाखाली मी तो उपचार निश्चितच घेईन. सध्या तर येथून निघण्याची इच्छाच होत नाही. मी येथील कामही करतो आहे. ईश्वर जेव्हा मला तिथे आणील तेव्हा मी येईन.

आपल्यात काही मतभेद आहेत. परंतु मला त्याची काळजी वाटत नाही. मी तुझ्याकडून काम घेऊ शकतो इतके माझ्याकरिता पुरे आहे.

देवदासला तू लिहिलेले पत्र तीक्ष्ण आहे, परंतु तू ते लिहिले हे योग्य केले. तू काय केले इतकेच तू लिहू शकला असता. खरे म्हणजे तू लिहिण्याआधीच मी त्याला लिहिले होते (पाहा "देवदास गांधी यांना पत्र", जानेवारी १, १९४५.).

न्यास तयार होईल. परंतु तो तयार होवो वा न होवो आपल्याला जर पुरेशी जमीन मिळाली तर आपण काम सुरू करण्याचा विचार करू शकतो. आणि तसाही तू काही रिकामा बसलेला नाही.

आर्देशीर चांगली प्रगती करत असेल. जिना साहेबांबद्दल तुला काय म्हणायचे आहे ते मला कळते. आशीर्वाद,

बापू

डॉ. दिनशा मेहता

६, टोडीवाला रोड,

पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

----------

# ४ फेब्रुवारी १९४५. ५८९. वेंकटसुबैय्या यांना पत्र

फेब्रुवारी ४, १९४५

प्रिय मित्र,

मला आजच तुमचे पत्र मिळाले. तुमचा पूर्ण अर्थसंकल्प पाठवा आणि तो मला आवडला तर मी तो विश्वस्त संस्थेकडे पाठवीन. संस्थेकरिता योजनेचा जोवर प्रश्न आहे निसर्गोपचारक हिच्याशी सहमत होतील काय? तुम्ही जर पुरेसे तरुण असाल तर भेटीची वेळ ठरवून इथे या आणि येथील रुग्णावर निसर्गोपचार करा. निसर्गोपचार इथे काम करत आहे परंतु ॲलोपॅथीचीच इथे मागणी आहे हे मला खेदाने कबूल करावे लागते.

अंतःकरणपूर्वक तुमचा,

मो. क. गांधी

श्री व्ही वेंकटसुबैय्या, आमदार,

कस्तुरीदेवीनगर,

नेल्लोर, (आंध्र)

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------

# ६ फेब्रुवारी १९४५. ६०६. शारदा गो. चोखावाला यांना पत्र

सेवाग्राम,

फेब्रुवारी ६, १९४५

चि. बबुडी,

डॉक्टरांचा सल्ला बरोबर नाही. तू आनंदला कोमट पाण्यात मोसंबीचा रस देऊ शकते. अथवा गरम पाण्याच्या भांड्यात त्या रसाचे भांडे ठेवून तो रस तू कोमट करू शकते व तो रस त्याला देऊ शकते. तू त्याला कोमट पाण्यात मध मिसळून देऊ शकते अथवा सरळ गुळ देऊ शकते. मध अधिक चागला राहील. तू त्याला भाज्यांचा सूप देऊ शकते. यामुळे त्याचे पोट साफ होईल आणि शौच्याला होऊन तो आनंदाने दूध घेईल. खोकला आणि सर्दी हे सर्व निश्चितपणे जातीला. त्याला सॅन्टोजेन देण्यात कोणतीही हानी नाही. तुला लगेच त्याचा परिणाम दिसेल. सर्वच मुले आजारी पडत असतात. तू काळजी करू नको. तू वाटेल ते औषध त्याला देऊ नको. सर्वच मुलांमध्ये आपोआप दुरुस्त होण्याची क्षमता असते. तो काय खातो याकडे लक्ष ठेव.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. १००५२. सौजन्य - शारदा गो. चोखावाला

--------------

खंड ८६

## २५ मे १९४५. ७३६. डॉ. दिनशा मेहता यांना पत्र

महाबळेश्वर,

मे २५, १९४५

चि. दिनशा,

नुकताच सायंकाळी तुझे पत्र मिळाले. मावळणकरबद्दल मी समजू शकतो. हिरा जरी कचऱ्याच्या ढिगात पडलेला असेल तरी तो उचलणे आणि त्यात आनंद मानणे आपले काम आहे. काही अंस हिरे गोळा करण्याकरिता पृथ्वीच्या पोटातून मणोगणती माती कशी काढली जाते हे मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. पैशाचा भाग वेगळा आहे. मावळणकर आपल्याबरोबर आले कारण त्यांचे वडील अतिशय उदार आणि चोखंदळपणे वागणारे होते.

तू शाहना बरोबर उत्तर दिले. त्यांनी दिलेले पैसे फी म्हणून तू ठेवून घेतले पाहिजे. मीसुद्धा त्यांना पैसे पाठवण्याकरिता लिहिले आहे. तू आला नाही याचा मला आनंद होतो. मी जर आजारी पडलो तर तुला बोलावीन; परंतु मी जर आजारी पडलो नाही तर कोणत्याही प्रकारची मालीश झाली तरी त्याने माझे काम भागू शकते. माझी मालीश करण्याऐवजी तू तिथे थांबून रुग्णांची काळजी घेणे आणि संस्थेला परिपूर्ण करणे मला अधिक पसंत आहे. ऊस गोड लागतो म्हणून तो मुळासकट खात नसतात.

. . . .

तू आल्यानंतर घनश्यामदासबद्दल आपण चर्चा केली तर बरे होणार नाही काय?

तुम्हा तिघांनाही आशीर्वाद,

बापू

दिनशा मेहता,

# निसर्गोपचार केंद्र, पुणे शहर

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

------------------

खंड ८७

# १९ जुलै १९४५. ४२०. दिनशा के. मेहता यांना पत्र

जुलै १९, १९४५

चि. दिनशा,

तुझ्या उपचाराखाली आधीच दोन मुली आहेत (जयसुखलाल गांधी यांची मुलगी मनू गांधी आणि नरहरी पारीख यांची मुलगी वनमाला पारीख; पाहा “मनू गांधी यांना पत्र”, जुलै २०, १९४५.). तुला त्यांत पूर्ण यश मिळो. आता बालकृष्णला (बालकृष्ण भावे, विनोबा भावे यांचे भाऊ) मी तुझ्याकडे पाठवण्याचा विचार करतो आहे. तो जर येऊ शकला तर ऑगस्टमध्ये येईल. मी त्याला सुवर्णपरपाटी (एक आयुर्वेदिक औषध) दिले, त्याचे वजन वाढले आहे. परंतु त्याचे जे काही वजन वाढले होते ते आता परत कमी झाले आहे. यामुळे त्याला तुझ्याकडे पाठवण्याचा माझा विचार आहे. मी त्याला सिमल्याहून लिहिले होते. त्याचे उत्तर सोबत जोडले आहे.

कदाचित सरदारही तिथे येतील. अर्थातच मी असे सुचवले आहे. ते जर आले तर कदाचित मलाही यावे लागेल. त्यांनी यावे असे तुला वाटते काय?

दोन मुलींशिवाय अजून एक मुलगी आहे. तिलासुद्धा पाठवण्याचा मी विचार करतो आहे. तीसुद्धा परिचारिकेचे काम शिकते आहे. तिची प्रकृतीही चांगली नाही. तिला सारखा ताप येत असतो. ती येऊ शकते काय? या तिघीही परिचारिकेचे काम शिकू शकतील आणि चांगल्या होतील अशी आशा आहे. तू त्यांना या पद्धतीने प्रशिक्षण द्यावे अशी माझी अपेक्षा आहे. गुलबेनला (दिनशा के. मेहता यांची पत्नी) तू पाचगणीला पाठवले काय?

तुम्हा तिघांनाही आशीर्वाद,

बापू

चिकित्सालय, पुणे

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

# २८ जुलै १९४५. ४८७. दिनशा के. मेहता यांना पत्र

जुलै २८, १९४५

चि. दिनशा,

तुझे पत्र मिळाले. आपण उपचाराबद्दल विचार करू. मी तिथे पोहोचल्यानंतर माझ्यावरील उपचाराचा आपण विचार करू. बालकृष्ण तयार असेल तेव्हा मी त्याला पाठवेन. मुसलमानांच्या शाळेच्या आणि टाटांच्या जमिनीबद्दल मला पाहावे लागेल. मला कळते त्याप्रमाणे यासंबंधात माझ्याकरिता करण्यासारखे काहीही नाही. आणि मी करू तरी काय शकतो? गावाला त्या जमिनीचा काहीही उपयोग नाही असा माझा विश्वास आहे. तिथे आरोग्यगृह बांधता येऊ शकते; यामुळे सिंहगडला जमीन असली तरी त्या जमिनीचा आपण उपयोग करू शकतो असे म्हणता येईल. परंतु ते सोड आणि मला तुझा दृष्टीकोन कळव. प्रेस्टन बहुधा महाग समजला जाईल. आपण ग्रामीण न्यासाच्या कल्पनेने पुढे जात आहो. त्याचा गुजरातीत अनुवाद करण्याची सूचना मी दिली आहे. गुलबाईंचे बाळंतपण केव्हा होईल? मनू आणि वेणूकडून तुला जे काही काम घ्यायचे असेल ते घे.

आशीर्वाद,

बापू

निसर्गोपचार केंद्र.

तोडीवाला रोड, रेल्वेस्टेशनसमोर, पुणे शहर

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---------------

# २८ जुलै १९४५. ४९५. वल्लभभाई पटेल यांना पत्र

सेवाग्राम,

जुलै २८, १९४५

भाई वल्लभभाई,

तुम्ही जर शस्त्रक्रियेविरुद्ध निर्णय घेतला असेल तर दिनशाच्या निसर्गोपचार केंद्रात जा. मी तुमच्याबरोबर येईन. मी आधीच त्यांच्याबरोबर सल्लामसलत केली आहे. ते आशावादी आहेत, आणि मीसुद्धा. काहीही झाले तरी तिथे गेल्याने तुमचे नुकसान होणार नाही. जर तुम्ही अहमदाबादला जाण्याचा निर्णय घेतला असेल तर ठरल्याप्रमाणे काही दिवस तिथे राहा.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. बापूना पत्रो - २ : सरदा वल्लभभाईने, पृष्ठ २८२

--------------------

खंड ८८

## ३ ऑक्टोबर १९४५. २३९. दिनशा के. मेहता यांना पत्र

ऑक्टोबर ३, १९४५

चि. दिनशा,

. . . .

कोणत्या तरी रुमानियामधील डॉक्टरकडून तपासून घेण्याकरिता सरदार परवानगी मागत आहेत. तुम्ही कोणाकडूनही तपासून घेऊ शकता पण उपचार तुमचाच (दिनशा के. मेहता यां) सुरू राहिला पाहिजे असे मी त्यांना सांगितले आहे.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल प्रतीवरून. सौजन्य - प्यारेलाल

----------------

# २८ जानेवारी १९४६. ४१९. एक पत्र

(हे पत्र देवनागरीत आहे.)

मद्रास

जानेवारी २८, १९४६

बंधूंनो,

तुमचे पत्र मिळाले. तुम्ही सर्व कमावते आहा. ईश्वराने तुम्हांला संपत्ती दिली आहे. यामुळे तुम्ही चिकित्सालयाला शुल्क म्हणून नाही तर यथाशक्ती तुम्हाला जे काही देता येणे शक्य असेल देत राहा. ही केवळ माझी इच्छा आहे. ते काहीही असले तरी मी काही आठवड्यातच तिथे येणार आहे. तेव्हा मला सर्व काही सांगा आणि मला शक्य असेल ते मी करीन.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

------------------

# २८ जानेवारी १९४६. ४१९. एक पत्र

(हे पत्र देवनागरीत आहे.)

मद्रास

जानेवारी २८, १९४६

बंधूंनो,

तुमचे पत्र मिळाले. तुम्ही सर्व कमावते आहा. ईश्वराने तुम्हाला संपत्ती दिली आहे. यामुळे तुम्ही चिकित्सालयाला शुल्क म्हणून नाही तर यथाशक्ती तुम्हाला जे काही देता येणे शक्य असेल देत राहा. ही केवळ माझी इच्छा आहे. ते काहीही असले तरी मी काही आठवड्यातच तिथे येणार आहे. तेव्हा मला सर्व काही सांगा आणि मला शक्य असेल ते मी करीन.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

---------------------

खंड ९०

# २५ मार्च १९४६. १९२. निसर्गोपचार - १

उरुळी [कांचन],

मार्च २५, १९४६

विठाबाई -

मी असा सल्ला देईन. तिने विवस्त्र होऊन सूर्यस्नान घेतले पाहिजे, त्यानंतर कटिस्नान आणि थंड पाण्यात घर्षण स्नान. जेवणात केवळ फळांचा रस आणि दूध अथवा ताक. तिची जर रामावर श्रद्धा असेल तर बहुधा ती दुरुस्त होईल. ती जर असे नियमितपणे करील तर ती निश्चितच बरीच चांगली होईल. संपूर्ण दुरुस्त होणे कठीण आहे.

हिरा -

फळ चावून तिने बाकीचा भाग फेकून दिला पाहिजे; दूध वा ताक घे; शिवाय कटिस्नान कर; पोटावर मातीचा लेप लावलेल्या पट्ट्या लाव. हे कसे करायचे तसेच माती कशी पाहिजे आणि ती कुठे मिळेल हे तिला दाखवावे लागेल. तिने सूर्यस्नानही घेतले पाहिजे.

अर्जुन -

तो जर नियमितपणे गरम आणि थंड पाण्यात आळीपाळीने बसला तर त्याला नियमितपणे लघ्वी होईल. त्याने उकळलेले पाणी प्यायला पाहिजे आणि फळांचा रस आणि ताक आहार म्हणून घेतला पाहिजे.

सलू -

हा तोच त्रास आहे काय? या गरीब माणसाच्या डोळ्यातून मोतीबंदू काढून काय उपयोग? माणसाने त्याबरोबरच राहायला पाहिजे. रामनामाचा जप कर. वेळ येईल तेव्हा ओठांवर रामनाम ठेवून जा. जर असे करता येणे शक्य नसेल तर त्याला दवाखान्यात ने आणि मोतीबिंदू काढून घे. मोतीबिंदूकरिता मला कोणताही उपचार माहीत नाही. ही काल आली होती काय? या उकाड्यातही तिला सूर्यस्नान दिले पाहिजे. यामुळे तिला घाम येईल आणि तिचे फोड सुकतील. डोक्यावर ओला टॉवेल घेऊन सर्व कपडे काढून सूर्यप्रकाशात पडून राहिली तर तिला काही फायदा होऊ शकेल असे मला वाटते. अशी पडून राहिलेली असताना तिने रामनामाचा जप करत राहिले पाहिजे. तिच्यावर हा सर्व उपचार इथे केला पाहिजे. तिचे फोड आपण स्वच्छ केले पाहिजे आणि त्यावर पट्टी बांधली पाहिजे. तिला तिच्या आहाराबद्दलही सल्ला दिला पाहिजे. हे सर्व जर इथे केले तरच तिच्यात सुधारणा होऊ शकेल.. . . .(पहिले नाव अस्पष्ट आहे.)

विठू -

हा काय खातो? याच्या जेवणात दूध, फळे, भाज्या आणि पोळ्या असल्या पाहिजे. सूर्यस्नान, कटिस्नान, घर्षणस्नान घ्यायला पाहिजे. याने जर नियमितपणे प्राणायाम केला तर याचा दमा कमी होऊ शकतो.

हिरूनाना -

दोन दिवस फळांचा रस; नंतर फळांच्या रसात दूध टाकायचा. सूर्यस्नान, कटिस्नान आणि घर्षणस्नान. शौच्याला साफ होत नसेल तर याने दोन दिवसांनंतर इनिमा घेतला पाहिजे. मातीचा लेप, टमाटे मिळत असतील तर टमाट्याचा रस.

राजू

सूर्यस्नान, कटिस्नान, घर्षणस्नान. ताक आणि फळांचा रस, दूध मुळीच नाही; तो जर ताकही पचवू शकत नसेल तर  सुरुवातीला फळांचा रस आणि उकळलेले पाणी.

महात्मा - लाईफ ऑफ मोहनदास गांधी, खंड ७, पृष्ठ ९६-९७मधील चित्रावरून

---------------------

# ३० मार्च १९४६. २१०. निसर्गोपचाराचा उपचार - २

उरुळी [-कांचन],

[मार्च [३०,] १९४६ ला वा त्यापूर्वी

(या दिवशी गांधीजी उरुळीहून निघाले होते.)

सुभद्रा (मुलीची आई) -

मुलीला संडासला होते काय? मुलीला डोके झाकून तू उन्हात ठेव; पोटावर मातीचा लेप लाव. मोसंबीचा रस दे. तिला कोमट पाण्यात स्टुलावर बसव. यामुळे संडास साफ होईल. असे करूनही तिला संडासाला साफ झाली नाही तर तिला इनिमा द्यावा लागेल. परंतु हे सर्व तुम्हा लोकांना करावे लागेल.

पारू (मुलगी) -

सूर्यस्नान, कटिस्नान, घर्षण स्नान. उकळलेले पाणी आणि ताक प्यायचे. मातीचे लेप.

मनू (मुलगी) -

सूर्य स्नान, बाष्पस्नान, थंड पाण्याने आंघोळ, मातीचा लेप. जेवण म्हणून दूध आणि फळांचा रस मिसळून घ्यायचा.

सदाशिव -

दुधाशिवाय तू टमाट्याचा रसही घेऊ शकतो, बाकी काही नाही. सूर्यस्नान, कटिस्नान आणि घर्षणस्नान.

आता बाकीचे लोक उद्या येऊ शकतात म्हणजे आजाऱ्यांना आपण आंघोळ घालू शकू.

अजी (मुलगी)

- फळांचा रस, सूर्यस्नान, कटिस्नान आणि घर्षण स्नान.

हिचे कपडे फार घाणरडे आहेत.

कोंडिबा/धोंडिबा -

रिकेट्सकरिता सर्वात चांगला उपाय सूर्यस्नान आहे दूध आणि फळांचा रस मिसळून घ्यायचा.

श्रीपाद -

याला कदाचित दवाखान्यात भरती व्हावे लागेल. त्याला जर चिठ्ठी हवी असेल तर तो चिठ्ठी घेऊन जाऊ शकेल.

हर्नियाकरिता दुसरा कोणताही उपाय नाही. मग तो लंगोटही घालू शकतो. तो हे सर्व जर करू शकत नसेल तर त्याने रामाला शरण जाऊन राहायला पाहिजे.

पार्वती -

फक्त मोसंबीचा रस. कटीस्नान आणि घर्षणस्नान; पोटावर मातीचा लेप, नियमितपणे सूर्यस्नान. ती जर इतके करील तर ती बरी व्हायलाच पाहिजे. काहीही झले तरी तिला रामनामाचे महात्म्य कळले पाहिजे.

जय (अथवा) . . .इथे नाव अस्पष्ट आहे. -

कोवळ्या सूर्यप्रकाशात काही मिनिट सूर्यस्नान घ्यावे, नंतर सावलीत नंतर परत सूर्यप्रकाशात. असे तिने एक तास करावे. हिला पाणी मिसळून फळांचा रस द्या. पाणी उकळलेले असावे. स्वच्छतेकरिता हिने दररोज आंघोळ केली पाहिजे.

सदाशिव -

फळांचा रस मिसळून दूध घ्यावे. पूर्णपणे कपडे काढून सूर्यस्नान; डोके नेहमी झाकलेले असले पाहिजे. केळीचे वा पपईचे पानही डोक्यावर ठेवता येईल. (पुढील भाग ‘विविध रुग्णांना सूचना’ मधून घेतला आहे.)

घाम येईपर्यंत उन्हात बसावे. तो आंघोळ करतो काय? उन्हात बसल्यानंतर जेव्हा याला गरम वाटेल तेव्हा याने थंड पाण्यात भिजवलेल्या स्वच्छ कापडाने शरीर पुसावे.

आज त्याला कटिस्नान कसे घ्यावे ते दाखवा.

होय आपण याला सूर्यप्रकाशात ठेवले पाहिजे. याला कटिस्नान दिले पाहिजे.

यालासुद्धा कटिस्नान दिले पाहिजे. आता याला दिसते काय? हा जर तिखटाशिवाय जेवेल, फळ खाईल, कटिस्नान आणि घर्षण स्नान घेईल तर हा पूर्णपणे चांगला होऊ शकेल.

याला संडास होते काय? याने काय खाल्ले? या वयात स्तनपान कसे? हा किती वर्षांचा आहे? दोन वर्षांच्या मुलाला स्तनपान का? याला फळांचा रस द्या. याला बस्तीची आवश्यकता आहे, ती इथेच देता येऊ शकते. आवश्यक व्यवस्था करा. जोशींनी हे सर्व पाहावे. आणि दोघांनाही कटिस्नान द्यावे.

ही मुलगी फार घाणेरडी आहे. तिने घर्षणस्नान घेतले पाहिजे, आणि सूर्यप्रकाशात बसून रामनामाचा जप करायला पाहिजे.

अजून जुने रुग्ण किती आहेत? त्यांच्यापैकी कितींना काल आंघोळ करण्याकरिता सांगितले होते? त्यांना आंघोळ घातली पाहिजे.

या मुली स्त्रियांसारख्या आहेत. त्यांच्यावर प्रभावतीने वा सुशीलालबेनने उपचार केला पाहिजे, आणि पुरुषांवर जोशीजींनी. पहिल्या बाईची तक्रार काय आहे? तिने पोटाला काय बांधले आहे? एक तर हिने इतके घट्ट बांधायला नको. हिने नग्न होऊन एकांतात उन्हात लांब पाय करून पडायला पाहिजे. हिने भाकरी खाणे बंद करून दूध आणि फळांवर राहायला पाहिजे. हिला परसाकड होते काय? ही काय करते? ती कोणाबरोबर आली आहे? हिच्या घरी कोणी आहे काय?

आपले एक मोजमाप आहे.

तर तू चांगल्या प्रकारे तपास. धिरूभाईंना मालीशकरिता पाठव. धिरूभाईंनासुद्धा बोलाव.

या सर्वांची नोंद कर.

याचे नाव आणि तक्रार विचार. हा काय खातो? नंतर त्याला उन्हात सर्व कपडे काढून झोपायला सांग. याने केवळ फळांचा रस घ्यायला पाहिजे; याने आधी गरम पाण्यात आणि नंतर थंड पाण्यात बसायला पाहिजे आणि बरे वाटेपर्यंत याने असे करायला पाहिजे. याला नियमितपणे जर परसाकड होत नसेल तर याला इनिमा दिला पाहिजे. याकरिता याच्या घरी कोणाला तरी पाठवले पाहिजे. हा जर नियमितपणे इतके करेल तर याचा रोग जाईल आणि मग याने श्रद्धापूर्वक रामनामाचा जप करायला पाहिजे.

महात्मा - लाईफ ऑफ मोहनदास गांधी, खंड ७, पृष्ठ ९६-९७मधील चित्रावरून

-----------------

# १६ ऑक्टोबर १९४६. ४८५. शारदा गो. चोखावाला यांना पत्र

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १६, १९४६

चि. बबुडी (शारदा),

मला तुझे पत्र मिळाले. तू जर नीट खाशील तर तुझे वजन वाढेल. शंकरीबेनने कटिस्नान आणि घर्षणस्नानाचा प्रयत्न केला पाहिजे. डोके दुखते (मायग्रेन) त्या ठिकाणी तिने मातीचा लेप लावला पाहिजे.

मी इथे अडकलो आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. १००६७. सौजन्य - शारदा गो. चोखावाला

---------------